म. ग्रं स. ठाणें
विषय मु प्रवास
सं. ६२०

REFBK-0023327

REFBK-0023327

# स्वप्नातून सत्याकडे

[ प्रवासवर्णन ]

लेखिका

**वासंती घैसास**

प्रथमावृत्ती :
१ जुलै १९८१

मूल्य : २० रुपये

प्रकाशिका :


श्रीमती विजया खाडेकर
निरंजन प्रकाशन
१२२७ लेले क्वार्टर्स
शिवाजीनगर
पुणे ४११००४

मुद्रक :

सौ. उषा ज. नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर
९१८ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०.

# अमेरिका

## अमेरिका-प्रवास मार्ग



# आभार

पहिल्यादा आभार मानायला हवेत नशिबाचे, ज्याने मला मनाजोगता जोडीदाराची दिला. केवळ माझ्या यजमानांच्या जिद्दीमुळेच ही सफर मला घडली.

डॉ. प्रदीप पटवर्धनासारखा सहप्रवासी आम्हाला लाभला हे आमचे आणखी एक भाग्य. टाईम, स्पॅन यासारखी अनेक मॅगॅझिन्स वाचून त्यांचे अमेरिकेविषयीचे ज्ञान इतके पक्के होते की कोठे काय बघण्यासारखे आहे हे ते एखाद्या सराईत माहितगारासारखे आधीच सांगत असत.

ही ट्रिप आखण्यासाठी ज्यांनी आम्हाला वेळोवेळी उपयुक्त माहिती दिली त्यात ॲनास्थेटिस्ट डॉ. बाळासाहेब देशपांडे, बालरोगतज्ञ डॉ. चोभे, एन्. सी. एल्. मधील शास्त्रज्ञ डॉ. मित्रा, डॉ. इंगळे, डॉ. पानसरे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो.

हे पुस्तक लिहिण्यासाठी उद्युक्त केल्याबद्दल माझ्या मैत्रिणीचे वडील श्री. बाबासाहेब गुत्ते आणि एन्. सी. एल्. मधील एक पितृतुल्य शास्त्रज्ञ डॉ. त्र्यं. रं. इंगळे याचे प्रेमळ आग्रहयुक्त सहाय्य मी कधीही विसरू शकणार नाही.

या ट्रिपमध्ये देश-परदेशच्या ज्या अनेक मित्र-मैत्रिणींनी विविध प्रकारचे सहाय्य केले त्याचा खास ऋणनिर्देश.

# अनुक्रमाणिका

## अमेरिका


| | |
|---|---|
| सूतोवाच | १ |
| प्रयाण | १३ |
| न्यूयॉर्क | २१ |
| सिरॅक्यूज | ३८ |
| नायगरा | ४४ |
| डेट्राईट | ४९ |
| शिकागो | ५४ |
| माऊंट रश्मोर | ६३ |
| यलोस्टोन नॅशनल पार्क | ६५ |
| सानफ्रान्सिस्को | ६९ |
| लॉस ॲंजेलिस | ७४ |
| लास वेगास | ८९ |
| ग्रॅंड कॅनियन | ९३ |
| अलबुर्की | ९५ |
| कोलोराडो स्प्रिंग्ज् | ९७ |
| डेनव्हर ते अटलांटा | १०२ |
| अटलांटा | १०५ |
| वॉशिंग्टन डी. सी. | १०९ |
| ग्रेहाऊंड | ११९ |
| आणि परत न्यूयॉर्क | १२४ |

## युरोप

युरोपिअँन देशांचा प्रवास करण्यापूर्वी . १११
लंडन .. .. . १२२
लंडन ते व्हेनिस ... ... ... ... १४५
व्हेनिस ... . ... १५१
रोम .. . .... १५३
जिनिवा .. .. ... . १६०
ॲमस्टरडॅम ... ... .. ... १६६
म्युनिक ... ... .. ... १६९
कोपनहेगन .. ... ... १७५
पॅरिस ... ... ... १७७
पुन्हा लंडन आणि भारत ... ... .. १८७

# अनुक्रमणिका

## अमेरिका


| | |
|---|---|
| सूतोवाच | १ |
| प्रयाण | १३ |
| न्यूयॉर्क | २१ |
| सिरॅक्यूज | ३८ |
| नायगरा | ४४ |
| डेट्राईट | ४९ |
| शिकागो | ५४ |
| माऊंट रश्मोर | ६३ |
| यलोस्टोन नॅशनल पार्क | ६५ |
| सानफ्रान्सिस्को | ६९ |
| लॉस अँजेलिस | ७४ |
| लास वेगास | ८९ |
| ग्रँड कॅनियन | ९३ |
| अल्बुर्की | ९५ |
| कोलोराडो स्प्रिंग्ज् | ९७ |
| डेन्व्हर ते अटलांटा | १०२ |
| अटलांटा | १०५ |
| वॉशिंग्टन डी. सी. | १०९ |
| ग्रेहाऊंड | ११९ |
| आणि परत न्यूयॉर्क | १२४ |

## युरोप


युरोपिअन देशांचा प्रवास करण्यापूर्वी ... १११

लंडन ... १२३

लंडन ते व्हेनिस ... १४५

व्हेनिस ... १५१

रोम ... १५२

जिनिवा ... १६०

ॲमस्टरडॅम ... १६६

म्युनिक ... १६९

कोपनहेगन ... १७५

पॅरिस ... १७७

पुन्हा लंडन आणि भारत ... १८७

23320

# सूतोवाच

लहानपणापासूनच मला प्रवासाचे फार वेड. शालेय जीवनातील छोट्या सहली किंवा महाविद्यालयीन दीर्घ मुदतीचे प्रवास मी कधीच चुकवले नाहीत. इतकेच नव्हे तर पदवी संपादन केल्यानंतर नोकरी करून स्वतः पैसे कमावू लागताच, 'प्रवासाकरिता प्रवास' म्हणून एकदा तरी 'जगप्रवास' करण्याची स्वप्ने मी रंगवू लागले. डॉ. विजय घैसास यांचेशी विवाहबद्ध झालेनंतर आपल्या स्वप्नरंजनास साथ देणारा जोडीदार मिळाला हे पाहून तर माझ्या आनंदास पारावार राहिला नाही. आम्हा दोघांच्या अमेरिकेस जाऊन आलेल्या वा स्थायिक झालेल्या अनेक मित्र-मैत्रिणींच्या तोंडून "अमेरिका म्हणजे पृथ्वीतलावरील सुख, समृद्धि, सुबत्ता यांचे माहेरघर" हे वर्णन पुष्कळदा ऐकले होते. तेव्हापासून जगप्रवासाची सुरुवात तरुणपणीच, शक्यतो लवकरात लवकर अमेरिकेची छोटीशी का होईना सफर करून करावी असे आम्हा दोघांना बरचेवर वाटू लागले. कोणी कितीही चिक्कू म्हटले तरी वायफळ खर्च न करता हळू हळू पैसे साठवू लागलो. जेव्हा थोडीशी माया गाठीला जमली आणि थोडे कर्ज काढून परत फेडायचा आत्मविश्वास आला, तेव्हा गाडी घेण्याच्या लोकाग्रहाला न जुमानता अमेरिका बघण्याच्या स्वप्नाला सत्यात उतरविण्याचे ठरविले. प्रवासाच्या दोन महिन्याच्या काळात माझ्या चार वर्षांच्या मुलीस ( मनाली ) संभाळण्याची तयारी सासूबाईंनी दर्शविताच ताबडतोब अमेरिकेस जाण्यासाठी लागणारी तयारी करण्याच्या हालचालीस सुरुवात केली. माझ्या यजमानांचे मित्र डॉ. प्रदीप पटवर्धन हेही सपत्नीक आमच्याबरोबर येण्यास तयार झाल्यामुळे तर दुधात साखर पडली.

आम्ही अमेरिकेस जाणार हे कळल्यावर भेटणारा जवळजवळ प्रत्येकजण विचारी "तुमचे कोण आहे तिकडे?" कोणी अमेरिकेत असेल तरच लोक अमेरिकेस जातात हे आपल्या लोकांच्या मनावर इतके बिंबले आहे की केवळ प्रवासी म्हणून कोणी जातील असे त्याना वाटतच नाही त्यामुळे आम्ही फक्त सृष्टिसौंदर्य, मानवनिर्मित ऐश्वर्य पहाण्यास जाणार, थोडे फार शिक्षण

घेण्याससुद्धा जाणार नाही हे ऐकून कित्येकांना आश्चर्य वाटले. आम्हाला हा प्रवास ठराविक दिवसात करावयाचा असल्यामुळे एका भारतीय प्रवासी कंपनीतर्फे तो ठरवावा व त्यांचे बरोबरच ही सहल पार पाडावी म्हणजे थोड्या वेळात सर्व गोष्टी चांगल्या तऱ्हेने पहाता येतील असे विजयचे मत होते. त्या दृष्टीने एका नावाजलेल्या प्रवासी कंपनीचे एजंटची गाठ घेतली त्या कंपनीच्या 'न्यूयॉर्क ते सान्फ्रान्सिस्को व परत' अशा मे-जून ते ऑक्टोबर महिन्यात दर सोमवारी हिंदुस्थानातून सहली निघणार असल्याच्या भल्या मोठ्या जाहिरातीही वर्तमानपत्रातून झळकत होत्या. ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या सोमवारी निघायचे निश्चित करून आमच्या जागा राखून ठेवण्यासाठी लागणारी प्रत्येकी १०००/- रु. अनामत रक्कमही भरली. सहलीचे संयोजक कंपनीच्या पुढील कार्यक्रमाबद्दल आम्हाला लवकरच कळवतील अशी आशा करीत आम्ही वाट पहात होतो, पण कोठे माशी शिंकली कोणास ठाऊक ! कंपनीचे एजंट सहल नक्की केव्हा निघेल ते सांगेनात आणि उरलेले पैसे देण्याचा तगादाही लावेनात. जसजसा ऑगस्ट महिना जवळ येऊ लागला तसतसे आम्ही बेचैन होऊ लागलो.

आम्हाला अमेरिकेची सफर ऑगस्ट ते ऑक्टोबर (मुख्यतः सप्टेंबर) महिन्यातच करावयाची होती. या काळात अमेरिकेतील सृष्टिसौंदर्य अवर्णनीय असते. या ऋतुला तिकडे 'Fall season' म्हणतात. यावेळी झाडाच्या पानांचे रंग हिरव्यांचे तांबडे, पिवळे, नारिंगी, जाभळे होतात. त्यानंतर पाने गळून पडण्यास सुरवात होते. थंडीच्या सुरवातीस झाडांचे खराटे होऊन बर्फ पडावयास लागतो. तसेच अमेरिकेत सप्टेंबरमधे शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्यामुळे हॉटेल्समध्येही रहावयास जागा मिळणे सोईचे जाते. कोठल्याही परिस्थितीत अमेरिकेस जाण्यासाठी १९७८ हे साल आणि ऑगस्ट ते ऑक्टोबर हा कालावधी आम्हाला चुकवायचा नसल्याने वरील कंपनीवर विश्वास न ठेवता स्वतःचे जबाबदारीवर हे परदेशागमन पार पाडावे असा विचार आमच्या मनात आता डोकावू लागला.

खर म्हणजे अनोळखी देशातील असा दीर्घ मुदतीचा प्रवास एकट्या स्त्रीने किंवा पती-पत्नीने करणे तसे धोक्याचेच. पुरुष कोठे कामाकरिता गेला तर बाई एकटी पडते, तिला सामानसुमान सोडून जाता येत नाही.

आमच्याबरोबर डॉ. प्रदीप व सौ. रेखा पटवर्धन येणार असल्याने आम्हाला स्वतंत्रपणे प्रवास करण्याचा बेत ठरविण्यास काहीच अडचण वाटली नाही. उलट आपल्या मनाप्रमाणे अमेरिका बघता येईल, पाहिजे त्या ठिकाणी कमी–जास्त वेळ राहता येईल, मित्रमंडळींना भेटता येईल असे वाटू लागले. अमेरिकनाचे जीवन जास्त जवळून बघायची ही संधी न सोडायची ठरविली आणि एक दिवस मनाचा हिय्या करून दुसऱ्या एजंटकडून 'एअर इंडिया'ची 'मुंबई ते न्यूयॉर्क व परत' अशी चार तिकिटे बुक केली. आधीचे प्रवासी कंपनीचे एजंटला त्यांच्या कंपनीबरोबरचा प्रवास रद्द करत असल्याचे कळविण्यास गेलो तेव्हा ते काय म्हणतील म्हणून मनात धाकधूक वाटत होती; परंतु त्यानी मंदस्मित करून, काहीही खळखळ न करता आमची अनामत रक्कम ताबडतोब परत दिली. खरं म्हणजे मला याचे आश्चर्यच वाटले. चौकशीअंती असे कळले की कंपनीस जर कमीत कमी पंचवीस प्रवासी मिळाले तरच त्याना ही सहल काढणे परवडते; नाहीतर कंपनी तेवढे प्रवासी मिळेपर्यंत सहल पुढे ढकलत राहते किंवा एवढे मेंबर गोळा करणे जर जमले नाही तर सहलच रद्द करतात. या बाबतच्या माहिती-संबंधी खुद्द प्रवाश्याना मात्र शेवटपर्यंत अंधारातच ठेवण्यात येते. ज्यांना वेळेचे बंधन नाही असे हौशी प्रवासी वा पेन्शनर्स कितीही वेळ वाट पाहू शकतात व सहल निघेल तेव्हा जातात. आमच्याबाबतीत ते शक्य नव्हते.

अमेरिकेस जाण्याचे विचार मनात घोळू लागल्याबरोबरच म्हणजे जवळ जवळ वर्षभर आधीच आम्ही पासपोर्टस काढून ठेवले होते. परिचयाच्या लोकांचे पत्ते, विशेषतः टेलिफोन नंबर्स मिळवून त्यांच्याकडे जाणार नसलो तरीही अमेरिकेत येत असल्याची पत्रेही टाकली होती. अमेरिकेत स्थायिक झालेल्या नागरिकाकडून स्पॉन्सरशिप (Sponsorship) मिळवून, अमेरिकन व्हिसाही आमचे आम्हीच मिळविले होते. परदेशांत जाण्यासाठी ज्यावी लागणारी देवी आणि कॉलऱ्याची प्रतिबंधात्मक इंजेक्शन्स घेऊन त्याबद्दलची वैद्यकीय प्रमाणपत्रेही तयार होती. म्हणूनच इतक्या शेवटच्या क्षणी आपले आपण सप्टेंबरमधेच जाण्याचे ठरविता आले.

अशी ऐनवेळी ठरविलेली सफर म्हणजे एक धाडसच होते. कारण ही सहल एकादेवेळी स्वस्त व मस्त होण्याची शक्यता होती किंवा विमानातून

नुसती अमेरिकेची वारी होण्याचाही संभव होता. वेळ, पैसा यांचा अपव्यय तर होणार नाही ना अशा शंकेची पाल मनात अनेकदा चुकचुकायची. अजून संसाराचा सर्व खर्च व्हावयाचा असूनही एवढ्या लहान वयात इतके पैसे खर्च करायची जिद्द आम्ही दाखवित आहोत म्हणून कोणी कौतुक करील तर नाव नको. सर्व दिशांनी नन्नाचा पाढा. या प्रवासाकरिता कोणी उत्तेजन तर दिले नाहीच पण सावधगिरीचा इशारा देण्याची संधी मात्र कोणीही सोडली नाही. "एवढं आताच जाण्याचं काय नडलंय ? चार वर्षांच्या मुलीस एकटे सोडून जाणं तुम्हाला शोभतं का ? " अशा वाग्बाणांनी निराश मात्र केले. एवढंच काय "पोरीकडे पाहून निदान तू तरी अमेरिकेस जायचा नाद सोड. यजमानांना वाटल्यास एकट्याला जाऊ दे. तिला येथे काही झालं तर ? " असा उपदेश काकुळतीस येऊन एका नातेवाईक बाईंनी मला केला. हे ऐकून माझ्या मनास किती वेदना होत असतील आणि मी करते त्यात काही चुकत तर नाही ना असे कितीदा वाटले असेल ते सांगता येणार नाही. "जावे त्याच्या वंशा" हेच खरे !

आमचा अमेरिकेस जाण्याचा निश्चय एवढ्या इशाऱ्यांना तोंड देऊनही पक्का आहे हे बघून अनेक जण त्यांना तिकडून पाहिजे असलेल्या वस्तूंच्या याद्या आणून देऊ लागले. त्यावेळी त्यांच्या मनात एवढा साधा विचारही आला नाही की हे लोक केवळ हौशी प्रवासी म्हणून अमेरिकेत जात आहेत. यांचे कोणी जवळचे नातेवाईक तेथे नाहीत. प्रवाशाना मिळणाऱ्या प्रत्येकी ५०० डॉलर्समध्येच त्यांना भागवायचे आहे, तेव्हा अमेरिकेतच डॉलर्स कमावत असल्यासारखे यांना आपण काही आणावयास सांगू नये. आम्ही आमचेजवळचे पैसे प्रथम सौंदर्यस्थळे पहाण्यावर खर्च करायचे, उरले तरच खरेदी करावयाची असे ठरविले होते. सर्व प्रवास आमचा आम्हीच करणार असल्याने नक्की किती खर्च येईल याचा काहीच अंदाज नव्हता म्हणून कोणीही कितीही शिष्ट म्हटले तरी उगाच खोटी आश्वासने देण्यापेक्षा मी स्पष्टपणे "मला नाही वाटत तुमच्यासाठी काही विकत आणणे जमेल" असे सांगत असे. पण विजय मात्र "हो ! हो !' करत. माझा नकार ऐकून निराश न झालेलेही महाभाग भेटलेच. ते एवढे जहांबाज की "तुम्हाला काय कमी आहे ? आम्ही येथे पैसे देऊ. फुकट नको हं"

म्हणून रिकामे होत. कोणी साड्या, फॉक्स, सेंटस् , खेळणी यासारख्या वस्तू त्याच्याकरिता आणावयास सांगितल्या, तर कोणी आम्ही आतापर्यंत विशेष कोणी न गेलेल्या ठिकाणी जात असल्यासारखे "काहीही चालेल पण आमचेकरिता काहीतरी आणाच" असेही सागितले. माझी खूप इच्छा होती प्रत्येकाला काहीतरी भेटवस्तू आणण्याची. ज्यांनी स्वतःसाठी काहीही आणायला न सांगता नुसत्या सदिच्छा दिल्या त्यांच्याकरिताच जमल्यास प्रथम काहीतरी आणावयाचे मात्र मी नक्की ठरवून टाकले. "आमचेकरिता 'हे' आणा म्हणणाऱ्यांप्रमाणे "आमच्या नातेवाईकांकरिता 'हे' न्या सांगणारेही महाभाग भेटले. एकाने दोन किलो बर्फी सान्फ्रान्सिस्कोला नेण्या-संबंधी विचारणा केली. आम्ही निघाल्यापासून तीन आठवड्यांनी तेथे पोचणार असल्याने ती चांगली राहील याची शाश्वती नव्हती म्हणून नकार देताच त्यांचा राग ओढवून घ्यावा लागला.

आम्ही येथून निघण्यापूर्वी काहीच दिवस आधी अमेरिकेस जाणाऱ्या प्रवाशाकरिता रोम, फ्रँकफुर्ट, पॅरिस, जिनिवा किंवा लंडन यापैकी एके ठिकाणी दीर्घ मुदतीचा स्टॉप जाताना अगर येताना घेता येईल, मात्र पुन्हा त्याच स्टॉपवरून भारतात परत आलं पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही स्टॉपवर ( जरी ते ठिकाण भारताच्या जवळ असले तरी ) विमानात बसू दिले जाणार नाही अशी नाविन्यपूर्ण सवलत 'एअर इंडिया' कंपनीने जाहीर केली. (सध्याच्या नियमानुसार हा स्टॉप जाताना व येताना दोन्ही वेळेस घेता येतो ). यामुळे याच प्रवासात युरोपही पहाणे शक्य होणार होते. यासाठी प्रत्येकी फक्त ३६५ रु. जादा भरावे लागणार होते. हे पैसे भरून आम्ही लंडन ला परत येताना थांबायचे ठरविले. त्याचप्रमाणे अमेरिका पहाण्या-करिता 'ग्रेहाऊंड' ( Greyhound ) या प्रवासी वहातूक करणाऱ्या कंपनीच्या बसचे एक महिन्याचे तिकीट न्यूयॉर्कमध्ये काढावे असेही अनेक अमेरिकेला जाऊन आलेल्यांशी विचारविनिमय करून ठरविले.

परदेशी प्रवास करावयाचा असला तर काय काय गोष्टी कराव्या लागतात याची स्थूलमानाने कल्पना यावी म्हणून त्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत. यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलांची माहिती प्रवासी कंपन्यांचे एजंटस् देतात.

१. **पासपोर्ट** ( Passport ) : परदेशी जाण्याचे विचार मनात घोळू लागल्याबरोबर पासपोर्ट काढून ठेवावा. हा मिळावयास साधारणतः ४० ते ५० दिवस लागतात व त्यासाठी ५० रु. फी पडते. एखाद्या एजंटातर्फे काढणे फार सोईस्कर जाते. या कामाकरिता ते सुमारे १०० रु. शुल्क आकारतात.

२. **व्हिसा** ( Visa ) : प्रत्येक देशाचे व्हिसा देण्यासंबंधीचे वेगवेगळे नियम असतात. युरोपियन देश व्हिसासाठी शुल्क घेतात पण या देशाचे व्हिसा एजंट लोक थोडे कमिशन घेऊन काढून देतात. अमेरिकन व्हिसाला पैसे पडत नाहीत. पण भारतीय प्रवासी कंपनीने ठरविलेल्या सफरीबरोबर जर आपण जाऊन त्यांचेबरोबरच परत येणार असलो तर ती कंपनी अमेरिकेत प्रवेश करण्याकरिता आपला व्हिसा काढून देते, परंतु सफर संपल्यानंतर जर आपल्याला अमेरिकेत राहून स्वतंत्ररित्या भटकायचे असेल तर बहुदा आपला व्हिसा आपल्यालाच काढावा लागतो. विशेषतः डॉक्टर्सना अमेरिकन व्हिसा मिळायला थोडी जास्त कटकट होते.

३. **अमेरिकेचा व्हिसा** . हा व्हिसा मिळण्याकरिता मुख्यतः अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या एखाद्या व्यक्तीने " अमेरिकेत येणाऱ्या या प्रवाशाच्या खर्चाची सर्व जबाबदारी मी घेत आहे " असे पत्र द्यावे लागते. याला Sponsorship असे म्हणतात. हा स्पॉनसरशीपचा फॉर्म अमेरिकेतून भरून तेथील योग्य अधिकाऱ्यांच्या सही-शिक्क्यानिशी भारतातील इच्छूक प्रवाशाकडे पाठवावा लागतो. वरील कागदपत्रांशिवाय आपण अमेरिकेत मुक्काम न करता सहल आटपताच भारतात परतणार आहोत हे दाखविण्याकरिता स्थावर मालमत्तेसंबंधीचे दाखले, बँकेतील ठेवींच्या पावत्या, आयकर भरल्याचे सर्टिफिकिट, नोकरी असेल तर रजा मंजूर झाल्याचे व परत आल्यावर कामावर रुजू होण्याबद्दलचे ऑफिसचे पत्र वगैरे गोष्टी व्हिसा काढायला जाताना बरोबर न्याव्यात; जेणे करून आपण भारतात नक्की परत येणार असल्याचे अधिकाऱ्यांना पटवून देऊ शकू. अमेरिकन व्हिसा मिळविण्यासाठी भरावा लागणारा ॲप्लिकेशन फॉर्म एजंटस्‌कडे मिळतो.

सर्व कागदपत्रांची जुळणी झाल्यानंतर मुंबईस अमेरिकन कौन्सिलेटमध्ये ( पत्ता लिंकन हाऊस, भुलाभाई देसाई रोड, बीच कँडी हॉस्पिटल-जवळ, मुंबई २६ ) जाऊन ती दाखविल्यानंतर त्यांना आणखी काही माहिती नको

असल्यास व्हिसाचा शिक्का मारून देतात नाहीतर परत इंटरव्ह्यूला यायला सांगतात. अमेरिकन कौन्सिलेटमध्ये फोनवरून अपॉईंटमेंट मिळत नाही. कामाच्या दिवशी सकाळी ८–३० वाजता कौन्सिलेट उघडते तरी अमेरिकेस जाऊ इच्छिणारे लोक सकाळी ६ वाजल्यापासूनच रस्त्यावर रांगेत उभे असतात. तेथे 'First come first served' अशी पद्धत असल्याने रांगेत जाऊन उभे राहण्याशिवाय दुसरा मार्ग सर्वसामान्य प्रवाशास तरी दिसत नाही. कौन्सिलेटमध्ये भेटण्यास शक्यतो शुक्रवारी जाऊ नये कारण त्यांचा आठवडा सोमवार ते शुक्रवार असल्याने शुक्रवारी उद्या इंटरव्ह्यूला या म्हणून सांगितले तर सोमवारी जावे लागते आणि मुंबईबाहेर रहाणाऱ्यांचा वेळ व पैसा निष्कारण वाया जातो.

वर निर्देश केल्याप्रमाणे प्रवास करण्याकरिता जावयाचे असेल तर अमेरिकेत काही शिकावयाचे आहे, जमले तर काही काळ रहावयाचे आहे असे आजिबात दर्शवू नये कारण त्यामुळे एखादेवेळी प्रवासी व्हिसासुद्धा नाकारला जाण्याची शक्यता असते. अमेरिकेत भारतीय लोक या ना त्या कारणाने जाऊन नोकऱ्या पत्करतात व कायम वास्तव्य करतात, याला आळा बसावा म्हणून अमेरिकन सरकार ही काळजी घेते. भारतातील सुमारे दोन लाख रुपयांची मिळकत अमेरिकेतील मध्यमवर्गीयाची एक वर्षाची कमाई आहे. या परिस्थितीमुळे भारतात सुस्थितीत असलेलेही अनेक लोक तिकडे स्थाईक व्हायला उत्सुक असतात. या बुद्धिमान तरुणांच्या गळतीस कसा आळा घालावा याबाबत भारत सरकार विचार करत आहे तर अमेरिकन सरकारनेही त्याच्या देशातील आयात बंद व्हावी म्हणून पुष्कळ उपाय योजले आहेत. यातील एक भाग म्हणजे अमेरिकेत प्रवेश करण्यासाठी व्हिसा देताना आखलेले कडक धोरण. प्रवासी जर मेडिकल डॉक्टर असेल तर हे निर्बंध जास्तच कडक आहेत.

आमचा इंटरव्ह्यू एका चाणाक्ष अमेरिकन बाईने घेतला. तिनेच आमचे नाव पुकारून दारही उघडले. सबंध कौन्सिलेटच्या ऑफिसमध्ये बाहेरच्या दरवाज्यातील वॉचमन सोडल्यास कोणीही चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी दिसले नाहीत. रिसेप्शनिस्टही नव्हती. वॉचमनच सेक्रेटरीसारखी माहिती पुरविणे, इंटरव्ह्यूला नंबर देणे, इत्यादी कामे करत होता. विजयला "अमेरिकेत डॉक्टर्स खोऱ्याने पैसा मिळवितात. तुला त्या देशात प्रॅक्टीस सुरू करावी

असे वाटत नाही का ? " तर मला " तू शास्त्राची पदवीधर आहेस, एन्. सी. एल्. मध्ये इतकी वर्षे काम करत आहेस, तुला अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशात संशोधन करावेसे वाटते का ? " असे प्रलोभनात्मक प्रश्न विचारले. सर्व प्रश्न पॉझिटिव्ह व मनाची इतकी चलबिचल करणारे होते की सहसा प्रवाशाला " मला खरं म्हणजे अमेरिकेतच नोकरी करायची वा शिकायची इच्छा होती पण चान्सच मिळाला नाही, आता जमलं तर प्रयत्न करायचा विचार आहे " असे उत्तर देण्याचा मोह व्हावा. पण असे उत्तर म्हणजे व्हिसाला नकार ठरलेला. आमच्या बाबतीत तो प्रश्नच उद्भवला नाही कारण विजयने " माझी स्वतःची पुण्यात कन्सल्टिंग रूम असून मी येथे पुरेसे पैसेही मिळवितो आहे. वयाच्या चाळीशीच्या आत सर्व जग बघायची इच्छा आहे. अमेरिका सर्वांत पुढारलेला देश म्हणून त्यापासून सुरुवात करतोय " तर मी " मुलीला सोडून जातेय, ऑफिसमध्ये रजा घेऊन जात आहे " अशी उत्तरे दिल्याने आम्ही भारतात नक्की परत येऊ अशी तिची खात्री पटली असावी. म्हणून लगेच तिने Wish you happy journey असे अभिवादन करून काउंटरवरील खिडकीतून पासपोर्टस् घेऊन जायला सांगितले. आम्हाला सहा महिन्याचा अमेरिकन व्हिसा मिळाला; पण विजयच्या पासपोर्टवर Physician who does not intend to take the medical qualifying exam असा शिक्का मारूनच ! अमेरिकन कौन्सिलेटमध्ये एक नमूद करण्यासारखी गोष्ट आढळली म्हणजे जेवढे पेपर्स आम्ही त्यांना दिले ते सर्व त्यांनी परत दिले. फायलिंगचे केवढे काम यामुळे वाचत असेल.

४. **वैद्यकीय प्रमाणपत्रे** कॉलरा व देवीची रोगप्रतिबंधक इंजेक्शन्स् घेतल्याचे महानगरपालिकेकडून सही शिक्क्याचे प्रमाणपत्र घ्यावे लागते. याकरिता स्वतंत्र पुस्तिकाच विमान-कंपनी तिकिटाबरोबर देतात किंवा एजंट पुरवितात. कॉलऱ्याचे इनाक्युलेशन खाजगी डॉक्टरकडून घेतले तरी चालते. या सर्व गोष्टी प्रवासाच्या बरेच दिवस आधी कराव्यात म्हणजे आयत्यावेळी ताप वगैरे येऊन घोटाळा, धावपळ होत नाही ( सध्याच्या नियमानुसार अमेरिकेला जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे इनाक्युलेशन करून घ्यायची जरुरी नाही ).

५. **प्रवासास लागणाऱ्या बॅगज्‌ :** प्रत्येकाला बरोबर दोन (लांबी, रुंदी व उंची मिळून १०२ इंचापर्यंत आणि वजन ६४ किलो पर्यंत) बॅगज्‌ नेता येतात. त्याचप्रमाणे एक हँडबॅगही नेता येते. याशिवाय ओव्हरकोट, पर्स, ब्लँकेटस्‌, पुस्तके वगैरे गोष्टीही हातातून नेल्या तरी चालतात.

६. **स्वतःचे फोटो :** पासपोर्ट काढताना ६ फोटो एजंटला द्यावे लागतात. शिवाय व्हिसा काढतानाही काही फोटो लागतात. स्वतःच्या पासपोर्ट साइझ फोटोच्या ४–६ जादा प्रती प्रवासात नेहमी जवळ असणे इष्ट कारण जर एखाद्या देशात प्रवास करण्याचे आयत्यावेळी मनात आले तर तेथील अधिकाऱ्यांना आपला फोटो देण्याची कित्येकदा जरूरी पडते. तेव्हा प्रथमच फोटोच्या १२ पासपोर्ट साईझ कॉपीज्‌ काढून ठेवणे चांगले.

७. **विमानाची तिकिटे :** ही तिकिटेही एजंटकडूनच काढणे चांगले. प्रवासी स्वतः तिकीट काढायला गेला तरी त्याला तिकिटासाठी जेवढे पैसे भरावे लागतात तेवढेच एजंटला द्यावे लागतात. पण एजंटला मात्र दर तिकिटामागे विमानकंपनीकडून सुमारे ९ टक्के कमिशन मिळते. हे एजंटस्‌ विमान प्रवासाचे नवे नवे झालेले नियम, मिळणाऱ्या सवलती याची कल्पना देतात. प्रवाशांकरिता वेगवेगळ्या विमान कंपन्या काय काय सोई उपलब्ध करून देतात हे ही सांगतात. उदा. 'ग्रे-हाऊंड' बसचे अमेरिकेतील प्रवासाचे तिकीट हिंदुस्थानातून रुपयांत कसे काढता येईल, इत्यादी.

८. **परदेश प्रवासासाठी मिळणारे परकीय चलन :** फक्त प्रवासी (Tourist) म्हणून परदेशात जावयाचे असल्यास प्रत्येकी ५००/– डॉलर्स चलन मिळते. आपले विमान प्रवासाचे तिकीट राष्ट्रीयिकृत बँकेचे एजंटला दाखवून परकीय चलन कोणत्या करन्सीत पाहिजे आहे ते कळविले की ते हे चलन मिळवून देतात; किंवा विमान कंपन्यांचे एजंटस्‌ही हे काम करतात. यासाठी पासपोर्ट आणि पासपोर्ट साईझ फोटोच्या चार प्रती द्याव्या लागतात. हे चलन थोडे रोख व थोडे ट्रॅव्हलर्स चेकस्‌मध्ये घ्यावे. हे परकीय चलन सरकारकडून फक्त एक वर्षाआड (alternate calender year) मिळते.

९. **विमानतळावर मिळणारे परदेशी चलन :** हे प्रत्येकी २४ डॉलर्सचे परकीय चलन एअर पोर्टवरच तिकीट दाखविल्यावर मिळते.

कस्टम्समध्ये जाण्यापूर्वी हे पैसे घ्यावे लागतात. एकदा कस्टम्समध्ये गेले की परत बाहेर पडता येत नाही. या परकीय चलनासाठी द्यावे लागणारे पैसे ( रुपयांत ) आठवणीने जवळ ठेवावेत. याशिवाय १०० रुपये एअर पोर्ट टॅक्स विमानतळावर ऐनवेळी भरावा लागतो.

**१०. विमानतळावर सामानाचे बाबतीत घ्यावयाची खबरदारी :** आपल्याला ज्या विमान कंपनीच्या विमानाने प्रवास करावयाचा असेल त्या कंपनीच्या नावाची पाटी असलेल्या काऊंटरसमोर आपले सामान घेऊन रांगेत उभे रहावयाचे. आपला नंबर आल्यावर आपले सामान वजन करून ते ताब्यात मिळाल्याच्या पावत्या तिकिटावर टाचतात. त्याच बरोबर विमानात कोठे बसावयाचे त्याचे सीट नंबर्स देतात. लवकर जाऊन विनंती केली असता खिडकी जवळील जागा आपणास मिळू शकते. हे काऊंटर्स ' कस्टम्स 'च्या बाहेर असतात.

कस्टम्समध्ये आपल्याला जे मौल्यवान सामान – सोन्याचे दागिने, कॅमेऱ्या-मारख्या वस्तू, इ. – भारतातून परदेशी न्यावयाचे असेल ते न विसरता पास-पोर्टमध्ये नोंदवून घ्यावे; नाहीतर परत येताना त्याच वस्तू परदेशात खरेदी केल्या आहेत असे समजून त्यावर ड्यूटी आकारतात. या कस्टम्समध्ये नोंद करून घ्यायच्या वस्तू वेगळ्या काढून स्वतःबरोबर नेणार असलेल्या हँडबॅगेत ठेवाव्यात. कारण इतर सामान कस्टम्समध्ये जाण्याआधी एकदा काऊंटरवर विमान कंपनीच्या ताब्यात दिले की ते शेवटच्या मुक्कामासच आपल्या ताब्यात मिळते. आधे मध्ये त्याला हात लावता येत नाही.

वर नमूद केलेल्या महत्त्वाच्या गोष्टींखेरीज खालील सूचना जरूर लक्षात ठेवाव्यात.

१. नेहमी लागणारी औषधे तसेच प्रथमोपचाराचे सामान बरोबर ठेवावे अमेरिकेत डॉक्टरकडे जाणे फार खर्चाचे आहे. तसेच तेथील औषधांची व्यापारी नावे ( Trade names ) वेगळी असल्याने माहीत असलेली औषधेही आयत्यावेळी विकत घेणे अवघड होऊन बसते.

२. अमेरिकेत डॉलर्समध्ये मेडिकल इन्शुअरन्स काढणे ज्यांना परवडत नसेल त्यांनी भारतातच ' ॲक्सिडेंट व सिकनेस ' प्रकाराचा स्वतःचा विमा उतरवावा. या इन्शुअरन्सचा फायदा जगभर घेता येतो. पैसे

मात्र रुपयात मिळतात. पण त्याच्या हप्त्यासाठी अमूल्य परदेशी चलन खर्च करावे लागत नाही.

३. ड्रायव्हिंग येत असेल तर इंटरनॅशनल ड्रायव्हिंग लायसन्स काढावे. दुचाकी व चारचाकी वहानांसाठी वेगळे लायसन्स असते. आर. टी. ओ. ऑफिसमध्ये यासाठी लागणारा फॉर्म मिळतो. तो भरून पासपोर्ट साइझ फोटो लाऊन दिला असता लगेच लायसन्स मिळते. त्यासाठी वेगळी टेस्ट द्यावी लागत नाही. प्रत्येक लायसन्सला १० रु. फी द्यावी लागते.

४ रुपायात थोडे पैसे बरोबर ठेवावेत. परतताना बरोबर आणलेल्या सामानावर ड्यूटी पडली तर हे पैसे लागतात. जर पैसे नसतील तर सामान लगेच ताब्यात न मिळता नंतर सोडवून घ्यायचा उपद्व्याप करावा लागतो.

५. अमेरिकेतील आपल्या ओळखीच्या लोकांचे पत्ते विशेषत: टेलिफोन नंबर्स त्यांचेकडे जायचे नसले तरी बरोबर ठेवावेत. अडीअडचणीत उपयोगी पडतात.

६. आपल्याला थंडीतही रोज आंघोळ केल्याशिवाय चैन पडत नाही म्हणून आतील कपड्यांचे कमीत कमी चार सेट्स तरी घ्यावेत. तेथील हॉटेलसमध्ये साबण, टॉवेल्स मिळतात म्हणून त्याचे ओझे नेऊ नये; पण कपडे धुवायचा साबण मात्र न विसरता न्यावा.

७. चष्मा वापरत असल्यास चष्म्याचे दोन जोड तरी न विसरता घ्यावेत. प्रवासात एखादा फुटल्यास आयत्या वेळी धावपळ होत नाही.

८. अमेरिकेतील अन्नपदार्थांच्या चवी आपल्याला रुचत नाहीत म्हणून लसूण, खोबरे, डाळ, दाणे यांच्या कोरड्या चटण्या, खाकरे, डिंकाचे लाडू, बटाटा चिवडा यासारखे टिकाऊ पदार्थ बरोबर न्यावेत. मात्र हे पदार्थ प्लास्टिकच्या पिशव्यांत सीलबंद करून घ्यावेत ( सुटे पदार्थ नेऊन देत नाहीत). यामुळे पैसा तर खूप वाचतोच पण चवही राहते. तसेच सुपारी, आवळाकाठी यासारख्या गोष्टीही न्याव्यात.

९. ग्रेहाऊंडच्या प्रत्येक स्टेशनवर रेस्टॉरंट असतेच. पण आसपास सहसा दुसरी हॉटेल्स नसतात. त्यामुळे तेथे जे मिळेल ते महाग असले

तरी खावे लागते म्हणून प्रवासात नेहमी ब्रेड, केक्स, सॉस, योगर्ट, बिस्किटे यासारखे पदार्थ जवळ ठेवावेत. हे अन्न खूपच स्वस्त पडते. अमेरिकेत मिळणाऱ्या 'मेक्सिकन' फूडची चवही बरीचशी आपल्या चवीशी जुळणारी असल्याने असे हॉटेल दिसल्यास तेथेच खावे.

१० अमेरिकेत इलेक्ट्रिकची उपकरणे खरेदी करताना ती २२० व्होल्टस्‌ची असतील तरच घ्यावीत. तेथे बहुसंख्य इलेक्ट्रिकच्या वस्तू ११० व्होल्टसच्या मिळतात. तसेच प्लग पीनची टोके गोल आहेत का ते बघून घ्यावे (त्यांच्याकडील या पीनस् चपट्या असून त्या आपल्याकडील प्लगच्या गोल भोकात जात नाहीत).

११. रंगीत फोटो अमेरिकेतच डेव्हलप आणि प्रिंट करून घ्यावेत. दर्जा व किंमत दोन्ही दृष्टीने ते फायद्याचे पडते. तसेच रंगीत फोटोंचे रोल्सही अमेरिकेत अतिशय स्वस्त असल्याने येथून न नेता तेथेच विकत घ्यावेत.

१२. इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर जबरदस्त कर द्यावा लागतो म्हणून जास्त पैसे खर्च करायचे नसतील तर अशा वस्तू आणायचे टाळावे. नुसत्या टेपरेकॉर्डवर ड्यूटी पडत नाही पण ट्रान्झिस्टर व टेपरेकॉर्डर एकत्र असलेल्या युनिटवर कर भरावा लागतो. अर्थात कस्टम्सचे हे नियम सारखे बदलत असतात.

१३ हॉटेल नेहमी ग्रेहाऊंड स्टेशनजवळील शोधावे म्हणजे टॅक्सीसाठी पैसे खर्च करावे लागत नाहीत. तसेच रूम घेताना नेहमी चेक-इन व चेक-आऊट टाईम बघूनच घ्यावी; नाहीतर एक-दोन तासाकरिता संबंध दिवसाचे भाडे भरावे लागते. हे टाळण्यासाठी रिसेप्शनिस्टपाशी थोडा वेळ सामान ठेवण्याची सवलत बहुदा सर्व हॉटेल्स देतात.

* * *

# प्रयाण

सोमवार ११ सप्टेंबरला रात्रौ दहाच्या 'पॅन ॲम' कंपनीच्या विमानाने मुंबईहून न्यूयॉर्कला जायचे निश्चित झाले. डॉ. प्रदीप व सौ. रेखा पटवर्धन आम्हाला एकदम मुंबईला सांताक्रूज विमानतळावरच भेटणार होते. पुण्याहून आम्ही दोघेच मुंबईला जाणार होतो. रविवार हा सुट्टीचा दिवस असल्याने मुद्दामच एक दिवस अगोदर जायचे ठरविले.

गेले काही दिवस माझ्या मनावर इतके प्रचंड दडपण आले होते की इतक्या तरुण वयात आपण एवढे मोठे साहस करत आहोत ते बरोबर का चूक तेच उमजत नव्हते. यांत्रिकपणे प्रवासाची तयारी शेवटपर्यंत चालूच होती. पण मनालीकडे पाहून मनाची चलबिचल वाढत होती. आजच्या ऐवजी उद्या निघायला पाहिजे होते म्हणजे मनालीजवळ अजून एक दिवस राहता आले असते असे सतत वाटत होते. कधी कधी या पोरीला आपण परत भेटू शकू की नाही या कुशंकेने काहीतरी कारण होऊन आपले जाणेच रद्द व्हावे असेही वाटे. लग्नानंतर हनिमूनला जाताना मनाचा जो मोकळेपणा असतो त्यामुळे कसलाही विचार न करता मनमुराद आनंद लुटता येतो. ते सुख मला वाटते, मूल झाले की परत चाखता येत नाही. मुलाची काळजी घेणारी कितीही माणसं त्याच्या अवती भवती असली तरी आईचे मन मात्र त्याच्याभोवतीच घुटमळत असते. वडिलांचीही तीच स्थिती होत असेल; पण पुरुष वरून मात्र ती कधीच दाखवित नाहीत. त्यातून विजयना तर बोलण्यासही फुरसत नव्हती. त्यांचा सारा वेळ पेशन्टस्च्या गाठीभेटी, त्यांना द्यावयाच्या औषधे-पथ्यपाण्याच्या सूचना, पुन्हा भेटीला यायच्या तारखा यातच जात होता.

मनालीला कुशीत घेऊन झोपण्याची शेवटची रात्रही संपली. आताच खऱ्या कसोटीची वेळ होती. आई-बाबाना सोडून एकटे रहायला मनालीचे मन तयार करण्यासाठी गेले सहा महिने आम्ही तिच्यावर 'Brain washing' चा प्रयोग करत होतो. मला वाटते ते तंत्र फारच उपयोगात आले. "मला पण तुमच्या बरोबर न्या" असा तिने हट्ट धरल्यावर "मुलांना विमानात

घेत नाहीत, नाहीतर तुला नक्की नेले असते " असे मी तिला सांगताच "मग T V वर मुले कशी विमानात बसलेली दाखवितात ?" असा प्रश्न विचारून तिने मला पेचात पकडले. शेवटी "ज्या मुलांचे बाबा अमेरिकेत नोकरी करतात त्याच मुलांना फक्त परवानगी असते " असे सांगून सारवासारव करावी लागली. "तुला वॉकी-टॉकी (बाहुली), खेळणी, फ्रॉक्स आणू. तू मोठी झाल्यावर अमेरिकेला जायला तुझ्यासाठी बँकेत पैसे ठेवले आहेत " या सारखा पुष्कळ युक्तिवाद करून तिचे मन तयार केले होते. पण एकूण काम अवघडच होते. मनीने मात्र मनाचा पूर्ण निश्चय केला होता. आज उठल्याबरोबरच तिने "मला आजी-पंजीकडे सोडा " असा बाबांच्यामागे लकडा लावला. माझे आईचे घरी मात्र अगदी मागे वळूनही न बघता घरात गेली. बाबांना 'टाटा' करायलाही बिचारी बाहेर आली नाही म्हणे. मनालीने दाखविलेल्या सूज्ञपणामुळे घरातून निघताना तरी मनाचा तोल सुटला नाही.

रविवारी ( १० सप्टेंबर ) सकाळी ९॥ चे सिकंदराबाद एक्सप्रेसने आम्ही मुंबईला प्रयाण केले. स्टेशनवर पोचविण्यास कोणीही आले नव्हते. तसे मुद्दाम कोणाला सांगितलेही नव्हते. माझा भाऊ विवेक फक्त येईन म्हणाला होता पण त्याचाही पत्ता नव्हता. विजयच्या मनात हा निरोप सांगायचा राहिला, याची आठवण द्यायची राहिली वगैरे अनेक गोष्टी सारख्या येत होत्या. निरोप कोणाबरोबर पाठवावा हा विचार करत असतानाच एन्. सी. एल. मधील माझे सहकर्मचारी श्री. तांबे त्यांच्या भाचीस पोचवावयास आलेले दिसले. विजयने लगेच त्यांना घरी पोचविण्यासाठी एक चिठ्ठी दिली. एवढ्यात विवेक-वंदना आलेच. त्यांच्याजवळही परत एकदा घरी द्यावयाच्या निरोपांची उजळणी झाली. गाडी वेळेवर सुटून ठरल्यावेळी कल्याणला पोहोचली. स्टेशनवर भाऊजी ( श्री. कमलाकर घैसास ) जीप घेऊन न्यायला आले होते. त्यांचे घरी मुलुंडला जाताना त्यांनी कल्याणजवळच चाललेले त्यांचे पाणी शुद्धीकरण करण्याच्या टाक्या बांधण्याचे काम दाखविले. कामाच्या साईटवर जाण्याचा रस्ता फारच सुंदर होता. येथूनच सौंदर्यस्थळे पहाण्यास सुरुवात झाली असे म्हणायला हरकत नाही. संध्याकाळी श्री. राम व श्री. कृष्णा रास्ते या मावस दीराच्या घरी जाऊन आलो. त्यांचेकडून पुण्यास घरी फोन

केला. त्याआधी विजयनी विसरलेल्या गोष्टींसाठी अण्णांना पत्र पाठविले होतेच. मुलुंडमध्ये गणेशोत्सवाची धामधूम चालू होती. गप्पांच्या नादात व मनाली समोर दिसत नसल्याने मानसिक दडपण कमी झाल्यामुळेच की काय " अमेरिकेस जाणे रद्द व्हावे, कमीत कमी पुढे तरी ढकलले जावे " यासारखे मनात चाललेले वादळ पुष्कळच शमून पुढील प्रवासाचे बेत रचण्यास उत्साह आला.

दुसरे दिवशी उठल्यापासूनच जाण्याचे वेध लागले. विमान रात्री १० वाजताचे होते; तेव्हा निदान सायंकाळी ६ वाजता तरी मुलुंडहून निघायला पाहिजे होते. नाक चोंदल्यावर नाकात घालावयाच्या औषधासारख्या बारीक-मारीक खरेदीत सकाळ निघून गेली. बॅगावर नावाची लेबल्स लावून सर्व कागदपत्रे, कपडे, बूट, वगैरे गोष्टी बरोबर घेतल्यात की नाहीत हे पाहीपर्यंत निघायची वेळ आली. नितीन, वंदु, कुंदाताईसमवेत गणपती विसर्जनाच्या मिरवणुकींना चुकवत विहार लेक, आय्. आय. टी. वरून जाणाऱ्या सुंदर रस्त्याने ७—७॥ चे सुमारास सांताक्रुझला येऊन पोहोचलो. विमानतळाबाहेरील गर्दी बघून नवख्या माणसाला तरी चक्रावून जायला होते. त्या गर्दीत आम्हाला पटवर्धन दांपत्य कोठेही दिसेना. एवढ्यात पुण्याहून ताई ( आई ) व सुमंता; ठाण्याच्या माधव आतोबा, उषा आत्याबरोबर आम्हाला निरोप देण्यासाठी आलेले दिसले. त्यामुळे मात्र आपण फार लांबच्या प्रवासाला जात आहोत याची जाणीव होऊ लागली.

डॉ. पटवर्धनांची थोडा वेळ वाट पाहून शेवटी आत गेलो. प्रवाशांना आत जाण्यासाठी जे दार होते त्यातून फक्त विमानाचे तिकीट दाखविणाऱ्यां-नाच आत सोडले जात होते. बाकीच्या हितचिंतकांसाठी वेगळे प्रवेशद्वार होते. आतमध्ये ' पॅन ॲम 'ची पाटी असलेली स्वतंत्र खिडकी नव्हती त्यामुळे काय करावे ते न सुचून थोडे भांबावून जायला झाले. आता कोठे चौकशी करावी हा विचार करत असतानाच विमान सुटायच्या वेळेपूर्वी सुमारे दोन तास दुसऱ्या कंपनीच्या खिडकीवर ' पॅन ॲम'चा बोर्ड लावला गेला. माहितगार लोकांनी तेथे लगलीच रांग करायला सुरुवात केलेली पाहून आम्हीही सामानासहित नंबर लावला. प्रदीप-रेखाचा अजूनही कसा पत्ता नाही म्हणेपर्यंत ते दोघे येताना दिसल्यावर जीव भांड्यात पडला. रांगेमध्ये

आमच्या पाठीमागे-पुढे बहुतेक नवखेच प्रवासी असल्याने कोणालाच नक्की काय करावयाचे याची फारशी कल्पना नव्हती.

विमानकंपनीचे ताब्यात सामान देऊन त्याबद्दलची कुपन्स व सीट नंबर्स घेतले. आम्ही नॉन स्मोकिंग कंपार्टमेंटमध्ये शेजार-शेजारील जागा मागितल्या. सामानाचे लोढणे हलके झाल्यावर पुन्हा बाहेर प्रेक्षकांसाठी असलेल्या दालनात ( Visitors lounge ) आलो तो आमचे विमान एक तास उशिरा येणार असल्याची अनाऊन्समेंट ऐकली. आता एवढा वेळ काढणे अगदी जीवावर आले. प्रवासाचे थोडे दडपण मनावर आल्याने गप्पाही सुचत नव्हत्या. विजयनी सुमंताजवळ परत अण्णांना निरोपाच्या आठवणींची चिठ्ठी दिली. हे पाहून त्याच्या 'अस्वस्थ' प्रकृतीवर मी खूप चिडले. पण स्वभावाला औषध नसते म्हणून सर्वांबरोबर कॉफी पिऊन राग शमविला. रात्र असल्याने विमानतळाच्या गच्चीवरूनही विशेष काही दिसणे शक्य नसल्याने बाकी मंडळींना विमान सुटेपर्यंत न थांबता घरी जाण्यास सांगितले. उषाआत्याने बोके, सुमंताने चंदनाचा हार, तर ताईने बारामतीहून पराडकर मामांनी खास पाठविलेला गुलाबाचा गेंद दिला. सर्वांना नमस्कार करून जड अंतःकरणाने निरोप घेतला व कस्टम्समध्ये प्रवेश केला.

या ठिकाणी कस्टम्स अधिकाऱ्यांकडून पासपोर्ट व इतर कागदपत्रांची तपासणी झाली. डॉ. खळदकरांचा 'कॅनन' हा आम्ही बरोबर घेतलेला अमेरिकन कॅमेरा न विसरता पासपोर्टमधे नोंदवून घेतला. कपडे, पर्सेस यासारख्या वैयक्तिक गोष्टींची पुरुष व स्त्रियासाठी वेगवेगळ्या ठिकाणी असणारी तपासणी पार पाडून जेव्हा आम्ही विमानात जायला तांत्रिक दृष्ट्या सज्ज झालो तेव्हा आमच्या लक्षात आले की प्रवासातील किरकोळ खर्चासाठी विमानतळावर दर तिकिटामागे जे २४ डॉलर्स विकत मिळतात ते घेण्याचे आम्ही साफ विसरलो होतो. हा एक्स्चेंज मिळत असलेला काऊंटर कस्टम्सचे बाहेर होता म्हणून पळतच तिकडे निघालो पण द्वाररक्षकाने दारातच अडविले. तेव्हा कळले की कस्टम्सचे नियमाप्रमाणे एकदा सर्व चेकिंग होऊन आत गेलेल्या व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव परत बाहेर जाऊ देत नाहीत. शेवटी अक्षरशः हातापाया पडून बऱ्याच विनवण्या केल्यावर आम्हाला बाहेर जायला परवानगी मिळाली. एक डॉलरला ८·३० रुपये हा त्या दिवशीचा डॉलर्स

खरेदीचा दर होता. कस्टम्समध्ये परत आत जाताना पुन्हा एकदा वैयक्तिक तपासणीला तोंड द्यावे लागले.

विमानात चढण्यासाठी लागणारे बोर्डिंग पासही मिळाले. परत प्रतिक्षा सुरू झाली पॅन ॲमचे हे विमान ऑस्ट्रेलियाहून येणार होते. एवढा थोडा वेळ पण सरता सरत नव्हता. सर्व आप्तेष्टांचे चेहरे दृष्टिआड झाले होते. विजयनाही घरी निरोप पाठवावयास काहीही साधन नव्हते. आता फक्त आमचे आम्हीच होतो. त्यामुळे आता खरे अमेरिकेचे वेध लागले.

पॅन ॲमचे ते प्रचंड विमान रात्रौ १०–३० वाजता एकदाचे सांताक्रुझला उतरले. चालत विमानापर्यंत गेल्यावर शिडीने वर चढून आपापल्या खुर्च्यांत अंग झोकून दिले. फारच मोकळे, हलके वाटत होते. विमान प्रवासाचा पहिलाच अनुभव असल्याने सगळ्याच गोष्टींबद्दल खूपच उत्सुकता वाटत होती. लहानपणापासून विमानाचे आकर्षण होते. पुणे-मुंबई विमान प्रवास तरी एकदा करायचाच असे म्हणता म्हणता दिवस तसेच निघून गेले आणि इतक्या लांबच्या प्रवासाचा योग प्रथम आला. पॅन ॲमचे विमान आतून अगदी पॉश होते. गुबगुबीत, आरामशीर खुर्च्या, संपूर्ण विमानभर पसरलेला गालीचा, स्वच्छ सुंदर स्वच्छतागृहे, गोड अमेरिकन हवाई सुंदरींचा वावर (त्यांचे उच्चार कळण्यास मात्र अडचण पडत होती) वगैरे गोष्टी नजरेत भरत होत्या.

रात्री ११–३० वा. विमानाने उड्डाण केले. पट्टे आवळणे, डोके टेकून बसणे, दुर्दैवाने विमान पाण्यात पडले तर काय काळजी घ्यावयाची, जास्त उंचीवर ऑक्सिजन लागला तर कसा वापरायचा इत्यादींची प्रात्यक्षिके दाखविली गेली. एखादे वेळी विमान लागले तर वापरावयाच्या बॅगज्, वाचण्यासाठी मासिके पुढच्या खुर्चींचे मागे असलेल्या पिशवीत ठेवलेली होती. पॅन ॲममधे तीन–चार–तीन अशी प्रत्येक रांगेतील खुर्च्यांची विभागणी असल्याने आणि आम्ही एकमेका शेजारील जागा मागितल्यामुळे खिडकीतून बाहेरील मजा बघण्याची संधी मात्र हुकली. अर्थात रात्र असल्याने मुंबई सोडल्यावर बाहेरचे काहीच दिसत नव्हते.

विमानाने एकदा ठराविक उंची गाठून सरळ अंतर काटायला सुरुवात केल्यावर पट्टे सोडून हालचाल करण्यास परवानगी असल्याची सूचना देण्यात आली आणि जेवणाची धावपळ सुरू झाली. खूप मोठी मोठी चॉकलेटस् मिळतील असे मला वाटत होते पण निराशा झाली. मात्र इतके तऱ्हतऱ्हेचे फळाचे रस हवाई सुंदरींनी देऊ केले की त्यातील

ज्यूस भरपूर देण्यात आला. संध्याकाळपासून एका कॉफीच्या कपाशिवाय काहीही न खाल्ल्याने पोटात अक्षरशः कावळे कोकलत होते म्हणून मांसाहारी जेवण घ्यायचे ठरविले आणि तेथेच चुकले. त्यांचे मांसाहारी पदार्थ तेल, तूप नसलेले, मसाला विरहित; बीफचे. त्याच्या हॉरिबल वासाने माझी तर भूक मरूनच गेली. जेवणाबरोबर मिळालेला पावाचा छोटासा तुकडा, लोणी व जॅम बरोबर खाऊन उदरभरण करावे लागले. जेवणाच्या शेवटी दूध, कॉफी, चहा मात्र पाहिजे तेवढा मिळाला म्हणून जठराग्नी जरा तरी शमला. त्यानंतर खाऱ्या दाण्याचे ( पीनट्स ) एक पाकिट दिले गेले. या पीनटस्‌ची चव इतकी अप्रतिम होती की पुन्हा पुन्हा मागायचा मोह आवरता आला नाही. बहुदा अनेकांनी हेच केले असावे कारण लवकरच ही पाकिटे खतम झाली. विमानातील इकॉनामि क्लासमध्ये जर ड्रिंक्स घ्यावयाची असतील तर जादा पैसे द्यावे लागतात. आम्ही अर्थात त्याचा विचारही केला नाही. जादा दोन डॉलर्स दिल्यानंतर खुर्चीच्या हातावर असलेल्या चॅनेल्समधून विविध प्रकारचे संगीत ऐकण्याची, तसेच हेड फोन लावून समोरच्या पडद्यावर चालू असलेल्या सिनेमाची स्टोरीही ऐकण्याची सोय होती. आम्ही मात्र सुरुवातीपासूनच डॉलर्स वाचवायचे ठरविले असल्याने मूकपट बघण्यावरच समाधान मानले. विमानात सिगारेट फक्त 'स्मोकिंग कंपार्टमेंट' मध्येच ओढता येते. सहज बघितले तर त्या भागात उतारूंची गर्दी कमी असल्याने तेथिल लोक दोन

करून खुर्च्यांच्या बिछान्यावर झोपी गेले होते; ते पाहून आपणही स्मोकिंग कंपार्टमेंटच घ्यायला पाहिजे होता असे वाटले. जेवणानंतर विमानात मंद दिवे लावले गेले. आम्हीही बसल्या बसल्या झोप नाही तरी किमान पक्षी डुलकी तरी कशी लागेल याचा विचार करत होतो. एवढ्यात परत पट्टे आवळण्याच्या सूचना देण्यात आल्या व आमचे

विमान बहरिनला भारतीय प्रमाणवेळेप्रमाणे मंगळवारी पहाटे २-३० वा. च स्थानिक वेळेप्रमाणे सोमवारी रात्रौ १२ वा. उतरले.

रात्र असल्यामुळे रिफायनरींचे डोक्यावर दिसणारे ज्वालांचे लोट सोडल्यास काहीही दिसत नव्हते. विमानतळावर उतरायला परवानगी होती म्हणून विमानतळ बघून यायचे ठरवून उठलो. दारातील शिडीवरून उतरायला पाऊल उचलले तो दारालाच एक बोगदा येऊन भिडलेला आढळला. त्यातून थेट विमानतळावरील इमारतीत चालत जाता येत होते. ही इमारत अतिशय स्वच्छ व सुंदर होती; शिवाय ती वातानुकूलितही असल्याने बाहेरील प्रचंड उष्णतेचा काहीही त्रास जाणवत नव्हता. गुबगुबीत सोफा बसायला नि अनेक वस्तू विकायला ठेवल्या होत्या. तेथून मनालीला एक ग्रिटींग कार्ड पाठविले. त्याला ३० सेंटस् पडले व तिकीट २५ सेंटस्चे लागले. अशा रीतीने डॉलर मोडून खर्चाला सुरुवात केली.

तासाभराने जेव्हा परत विमानात चढलो तव्हा विमान 'हाऊस फुल' झालेले पाहून आता सर्वांनाच बसावे लागणार म्हणून थोडे बरे वाटले. आम्ही बहरिन विमानतळ स्थानिक वेळेनुसार रात्री १-३० वाजता सोडला. विमान वर जाताना विशेष त्रास झाला नाही. मघाशी बहरिनला उतरताना मात्र पोटात कालवा कालव होणे, मळमळणे यासारखा त्रास मला तरी झाला. हल्लीची विमाने प्रेशराइज्ड् असल्यामुळे पूर्वीइतका विमान प्रवासाचा त्रास होत नाही; पण विमान खूप ऊंची गाठत असल्याने कानाला दडे मात्र बसले. यानंतर न्यूयॉर्क पर्यंतचा १२-१३ तासांचा प्रवास सलग होता. विमान प्रवासाचे नाविन्य आता कमी झाले होते. विमान एकदा सरळ मार्गक्रमण करू लागले की नंतरचा प्रवास तसा कंटाळवाणाच होतो. पाय मोकळे करण्यासही विशेष जागा नसते. नेहमी प्रवास करणारांना तर विमानाचा प्रवास अगदीच बोअरींग होत असावा.

बहरिनहून उडल्यावर विमान आकाशात स्थिर होऊन विशिष्ट उंचीवरून प्रवास करू लागल्यानंतर पुन्हा लगेच रात्रीच्या जेवणाची ( डिनर ) सूचना आली. यावेळी मात्र मी शाकाहारी जेवण मागविले. तेही बेचवच होते. इतक्या लवकर काहीही व्यायाम न करता जेवायची बहुदा पहिलीच वेळ असावी. नंतर सिनेमा सुरू झाला. मूकाभिनय पहात निद्रादेवीची आराधना

सुरू केली. ठराविक वेळानंतर फळांचे रस, चहा, कॉफी, सँडविचेस वगैरे मुबलक दिले जात होते. तसेच याशिवायही कधी लागले तर मागूनही घेता येत होते. खाण्यापिण्याशिवाय काहीही उद्योग नसल्याने अधून मधून त्याचा समाचार घेत राहिलो

पहाटे ४–५ वाजताच पूर्वेकडे उजेड दिसू लागला. पश्चिम मात्र अजूनही घनदाट काळोखात बुडालेली होती. विमानातून सूर्योदय बघायला मिळाला. जसजसे उजाडू लागले तसतसे बाहेरील दृष्य फारच विलोभनीय दिसत होते. निसर्गाच्या रंगाची किमया नजर खिळवून टाकत होती. खिडकीतून खाली डोकावल्यावर दिसणारे सौंदर्य तर न विसरता येण्याजोगे होते. निळ्याशार पार्श्वभूमीवर ( बहुदा ते पाणी असावे ) शुभ्र ढगांचे पुंजके कापूस पिंजारून विखरल्यासारखे दिसत होते. पांढरा रंग इतका मुलायम दिसत होता की हात लावून बघायचा मोह व्हावा. या सर्व मनमोहक दृष्यावरून आमचे विमान न्यूयॉर्कच्या दिशेने झेपावत होते पहाटे सहा वाजण्याच्या अगोदरच ब्रेकफास्टची वेळ झाल्याची घोषणा झाली. परत उदरभरण केले. या विमान प्रवासात जेवढे खाल्ले असेल तेवढे आठवणीत तरी कधी खाल्ले नव्हते. विमानात सगळीकडे गालीचे, बसावयाच्या खुर्च्या, दरवाजे यासारख्या सिन्थेटिक गोष्टी होत्या. मी सिन्थेटिकच साडी नेसलेली असल्यामुळे मला सतत शॉकस्च्या झटक्यांना तोंड द्यावे लागत होते. शेवटी शेवटी तर सारखे बसून बसून स्टॅटिक इलेक्ट्रिसिटीमुळे माझी साडी इतकी वर जाऊन चिटकून बसली की ती मिनीची मॅक्सी काही केल्या होईना. प्रवासात चुरगाळले तरी कापसापासून तयार केलेले कपडेच वापरायला पाहिजेत हे त्यावेळी पटले.

अशा रीतीने स्थानिक वेळेप्रमाणे मंगळवारी सकाळी ७–१५ वाजता तर भारतीय प्रमाणवेळेप्रमाणे मंगळवारी संध्याकाळी ५–१५ वा. आमचे विमान न्यूयॉर्कच्या 'जे. एफ्. के.' विमानतळावर घिरट्या घालू लागले.

* * *

# न्यूयॉर्क

## मंगळवार १२ सप्टेंबर

न्यूयॉर्क आले. पट्टे बांधायच्या सूचना दिल्या गेल्या. स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता. विमान व्यवस्थित उतरल्यावर अत्यानंदाने आपलीच पाठ थोपटून घेतली. पुढचा प्रवास कसा का होईना, निदान अमेरिकेला तरी पाय टेकले. इतक्या दिवसांचे स्वप्न साकार झाले म्हणून धन्य वाटले. विमानाच्या दरवाज्याला लागूनच विमानतळावरील इमारतीत जाण्यासाठी बोगदा येऊन मिळाला होता, त्यामुळे बस वगैरेची भानगड करावी लागली नाही. खूप तंगडतोड केल्यावर कस्टम्स ऑफिस आले. उतरवून घेण्यासाठी आलेल्या लोकांच्या नावांची, त्यांनी दिलेल्या निरोपाची अनाऊन्समेंट चालली होती. पण श्री. हरिष मंगरूळकर या आमच्या ज्या कौटुंबिक स्नेह्याकडे आम्ही न्यूयॉर्कमध्ये उतरणार होतो आणि ज्यांना आम्ही विमानतळावर न्यायला येण्यासंबंधी पुण्याहून निघण्याआधी तार केली होती. त्याचा मात्र कोणताही निरोप नव्हता. कस्टम्सचे ५–६ कौंटर्स असल्याने सर्व सोपस्कार अर्ध्या तासातच संपले. आमच्या बॅग्ज् उघडूनही बघितल्या नाहीत. आपापल्या ट्रॉलीजवर सामान घेऊन बाहेर पडलो तरीही मंगरूळकरांचा पत्ता नव्हता. हे पाहून फारच धाबे दणाणले. प्रचंड मोठी इमारत, सरकते, आपोआप उघडमिट करणारे दरवाजे, नवीन पुढारलेले अनोळखी ठिकाण, त्यातून कोणीही आणायला आलेले नाही, या सर्वांमुळे आलेला नर्व्हसनेस तोंडावर दिसू न देण्याची धडपड, आपल्याला कोणी फसवू नये म्हणून चालली होती. एवढयात एक भला मोठा, आडदांड, ६॥ फुटी निग्रो ड्रायव्हर "टॅक्सी पाहिजे का!" म्हणून परत परत विचारू लागला. काळ्या लोकांबद्दल भारतात अनेकांनी उगाचच फार भीति घालून ठेवली होती. त्यामुळे काय करावे ते सुचेना. आपण नक्की बनविले जाणार असे मात्र उगाचच वाटत होते. डॉ. पटवर्धन तर फारच अस्वस्थ झाले. मंगरूळकरांना फोन करतो म्हणून गेले पण डाईमचे नाणे नसल्याने परत आले. तेवढयात

मंगरुळकर आलेच. ट्रॅफिक जॅममध्ये अडकून पडले होते. आमचा जीव भांड्यात पडला. त्यांच्या भल्यामोठ्या गाडीतून न्यूयॉर्कचे दर्शन घेत घेत जवळ जवळ एक तासानी त्यांचे घरी पोहोचलो.

हरिष लॉंग आयलंड ( Long Island ) या मॅनहॅटन ( प्रॉपर न्यूयॉर्क ) पासून ४० मैल दूर असलेल्या ठिकाणी रहात होता. हा भाग न्यूयॉर्कमधील श्रीमंत वस्तीचा. घराभोवती तर सोडाच पण फुटपाथवरतीही छान हिरवळ असलेला. हरिषचे रहात असलेले घर दुमजली, लाकडाचे. वरचा संबंध मजलाच त्याचेकडे भाड्याने होता. हरिष स्वतः मेकॅनिकल इंजिनिअर. अमेरिकेतील PALL या प्रसिद्ध कंपनीत नोकरी करत होता. सहा महिन्यांनंतर तो भारतातच कायम वास्तव्यासाठी जाणार असल्याने आम्हा[illegible] एकच आठवडा त्यानी पत्नीला व मुलांना भारतात पाठविले होते. त्यामुळे सर्व घरच आम्हाला मोकळे होते. आम्हाला आराम करायला सांगून हरिष ऑफिसला गेला. पहिल्यादा आघोळी करून हरिषने दिलेल्या एरोग्रॅम्सवरती घरी पत्रे लिहिली. खर म्हणजे घरून निघताना पोचल्याबरोबर तार करू असे आश्वासन दिले होते, पण सुखरूप पोहोचल्यावर तारेसाठी डॉलर्स खर्च करायचे जीवावर आले. म्हटले ' पॅन ॲम 'च्या विमानाची पेपरमधे वाईट बातमी [illegible] असे ते लोक समजतीलच ! हरिषचे ऑफिस त्याच्या घरापासून मोटारने फक्त पाच मिनिटाच्या अंतरावर असल्याने लंचला तो घरी आला तो एक ' पिझ्झा ' घेऊनच. ' पिझ्झा ' ही एक इटालीयन व्हेजिटेरियन डिश. अतिशय टेस्टी. पिझ्झा येवढा मोठा होता की एका पिझ्झात पांच जणांची पोटे भरली. हरिष म्हणाला " आजचा दिवस तुम्ही विश्रांती घ्या. " पण पुढचा सगळा प्रोग्रॅम डोळ्यापुढे दिसत असल्याने विजय म्हणाला " आराम बिराम काही नाही. आजच्या आज ग्रेहाऊंडचा पास काढलाच पाहिजे. " डॉ. पटवर्धनांनीही त्याला दुजोरा देताच दोघेही कपडे चढवून हरिषबरोबर बाहेर पडले देखील. हरिष ऑफिसला जाताना त्यांना रेल्वे स्टेशनवर सोडणार होता. पहिल्याच दिवशी काहीही माहिती नसताना दोघेच जण मॅनहॅटनला कसे जातील याची हरिषला थोडी काळजी वाटत होती. मी व रेखाने मात्र त्यांच्या जिद्दीचे कौतुक करत जी ताणून दिली ती हरिषने संध्याकाळी घरी येऊन उठवेपर्यंत. विजय, प्रदीपचा अजून पत्ता

नसल्याने आम्ही तिघांनीच मार्केटमध्ये जायचे ठरविले. न्यूयॉर्कला त्या दिवशी मुंबईसारखे उकडत होते; पण आभाळ मात्र स्वच्छ होते. घराबाहेर पडताना "छत्र्या घ्या. पाऊस पडायची शक्यता आहे" असे हरिषने सांगताच हसू आले. वाटले "पुण्याच्या वेधशाळेच्या अंदाजासारखाच हा अंदाज असणार. काय करायचंय छत्र्यांचं लोढण घेऊन !" पण थोड्याच वेळात चक्क पाऊस कोसळू लागला आणि इतका अचूक अंदाज बघून मीही पुरती कोसळले. हा पाऊस खरा असेल यावर विश्वासच बसेना. अमेरिकेत हवामानाचा अंदाज दर १५ मिनिटांनी रेडिओवरून सांगत असतात. रोजचे हवामान निराळे. कधी ऊन, कधी पाऊस, कधी वादळ, कधी गडगडाट तर कधी हिमवर्षाव. लोक रेडिओ ऐकून छत्री न्यायची, का ओव्हरकोट, का रेनकोट ते ठरवितात.

हरिषने आम्हाला एका प्रचंड मोठ्या शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये नेले. असंख्य दुकाने, काही अनेक मजली, इतकी भव्य, इतकी भपकेदार की आपण स्वप्नात तर नाही ना असा भास व्हावा. प्रत्येक डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये कपडे, खेळणी, ग्रोसरी, घरगुती उपयोगाच्या वस्तू या सारखे विविध विभाग. कशालाही हात लावा, काहीही उचला. मालाचे वर्णन, किंमत, लिहिलेली असल्याने कोणाला विचारायला नको. आवडेल ते घेऊन काऊंटरवर जाऊन पैसे द्या अन् माल घेऊन जा. क्रेडिट कार्ड असणाराना रोख पैसेही द्यावे लागत नाहीत. शालेय वर्ष नुकतेच सुरू झाल्याने शाळेतील मुलांना लागणाऱ्या वस्तूंचे खास 'विंडो डेकोरेशन' केलेले होते. एस्केलेटर्सवरून चढण्या उतरण्याचा पहिल्यांदा योग आला. गरगर फिरणाऱ्या या जिन्याच्या पायरीवर झटकन पाऊल टाकणे आणि काढणे ही कलाच आहे. सुरवातीला ते सतत फिरणारे जिने पाहून गडबडून जायला व्हायचे पण लवकरच त्यांची सवय झाली. हरिष "मला घरी जाऊन भाजी करायची आहे, लवकर चला" म्हणायला लागला. पण आमचे पाऊल निघत नव्हते. काय पहावं, काय घ्यावं, काय करावं, काही सुचत नव्हतं. त्या स्वप्नमय जादूनगरीने आम्हाला पुरते भारावून टाकले. हरिषला म्हटलं "स्वयंपाक आम्ही करू पण अजून थोडावेळ थाबू." हरिषने सूचना दिली "आज नुसते पहा. खरेदी करण्याची घाई करू नका." म्हणून थोड्या चमच्यांशिवाय काहीही न घेता काढता पाय घेतला.

घरी पोहोचलो तरी विजय, प्रदीपचा पत्ता नव्हता. लॉंग आयलंडला येणारी लोकल यायची वेळ झाली होती म्हणून त्या दोघांना आणायला आम्ही तिथे 'ग्लेन स्ट्रीट' रेल्वे स्टेशनवर गेलो. गाडी बरोबर वेळेला येऊन पुढे निघून गेली पण ही दोघे काही उतरली नाहीत. नामसादृश्यामुळे 'ग्लेन कोव्ह' या पुढच्या स्टेशनवर ते चुकून उतरतील असे हरिषला वाटल्याने तेथे गेलो पण त्या स्टेशनवर चिटपाखरूही नव्हते. काळजी करत घरी परतलो. आता काय करावे हा विचार करत असतानाच फोन वाजला. अपेक्षेप्रमाणे डॉ. पटवर्धनांचाच होता " आम्हाला मॉट स्ट्रीट हॉटेल-पासून घेऊन जा " म्हणून! भेटीअंती कळले की हरिषला आलेली शंका खरी ठरली होती. ते दोघे ग्लेन स्ट्रीट ऐवजी ग्लेन कोव्हला उतरून रेल्वेलाईनच्या कडेने उलटे चालत गेलो तर ग्लेन स्ट्रीटला पोहचू म्हणून निघाले पण नंतर तो रस्ता जंगलात जाऊ लागल्याने व तेथून हरिषचे घर माहित नसल्यामुळे अखेर घेऊन जाण्यासाठी त्यानी फोन केला. अशा रीतीने आमचा रस्ते चुकण्याचा श्रीगणेशा झाला.

घरी आल्या आल्या प्रदीप, विजयनी 'आम्ही आलो आहोत' हे सांगण्या-साठी अमेरिकाभर अनेक मित्र, नातेवाईकांना अनेक कॉलमनी फोन केले. येथील 'फोन' ही वेधशाळेच्या अचूक अंदाजाप्रमाणे आपल्याला वाटणारी आणखी एक चमत्कृती. 'कलेक्ट कॉल' म्हणजे ज्याच्याशी बोलायचे असेल त्याचा नंबर एक्स्चेंजतर्फे घ्यायचा. ऑपरेटर त्याला विचारतो " अमुक अमुक व्यक्ती तुमच्याशी बोलू इच्छिते. तुम्ही त्यांचा फोन घेणार का ?' त्यांनी "हो" म्हटले की संभाषण सुरू. हे सर्व दोन मिनिटांत होते. या प्रकारच्या फोन-साठी लागणारा खर्च ज्याला फोन करायचा तो म्हणजे जो कॉल घेतो तो करतो. प्रवासी लोकांना आपल्या खिशाला चाट न लावणारी फोनची ही पद्धत पाहून अचंबा वाटला. फोनचे बिल वाजवी येत असल्याने लोकाला भुर्दंड पाडण्यात विशेष वाईट वाटत नाही. जर आपले पैसे खर्च करून फोन करायचा असेल तर अमेरिकेच्या या टोकापासून त्या टोकापर्यंतचा कोठलाही नंबर फिरविताक्षणीच पलिकडून " हॅलो " आलेच. ट्रंक लावा, वाट बघत बसा, बऱ्याच वेळाने " लाईन बिघडली आहे " असे उत्तर हा प्रकार तेथे नाही. टेलिफोन कंपन्याही प्रायव्हेट आहेत. त्यातील

'बेल' ही सर्वात लोकप्रिय कंपनी. दुकानांमध्येही नानाविध आकारात, रंगात अनेक कंपन्यांचे टेलिफोन्स तावडतोब उपलब्ध होते. वेटिंग लिस्टची भानगड नाही.

मी व रेखाने हरिषच्या मदतीने स्वयंपाक केला. गॅस बटण फिरवितांच काडी वा लायटर न लावता सुरू होताना बघून गंमत वाटली. अमेरिकेत 'फ्रोझन फूड' खूप मिळत असल्याने अर्ध्या तासात डाळ, भात, मटारांच्या उसळी सकट सर्व तयार झाले. तेथे एक प्रकारचा ( इटालिअन ) ब्रेड मिळतो; जो ओव्हनमध्ये ठेवला असता आपल्याकडील भाकरी सारखा पापुद्रा सुटून फुगतो. वरती तूप घातले की अगदी गरम भाकरी खाल्ल्याचे समाधान मिळते. हरिषच्या फ्रीझमध्ये वांगी, फ्लॉवर, टॉमॅटो वगैरे भाज्या तर होत्याच पण मिरच्या, कोथींबीर, ओल्या नारळाचे खोबरेही बघून आश्चर्य वाटले. घरी स्वयंपाक केला तर चवीत काहीच उणीव भासत नाही. मनसोक्त गप्पा मारत जेवणाचा फडशा पाडला. पॅन ॲमच्या आळणी, बेचव जेवणानंतरचे हे जेवण अमृताहून गोड लागले. जोडीला दोन-तीन प्रकारचे आयते मिळणारे दही व ताक होतेच. दही, ताक करण्याचे गृहीणींचे किती काम वाचत असेल ! तृप्तीची ढेकर देऊन अन्नदाता सुखी भवः म्हणून उठलो.

विजय, प्रदीपनी ग्रेहाऊंडचे ( Greyhound International Headquarters Office, 625 Eighth Avenue, New York 10018 Phone No 212–595–0400 ) पास काढून आणले होते. त्यांनाही पावसानी झोडपले. पास मिळायला मात्र काहीही त्रास झाला नाही. २२५ डॉलर्स किंमतीचा हा बसचा पास एक महिना अमेरिका, कॅनडाभर कुठूनही, कसेही, कितीही वेळा फिरण्यासाठी वापरता येणार होता. विमानाचेही याप्रकारचे पासेस मिळतात आणि वेळेची खूप बचत होत असल्याने ते स्वस्तही वाटतात, पण बसने प्रवास केल्याने सर्व अमेरिका जवळून बघण्याची संधी मिळणार असल्याने आम्ही बसनेच जायचे ठरविले. दुसरे दिवशी 'ग्रेलाईन'च्या ( ग्रेहाऊंडची अंतर्गत प्रेक्षणिय स्थळे दाखविणारी बस ) बसने न्यूयॉर्क शहर बघण्याचे ठरवून गुबगुबीत फोमच्या गादीवर, मुलायम दुलईत समाधानाने झोपेच्या आधीन कधी झालो ते कळले देखील नाही.

## बुधवार १३ सप्टेंबर

लवकर उठून सकाळी ९ ची न्यूयॉर्क दर्शनाची बस काहीही करून पकडा-यचीच असे ठरवून धावपळीने निघालो, तेव्हा लोकल्सची अदलाबदल करत ग्रेलाईनच्या ऑफिसमध्ये ( 900, Eighth Ave between 53rd St E 54 th St. ) कसे बसे ९॥ पर्यंत पोहोचलो. सबंध न्यूयॉर्क स्ट्रीटस् आणि अव्हेन्यूंनी काटकोनात विभागले असल्याने आणि प्रत्येक रस्त्यावर नंबरांच्या पाट्या असल्याने पत्ता शोधायला अडचण पडली नाही. लगेच सकाळी १० ची टूर घेऊन ( दर प्रत्येकी १२·५० डॉ. ) कंपनीच्या अलीशान, वातानु-कूलीत बसने शहर बघायला सुरुवात केली. ४½ तासांच्या या ट्रीपमध्ये पुरे न्यूयॉर्क पालथे घातले. गाईड सतत कॉमेंट्री करत होता. कॅथेड्रल ऑफ सेंट जॉन दि डिव्हाईन, चायना टाऊन आणि स्टॅच्यू ऑफ लिबर्टी या फक्त तीनच ठिकाणी खालती उतरविण्यात येऊन बाकी सर्व स्थलांचे बसमधूनच दर्शन देण्यात आले. कंपनीच्या पॅम्प्लेटमधील ते दाखविणार असलेल्या स्थलांची भलीमोटी यादी वाचून आम्ही ही सहल निवडली होती; पण प्रवाशांची दिशाभूल करण्याचा हा अभिनव प्रकार बघून आश्चर्य वाटले.

पहिल्यांदा चर्च बघितले. अगदी भव्य होते. तेथेच कोपऱ्यावर एक फिरता हातगाडीवाला उभा होता. इतक्या छोट्या गाडीवर गरम व गार अनेक पदार्थ होते. अमेरिकेतील प्रसिद्ध ‘ हॉट डॉग ’ येथे प्रथम खाल्ला. खाऊन झाल्यावर रस्त्यावर मात्र कोणी कचरा टाकताना दिसले नाही. चायना टाऊन हा भाग, त्यातील एक बुद्ध मंदिर, प्रेक्षणीय ठिकाण म्हणून का दाख-विले याचे कोडे पडले. तेथे रहात असलेल्या चिन्यांची संख्या लाखामध्ये होती. रस्त्यावरील पाट्याही चिनी भाषेतच लिहिलेल्या होत्या. सकाळी लिंकन सेंटर, स्टेट एम्पायर बिल्डिंग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, अनेक विद्यापीठे, इ. गाईडने जाता जाता बसमधून दाखविली. दुपारी स्टॅच्यू ऑफ लिबर्टीला जाण्यासाठी बोटीच्या धक्क्यावर येऊन पोहोचलो. येथे थोडा वेळ जेवणासाठी देण्यात आला.

स्वातंत्र्यदेवीचा हा पुतळा ( Statue of liberty ) एका बेटावर ( लिबर्टी आयलंड ) असून तो बघायला बोटीतून जावे लागते. या बोटी ‘कोस्ट बॅटरी टर्मिनल बिल्डिंग’ या लोअर मॅनहॅटन मधील ठिकाणापासून दर

तासाला असतात. आमची ग्रेलाईनची बस येथे सुमारे एक तास थांबणार होती. बोटीत खायची-प्यायचीही सोय होती. स्वातंत्र्यदेवीच्या या पुतळ्याची चौथरा धरून ऊंची ९३ मिटर्स (३०५ फूट) तर फक्त पुतळा ४६ मि. (१५१फू.) ऊंचीचा असून त्याचे वजन २२५ टनस् आहे. पुतळ्याच्या मुगुटा-पर्यंत वर जाता येते. चौथऱ्यापर्यंत लिफ्टनेही जाण्याची सोय असून चौथऱ्या-पासून पुतळ्याच्या मुगुटात जाण्यासाठी एका वेळी एका माणसाला चढता येऊ शकेल येवढे पण जाण्या-येण्यासाठी वेगळे गोलाकार जिने आहेत. या जिन्याला १७१ पायऱ्या असून, चौथऱ्याच्या जिन्याला १६७ पायऱ्या आहेत. मुगुटात बाहेरील दृष्य बघण्यासाठी गॅलरी बांधलेली आहे. पूर्वी पुत-ळ्याच्या मशालीमध्ये जाता येत असे पण १९१६ नंतर त्या १२ मीटर अरुंद शिडीमध्ये फार गर्दी ( Congestion ) व्हायला लागल्याने तो मार्ग बंद केला. आम्ही लिफ्टसाठी डॉलर्स खर्च न करता पायऱ्या चढून वरपर्यंत गेलो. खाली येईपर्यंत घामाने डबडबलो. वर चढून येण्याचा व्यायाम केवळ तरुण वयात आल्यानेच शक्य झाला. हे सबंध बेटच फार सुंदर आहे. न्यूयॉर्कचा किनारा ( Coast line ) तर येथून फारच अप्रतिम दिसतो. येथे एक छोटे म्युझियमही असून त्याचे ओझरते दर्शन घेतले. एक सबंध दिवसही येथे घालवायला मजा येईल. आम्हाला मात्र ट्रीपबरोबर आल्याने घाईघाईने सर्व बघून परतावे लागले.

स्टॅच्यू ऑफ लिबर्टी पाहून झाल्यावर परतीच्या प्रवासात युनो, सेंट्रल पार्क, म्युझियम, हडसन नदीवरील पूल वगैरे ठिकाणे बसमधून दाखविली. तसेच श्रीमंत लोकांची शॉपिंग सेंटर्स, 'जॅकेलाईन ओनॅसिसच्या' मालकीची गॉगल्स ग्लासची एक अति उंच भव्य इमारत अशा सामान्य माणसाला कुतुहल वाट-णाऱ्या गोष्टीही दाखविल्या. काही रस्त्यांवर एकमेकांसमोर काचेची तावदाने असलेल्या इतक्या इमारती आहेत की त्याची प्रतिबिंबे बघून आपण काच महालातच आहोत असा भास होतो. बरीचशी ठिकाणे बाहेरूनच दाखवि-ल्याने अजिबात समाधान झाले नाही. न्यूयॉर्क शहराची फक्त ढोबळ कल्पना तेवढी आली. ट्रीप संपतेवेळी दुपारचे २॥–३ च वाजले असल्याने ग्रेलाइनच्या ऑफिसपाशी न उतरता 'रॉकफेलर सेंटर' या अलिकडील स्टॉपलाच उतरलो, जरा भटकून मग घरी जावे या हेतूने.

रॉकफेलर सेंटर हा शॉपिंग एरिआ. येथे जमिनीपासून खाली एक श्रीमंत लोकांसाठी रेस्टॉरंट होते. त्यात 'प्रोमेथिअसचा' सोन्याचा पुतळा एका छोट्या धबधब्यापुढे बसविला होता. अमेरिकेतील हॉटेल्सच्या दरांची भारतात लोकांनी इतकी भीति घातली होती की खाली पायरी उतरावयाची कल्पनाही मनाला शिवली नाही. जवळच ' सिंगर ' मशिनची एक शोरूम होती. तेथे कापड, शिवणकामाला लागणाऱ्या वस्तू, एम्ब्रॉइडरीचे सामान वगैरे गोष्टीही मिळत होत्या. कापड अतिशय स्वस्त होते. अमेरिकेत शिलाई भयानक असल्याने की काय पण विशेष कोणी खरेदी करताना दिसले नाही. आम्ही मात्र पँट, फ्रॉक पिसेस खरीदले. नंतर सकाळी बसमधून बघितलेल्या ' बार्गेन स्ट्रीटचा ' शोध पायी जाऊन काढला. बार्गेन स्ट्रीटवर लोक रस्त्यावर दुकाने माडून बसले होते. बार्गेन म्हणजे किंमतीची घासाघीस नाही तर कमी दर म्हणे ! येथे परत नाईट गाऊन, शर्टस, फ्रॉक्स वगैरे खरेदी करेपर्यंत सात वाजले. दुकाने पटापट बंद होऊ लागून आतले गिऱ्हाईकही बाहेर ढकलले जाऊ लागले. रस्त्यावर शुकशुकाट झाला.

न्यूयॉर्कच्या भर रस्त्यावर काही पोलीस घोड्यावरून पेट्रोलींग करत असलेले बघून चकित झालो. रात्रीच्या जेवणासाठी पीझा घेऊन स्टेशन शोधायला सुरुवात केली. घड्याळात बघितले तर ८॥ वाजलेले. आता इतक्या उशिरा लॉंग आयलंड सारख्या लांबच्या ठिकाणी जायचे म्हणजे छातीत धाकधुक व्हायला लागले. भारतातून निघताना अनेकानी बजावले होते " संध्याकाळी ७ नंतर बाहेर पडू नका. धोकादायक असते. उगाच लुबाडले, लुटले, फसविले जाल. " पण कसचं काय ! जेमतेम रात्री ११ वाजता लॉंग आयलंडला पोहोचलो. रस्त्याने चालणारे आम्ही फक्त चौघेच होतो. हरिष पार्टटाईम डी. बी. एम. चा कोर्स करत होता. त्याचे बुधवारी संध्याकाळी ~~कॉलेज असे. घरी पोहोचलो तरी हरिष कॉलेजमधून~~ आला नव्हता, पण घर उघडेच होते. अमेरिकेत कुलपे न लावता लोक सर्रास बाहेर जाताना दिसतात. आम्हालाच कुलूप न लावता बाहेर जायचे म्हणजे [illegible]न पडत नसे, उगाच चोरीबिरी होईल का या भीतिने ! जुन्या मालाला तेथे काहीच किंमत नसल्यामुळे कदाचित हुदा भुरट्या चोऱ्या होत नसाव्यात.

## गुरुवार १४ सप्टेंबर

काल नुसती बाहेरून बघून समाधान न झालेली काही ठिकाणे प्रत्यक्ष आत जाऊन बघायची ठरविली. हरिषकडून तेथे कसे जायचे याची माहिती घेउन सकाळी घराबाहेर पडलो.

पहिल्यांदा 'स्टेट एम्पायर' ही भूगोलात वाचलेली जगातील एके काळची सर्वांत उंच इमारत ( 5th Avenue, 34th Street ) बघायला गेलो. या जमिनीपासून ( side walk ) १४७२ फूट उंच असलेल्या इमारतीच्या ८६ व्या मजल्यावर अवलोकन कक्ष ( viewers gallery ) असून तेथे कोणालाही तिकीट (प्रत्येकी १ २० डॉ.) काढून जाता येते. एकच लिफ्ट ८६ व्या मजल्यापर्यंत नेत नाही. ३-४ वेळेस लिफ्टस् बदलूनही काही क्षणातच वरती आलो. इतक्या उंच लिफ्टने यायचा अनुभव फारच फॅन्टास्टिक ! कानाला मात्र चांगलेच दडे बसले. या गॅलरीतून सबंध न्यूयॉर्क फारच विलोभनिय दिसत होते. स्वच्छ सूर्यप्रकाश असल्याने दूरपर्यंतचे दृष्य स्पष्ट दिसत होते. वरून बाकीच्या गगनचुंबी इमारती अगदीच खुज्या वाटत होत्या; तर मोटारी काडेपेटी एवढ्या छोट्या दिसत होत्या. हडसन नदी, तीवरील झुलते पूल, केनेडी एअरपोर्टवरील विमानाची उड्डाणे यासारखी दृष्ये न विसरता येण्याजोगी होती. दहा सेंटस् टाकून दुर्बिणीतून ठराविक वेळ न्यूयॉर्क दर्शनाचा आनंद लुटण्याचीही सोय होती. गच्चीवर वारा मात्र सुसाट होता. न्यूयॉर्कचे विहंगम दृष्य जेवढे नजरेत साठविता येईल तेवढे प्रयत्नपूर्वक जतन करून खाल्ती आलो.

सबंध न्यूयॉर्क शहरच अति प्रचंड, उंचच्या उंच आभाळाला भिडणाऱ्या इमारतींनी भरून गेले आहे. नवीन बांधलेल्या बऱ्याचशा बिल्डिंग्ज गॉगल्स ग्लासच्या आहेत. शेवटच्या मजल्याकडे पहायचे झाले तर मानेला रग लागायची. आमचा कॅमेरा तर फुटपाथवरून एकही इमारत पूर्ण उंचीत टिपू शकला नाही. येथे आढळणारी आणखी एक गमतीदार गोष्ट म्हणजे फक्त कार पार्किंगसाठीच्या अनेक मजली इमारती. कोठेही फुकटात गाडी उभी करता येत नाही. काही रस्त्यांवर पार्किंग मिटर्स आहेत. मॅनहॅटनमध्ये ताशी पाच डॉलर्सपर्यंत महाग पार्किंग रेटस् काही ठिकाणी असूनही गर्दीच्या वेळी

गाडी पार्क करायला जागा मिळत नाही. म्हणून बरेच लोक ऑफिसेसला गाड्या न आणता लोकलने येणे पसंत करतात.

रस्त्यावरील एका कापडाच्या दुकानात शिल्न ३–४ डॉलर्स ला एक अशा विश्वास न बसण्याजोग्या किमतीत पॅंट पिसेस खरेदी केले. साड्या मात्र अजून कोठेही दिसल्या नव्हत्या. अमेरिकेत सर्व कापडाचा पन्हा ४८ इंच असल्याने कोठलेही कापड साडी म्हणून वापरता येते. पॅंटला किती कापड लागेल यासाठी मात्र खूपच डोके खाजवावे लागले. तोपर्यंत लंचची वेळ आली.


काल हॉट डॉग टेस्ट केला होता आज अमेरिकेच्या सुप्रसिद्ध 'हॅमबर्गर'चा समाचार घ्यायचे ठरविले. सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटस्‌मध्ये लांबच्या लांब रांगा होत्या. सर्व टेबल्सही भरलेली होती. चौकशीअंती कळले की हा लंच टाईम होता. या भागात अनेक ऑफिसेस असल्याने सर्व हॉटेल्समध्ये गर्दी होती. रस्तेही माणसांनी फुलून गेले होते. अमेरिकेत चालणाऱ्या माणसातून हिंडताना आगळीच मजा वाटत होती. शेवटी एका सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटमध्ये नंबर लागला. तरुण, कडक युनिफॉर्ममधील मुले-मुली रेस्टॉरंट चालवत होती. ऑर्डर दिल्यावर लगेच सुंदर पॅकिंगमध्ये खायचे पदार्थ हजर. हॅमबर्गर, चीझ-बर्गर, फ्रेंच फ्राईज्, कॉफी, कोल्ड मिल्क, वेगवेगळ्या प्रकारचे मिल्क शेकस्, इ. प्रत्येकाचे नाव, किंमत वगैरे गोष्टी ठळक अक्षरात लिहीलेल्या असल्याने आमच्यासारख्या नवख्यांनाही काहीच अडचण पडली नाही. सॉस, मिरपूड, मीठ, साखर, दूध (कॉफीसाठी) याची पाकिटे; प्लास्टिकच्या सुऱ्या, काटे, चमचे यांचे ढीगच्या ढीग पडलेले होते. पाहिजे तेवढे उचला. खाऊन झाल्यावर मात्र प्रत्येकजण आपापले टेबल साफ करून जात होता. पॅकिंगचे कागद कचऱ्याच्या टोपलीत टाकायला काही वाटले नाही पण प्लास्टिकच्या वस्तू टाकताना अगदी जीवावर आले. मला आपल्याकडील डबा-बाटलीवाले, कचरा पेटीतील कागद जमवून त्यावर उदरनिर्वाह करणारे यांची आठवण झाली. हे लोक तर गाड्याही समुद्रात बुडवितात म्हणे; मग प्लास्टिकच्या वस्तूंचा काय किंमत. सबंध अमेरिकेभर मॅकडोनाल्डस्, जॅक इन् द बॉक्स, बर्गर किंग यासारख्या सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटस्‌च्या शाखा आहेत. ही ठिकाणे म्हणजे प्रवाशांची पोट पुजेची विश्रांती स्थानके. स्वस्त नी मस्त.

जेवून यूनोच्या दिशेने रस्ता काटायला सुरुवात केली. वाटेत ' रेडिओ सिटी म्युझिक हॉल ' लागला येथील ' शो ' फार प्रेक्षणीय असतात म्हणून तिकिटे काढायला गेलो; पण वार्षिक दुरुस्तीसाठी थिएटर बंद असल्याने निराश होऊन पुढे जावे लागले.

युनायटेड नेशन्स ( UN )च्या दारात सर्व सभासद राष्ट्रांचे राष्ट्रध्वज फडकत असलेले बघूनच 'हे' आपलं आहे अशी जाणीव होते. ईस्ट नदीकाठी ४२ आणि ४८ व्या स्ट्रीटच्यामध्ये १६ एकर जागेत युनायटेड नेशन्सचे हे हेडक्वार्टर्स असून ते बघण्यासाठी दररोज सकाळी ९ ते दुपारी ४-४५ पर्यंत दर १५-२० मिनिटांनी जगातील प्रमुख भाषेत गाईडेड टूरस् असतात त्यासाठी प्रत्येकी २ डॉ फी द्यावी लागते. ग्रूप मोठा असेल आणि जर आगावू विनंती केली तर ते कोणताही भाषिक—अगदी हिंदी सुद्धा—गाईड देऊ शकतात. ५ वर्षाखालील मुलांना मात्र या टूरमध्ये घेत नाहीत. विविध देशांतील लोक गाईड म्हणून काम करताना दिसले. त्यात साडीतील एका भारतीय युवतीचाही समावेश होता. यूनोच्या ज्या अधिकृत सभा ( official meetings ) होतात त्यांना कोणालाही हजर राहता येते या मीटिंग्जची तिकिटे जो आधी येईल त्याला प्राधान्य ( first come first served ) या तत्त्वावर देतात. १५ किंवा अधिक लोकांच्या ग्रूपला जर गाईडेड टूरस्, डेलिगेटस्च्या डाइनिंग रूममध्ये लंच, मीटिंग्जची तिकिटे याचे रिझर्वेशन करावयाचे असेल तर त्यानी Group Programme Unit, Visitors' Service, United Nations, New York 10017 Tel ( 212 ) 754—7713 या पत्त्यावर अगोदर पत्र व्यवहार करावा. आम्ही गेलो तेव्हा मीटिंग्ज नसल्याने सेक्युरिटी काऊन्सिल, जनरल असेंब्ली, इकॉनॉमिक व सोशल काऊन्सिल वगैरे सर्व आतून प्रेक्षकासाठी राखून ठेवलेल्या खुर्च्यांवर बसून बघता आले. जनरल असेंब्ली हॉलची भव्यता तर मनावर कायमचा ठसा उमटवून जाते. यूनोच्या अधिकृत भाषा ( official languages ) चायनिज, इंग्लिश, फ्रेंच, रशियन, स्पॅनिश आणि जनरल असेंब्लीत या व्यतिरिक्त अरेबिक अशा असून कोणताही प्रतिनिधी अथवा व्हिजिटर त्याला पाहिजे असलेल्या भाषेची डायल फिरवून वक्त्याचे भाषण किंवा त्याचवेळी स्वतःच्या राष्ट्रभाषेत त्याचा अनुवाद इअर फोनवरून ऐकू

शकतो. तसेच प्रत्येक हॉलमध्ये टी.व्ही. कॅमेरे, वार्ताहार, व्हिजिटर्स याच्यासाठीही खास सोयी केलेल्या आहेत. कॉरिडॉर्समध्ये विविध देशांनी भेट दिलेल्या वस्तू मांडलेल्या आहेत. या गाईडेड टूरमुळे युनोचे ध्येय, धोरण आणि कार्य याची जास्त चांगली माहिती मिळाल्याचे समाधानात बाहेर पडलो.


परत आमची तंगडतोड सुरू झाली. वाटेत लागलेल्या अनेक दुकानातून घुसून शर्टस् वगैरे सारखी बारीक सारीक खरेदी केली. काही ठिकाणी फुट-पाथवर चक्क फेरीवाले बसले होते, पण एकच भाव. घासाघिस नाही. प्रत्येकी २ डॉ. प्रमाणे दोन घडीच्या छत्र्या विकत घेतल्या. संध्याकाळी हरिषबरोबर डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये जायचे ठरले असल्याने लवकर, रस्ता न चुकता घरी परतावयाचे ठरविले. पण हे न्यूयॉर्कमध्ये नवख्याला तरी केवळ अशक्यच! लोकल बदलताना मी, विजय व रेखा अंडरग्राऊंडच्या डब्यात चढलो. डॉ. पटवर्धन चढणार येवढ्यात टयूबची दारे बंद होऊन ते प्लॅटफॉर्मवरच राहिले. डॉ. पटवर्धन होते म्हणून ते बरोबर येऊ शकले. मी किंवा रेखा असतो तर आमची काय अवस्था झाली असती याचा विचारही करवला नाही. न्यूयॉर्क, मला वाटतं, जेवढं वरती वसलं आहे तेवढंच जमिनिखालती आहे. अंडरग्राऊंड रेल्वेचे जाळे न्यूयॉर्कभर पसरले आहे. या टयूब म्हणजे इतक्या फास्ट की फटकन येऊन थाडकन दारे आपोआप उघडणार, आत जाऊन बसेपर्यंत दारे आपोआप खाडकन बंद होऊन लगेच सुसाट वेगाने पुढील स्टेशनकडे धावायला सुरवात करणार. आत चढायला थोडा उशीर झाला तर दारात चेंगरून मरायची भीती. लोकल्सना गर्दी—विशेषतः ऑफिसेसच्या वेळांना—अगदी मुंबईसारखीच! थोडक्या वेळात न्यूयॉर्कच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत कोठेही झटकन पोचायची मात्र हमखास खात्री. स्टेशन्सवरती नावाच्या पाट्या अगदी एखाद्याच ठिकाणी असल्याने चुकायचे चान्सेस जास्त. 'मेडिसन स्क्वेअर' मधील अंडरग्राऊंड स्टेशन इतके प्रचंड मोठे आहे की तेथे आम्ही अनेकवेळा जाऊनही दरवेळी आत-बाहेर करताना वेगळाच दरवाजा लागत असे. अगदी चक्रव्यूहात पडल्याचा भास व्हायचा. न्यूयॉर्कमध्ये आम्ही जितके चुकलो असू तितके अमेरिकेत अन्य कुठेही चुकलो नाही. इतके ते प्रचंड मोठे आहे. जणू छोटा देशच!



'एम्पायर स्टेट 'च्या ८६ व्या मजल्यावरून दिसणारे न्यूयॉर्क ( पृ. २९ )



थ्री कॉईन फाऊंटन, रोम   सहप्रवासी विजय, वासती, रेखा, प्रदीप
( पृ. १५४ )



प्रो. व मिसेस एगर्स समवेत त्याचे घरासमोर ( सिरॅक्यूज, न्यूयॉर्क )
( पृ. ३८ )



जगप्रसिद्ध नायगऱ्याची कॅनेडियन बाजू ( पृ ४४ )

हरिषने संध्याकाळी एका 'फक्त खेळण्यांच्या' दुकानात नेले. खेळण्याची विविधता, मुबलकता, कल्पकता बघून तेथील मुलांचा हेवा वाटला. ८ ते १० डॉलर्स पर्यंत अनेक सुंदर, बुद्धीला खाद्य देणारी खेळणी मिळत होती. मोठे लोक वापरत असलेल्या प्रत्येक गोष्टींची छोट्यांसाठी पुनरावृत्ती केलेली आढळली. खेळण्यांतील शिवणाच्या मशीनवर शिवले जाते, टाईपरायटरवर टाईप होते, तर कॅमेऱ्यावर खरे फोटो निघतात. छोटी घरे, त्यांत सबंध किचन, ड्रॉईंग रूम, बेडरुम, इत्यादींचे सेटस्. नानाविध प्रकारची चालती बोलती, विचाराना चालना देणारी खेळणी बघून परत अमेरिकेतच मूल म्हणून जन्माला यावे असे वाटले. मनालीला वॉकी-टॉकी बाहुली घ्यायची होती. त्या दुकानात फक्त चालणाऱ्या किंवा बोलणाऱ्याच बाहुल्या मिळत होत्या. दोन्ही एकत्र असलेल्या बाहुलीची फॅशन गेली होती म्हणे. जेवणाऱ्या, दूध पिणाऱ्या, शी-शू करणाऱ्या, अंगावर रॅश येणाऱ्या, यासारख्या अनंत प्रकारच्या बाहुल्या होत्या. त्याचे बेडस्, बाबागाड्या, कपड्याचे सेटस् हे सर्व बघून तेथेच भातुकलीचा खेळ मांडायचा फार मोह झाला. मनालीसाठी दुसरीकडे वॉकी टॉकी मिळेल या आशेने अन्य बारीक-सारीक खेळणी घेऊन दुकानाबाहेर पडलो. तेथून जवळच असलेल्या जरा महाग डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या कॉम्प्लेक्समध्ये नंतर जाऊन हरिषने चला चला म्हणेपर्यंत नुसतेच भटकून विशेष काही खरेदी न करता घरी परतलो.

## शुक्रवार १५ सप्टेंबर

ग्रेहाऊंडच्या पासचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचा म्हणून नवीन दिवसाच्या सुरुवातीलाच म्हणजे आज रात्री १२ वा. अमेरिका दर्शनाला सुरुवात करावयाची ठरविली आपल्याला कोणकोणती ठिकाणे बघायची आहेत याचा नकाशा आम्ही भारतातच काढून तयार ठेवला होता.

आमच्या बरोबर भटकण्यासाठी हरिषने आज रजा घेतली होती. सकाळपासूनच पावसाची रिपरिप लागली होती. पण दुपारी उघडेल असा अंदाज होता. सगळीकडे सामान स्वतःच वहायचे असल्याने प्रत्येकी एक सुटकेस आणि एक हँडबॅग घेऊन हरिषच्या गाडीतून त्याचे घर सोडले.

पहिल्यांदा बॅंक व पोस्टातील कामे केली. बॅंकेत क्लोज सर्किट टी. व्ही. असतो. केवळ पत्रे पोस्ट करायला अमेरिकेत लांब जावे लागत नाही. प्रत्येक घरापाशी प्रत्येकाची पत्रांसाठी छोटी पेटी असते, त्यात आपल्याला बाहेर पाठवायची पत्रे पेटीचा इंडिकेटर वर करून ठेवली की पोस्टमन पत्रांचा बटवडा करायला येतेवेळी आपली पत्रे घेऊन जातो. पोस्टमनला युनिफॉर्म मात्र नसतो. एकूण अमेरिकेत युनिफॉर्म हा प्रकार मला वाटत जवळ जवळ नाहीच. शाळेतील मुलानाही गणवेष नाही.

नंतर एका छोट्या ग्रोसरी शॉपमध्ये जाऊन लंचसाठी खायचे पदार्थ खरेदी केले तेथे टेबल क्लॉथ, स्वेटर्स, खेळणी वगैरे वस्तूही स्वस्त होत्या म्हणून त्यांचीही खरेदी केली. आपल्याकडे सनमायकामुळे टेबल क्लॉथ हा प्रकार सध्या जवळजवळ नाहीसा झाल्यासारखाच आहे. अमेरिकेत मात्र डायनिंग टेबलवर टेबल क्लॉथ असतोच. त्यामुळे टेबल क्लॉथचे वेगवेगळ्या आकाराचे, रंगाचे, कृत्रिम धाग्यांचे अनेक प्रकार तेथे बघायला सापडतात. या प्रकारच्या ग्रोसरी शॉप्समध्ये रोजच्या जीवनाला आवश्यक असणारे सर्व काही मिळते. बरेच ठिकाणी अशी दुकाने रात्रौ १०-११ पर्यंत किंवा काही ठिकाणी २४ तास उघडी असतात. खायच्या पदार्थांचे तर अगणित प्रकार. काय खावे, काय टेस्ट करावे हेच सुचत नसे. कमी, जास्त फॅट असलेले दुधाचे गॅलन मधील डबे; तर ताकाचे लिटर्स मधील! इतकेच काय कोका कोलाच्याही गॅलनमधील बाटल्या दह्याला अमेरिकेत ‘ योगर्ट ’ म्हणतात. याचेही अनेक प्रकार. नॅचरल योगर्ट, क्रीम योगर्ट ( सायीचे दही ) चीझ कर्ड, रॉसबेरी, स्ट्रॉबेरी सारख्या स्वादांची योगर्टस. जी गोष्ट योगर्टची तीच चीझची. त्यातून चीझ तर फारच स्वस्त. ब्रेडच्या व्हाईट, ब्राउन, स्वीट, फ्रूट, पोर्क, सारख्या अनेक व्हरायटीज्, सॉसेस आणि ड्रेसिंगच्या प्रकारांतील विविधता तर विचारूच नका. दुकान बदलले की मॅनुफक्चरिंग कंपनी बदले, व्हरायटीज् बदलत. परत किती स्वस्त. २५-३० सेंटला एक मोठा ब्रेड तसेच तेवढ्याच किंमतीत सॉसची बाटलीही मिळे. एका डॉलरमध्ये ब्रेड सॉस खाऊन आम्हा चौघाना पोट भरता येत असे. वेफर्स, चॉकोलेट्सचेही नानाविध प्रकार.

न्यूयॉर्कमध्ये अजून साड्यांची खरेदी झाली नव्हती भारतीय स्त्री साडी शिवाय कशी हालणार म्हणून हरिषने आम्हाला एका इंडिअन स्टोअरमध्ये

नेले. पण तेथे साड्यांच्या प्रत्येकी ३०-३५ डॉलर्स किंमती ऐकून साडी घेण्याचा विचार रहीत केला. केशराची किंमतही औंसाला ४० डॉलर्स सांगितल्याने केशराचा नादही सोडून दिला. 'पॅनासॉनिकचा' एक जपानमेड पॉकेट ट्रान्झिस्टर ८ डॉ. ला आणि 'सोनी' च्या सहा कॅसेटस् डझनाला १६ डॉलर्स दराने घेतल्या. टेपरेकॉर्डर ४२ डॉलर्सला मिळत होता.

दुकानातून बाहेर येऊन बघतो तर हरिषच्या गाडीचे चाक बसलेले. त्याने फक्त मेकॅनिकला फोन केला. अर्ध्या तासातच टायर बदलून पुढे जाण्यासाठी मोटर तयार झाली. या प्रकारच्या सर्व्हिससाठीही विमा असतो. पंक्चर काढणे, रिमोल्डिंग वगैरे प्रकार तेथे नाही; कारण ते स्टील बेल्टेड टायर्स होते. पंक्चर झालेले टायर फेकून लगेच नवीन बसवितात तेथून नंतर आम्ही न्यूयॉर्कमधील प्रसिद्ध म्युझियम बघायला गेलो, पण ते बंद व्हायच्या आत पोचू न शकल्याने माघारी फिरावे लागले. वाटेत 'जे. सी. पेनी' हे अवाढव्य डिपार्टमेंटल स्टोअर लागल्यावर पाय आपोआप तिकडे वळले.

न्यूयॉर्कमधील ही दुकाने कधीही न विसरता येण्याजोगी. अक्षरशः जादूनगरीत गेल्यासारखे वाटे. काही काही तर ७-८ मजली. एका मजल्यावर एक प्रकारचा माल. मालात इतकी विविधता की प्रत्येक गोष्ट नुसती ओझरती बघायची म्हटली तरी दिवस अपुरा पडायचा. स्वयंपाकघर, टॉयलेटमध्ये लागणाऱ्या छोट्या मोठ्या वस्तूंपासून टी. व्ही दागदागिन्यापर्यंत सर्व वस्तू नानाविध डिझाइन्समध्ये उपलब्ध होत्या. बागकामाची अवजारे, घरातील किरकोळ दुरुस्तीसाठी लागणारी हत्यारे याचाही त्यांत समावेश होता. ड्रॉईंगरूम, बेडरूमच्या दालनांमधील वेगवेगळ्या डिझाइन्सचे फर्निचर बघून आपल्या हयातीतही अशी दुकाने आपल्याकडे होऊ शकतील की नाही याची शंका वाटली. छोटे टी. व्ही. ७० डॉलर्सपासून मिळत असलेले बघून ते विकत घ्यायचा मोह अनेकदा आवरावा लागला. कपड्यांच्या विभागात घुसले की कोणीतरी चला चला म्हणेपर्यंत बाहेर पडणे जीवावर यायचे. वरं या सर्वांच्या किंमतीही फार अव्वाच्या सव्वा नव्हत्या. अमेरिकनाच्या खिशाला नक्की परवडणाऱ्या.

अमेरिकेत Sears, J C. Penny, Gimbel's, Korvettes, Two guys, Thrifty, K-Mart, या सारख्या डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या लहान सहान

गावातही शाखा आहेत. डिसकाऊंट किंवा ड्रग स्टोअर्स लिहिलेले असते तेथे माल जरा स्वस्त मिळतो, अर्थात मालाची प्रतही तेवढी कमी दर्जाची असते. तसेच बऱ्याचशा दुकानांतून रिडक्शन सेलसाठी बहुदा एखादा तरी कोपरा राखून ठेवलेला असतो. तेथे काही काही वस्तू अतिशय स्वस्त म्हणजे जवळजवळ फुकटातच मिळतात. १-२ रुपयात पाच वर्षे वयाच्या मुलीच्या मापाचा तयार फ्रॉकच काय पण फ्रॉकचे नुसते कापडही आपल्याकडे मिळत नाही, पण तो तेवढ्याच डॉलर्समध्ये अमेरिकेत या सेल काउंटरवर मिळू शकतो. अमेरिकन माणसाचे सरासरी उत्पन्न महिन्याला ७०० डॉलर्स आहे. त्यांना तर ही किंमत म्हणजे ' किस झाडकी पत्ती ' वाटत असावी. बर या सेलमध्ये खराब झालेला माल नसून थोड्या जुन्या फॅशन व डिझाईन्सच्या वस्तू असतात. आपल्याला अर्थात त्या ओल्ड फॅशनच्या वाटत नाहीत. आम्ही दुकानात शिरल्या शिरल्या हा काउंटर पहिल्यांदा धुंडाळून मगच इतरत्र बघत असू.

वेधशाळेच्या अचूक अंदाजाचा पुन:प्रत्यय आला. पाऊस जाऊन आभाळ स्वच्छ झाले. आता अंधार पडू लागला होता. खूप घिरट्या घातल्यानंतर ब्रॉडवेजवळील एका छोट्या रस्त्यावर गाडी पार्क करायला जागा मिळाली. पण त्या रस्त्यावर गाडी सोडून जाणे म्हणजे सामानाच्या चोरीमारीच्या भीतिने धोकादायक होते म्हणून अधून मधून गाडी सुरक्षित असल्याची खात्री करून घेत ब्रॉडवेवरून खूप भटकलो. रात्री ब्रॉडवेवरून चालत हिंडण्यात आगळीच मजा आहे. सगळीकडे दिव्यांचा लखलखाट. जवळ जवळ सगळ्या सेक्सी चित्रपटांच्या जाहिरातींचा झगमगाट. रात्रौ १२॥ वा. ची सिरॅक्युजला जाणारी ग्रेहाऊंडची बस पकडायची ठरविली असल्याने तोपर्यंत वेळ काढणे भाग होते रस्त्यातील स्वस्त वाटणाऱ्या दुकानातून घुसत, कधी नुसतेच काचेच्या शो केसेसमधील वस्तूंचे भाव वाचत, ब्रॉडवेवरील गंमत बघत टाईम पास करू लागलो. हरिषला ४० मैल जायचे असल्याने आम्हाला ग्रेहाउंड स्टेशनवर सोडायला सांगून आणि खरेदी केलेले सामान त्याच्याबरोबर पाठवून रात्रौ ९ वा. हरिषचा निरोप घेतला.

आमच्या प्रवासाच्या खऱ्या कसोटीला आता सुरुवात झाली. हरिषचा एस्कॉर्ट आता नसल्याने आमचे आम्हालाच सर्व मॅनेज करावयाचे होते. याचा

प्रारंभ स्वतः बॅगज् उचलून नेण्याने झाला. पोर्ट ॲथॉरिटी बिल्डिंगमधील ग्रेहाऊंडचा हा बस स्टँड म्हणजे छोटे गावच आहे. एका खाली एक किती मजले आहेत कोण जाणे. या इमारतीखाली ट्यूबही येते. चुकायच्या भीतिने भटकायचेही टाळावे लागले. स्टँडवर बसायला असलेल्या काही खुर्च्यांना पोर्टेबल टी. व्ही. बसविले होते. ते आपल्याकडील वजन करायच्या काट्यासारखे काही पैसे टाकले असता ठराविक वेळ चालू होत. त्यादिवशी टी. व्ही. वर महंमद अली आणि लिऑन स्पिंक्स यांचा गाजलेला बॉक्सिंगचा सामना चाललेला होता. आम्ही मात्र डॉलर्स उगाच खर्च करायचे नाहीत म्हणून नुसतेच बसून कंटाळवाणा वेळ कसातरी काढला आणि रात्रौ बरोबर १२।। वा सिरॅक्यूजच्या दिशेने अमेरिकेचा प्रवास सुरू केला.

सिरॅक्यूजला आम्ही मुद्दाम मुक्काम करायचे ठरविले कारण तेथे एगर्स (Eggers) या अमेरिकन कुटुंबात रहायचा अनुभव मिळणार होता. डॉ प्रदीप पटवर्धन याचा धाकटा भाऊ राजेंद्र हा काही वर्षांपूर्वी अमेरिकन फील्ड सर्व्हिसच्या एक्स्चेंज प्रोग्रॅममध्ये प्रो. एगर्स यांचेकडे एक वर्ष राहिला होता. राजेंद्रचे व एगर्स कुटुंबाचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असल्याने त्यांनी प्रदीपला पर्यायाने आम्हाला आग्रहाचे आमंत्रण दिले होते.

* * *

# सिरॅक्यूज

## शनिवार १६ सप्टेंबर

अधून मधून डुलक्या घेत पहाटे ५ च्या आधीच सिरॅक्यूजला येऊन पोहोचलो. इतक्या लवकर ' एगर्स ' लोकाना कसे उठवायचे म्हणून आन्हिक स्टेशनवरच उरकून शेवटी ६ वा. त्यांना आम्हाला स्टेशनवर न्यायला येण्याची विनंती करणारा फोन केला. पधरा मिनिटातच मिसेस एगर्स गाडी घेऊन हजर झाल्या. ओळख नसलेल्या आणि त्यातून अमेरिकन फॅमिलीत रहायचे असल्याने त्याचे शिष्टाचार आपल्याला जमतील की नाही या भीतिने आलेले टेन्शन मिसेस एगर्सच्या बडबडीमुळे लगेच नाहीसे झाले. प्रो. एगर्स हे इकॉनॉमिक्सचे प्रोफेसर. सध्या सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीचे चॅन्सेलर असल्याने त्यांना व्यवस्थापनाचे काम बघावे लागत असे. वीक-एण्ड असल्याने आज ते घरीच होते. आमचे प्रेमपूर्वक स्वागत करून त्यांनी मोठ्या आत्मीयतेने त्यांचे सर्व घर दाखविले. राजमहालच होता तो. मोठमोठे हॉल्स, ५–६ शयनगृहे, ३ डायनिंग रुम्स, अनेक गुबगुबीत सोफा सेटस्. घरात सगळीकडे–जिन्यावरसुद्धा–गालीचे, त्यातील बरेचसे पर्शियन. रूमच्या रंगाला मॅचिंग होणारे आतील इतर सर्व सेटस्. किचनमध्ये स्टीलच्या मोठ्या कपाटाएवढे दोन अवाढव्य फ्रीज. मधोमध ५–६ वेगवेगळ्या प्रकारचे ओव्हन्स. क्रोकरी तर बरीचशी चांदीची असल्याने तीवर नजर ठरत नव्हती. प्रो. एगर्सनी खोटी प्रौढी न मिरविता " हे सगळे युनिव्हर्सिटीच्या मालकीचे आहे " म्हणून लगेच सांगून टाकले. येवढ्या मोठ्या घरात प्रो. व मिसेस इगर्स दोघेजणच रहात होते. मुले सगळी वेगवेगळ्या गावांना नोकरी निमित्त होती. घरात नोकर-चाकरही कोणी नव्हते. तरीही आमचे घर बघून होईपर्यंत मिसेस इगर्सची ब्रेकफास्ट तयार असल्याची हाक आली.

भरपूर गप्पांच्या साथीने ब्रेक फास्ट करून प्रो. इगर्स आम्हाला सिरॅक्यूज युनिव्हर्सिटी दाखवायला घेऊन गेले. शनिवार असल्याने युनिव्हर्सिटीचे सर्व

विभाग बंद होते. मुलांच्या गेम्स मात्र जोरात चालू होत्या. वाटेत भेटणारी मुले ' हाय चॅन्सेलर ' असे विश् करताना बघून आम्हाला कसेसेच होत होते. स्टुडण्ट हॉस्टेलच्या शेवटच्या मजल्यावरून शहराचे दृश्य चांगले दिसते म्हणून वर जाण्यासाठी लीफ्टच्या क्यूमध्ये उभे राहिलो. लीफ्टमध्येही ज्याला जिथे जायचे असेल त्या आधल्या-मधल्या मजल्यावर उतरून मुले जात होती. ' चॅन्सेलर ' होते म्हणून खास लांगूलचालन; त्यांना वर जायला आधी प्राधान्य यासारखी चमचेगिरी कोणीही करताना दिसले नाही. हॉस्टेलही मुला-मुलींसाठी एकच होते. वरून सबंध शहरभर हिरवा गालीचा हंतरल्यासारखा वाटत होता. फॉल सीझननंतर सर्व रंगीबेरंगी होऊन जाते म्हणे चॅन्सेलरचे ऑफिस, लायब्ररी वगैरे बघून घरी परतलो. खुद्द चॅन्सेलरने स्वतः युनिव्ह-र्सिटी दाखविली म्हणून फार अभिमान वाटला.

जेवण करून मिसेस इगर्स आम्हाला खरेदी करायला मार्केटमध्ये घेऊन गेल्या तर चॅन्सलर टी. व्ही. वर ' रकबी ' पहात बसले. ' रकबी ' हा अमेरिकनांचा अत्यंत आवडता खेळ. लंबवर्तुळाकार बॉलने हेलमेट घालून हाताने खेळतात. मार्केटमध्ये सर्व वस्तू महाग वाटल्याने काही खरेदी न करताच हात हालवत परत आलो.

संध्याकाळी ७ वा. इगर्स लोक आम्हाला ' पोसायडन ' या एका ग्रीक रेस्टॉरंटमध्ये डिनरला घेऊन गेले. मेनू कार्डमध्ये सर्वच नवीन, अनोळखी नावे पाहून ऑर्डर कोणती द्यावी तेच कळेना. शेवटी एक डिश सिलेक्ट केली. अगदीच बेचव निघाली. सबंध प्लेट न खाता टाकताना फारच ओशाळवाणे वाटत होते; पण नाईलाज होता.

## रविवार १७ सप्टेंबर

अमेरिकेतील रोजची वर्तमानपत्रे ८० ते १०० पानी असतात, तर रविवारचे पेपर्स म्हणजे जणू आपल्याकडील दिवाळी अंकच ! याबरोबरच सेलच्या खास सेपरेट पुरवण्या असतात त्या वेगळ्याच. शिवाय रद्दीला काहीही किंमत नसल्याने वाचून झाल्यावर सर्व पेपर्सची कचऱ्याच्या टोपलीत रवानगी करावी लागते. काही डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या स्वत:च्या वेगळ्या पुरवण्या असतात. त्यामध्ये वस्तूचे वर्णन, किंमत वगैरे सर्व लिहिलेले असते. आपण घरूनच काय

घ्यायचे ते ठरवून दुकानात जाऊन ताबडतोब तो माल खरेदी करू शकतो. यात अजिबात फसवाफसवी नसते.

सकाळी उठून संडे स्पेशलच्या पुरवण्या बघितल्यावर 'टू गाईज' मधील वस्तू स्वस्त वाटल्या. तसे मिसेस एगर्सना सांगताच त्यांनी आम्हाला ब्रेक फास्ट नंतर तेथे नेऊन सोडायचे कबूल केले. ब्रेक-फास्टला खास आमच्यासाठी पॅन केक्स् केले होते. मिसेस इगर्संची मला कमाल वाटली. आम्ही येणार म्हणून भारतीय पाकशास्त्राची पुस्तके वाचून ती आम्हाला आवडतील असे पदार्थ करून घालत होती. काल छोले केले होते आजचे पॅन केक्स तर फारच आवडले. रात्री डिनरला खास चिकनचा बेत होता.

अमेरिकेत स्वेटर्स फार स्वस्त नी मस्त मिळतात म्हणून भारतातून येताना मी स्वेटर न घेताच आले होते. न्यूयॉर्कमध्ये स्वेटर्स ८-१० डॉलर्सचे खाली मिळाले नाहीत म्हणून कधी कुडकुडत तर कधी जास्त उबदार व जड ओव्हरकोट घालून वेळ निभावून नेत होते. आज मात्र टू गाईजमध्ये ५ डॉलर्सला स्वेटर दिसल्यावर लगेच खरेदी केला. न्यूयॉर्कपेक्षा सर्वच वस्तू स्वस्त होत्या. अमेरिकेत छोट्या गावात टॅक्सेस कमी असल्याने सगळ्या गोष्टी थोड्या स्वस्त मिळतात.

रात्री एगर्सनी आम्ही आलो होतो म्हणून प्रो. बाली व त्यांचे फॅमिलीला डिनरसाठी बोलावले होते. दुपारच्या जेवणानंतर थोडी डुलकी घेऊन स्वयंपाकघरात येऊन बघते तो चॅन्सेलर स्वतः ॲप्रन बांधून बायकोला चिकन फ्राय करायला मदत करत होते. ते बघून मला अक्षरशः दोन फूट उडायला झाले. आपल्याकडील नवरा तोही इतक्या मोठ्या पोस्टवरील, बायकोला मदत करायचा नुसता विचार तरी करेल का असा विचार माझ्या मनात आला. प्रो बाली सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीत फिजिक्स शिकवतात, तर मिसेस बालींनी त्याच युनिव्हर्सिटीत मराठीत Ph D केल्याचे ऐकून खरे वाटले नाही. या विद्यापीठात मराठी पुस्तकांची मोठी लायब्ररीही आहे म्हणे. गंमत म्हणजे त्यांच्या तीन मुलींपैकी एकीलाही चांगले मराठी बोलता येत नव्हते. त्यांच्या थोरल्या मुलीने एका अमेरिकन डॉक्टरशी लग्न केलेले होते. तिचा नवरा फिचर्सनी निग्रो वाटत होता पण रंगाने उजळ होता. तो निग्रो असावा

की नाही याबाबत आम्ही आपआपसात चर्चा केली; पण त्यांना प्रत्यक्ष विचारायचे धैर्य मात्र झाले नाही. मिसेस वार्लीनी मटकीची उसळ, पुलाव तयार करून आणला होता तर मिसेस एगर्सनी फ्राइड चिकन, फ्राइड फ्लॉवर, केक, आइस्क्रिम वगैरे पदार्थ केले होते. सर्व पदार्थ फारच चवदार झाले होते. पार्टी खास मोठ्या डायनिंग हॉलमध्ये शॅन्डेलिअर्सच्या उजेडात पार पडली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अगदी कोरडी पार्टी. बिअर सुद्धा नाही. प्रो. एगर्स ड्रिंकिंग, स्मोकींग करत नसलेले बघून अमेरिकेतही असे लोक असू शकतात हे पहायला मिळाले. खूप गप्पा मारत, खेळीमेळीच्या वातावरणात जेवण झाले. अमेरिकेत प्रत्येक जेवणाच्या शेवटी कॉफी असतेच. पण ते लोक फ्रीझ कोल्ड दूध न तापवता वापरत असल्याने ' मि. कॉफी ' मधून परकोलेट होणारी गरम कॉफी गार व बेचव होऊन जाते.

रात्री झोपायच्या आधी टी. व्ही. वर इजिप्त-इस्रायलच्या पंतप्रधानांचा प्रे कार्टरच्या उपस्थितीतील शांतता करारावरील सह्यांचा कार्यक्रम बघितला.

## सोमवार १८ सप्टेंबर

आपल्याकडे पाहुणे येणार तेव्हा त्याच्या आवडी-निवडी लक्षात घेऊन, त्याचा त्याप्रमाणे आगावू प्रोग्रॅम आखून, त्याना आपल्याकडील मुक्काम बोअर होऊ न देण्याचे कसब मिसेस एगर्सकडून शिकावेसे वाटले. आज सकाळी ' हॉस्किन्स ' ( Hoskins ) याच्या शेतावर जाण्याचा कार्यक्रम होता. आम्ही उठून, तयार होऊन खाली यायच्या आतच प्रो. एगर्स युनिव्हर्सिटीत गेलेले सुद्धा होते. गेले दोन दिवस वीक-एण्ड म्हणून घरी असल्याने त्यांच्याशी अनेक विषयांवर खूप गप्पा मारता आल्या. मिसेस एगर्स ब्रेकफास्ट झाल्यावर स्वतः गाडीतून आम्हाला हॉस्किन्सकडे घेऊन गेल्या.

हॉस्किन्स कुटुंबाची ' ऑबर्न ' या गावी ४५० एकर्स शेती होती. मि. हॉस्किन्स आणि त्याची ५ मुले मिळून शेतीचा सर्व कारभार चालवत होते. मिसेस हॉस्किन्सची पांच वर्षापूर्वी करोनरी बायपास सर्जरी झाली असून सुद्धा शेतावर भरपूर काम करून शिवाय शाळेत पार्ट टाईम नोकरी करत होती. अमेरिकेत अनेक पार्ट टाईम जॉबज् उपलब्ध असल्याने बायकांना घरकाम संभाळून उरलेल्या वेळात अर्थार्जन वा सोशल वर्क करता येते. तसेच

ऑनररी काम करण्याची इच्छा असणाऱ्यांनाही अनेक संधी उपलब्ध आहेत. ' I am serving ' म्हणजे ' ऑनररी काम करणे ' आणि ' I am employed ' म्हणजे ' पगार घेऊन काम करणे ' हा अर्थ मला मिसेस एगर्सकडून समजला. मिसेस एगर्स म्हणे सहसा पँट घालत नाहीत पण त्यादिवशी त्यांनी पँट घातलेली बघून मिसेस हॉस्किन्सला आश्चर्य वाटले. त्या येणार म्हणून मिसेस हॉस्किन्सने मुद्दाम आठवणीने स्कर्ट घातला होता. My husband says " I would like to see some female when I come home" हे मिसेस हॉस्किन्सचे उद्गार ऐकून मला आश्चर्य वाटले. तेथील पुरुषांनाही बायकांनी बायकीच दिसावे म्हणून फ्रॉक्स, स्कर्टस् घातलेले आवडतात हे बघून आपल्याकडील साडीच आवडणाऱ्या बहुसंख्य नवरोजींची आठवण झाली. थंडीत मात्र त्या बायकाना नाईलाजास्तव पॅट शर्टस घालावे लागतात. मि. हॉस्किन्सचे ८५ वर्षांचे आई-वडील त्यांच्याच घराच्या रस्त्यासमोरील दुसऱ्या घरात वेगळे रहात होते म्हणूनच बहुदा त्यांचेकडे सासवा-सुनाचे संबंध चागले रहात असावेत.

हॉस्किन्सकडे प्रचंड मोठे ट्रॅक्टर्स, पेरणी, कापणी इ. गोष्टीसाठी लागणारी अवजारे, धान्य साठविण्यासाठी गुदामे, गोठा, गुरे वगैरे तर होतेच शिवाय स्वतःचा पेट्रोल पंपही होता. थंडीमध्ये रस्त्यावर साठलेला बर्फ ट्रॅक्टरच्या सहाय्याने काढून रस्ते साफ करण्याच्या कामाचे कॉंट्रॅक्ट घेणे हा त्यांचा जोडधंदा. मोठ्या अगत्याने त्यांनी आम्हाला सर्व दाखविले. त्यांचे घरही सर्व आधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज होते. शहरातल्या आणि त्यांच्या राहणीमानात काहीही फरक जाणवला नाही. उलट मला तर हे खेडे शहरापेक्षा स्वच्छ, शांत, सुंदर, हिरवेगार असल्याने जास्त आकर्षक वाटले. खेडेगावच्या कल्पना पुरत्या कोसळून पडल्या. धुळीने माखलेले रस्ते, जुनाट, पडकी घरे, विटक्या कपड्यातील लोक हे काही नाही. मि. हॉस्किन्स मात्र आपल्या-कडील शेतकऱ्यांप्रमाणेच भाव फार कमी मिळतात म्हणून धान्य विकायला परवडत नाही असे ओरडत होते. हॉस्किन्सकडे चहा, कुकीज्, टोस्ट वगैरे खाऊन इगर्सकडे जेवायला परत आलो.

दुपारी तीनच्या गाडीने नायगरा बघण्यासाठी बफेलोला प्रयाण करायचे होते. भूक नव्हती तरी मिसेस एगर्सनी आग्रहाने जेवायला घालून गाडीतून

ग्रेहाऊंड स्टेशनवर नेऊन सोडले. प्रो. एगर्सही वेळात वेळ काढून आम्हाला पोचवायला बस स्टँडवर आले होते. एवढा मोठा बिझी माणूस ( दोनच दिवसानी त्यांचेकडे ब्रिटनचे माजी पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन पाव्हणे म्हणून येणार होते ). पण आम्हा परदेशीय, त्यांच्यापेक्षा सर्वच दृष्टीने लहान माणसांना इतकी अगत्याची वागणूक देतो हे पाहून पाश्चात्यांबद्दल असलेल्या अनेक कल्पना भ्रामक ठरल्या. मिसेस एगर्सची प्रेमळ वागणूक तर न विसरता येण्याजोगी. ६५ वर्षांची बाई पण उत्साह आम्हा तरुणांना लाजविणारा. सारखी धावत, पळत असायची. बस सुटेपर्यंत स्टेशनवर थांबली होती. एवढ्या मोठ्या लोकांच्या घरी पाहुणचार घ्यायचा योग आल्याबद्दल धन्य वाटले. सिरॅक्यूज सोडले तरी मिसेस एगर्सचे How nice ! How fine ! Excuse me ! Thank you या सारखे बोलणे सतत कानात घुमत होते.

* * *

# नायगरा

## सोमवार १८ सप्टेंबर

नायगरा बघण्यासाठी खुद्द नायगऱ्याला उतरण्यापेक्षा बफेलो या नायगऱ्याजवळील गावी मुक्काम करून नायगरा बघायला जाणे जास्त स्वस्त पडते. बफेलोला श्री. श्रीकांत रानडे हे डॉ. पटवर्धनांचे नातेवाईक रहात असल्याने आम्ही साहजिकच त्यांच्याकडे उतरायचे ठरविले. संध्याकाळी ७–३० वा. बफेलोला पोहोचलो. पाऊस धो-धो पडत होता. नायगऱ्याची रात्रीची शोभा पाहून येऊन मगच रानडयांच्या घरी जावे असे ठरवून त्यांना तसा स्टेशनवरून फोन करताच " नायगऱ्याला आता मुसळधार पाऊस पडत असून तेथे तुम्हाला काहीही दिसणार नाही, म्हणून तुम्ही आज नायगऱ्याला जायची घाई करू नका " असा मित्रत्वाचा सल्ला त्यांनी दिला. त्याप्रमाणे आम्ही नायगऱ्याला जायचे रद्द करून रानडयाना आम्हाला स्टेशनवर न्यायला यायला सांगितले. त्यांच्या छोटया गाडीत आम्हाला सामानासकट कसे बसे बसवून हळू हळू गाडी चालवित रानडे आम्हाला त्यांच्या घरी घेऊन गेले.

श्रीकांत, अंजली रानडे हे नुकतच लग्न झालेले आनंदी जोडपे. श्रीकांत इंजिनिअर असून बफेलोत ( अमेरिका ) राहून रोज नोकरीसाठी कॅनडात जात असे. तर अंजलीही इंजिनिअर असून तिने नुकतीच बफेलो युनिव्हर्सिटीत M S साठी ॲडमिशन घेतली होती. चाळवजा पण अतिशय सुंदर इमारतीत त्यांचे छोटेसे अपार्टमेंट होते. एक बेडरूम, एक ड्रॉईंगरूम, एक किचन येवढीच जागा. पण अमेरिकेत जागा कितीही लहान असली तरी ओव्हन, डिश वॉशर, कुकींग रेंज, फ्रीज या सहित सुसज्ज स्वयंपाकघर ब्लॉक भाडयाने घेतानाच मिळते. वॉशिंग मशिन फक्त नसते. ते एका मजल्यावर वा इमारतीत कॉमन असून पैसे टाकून ठराविक वेळ वापरता येते. सोफा, बेडस्, पडदे इ. सर्व पैसे दिले की हजर. यात टेलिफोनचाही नंबर लागतो. प्रत्येकाच्या घरी जाड गालीचे, स्लिपिंग बॅगज् असल्याने घर लहान असले तरी पाहुण्यांना झोपायची पंचाईत पडत नाही.

हसत खेळत गप्पा मारत जेवणावर ताव मारला. खीर, रस्सा अप्रतिम झाला होता जोडीला इटालिअन ब्रेड होताच. तीन दिवसांच्या पाश्चात्य पद्धतीच्या जेवणानंतर आजचे महाराष्ट्रीयन जेवण फारच रुचकर लागले. सर्वजण पुण्याचेच असल्याने गप्पा इतक्या रंगल्या की झोपायला रात्रीचे १२ वाजून गेले.

## मंगळवार १९ सप्टेंबर

पहाटे पाचला उठून सहा वाजता रानड्यांच्या बरोबरच ( सर्व सामान त्यांच्या घरी ठेऊन ) बाहेर पडलो. रानडे रोज स्वतःच्या गाडीने ऑफिसला नायगऱ्यावरूनच जात असल्याने त्यांनी आम्हाला नायगऱ्यापाशी आणून सोडले. अमेरिका-कॅनडाच्या बॉर्डरवर खूप चेकिंग होते. आम्ही बरोबर सुटकेसेस सारखे अवजड सामान नेले नसल्याने कस्टम्समधून आमची लवकर सुटका झाली.

आज सुदैवाने पाऊस नव्हता पण हवा मात्र ढगाळ असल्याने सूर्यदर्शनाचे नाव नव्हते. आपण खरोखरचा जगप्रसिद्ध ' नायगरा ' धबधबाच बघत आहोत याची स्वतःला चिमटा घेऊन खात्री करून घेत नायगरा नजरेत साठवून घेतला. नदीच्या एका किनाऱ्यावर अमेरिका असून दुसऱ्या किनाऱ्याला कॅनडा आहे. नदीचे दोन भाग होऊन अर्धी नदी अमेरिकन साईडने खाली उडी मारते तर उरलेली अर्धी कॅनेडियन भागात असलेल्या ' हॉर्स शू शेप ' कड्यावरून खाली कोसळते. कॅनेडियन बाजूला जास्त पाणी असल्याने नाय-गऱ्याची ती बाजू जास्त भव्य आहे, म्हणूनच कॅनेडियन साईडने नायगरा पहाण्यात जास्त मजा आहे.

नायगरा वेगवेगळ्या ठिकाणांहून, निरनिराळ्या अँगल्समधून पहाण्यासाठी अनेक साईट सिईंग टूरस् आहेत. या सर्व ट्रिप्स सकाळी ८–८॥ ला सुरू होतात. आम्ही तेथे सकाळी ७ लाच जाऊन थडकलो होतो. दोन तास थंडीत कुडकुडत कसेबसे घालविले. खूप फोटो काढले. सूर्याजीरावाचा मात्र अजून पत्ता नव्हता. नायगऱ्याचे आम्ही तीन प्रकाराने दर्शन घेतले.

पहिल्यांदा उंच मनोऱ्यावरून ( Skylon Tower ) नायगरा बघितला. टॉवरवर जायला काचेची दारे असलेली लीफ्ट बाहेरून बसविलेली असल्याने

वरती जाता-जाता वेगवेगळ्या ऊंचीवरून दृश्य बघता येते. टॉवरच्या टॉपवर ऑब्झर्वेशन गॅलरी असून एक फिरते रेस्टॉरंटही आहे. रेस्टॉरंट महाग असेलच या खात्रीने त्यात पाऊलही न टाकता फक्त नायगराच पहाण्याचा आनंद उपभोगून खाली परतलो. तेथे दुसराही एक मनोरा ( National Panasonic Tower ) उंचावरून नायगरा पहाण्यासाठी आहे.

आम्ही दुसरी ट्रिप घेतली ' मेड ऑफ दि मिस्ट 'ची. यात छोट्या बोटीतून रेनकोट घालून धबधब्याच्या अक्षरशः पायथ्यापर्यंत ( bottom ) नेतात. अंगावर तुषारांचा इतका पाऊस पडत असतो की डोळेही उघडणे मुष्कील होते. समोरील पाण्याचा तो रौद्र प्रवाह पाहून बोट परत कधी वळते असे होऊन जाते.

नतर आम्ही ' सीनिक टनेल ' बघायला गेलो. कॅनेडियन बाजूच्या धबधब्या पाठीमागचा खडक पोखरून बोगदा केला असून त्याला मधेमधे खिडक्या ठेवलेल्या आहेत. या खिडक्यांतून चक्क नायगऱ्याच्या धारेतच हात घालता येत होता. वरून पडणाऱ्या पाण्याचे जबरदस्त प्रेशर जाणवत होते. तुषारांमुळे येथेही पूर्ण भिजायला होते म्हणून या टनेलमध्ये जाण्यासाठीही गमबुटस्, रेनकोट, वगैरे साज करावा लागलो. इतक्या वेगवेगळ्या मापाचे बुटस्, रेनकोटस् देण्याचे काम अनेक मुली चटपट करत होत्या. त्यामुळे भलीमोठी रांग असूनही झटकन आत जाता येत होते.

खरच हे लोक एकच गोष्ट किती तऱ्हेतऱ्हेच्या कल्पकतेने दाखवतील ! प्रत्येक ठिकाणी दाखविण्यासाठी अनेक सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागत असल्याने कोठलीही गोष्ट फुकटात बघता येत नाही. प्रत्येकी २-३ डॉलर्स तरी एन्ट्रन्स फी असतेच. टुरिस्टना पहिल्यादा ती थोडी जास्त वाटते; पण त्यांनी ती गोष्ट चांगली दाखविण्यासाठी व नीट ठेवण्यासाठी घेतलेले कष्ट बघून मात्र कमीच वाटते. नायगऱ्याच्या जवळच असणाऱ्या बागा, म्युझियम्स वगैरे बघण्यासाठीही सहली आहेत. आम्ही मात्र त्या घेतल्या नाहीत कारण नायगऱ्याच्या समोरचे रस्ते म्हणजेही प्रचंड बागाच आहेत. सगळीकडे हिरवीगार हिरवळ त्यावर रंगीबेरंगी पाना-फुलांचे डेकोरेशन. फारच उल्हासित वाटते. कॅनेडियन धबधब्याजवळील रस्ता सारख्या उडणाऱ्या तुषारांनी कायम ओला असतो. छत्री घेऊनच या रस्त्यावर हिंडावे लागते. तसेच इंद्रधनुष्येही

दिसतात म्हणे पण त्या दिवशी सूर्यप्रकाश नसल्याने ती शोभा बघण्याची संधी मात्र हुकली.

धबधब्यासमोर अनेक रेस्टॉरंटस आहेत; तेथे जेऊन परत रस्त्यावरून हिंडू लागलो. पण थंडी 'मी' म्हणत असल्याने बाहेर हिंडण्यातही सुख वाटेना. नायगऱ्याची रात्रीची शोभा तर पहायचीच होती. आता एवढा वेळ या थंडीत कसा काढायचा म्हणून शेवटी टोरांटोला (कॅनडा) जाण्याचा निर्णय घेतला. ग्रेहाऊंडचा पास कानडामध्येही चालत असल्याने कॅनडातील एक शहर ओझरते का होईना बघायची संधी साधता आली. बसच्या उबदार वातावरणात प्रवेश केल्यावर हायसे वाटले. आता निदान मस्त झोपता तरी येणार होते. टोरांटोला जाण्याचा विचार लवकर न सुचल्याबद्दल थोडे वाईट वाटले कारण तेथे आता आम्हाला जेमतेम दोन तासच थांबता येणार होते.

जाताना वाटेत 'लेक ऑंटॅरिओ' लागले. एवढे प्रचंड की समुद्रासारख्या लाटाही उसळत होत्या. या लेक खालून टोरांटो ते डेट्रॉईट बोगदा आहे. दु. ४–४॥ वा. टोराटोला पोहोचलो. वाटेत ग्रेहाऊंड स्टेशनजवळच एक उंच टॉवर दिसला; तो बघावा म्हणून चालू लागलो पण तो काही येईना. शेवटी वेळेवरच त्याचा नाद सोडला म्हणून बरं झाल कारण टोराटाहून परतताना बघितले तर तो फारच लांब होता. हा टॉवर (Top of the Toranto) सध्या जगात म्हणे सर्वात उंच आहे. 'सिटी हॉल'च्या परिसरात थोडा वेळ काढून बस स्टँडवर परतलो. टोरंटोचे रस्ते अमेरिकेसारखेच, दोन्ही बाजूला हिरवळ असलेले. पण ट्रॉली बसेस, ट्रॅम्सनी गजबजलेले इंडियन लोकही बरेच दिसले. अमेरिकेपेक्षा सर्वच गोष्टी थोड्या महाग वाटल्या. अर्थात् मत बनविण्याइतका वेळही आम्हाला मिळाला नाही. जर आम्ही बफेलोला परत न येता टोरांटोहून डायरेक्ट डेट्रॉईटला गेलो असतो तर कॅनडा जास्त जवळून बघता आला असता.

टोराटोहून संध्याकाळी निघून रात्रीची रोषणाई बघायला नायगऱ्याला परत आलो. अप्रतिम लाईटिंग होते. संगीताच्या तालावर निळा, गुलाबी, पिवळा, पांढरा इ. रंगाच्या दिव्यांचे झोत धबधब्यावर सोडले जात होते. प्रत्येक रंगात नायगऱ्याचे सौंदर्य आगळेच दिसत होते. पांढऱ्या झोतात नायगऱ्यातून बर्फच पडत असल्याचा भास होत होता 'नायगरा बाय नाईट'

खरच अविस्मरणीय ! हिवाळ्यात संपूर्ण गोठलेला नायगरा सुद्धा अतिशय फॅन्टास्टिक दिसतो म्हणे, परंतु त्यावेळी इतर सर्व ट्रीप्स बर्फामुळे बंद असल्याने त्या मजेला मात्र मुकावे लागते.

रात्रीच्या नायगऱ्याचे सौंदर्य पिऊन आता काहीतरी उदरभरण करावे म्हणून निघालो तो खायची-प्यायची सर्व दुकाने, रेस्टॉरंटस् बंद झालेली. भूक तर सपाटून लागली होती. रात्रीचे फक्त ९ च वाजले होते. आता उद्या सकाळपर्यंत उपास करावा लागणार असे म्हणत निराश होऊन परतत असताना एक नुकतेच बंद होत असलेले हॉटेल सापडले आणि आमच्या विनंतीवरून आमचे खाणे होईपर्यंत तरी ते उघडे ठेवण्याची कृपा संचालकाने केली.


बफेलोला परत जायला रात्री १० ला गाडी होती. ग्रेहाऊंड स्टेशनवर गेलो तर गाडीला अतोनात गर्दी. काहीही करून ही गाडी आम्हाला मिळायलाच पाहिजे होती कारण बफेलोला, डेट्रॉईटला जाणारी पुढची बस पकडायची होती. त्या गाडीत जागा मिळाली नाही आणि उभे राहून जायला परवानगीही दिली नाही. आता आपले पुढील प्रवासाचे सर्व कॅलेंडर कोलमडणार म्हणून आमचा धीर सुटला पण कंट्रोलर म्हणाला, " काही काळजी करू नका. कोणीही उभे राहून जायची गरज नाही. तुमच्यासाठी दुसरी बस सोडतो." आणि चक्क आम्हा ७–८ जणांसाठी दुसरी बस सोडली. रांग संपेपर्यंत बसेस सोडण्याचा ग्रेहाऊंडचा नियमच आहे म्हणे ! खरच, आपल्याकडे असे दिवस कधी येतील का ?

रात्री ११ वाजता बफेलोला पोहोचलो. श्रीकांत, अंजली आमचे सामान घेऊन स्टेशनवर आलेलेच होते. त्यांनी केलेल्या मदतीमुळे नायगऱ्याचा प्रवास फारच सुखकर झाला. रानडे दांपत्याशी थोडा वेळ गप्पा मारून आणि त्यांना दुसरे दिवशी सुट्टी नसल्याने घरी जायला सांगून रात्री १२ वाजता डेट्रॉईटला प्रयाण केले.

* * *



फोर्ड मोटर क, डेट्राईट ग्रीन फिल्ड व्हिलेज (पृ. ५१)



ॲम्युझमेन्ट पार्क, मॅरियॉट्स 'ग्रेट अमेरिका', शिकागो लूप राईड (पृ ६०)

बेरिल स्प्रिंग व फायर होल



यलोस्टोन नॅशनल पार्क  निसर्गाची उधळण (पृ ६५)



बर्फवृष्टी

८२० २३३२८ अ.प्रवास १९१९ ... शाखा

# डेट्रॉईट

## बुधवार २० सप्टेंबर

डेट्रॉईटला जाण्याचे खास आकर्षण म्हणजे जगप्रसिद्ध फोर्ड मोटर कंपनी पाहणे हे होते. सकाळी ८ च्या सुमारास डेट्रॉइटला येऊन पोहोचलो. काल-पासून श्री. अकोलकर यांना कॉन्टॅक्ट करत होतो पण ते वीक-एण्डला या म्हणून निरोप देत होते. स्टेशनवरून त्यांना पुन्हा घरी आणि नंतर फॅक्टरीत फोन केले, पण ते भेटू शकले नाहीत म्हणून शेवटी हॉटेलमध्ये उतरावयाचे ठरविले. एवढ्यात अकोलकरांचाच फोन येऊन त्यांनी संध्याकाळी फोर्ड मोटर कंपनीत न्यायला येतो म्हणून सांगितले. सामान ग्रेहाऊंड स्टेशनवरील लॉकरमध्ये ठेऊन फोर्ड मोटर कंपनी बघायला बसने गेलो. दोनदा बसेस बदलायला लागल्याने तेथे पोचायला बारा वाजले. टॅक्सीने गेलो असतो तर पैसे जास्त पण वेळ कमी लागला असता.

कंपनीच्या गेस्ट रिसेप्शन सेंटरपाशी उतरलो. तेथे फोर्ड मोटरींची लेटेस्ट मॉडेल्स, त्यांची माहिती, कंपनीचा इतिहास, फोटो वगैरेंचे छोटे प्रदर्शनच होते. तेथील टी. व्ही. वरही यासंबंधीची फिल्म सतत चालू होती. याच ठिकाणाहून मोटर असेंब्ली युनिट बघायला जाण्यासाठी कंपनीच्या बसेस आहेत. एकावेळी ३-४ बसेस अशा दिवसातून दर अर्ध्या तासाने एक ट्रिप्स असतात. त्यामुळे कितीही गर्दी असली तरी पटकन नंबर लागतो. हे सर्व कंपनी आपल्या खर्चाने, त्यांच्या गाईडसह दाखविते. आपल्याला कोणत्या ट्रिपबरोबर जायचे याची रिसेप्शनिस्टकडे फक्त नोंद करण्याव्यतिरिक्त काहीही करावे लागत नाही.

फोर्ड मोटरींचे असेंब्ली युनिट म्हणजे अक्षरशः जादू वाटते. आपण पुढे जात असताना आपल्याबरोबर एक एक भाग जुळत जाऊन संपूर्ण तयार मोटर ऑटोमॅटीक धुऊन-पुसून बाहेर पडते. आम्हाला 'मस्टांग' आणि 'कॅप्री' गाड्या तयार होत असलेला विभाग दाखविला. आतमध्ये सरकते पट्टे होते. स्टियरिंग व्हील, चाके, सीटस् यांसारखे गाडीचे विविध पार्टस्

स्व...४

लोंबकळत येऊन योग्य जागी बसत होते. कामगारामध्ये अनेक महिला बघून आश्चर्य वाटले. अमेरिकेत इतक्या ठिकाणी बायका काम करताना दिसतात की तेथील पुरुष फक्त सैनिकी पेशा पत्करत असावेत अथवा बाईच्या जीवावर खात असावेत असे वाटले. एकाच वेळी तयार होणाऱ्या गाड्या देखील किमान बाहेरून तरी वेगळ्या होत्या. या विभागातून बाहेर पडलो, तो तयार मोटरींचा महासागरच पसरला होता. एक मोटर काही दुसरी सारखी नव्हती. अगदीच काही नाही तर निदान रंग तरी वेगळा होताच. ७९ सालच्या फोर्ड गाडीचे मॉडेल शोकेसमध्ये विराजमान झाले होते. नवीन मॉडेल बाहेर यायचे म्हणून बरेच वेळा कंपनी ऑगस्टमध्ये टूरिस्ट लोकांना बंद असते.

नंतर कंपनीचेच स्टील शीटस् ( Hot strip mill ) तयार करण्याचे युनिट दाखविले. लोखंडापासून पत्रा होईपर्यंतचा प्रवास बघणं हा फारच रोमांचकारक अनुभव आहे. लाल तप्त लोखंडाची ज्वाला ओकत जाडी कमी होत जाणारी पट्टी बघून डोळे दिपत होते. तेथील तपमान १२५° ते १५०° फॅ. असल्याने घामाच्या धारा लागल्या होत्या. त्यामुळे कधी एकदा बाहेर पडतो असे होऊन गेले.

संपूर्ण ट्रिप साधारणतः दोन तासांची होती. त्यानंतर त्यांनी पुन्हा गेस्ट सेंटरमध्ये आणून सोडले. येथून तयार झालेल्या गाड्यांची चाचणी घेण्यासाठी असणारा कार टेस्टिंग ट्रॅक दिसतो. अनेक गाड्यांचे; त्या प्रचंड वेगात वाकड्या-तिकड्या, तिरक्या चालवून टेस्टिंग चाललेले होते. वरील सर्व कसोट्यांना उतरणारी गाडीच बाजारात जाते.

अमेरिकेत बाजारात वेगवेगळ्या कंपन्यांच्या, नानाविध प्रकारच्या गाड्यांची रेलचेल असते. गाडीसाठी नंबर लावणे हा प्रकार नाही. नवीन, सुंदर गाडी ३-४ हजार डॉलर्सपर्यंत मिळते. सेकंड हँड ( म्हणजे फक्त नावाला ) गाड्या तर १००० डॉलर्सपासून होत्या. ७९ ची नवीन मॉडेल्स आल्यावर ७८ ची मॉडेल्स सेलवर गेली सुद्धा. पेट्रोलही ५५ ते ६० सेंटसला गॅलन इतके स्वस्त. त्यामुळेच त्या लोकांना मॅचिंग गाडीही वापरायला परवडू शकते. गाड्यांच्या सेलची अनेक प्रचंड दुकाने पाहून अनेकदा गाडी विकत घेण्याचा मोह मात्र झाला.

नंतर आम्ही हेन्री फोर्ड म्युझियम बघायला गेलो. हेन्री फोर्डने तयार केलेल्या पहिल्या गाडीपासून, मोटरी, रेल्वे इंजिन्स, विमाने, सायकल्स, शिवणाची मशिन्स इत्यादी अनेक गोष्टींत कसकशा सुधारणा ( modification ) होत गेल्या हे दाखविणारी मॉडेल्स होती. पूर्वीच्या काळातील दुकाने होती, त्यात बटण दाबले की आतील वस्तूच्या इतिहाससंबंधी रेकॉर्ड सुरू होई. अक्षरशः धावत पळत म्युझियम नुसते नजरेखालून घातले, कारण ग्रीनफील्ड व्हिलेज या दुसऱ्या म्युझियमची झलक बघायची होती. म्युझियम-मध्ये त्याच दिवशी परत आत जावयाचे असेल तर वेगळे तिकीट काढावे लागत नाही. हातावरून कसला तरी बोळा फिरवतात. आपल्याला नुसत्या डोळ्यांनी त्याचा रंग दिसत नाही वा वास येत नाही पण काही विशिष्ट प्रकारच्या लाईट खालीच तो रंग दिसत असल्यानेत्याना तिकीट न काढता घुसणारे ओळखता येतात. हे म्युझियम बघायचे तिकीट प्रत्येकी ३.५० डॉ. असून बुधवारी सिनिअर सिटीझन्सना या म्युझियममध्ये मोफत प्रवेश असतो. त्यामुळे आज म्हाताऱ्या कोताऱ्यांनी गर्दी उडविली होती.

अमेरिकेत ' सिनिअर सिटीझन्स ' म्हणजे ६५ वर्षांवरील नागरिकांना अनेक ठिकाणी खास सवलती दिलेल्या आहेत. बसेसमध्ये राखीव जागा असतात. काही ठिकाणी आठवड्यातून एखादा दिवस फ्री एण्ट्री असते; तर काही जागी दरामध्ये सवलत दिलेली असते. व्हिलचेअरवरून येणाऱ्यांसाठी खास मोठ्या दाराच्या बाथरूम्स केलेल्या असतात. अनेक वयस्कर लोक जीवनाचा आनंद लुटताना दिसतात.

हेन्री फोर्ड म्युझियमहून धावत पळत मी व विजय ग्रीनफील्ड व्हिलेज ( Greenfield village ) ही काय भानगड आहे ते बघायला गेलो. हे गाव म्हणजे हेन्री फोर्डचे जन्मगाव. त्याच्या जन्माच्या वेळी ते जसे होते तसेच्या तसे आजही जतन केले आहे. हे म्युझियम बंद व्हायला जेमतेम एक तासच राहिला होता तरी प्रत्येकी ३.५० डॉ. तिकीट काढून आत शिरलो तो गावातून फिरणारी बग्गीची शेवटची फेरी गेल्याचे कळले. शेवटी जमेल तेवढे पायीच बघण्याचे ठरविले. अमेरिका या शतकाच्या सुरुवातीला कशी होती याचे चालते बोलते दर्शन हे म्युझियम बघताना होते. घरे, रस्ते, दुकाने वगैरे सर्व जुन्या पद्धतीचे. दुकानांतून काम करणारे लोक त्यावेळच्या

फॅशन्सचे कपडे घालून वावरताना दिसतात. बग्गया, घोडागाडया, छोटी रेल्वे ( तिचे जुनाट स्टेशन, टणठण वाजणारी घंटा ) ही तेथील जुन्या जमान्यात असणारी हिंडायची साधने. आम्ही या छोट्या रेल्वेतून या व्हिलेजभोवती फेरफटका मारला. हेन्री फोर्डची पहिली मोटरगाडी, त्याचं वर्कशॉप, तो जन्मला ते घर ( घरातील फर्निचरही जसेच्या तसे बघायला मिळते ); तसेच एडीसनची पॅडल व्हील स्टीम बोट, कारागीर प्रत्यक्ष काम करत असलेली दुकाने, इ. गोष्टी पाहताना आपल्याला वर्तमानकाळ विसरायला होतो. सबंध गावभर चालत भटकण्यात नक्कीच मजा आली असती, पण वेळेअभावी ते शक्य नव्हते म्हणून जमले तेवढे जास्तीत जास्त पाहून घेतले. पाचच्या ठोक्याला बाहेर पडावेच लागले. वेळ अपुरा पडल्याची रुखरुख मात्र बाहेर पडताना होत होती.

ग्रीन फील्ड व्हिलेज आणि हेन्री फोर्ड म्युझियम मिळून इनडोअर-ऑउट्डोअर म्युझियमचा २४० एकर जागेत वसविलेला हा कॉम्प्लेक्स असून एकट्या ग्रीन फील्ड व्हिलेजमध्ये जवळ जवळ १०० महत्वाच्या वा ऐतिहासिक महत्व असलेल्या गोष्टी आहेत. अमेरिकन लोक कसे रहात होते, काय काम करत होते, कशी मजा करत होते; त्यांच्यातील घरगुती व्यवसायापासून ( Home crafts ) ते पुढारलेले औद्योगिक राष्ट्र ( Industrial Nation ) होईपर्यंतचा बदल कसकसा होत गेला याचे चित्र ही दोन्ही म्युझियम्स बघताना उभे रहात.

सकाळी ठरल्याप्रमाणे श्री. अकोलकर संध्याकाळी घरी जाताना आम्हाला न्यायला आले. त्यांचे घर बैठे, पुढे लॉन, मागे मुलांना खेळायला घसरगुंडी-झोपाळा. मुलांच्या या खेळण्यांची कीटस अमेरिकेत दुकानातून तयार मिळत असल्याने स्वत.चे घर असणाऱ्यांकडे बहुदा असतातच. त्या दिवशी डेट्रॉईटला मुंबई सारखे उकडत असल्याने मस्तपैकी गार पाण्यानी आंघोळी केल्या. नंतर श्री. व सौ. अकोलकर आम्हाला जवळील एका मार्केटिंग कॉम्प्लेक्समध्ये घेऊन गेले. न्यूयॉर्कसारखीच भव्य दुकाने. येथे पॅंटस् म्हणे फार स्वस्त म्हणजे ५-६ डॉलर्सला सुद्धा मिळतात. विजय-प्रदीपच्या मापाच्या पॅंटस् न मिळाल्याने नुसतेच भटकून बाहेर पडलो तर अकोलकरांना स्वतःची गाडीच सापडेना. ए, बी, सी, कुठल्या लॉटमध्ये गाडी पार्क केली

होती ते बघायचे अकोलकर विसरल्याने आम्ही सर्व लाल रंगाची गाडी शोधू लागलो. तेथे अनेक लाल गाड्या होत्या. गाड्यांच्या समुद्रातून आपली गाडी शोधणे म्हणजे फारच कठीण काम. शेवटी अकोलकर आल्या रस्त्याने परत दुकानात गेले, आणि गाडी घेऊन आले, तेव्हा असं कळलं की आम्ही पहिल्या मजल्यावर गाडी पार्क करून आत शिरलो होतो आणि बाहेर मात्र तळमजल्यावरून पडून तेथेच गाडी शोधू लागलो. ही शॉपिंग सेंटर्स कधी कधी इतकी मोठी असतात की नवख्याला तर कुठून आत शिरतोय आणि कुठून बाहेर पडतोय याचा अजिबात पत्ता लागत नाही. रात्रीही चांगलेच उकडत असल्याने टेबल फॅन शोधून लावावा लागला. संगिताच्या साथीत झोप कधी लागली ते कळले देखील नाही.

अकोलकर आम्हाला ते ऑफिसला जाताना ग्रेहाऊंड स्टेशनवर सोडणार होते. सकाळी ६ वा. घराबाहेर पडलो. इतक्या रामप्रहरी सुद्धा रस्त्यावर ट्राफिक सुरूच होता. उजाडले देखील नव्हते तरी ऑफिसला जाणाऱ्यांच्या मोटरींच्या रांगा रस्त्यावर लागल्या होत्या. ग्रेहाऊंड स्टेशनजवळ कोठेही पार्किंग लॉट नव्हता. अमेरिकेत कायदा मोडला की जागेवरच जबरदस्त दंडाची शिक्षा आहे. नेमून दिलेल्या ठिकाणांशिवाय जर कोठे गाडी उभी केली तर लगेच तिकीट मिळते. स्टेशनच्या आसपास पोलिसांचा खडा पहारा होता. स्टेशनभोवती २-३ वेळा चकरा मारून शेवटी एकदा आम्हाला उतरण्यापुरती जागा मिळाली. श्री. व सौ. अकोलकरांनी आमचे चांगले आदरातिथ्य केले. सामान ग्रेहाऊंड स्टेशनवर लॉकरमध्ये ठेऊन त्यांच्या घरी गेल्याने त्यांना द्यायला आणलेली भेटवस्तु तशीच राहून गेली. फक्त पुणेरी पद्धतीचा पाहुणचार झोडून पुढे सटकलो.

* * *

# शिकागो

## गुरुवार २१ सप्टेंबर

दुपारी १२॥ वा. शिकागोला पोहोचलो. रस्त्याने भूगोलात वाचलेले कत्तलखाने कोठे दिसतात का ते मी पहात होते; पण खाटीकखाने तर सोडाच पण डुकरेही कोठे दिसली नाहीत. डॉ. चंद्रशेखर जोशी यांचेकडे आम्ही उतरणार होतो. त्याना आल्याचा फोन करताच, मिसेस मोहिनी जोशी आम्हाला गाडी घेऊन न्यायला आली. मोहिनी डाऊन-टाऊन सारख्या गजबजलेल्या ठिकाणीही सफाईने गाडी चालवित होती. त्यांचे घर अर्ध्या तासाचे अंतरावर असल्याने जाता-जाता बऱ्याचशा शिकागोचे दर्शन झाले. वाटेत लेक मिशिगन लागले हे लेक म्हणजे समुद्रच ! मोठमोठ्या बोटीही आत येतात याचं पाणी फक्त गोड म्हणून लेक म्हणायचं एवढंच. या लेकमुळे शिकागोत कायम, विशेषतः संध्याकाळी झोंबरे, थंडगार वारे वहात असते.

डॉ. जोशींचे घर टुमदार, पुढे-पाठीमागे लॉन, खाली तळघर, वरती अर्धा मजला; त्यावर बेडरूम्स. त्यावेळी मोहिनीचे आई-वडील (श्री. व सौ. केळकर) आले होते म्हणून डॉ. जोशींनीही थोडे दिवस रजा घेतली होती. ते पुण्या-मुंबईकडील आणि गप्पिष्ट असल्याने बऱ्याच समाईक ओळखी निघाल्या आणि गप्पा खूप रंगल्या.

दुपारी शेजारच्या घरात राहणारा एक अमेरिकन आम्हाला पाहून कोण पाहुणे आलेत म्हणून चौकशी करायला आला आणि भरपूर अघळपघळ गप्पा मारत बसला. कोणीही नवीन दिसलं की तो अशीच चौकशी करत असतो म्हणे. त्याच्याकडेही आपल्याकडील चाळीतल्यासारखे 'नारायण' असतात बघून बरं वाटलं.

संध्याकाळी डॉ. जोशी त्यांच्या गाडीतून आम्हाला शहरात फेरफटका मारायला घेऊन गेले. त्यांनी शिकागोतील बहाई टेंपल आणि हरेकृष्ण मंदिर ही टूरिस्ट बसेस बरोबर न बघता येणारी ठिकाणे दाखविली. बहाई

टेंपलचे कोरीव काम अप्रतिम आहे. सर्व धर्मांच्या पूज्य वस्तूंना या कोरीव कामात स्थान होते. हिंदूंचे स्वस्तिक होते; पण उलटे. बहाई धर्मावरील तसेच टेंपलच्या वास्तु संबंधीची एक फिल्म तेथील एका ऑडीटोरियम मध्ये चालू होती. अतिशय भव्य नि शांत ठिकाण. भोवताली सुंदर बगीचा, मागे लेक मिशिगन. पण बाहेर इतके गार वारे सुटले होते की अशा रम्य ठिकाणी थोडा वेळही थाबावेसे न वाटता कधी एकदा गाडीत बसतो असे झाले. हरेकृष्ण मंदिरात भगवे कपडे, गळ्यात जानवे, तुळतुळीत गोटा, शेंडी या वेशातील हरेकृष्ण-हरेराम म्हणत बसलेले ते गोरेपान लोक आपल्याकडील चित्तपावन ब्राह्मणच वाटत होते. शिकागो अतिशय प्रचंड मोठे शहर असले तरी काही भाग जरा जुनाटच वाटतो. न्यूयॉर्कची सर मात्र नाही.

बरंचसं शिकागो पालथे घालून रात्री १० वा. परत आलो. मोहिनी अजून कॉलेजमधून घरी आली नव्हती. मोहिनी बी. एस्सी. असून तेथे ती अकाऊंटन्सीमध्ये एक कोर्स करत होती. तिचे कॉलेज आठवड्यातून एक दिवस रात्री ७ ते १० असे. इतक्या रात्री एकटी गाडी घेऊन यायला तिला भीति वाटत नसे. तसेच टॅक्सीतूनही ती एकटी हिंडत असे. हे बघून मला जरा नवलच वाटले. त्यावर तिने खुलासा केला, "गाडीतून हिंडण्यात धोका नसतो. टॅक्सीमध्ये रेडिओ सेटस् असून रेडिओ संदेशाद्वारे त्यांचा दुसऱ्या टॅक्सींशी किंवा कंट्रोलरूमशी सतत संबंध असतो." हे ऐकून माझीही एकटे हिंडायची भीति थोडी कमी झाली. अमेरिकेत कुठलाही कोर्स आपल्या सोईप्रमाणे कितीही दिवसात ( म्हणजे जसा कोर्स असेल तसा, रोज केला तर एक टर्ममध्ये, आठवड्यातून एक वेळा केला तर ४ टर्मस्‌मध्ये वगैरे ) पूर्ण करता येतो. अनेक संध्याकाळची कॉलेजेसही आहेत. त्यामुळेच नोकरदार, गृहिणी जसे जमेल तसे आपापले उद्योग संभाळून प्रगती करून घेऊ शकतात. नोकरीतील पेशा बदलायचा असल्यासही यामुळे शक्य होते. तुमची बेसिक डिग्री जर जो कोर्स करायचा त्याच विषयातील असेल तर कोर्स पूर्ण करायच्या वेळेतही सूट मिळू शकते.

मोहिनीचा डेंटिस्ट भाऊ गिरीश केळकर हाही शिकागोलाच होता. त्याच्याकडून अमेरिकेतील भारतीय डेंटिस्टच्या परिस्थितीची हकिगत ऐकून वाईट वाटले. भारतातून डेंटिस्टना अमेरिकन व्हिसा लगेच मिळतो म्हणून

बरेच तरुण अमेरिकेत मोठ्या आशेने येतात. पण अमेरिकेत डेंटिस्ट म्हणून काम मिळायला तेथील एक परीक्षा पास व्हावी लागते जिचा रिझल्ट जेमतेम एक टक्का लागतो. त्यामुळे अनेक डेंटिस्टना ' डेंटिस्ट ' म्हणून नोकरी न मिळाल्याने लॅबोरेटरीमध्ये कवाड्या करण्यावर समाधान मानावे लागते, तर काही डेंटिस्ट पेट्रोल पंपावर कामे करून पैसे मिळवितात. त्यांना पैसे भरपूर मिळतात पण नैराश्य येऊन फार मानसिक यातना भोगाव्या लागतात.

## शुक्रवार २२ सप्टेंबर

सकाळी भरपूर नाश्ता करून बघायच्या ठिकाणाचा डॉ. जोशींकडून नकाशा काढून घेऊन शिकागो पहायला घराबाहेर पडलो. पहिल्यांदा ओल्ड शिकागो-मधील अम्युझमेंट पार्क बघण्याचे ठरविले. तेथे जाण्यासाठी अनेक लोकल्स अचूक बदलत गेलो तरी शेवटची लोकल चुकलीच म्हणून सायन्स म्युझियमला जायचे ठरविले शिकागोच्या लोकल्स ( Sub ways ) कधी जमिनीखालून तर कधी जमिनीवरून धावतात. स्कोकी स्विफ्ट या १-२ डब्यांच्या रेल्वे लहान स्टेशन्स पासून मोठ्या स्टेशन्सपर्यंत घेऊन जातात. सबवेज्‌ची स्टेशन्स न्यूयॉर्कच्या तुलनेत जुनाट वाटतात. शिकागोत बस-रेल्वेला एकच तिकीट काढता येते ते एक तासापर्यंत चालते. ते काढून सायन्स म्युझियमला गेलो. बसमध्ये कंडक्टर हा प्रकारच नसतो. ड्रायव्हरपाशीच तिकिटाचे मशिन असते त्यात पैसे टाकून तिकीट घ्यायचे. बऱ्याच बसेस बायका चालविताना बघून जरा आश्चर्य वाटले.

सायन्स म्युझियम अतिप्रचंड होते. सायन्समधील बहुतेक सर्व प्रमुख शाखांची वेगवेगळी दालने होती. मॅथेमॅटिक्स, फिजिक्स यासारखे आम्हाला विशेष गम्य नसलेले विभाग तर आम्ही वगळलेच; पण उरलेले ओझरते बघाय-लाही खूप धावपळ करावी लागली. जवळजवळ सगळी ' वर्किंग मॉडेल्स ' होती. मॉडेलपाशी टेलिफोन ( ज्याचा रिसिव्हर उचलून कानाला लावला की समोरच्या चित्राविषयी कॉमेंट्री ऐकू येई ) किंवा बटण तरी असे ( बटण दाबल्याबरोबर आपल्यासमोर चलतचित्र कॉमेंट्रीसकट सुरू होई ) नाहीतर त्या मॉडेल विषयी माहिती सांगणारी टी. व्ही. फिल्म चालू असे. अगदीच काही नसले तर चार्टस्‌ आहेतच. त्यामुळे कोणताही विषय चटकन समजायला मदत होत होती.

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने पकडलेली एक पाणबुडी जशीच्या तशी तेथे आणून ठेवली होती. गाईडच्या कॉमेंट्रीसकट ती आतून बघायची सोय थोडे पैसे देऊन होती. आम्ही त्याचा फायदा घेऊन पाणबुडी बघून आलो. लेटेस्ट अॅट्रॅक्शन म्हणून त्यावेळी कोळशाची खाण तयार केली होती. तिकीट काढून प्रत्यक्ष बघायला आत गेलो कोळसा काढणारे मजूर, डेव्हीज् लँपचा स्फोट इ. गोष्टी बघून आपण प्रत्यक्ष कोळशाच्या खाणीत नसून मॉडेलमध्ये आहोत हे विसरायला होत होते. कोळशाचे खडक ( Coal rocks ) तर इतके हुबेहूब बनविले होते की कपडे काळे होण्याची भीति वाटावी. तसेच अपोलो ८ चे कमांड मोड्यूल तर ल्यूनार मोड्यूलची प्रतिकृती ( replica ) ठेवली होती. फुड टेक्नॉलॉजीच्या दालनामध्ये वेगवेगळे अन्नपदार्थ, काय खावे, कसे खावे, किती खावे याविषयीची माहिती होती. तसेच एका काट्यावर कपडे न काढता वस्त्रविरहित वजन ( naked weight ) मोजण्याची सोय होती. स्पोर्टस् सेक्शनमध्ये अनेक खेळ बटणे, खटके वगैरेच्या साहाय्याने खेळून तुमची अचुकता व स्टॅमिना पडताळून पहायचीही सोय होती. मेडिसिन विभागात वर्किंग मॉडेल्सच्या साहाय्याने प्रत्यक्ष ऑपरेशन करताना दाखविले होते. त्यासमोरील फोन उचलला की वेगवेगळ्या प्रकारच्या अॅनास्थेशियांविषयीची कॉमेंट्री सुरू होत होती. कॅन्सर कोणकोणत्या कारणांनी होतो, तो कसा ओळखावा वगैरेच्या अनेक छोट्या, छोट्या फिल्म्स चालू होत्या. 'हार्ट अॅटॅक' कोणाला, कसा, कधी येऊ शकतो या संबंधीची माहिती देणारी अनेक मॉडेल्स होती एका ठिकाणी एकदा हृदयविकाराचा झटका आलेल्या माणसाला परत हार्ट अॅटक येऊ शकण्याचे चान्सेस कॉम्प्युटरच्या सहाय्याने अजमाऊन पहाण्याचीही सोय होती. कोणीही नॉन मेडिकल माणूस, मुले जरी या विभागातून दोन-तीन वेळा हिंडली तरी निदान त्यांना स्वतःची काळजी घेण्यापुरते ज्ञान मिळेल असे मला वाटले. कुठलीही गोष्ट हालत्या, बोलत्या मॉडेल्सच्या साहाय्याने दाखविली असता किती लवकर समजते याचा अनुभव आला.

कमीत कमी एक सबंध दिवस तरी हे म्युझियम बघायला आपण घालवायला पाहिजे होता, अशी टोचणी मात्र वेळ कमी पडल्याने बाहेर पडताना लागली होती. तरी अॅग्रीकल्चर सेक्शन सिरॅक्युजला प्रत्यक्ष शेती,

शेत अवजारे बघितल्याने गाळून टाकला तर फोटोग्राफी, क्रिमिनल फोटोग्राफी, मेकॅनिकल इंजिनिअरींग यासारखे अनेक विभाग इतके ओझरते बघितले की पुढचे बघताना मागचे विसरून गेले.

शिकागोच्या फ्रॅनिटोरियमबद्दल भारतात बरेच वाचले होते म्हणून सायन्स म्युझियम मधून बाहेर पडून बरीच तंगडतोड करून ते बघायला गेलो. पण ते वार्षिक दुरुस्तीसाठी बंद असल्याने निराश होऊन परतावे लागले. तेव्हा तेथून जवळच असलेले अक्वेरियम तरी बघावे म्हणून आत शिरलो.

या ॲक्वेरियममध्ये दर शुक्रवारी 'फ्री एण्ट्री' असल्याने तिकिटाचे डॉलर्स वाचले. अनेक प्रकारचे लहान-मोठे शार्कस, सील यासारखे मासे, पेंग्वीन पक्षी मोठमोठ्या टँक्समध्ये ठेवलेले होते. मधोमध असलेल्या प्रचंड मोठ्या गोलाकार काचेच्या टँकमध्ये माशांबरोबर पाणबुड्याही काम करताना दिसत होता. अमेरिकेतील एक तरी ॲक्वेरियम प्रत्येकाने बघितलेच पाहिजे असं मात्र निश्चितपणे वाटलं.

ॲक्वेरियमच्या बाहेर लेक मिशिगन असून तेथे अनेक खासगी बोटी नांगरलेल्या होत्या. अमेरिकेत श्रीमंतीचे लक्षण म्हणजे स्वतःच्या मालकीच्या हेलिकॉप्टर, विमान, बोटी यासारख्या गोष्टी असणे. वीक एण्डला ट्रेलरवर बोट ठेऊन अनेक जण बोटिंग, फिशिंग करायला जाताना दिसतात. जॉगिंग हा अमेरिकनांचा आणखी एक आवडता छंद. अनेक जॉगर्स भर दुपारी रस्त्यावरून धावताना दिसतात. काही रस्ते खास जॉगिंग करणाऱ्यांसाठी राखून ठेवलेले आहेत.

लेकच्या किनाऱ्यावरील हिरवळीवर थोडा वेळ बसलो. येथून 'सीअर्स टॉवर' ही जगातील सध्या सर्वांत उंच असलेली इमारत फारच जवळ दिसत होती म्हणून ती बघूनच घरी परतायचे ठरवून तिच्या दिशेने चालायला लागलो. जसजसे अंतर काटू लागलो तसतशी ती इमारत अजूनच दूर जाऊ लागली. एक-दीड तासांच्या पायपिटीनंतर एकदाचे तेथे पोहोचलो. १०३ व्या मजल्यावर एकाच लीफ्टने काही सेकंदातच वर गेलो. दिवे लागण्याची वेळ व्हायला आली होती. वरून शिकागोचे दृश्य फारच विलोभनीय दिसत होते. सरळ रस्ते, रेल्वेचे लूपस्, मोटारींच्या सरळसोट, लांबच लांब रांगा, एका बाजूला लेक मिशिगन. सारखे बघत बसावे असे

वाटणारा सीन. न्यूयॉर्कसारख्या गगनभेदी इमारती नसल्याने खालचे सर्व स्पष्ट दिसत होते. थोड्याच वेळात अवर्णनीय सूर्यास्त बघावयास मिळाला. दिवे लागल्यावर शहाराच्या दृश्याची शोभा तर फारच अप्रतिम होती. बघता बघता काळोख झाला आणि आता घरी पोचायला चांगलाच उशीर होणार म्हणून भीति वाटायला लागली. डॉ. जोश्यांना आम्ही थोडे उशिरा येत असल्याचा फोन केला.

खालती येऊन बघतो तो सिअर्स टॉवरच्या जवळपासची सर्व स्टेशन्स बंद झालेली होती. रेल्वे स्टेशन्सही ऑफिसेससारखी ठराविक वेळी बंद होत असलेली पाहून आश्चर्य वाटले. घरी जाण्यासाठी पर्याय शोधत चाललो असताना शेवटी एक स्टेशन उघडे मिळाले. काल शिकागोला लोकलमध्ये एका बाईला पिस्तुलाने मारल्याची बातमी आजच्या वर्तमानपत्रात आली होती, ती आठवून इतक्या उशीरा जायची थोडी धाकधूक वाटत होती. लोकलमध्ये आफ्रिकेतून अमेरिकेस आलेले मेहता नावाचे एक गुजराथी गृहस्थ भेटले. त्यांची पत्नी स्टेशनवर गाडी घेऊन येणार होती म्हणून त्यांनी आम्हाला स्टेशनपासून डॉ. जोश्याच्या घरापर्यंत त्यांच्या गाडीतून यायचा आग्रह केला. पण स्टेशनवर उतरून डॉ. जोश्यांना फोन करताच ते गाडी घेऊन आम्हाला न्यायला आले श्री. मेहतांचे आभार मानून घरी पोहोचलो तो रात्रीचे दहा वाजून गेले होते. खाण्यापिण्याची तयारी होतीच. सर्व जण आमचीच वाट बघत होते. गप्पांच्या मैफिलीत जेवण संपवून डोळा कधी लागला ते कळले देखील नाही.

## शनिवार २३ सप्टेंबर

'ॲम्युझमेंट पार्क' तुम्ही पहाच असे डॉ. जोश्यांनी आम्हाला पुन्हा पुन्हा आग्रहाने सांगितले होते. परवा 'ओल्ड शिकागो' हा एका छपराखाली ( under one roof ) असलेला ॲम्युझमेंट पार्क बघायची संधी हुकली होती म्हणून आज 'ग्रेट अमेरिका' ह्या त्याच प्रकारच्या दुसऱ्या जास्त मॉडर्न आणि उघड्यावर ( Open air ) बसविलेल्या पार्कमध्ये तो फक्त शनिवार-रविवारच उघडा असल्याने जावयाचे ठरविले. तेथे जाण्यासाठी रेल्वे स्टेशनवर गेलो तो स्टेशनला कुलूप. स्टेशन सुट्टीच्या दिवशी बंद असणे

हा प्रकार आपल्याला नवीनच. अमेरिकेत रेल्वेही वेगवेगळ्या कंपनींच्या खासगी मालकीच्या आहेत. लोकांच्या सोईसाठी थोड्या लोकल्स चालू होत्या. त्याची तिकिटे गाडीतच दिली जात होती. तसेच दुसऱ्या स्टेशनपर्यंत बसेसनी पोचवायचीही व्यवस्था केलेली होती. रेल्वे, बस करीत कसे बसे ११ वाजेपर्यंत पार्कमध्ये जाऊन पोहोचलो.

'ग्रेट अमेरिका' या ॲम्युझमेंट पार्कचे आत जाण्यासाठी प्रत्येकी ९ डॉलर्स प्रवेश फी असून हे तिकीट एकदा काढले की कितीही, कोणत्याही राईडस् तुम्ही घेऊ शकता. हा पार्क म्हणजे आपल्याकडील जत्रेची कल्पनातीत सुधारून वाढविलेली आवृत्ती. येथील जवळ जवळ सर्व राईडस् नुसत्या बघायला सुद्धा भीतिदायक वाटत होत्या. इतक्या वेड्यावाकड्या, अनेक वेळा खाली डोके वर पाय कराव्या लागणाऱ्या राईडस बघून शास्त्रज्ञाच्या कल्पकतेची किमया थक्क करते. हे सर्व डिझाइन करून प्रत्यक्ष तयार करताना किती शास्त्रीय अचुकता लागत असेल याचा विचारही करवत नाही. शिवाय कोठेही ॲक्सिडेंड नाही. अमेरिकेतील मुलांना लहानपणापासूनच वेगवान आयुष्य जगायची सवय असल्यानेच, मला वाटत, लहान पोरबाळही मजा करत होती. ते बघून आम्हीही मनाचा हिय्या करून, कधी छातीत धडधडत असताना हो-ना करत, तर कधी डोळे मिटून घेऊन बऱ्याचशा राईडस्ची मजा चाखली.

रोलर कोस्टरमध्ये छोट्या २-३ डब्यांच्या रेल्वे गाड्यांतून सफरीला नेतात. एकदा डाव्या तर एकदा उजव्या बाजूला इतके तिरके करतात की आपण गाडीतून आता नक्की खाली पडणार म्हणून किंचाळी फोडावीशी वाटावी. या डब्याना ॲटोमॅटिक लॉकिंग अरेंजमेंट असते. एका वेळी अशा ३-४ गाड्या फिरत असतात; त्यामुळे मोठा क्यू असला तरी नंबर लागायला वेळ लागत नाही. लूप ची राईड तर महाभयानकच. मरणाच्या भीतिचा धक्का जीवंतपणी देणारी. खाली डोकं वर पाय आणि काही क्षणातच परत स्टेशनवर हजर. एका ठिकाणी एका मेरी-गो-राऊंडसारख्या जमिनीला समांतर फिरणाऱ्या चक्राच्या पाळण्यांत बसलो आणि ते चक्र फिरता फिरता तिरके होत होत लूप सारखे जमिनिशी काटकोनात फिरू लागले. अनेक वेळा शिर्षासन घडले. तर दुसऱ्या एका ठिकाणी "हिंमत असेल तरच आत या" असा बोर्ड बघून आत शिरलो तो एका सिलींडरच्या भिंतीला टेकून उभे राहायला

सांगून सिलींडर प्रचंड वेगाने फिरविला आणि काही समजायच्या आत सिलींडरचा तळच काढून घेतला. आपणही आता खालती कोसळणार या भीतिने शेजारच्याचा हात धरायला जावे तर हातही हालेना. संपूर्ण भिंतीला चिकटलेल्या अधांतरी अवस्थेतील हा अनुभव फारच चित्तथरारक होता.

अशा एक ना दोन असंख्य राईडस्. अनेकदा काळजाचे ठोके चुकविणाऱ्या आणि राईडची जीवघेणी मजा लुटून काही वाईट न होता सुखरूप बाहेर पडल्याबद्दल हायसं वाटायला लावणाऱ्या. राईडस्ची भीषणता आणि काहींच्या प्रवेशद्वारातील '४॥ फूटापेक्षा कमी उंचीचे लोक, हार्ट पेशन्टस्, गर्भवती स्त्रिया इत्यादींनी 'ह्या' राईडस् घेऊ नयेत' असे फलक पाहून आपण तरुण वयातच अमेरिकेला आल्याबद्दल परत एकदा स्वतःची पाठ थोपटून घेतली.

या पार्कमध्ये म्युझिक, जादू, इनडोअर गेम्स यांसारखी इतरही अनेक करमणुकीची साधने होती. ज्याला जे आवडेल, स्वतःच्या वयाला नि प्रकृतिला जे सोसवेल त्या प्रकारच्या मनोरंजनाची सोय होती. खाण्या-पिण्याचेही भरपूर स्टॉल्स होतेच. अनेक वयोवृद्ध लोक—त्यांतील काही तर व्हीलचेअर्सवर बसूनही — जत्रेचा आनंद उपभोगायला आलेले दिसले. एकाच दिवशी मला नाही वाटत सर्व राईडस् घेणे शक्य होईल, कारण सारखे उलटे-सुलटे, वाकडे-तिकडे गरगर फिरून पोटात ढवळायला लागते. निदान आमच्या तरी लागले. हा पार्क गावाबाहेर असल्याने आणि बस, रेल्वे करून घरी पोचावयास सुमारे दोन तास लागणार असल्याने आम्ही दुपारी ३ च्या सुमारासच बाहेर पडलो. अमेरिकेत असे ॲम्युझमेंट पार्कस् ठिकठिकाणी आहेत. जेथे जमेल तेथे काहीही करून प्रवाशानी असा एकतरी पार्क आवर्जून बघावाच.

सकाळी एका दुकानात आइस्क्रिम गॅलनला २ डॉलर्स या दराने मिळत असलेले बघितले होते म्हणून संध्याकाळी घरी परतताना प्रत्येकाने आइस्क्रिम 'ओ' येईपर्यंत खाऊन घ्यावयाचे ठरविले. आयत्या वेळी मी सोडून सर्व जण ढेपाळले. मीही फक्त एक लिटरचीच स्लॅब घेतली. पण एवढे आईस्क्रिमही मला एकटीलाच काय पण चौघांनाही संपेना. अति आधाशीपणा न केल्याबद्दल बरं वाटलं. आइस्क्रिम गॅलनमध्ये आणि तेही इतके स्वस्त नुसती बघण्याचीही सवय नसल्याने या हावरटपणाबद्दल नाईलाज झाला असावा.

शिकागोला इंडियन शॉप्समध्ये साड्या स्वस्त नि मस्त मिळतात म्हणून रात्री मोहिनी आम्हाला साड्यांच्या दुकानात घेऊन गेली. २०–२५ डॉलर्स-पयत चागल्या साड्या होत्या. पण इतक्या महाग साड्या खिशाला परवडण्याजोगे नव्हते म्हणून मी एक स्वस्तात स्वस्त अशी १२ डॉलर्सची साडी घेतली. अमेरिकेत साडीच्या या एकाच सॅपल पीसवर बहुधा समाधान मानावे लागणार म्हणून वाईट वाटले.

रात्री २ च्या गाडीने 'माऊंट रश्मोर' बघण्यासाठी 'रॅपिड सिटीला' जायला निघायचे होते. तोपर्यंतचा वेळ काढण्यासाठी पुरुषांनी पत्याचा डाव टाकला तर आम्ही कपड्यांना इस्त्री, आवराआवर यासारखी कामे सुरू केली. एवढ्यात माझी मामे बहीण सौ. शोभा देशपांडे हिचा अटलांटाहून फोन आल्याचे मोहिनीने सांगितले. तेव्हा मला ती चेष्टाच करत आहे असे वाटले. शोभाला आमचा पत्ता, टेलिफोन नंबर कसा समजला ? तिच्याशी बोलल्यावर कळलं की तिला माझे मुंबईहून पाठविलेले पत्र मिळाल्याबरोबर तिने न्यूयॉर्कला हरिषकडे फोन केला. पण त्यावेळी आम्ही न्यूयॉर्क सोडले असल्याने हरिषने अकोलकरांचा पत्ता दिला आणि अकोलकराकडून तिला डॉ. जोश्यांचा पत्ता समजला. शोभाच्या उत्साहाचे आणि टेलिफोन इतक्या झटपट मिळण्याच्या किमयेचे कौतुक करत मी पाच मिनिटानंतर हिला बिलाला किती खड्ड्यात घालायचे म्हणून फोन ठेवण्याची घाई करू लागताच शोभा म्हणाली, " इतक्या वर्षांनी भेटते आहेस तेव्हा अर्धा तास तरी बोल. सर्व लोकाची सविस्तर माहिती सांग. येथे टेलिफोनचे बिल अगदी बेताचे येत असल्याने तू पैशाची काळजी करू नकोस. " अटलांटाला खास काही बघण्यासारखे नसल्याने इतर सर्व बघून वेळ उरलाच तर मात्र नक्की येण्याचा आग्रह शोभाने केला. तसेच 'डॉलर्स' लागले तरीही लगेच कळवायला तिने मुद्दाम सांगितले. शोभाचे यजमान विजयने काहीही करून 'लास वेगासला' जाऊन तेथील प्रसिद्ध 'शो' न चुकविण्याचे परत परत बजावले.

पत्त्याचा रंगलेला डाव अर्धवट सोडून आणि डॉ. जोश्यांचा अजून एक दिवस राहण्याचा आग्रह मोडून, जोशी-केळकर फॅमिलींचा निरोप घेतला. गिरीश केळकरने गाडीने रात्री एक वाजता ग्रेहाऊंड स्टेशनवर नेऊन सोडले.

* * *

# माऊंट रश्मोर

## सोमवार २५ सप्टेंबर

आम्ही पहाटेपर्यंत रॅपिड सिटीला ( Rapid City–South Dakota ) पोहचू असा आमचा अंदाज होता, पण मध्यरात्रीच तेथे पोहोचलो. तेथील ग्रेहाऊंड स्टेशन अगदीच छोटे असल्याने सकाळपर्यंत वेळ कसा काढावा हा प्रश्न पडला. शेवटी हॉटेलमध्ये मुक्काम करायचे ठरविले. स्टेशनवर ड्युटीवर असलेल्या माणसानेच फोन करून आम्हाला Hotel Marions (830 Quincy, Rapid City ) येथे रुम्स मिळवून दिल्या. त्यांचा दर दोना डबल रुमला १५ डॉलर्स. बाथरुम मात्र कॉमन. एका बाईचे घरेलु, स्वच्छ नि सुंदर खोल्या असलेले हे हॉटेल होते. एक सबंध रात्र बसमध्ये काढल्याने इतकी झोप लागली की सकाळी आम्ही उठेपर्यंत ग्रेलाइनच्या साईट सिईंग टूरस् निघून गेल्या होत्या म्हणून टॅक्सीने माऊंट रश्मोरला ( Mount Rushmore ) जायचे ठरविले. दुपारी बारा वाजता हॉटेल सोडून सर्व सामानानिशी टॅक्सीत बसलो.

माऊंट रश्मोर पर्यंतचा सर्व रस्ता पिकनिक रोडच होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला पाईन्सची गर्द वनश्री. अनेकदा खालती उतरून तिथेच बसून रहायचा मोह झाला. ' माऊंट रश्मोर ' हे अमेरिकनांच्या दृष्टीने लोकशाहीचे तीर्थक्षेत्रच असून तेथे ६००० फूटाच्या पहाडावर वॉशिंग्टन, जेफरसन, लिंकन आणि टेडी रुझवेल्ट या अमेरिकेच्या चार थोर राष्ट्राध्यक्षांचे अर्धपुतळे खोदलेले आहेत. हे स्मारक करायला १६ वर्षे लागली आणि गुट्झॉ बोर्गलम ( Gutzon Borglum ) या त्याच्या निर्मात्याच्या मृत्युनंतर सात महिन्यांनी ते काम पूर्ण झाले. या पुतळ्याचे चेहेरे जर पूर्ण माणूस काढला तर ४६५ फूट ऊंचीचा होईल हे प्रमाण धरून कोरलेले आहेत. त्याची तोंडे सरासरीने हनुवटीपासून वरपर्यंत ६० फूट, नाके २० फूट, जीवण्या १८ फूट तर डोळे ११ फूट या मापांची आहेत. हे पुतळे बघण्यासाठी

गॅलरीज् बांधलेल्या असून दुर्बिणीही बसविलेल्या आहेत. पुतळे अतिशय भव्य ! विशेषतः त्यांचे डोळे फारच जीवंत वाटतात. येथील सर्वच परिसर निसर्गरम्य, शांत नि उदात्त वाटतो. या पुतळ्यांवर रात्री रंगीत लाईटस् टाकतात. ही शोभा बघण्यासाठी स्पेशल कंडक्टेड टूरस्‌ही आहेत. तसेच हे पुतळे अगदी जवळून पहाण्यासाठी हेलिकॉप्टर राइडस्‌ही आहेत. टॅक्सीने पंचवीस डॉलर्स घेतले पण दोन-अडीच तासात आरामात ट्रीप झाली.

टॅक्सीने आम्हाला परस्पर बसस्टँडवर सोडल्याने अवजड सामान हातातून वाहून न्यायचा त्रासही वाचला. येथून आम्हाला यलो स्टोन नॅशनल पार्कमध्ये जाण्यासाठी लिविंग्स्टन या गावी जावयाचे होते. तेथे ग्रेहाऊंडची बस जात नसल्याने कॉन्टीनेंटल ट्रेलवेज् या ग्रेहाऊंड सारख्याच दुसऱ्या प्रवासी कंपनीच्या बसने जावे लागणार होते ( ज्या ठिकाणी ग्रेहाऊंडच्या बसेस जात नसतील तेथे ग्रेहाऊंडचा पास कॉन्टीनेंटल ट्रेलवेज्‌च्या बसेसनाही चालतो ). बस संध्याकाळी होती. स्टेशनवर वेळ कसा घालवावा हा विचार करत असताना जवळच कापडाची दुकाने दिसली. सहज चौकशी करता किमती फारच कमी वाटल्या. 'सिंगरच्या' कापडाच्या दुकानात यार्डाला एक डॉलर या दराने सुंदर कापड मिळत होते. अमेरिकेत सर्व कापडाचा पन्हा ४८ इंच असल्याने कोठलेही कापड साडी म्हणून वापरता येते. ६ डॉलर्समध्ये एक या हिशेबाने साड्या मिळाल्या. इंडियन शॉप्समध्ये किती कापतात याचा प्रत्यय आला. अमेरिकेत लहान गावात सर्वच वस्तू जास्त स्वस्त मिळतात शिवाय व्हरायटीही शहरासारखीच असते. चार साड्या खरेदी करायला मिळाल्या खुशीत पुढील प्रवासास सुरुवात केली.

* * *

# यलोस्टोन नॅशनल पार्क

## मंगळवार २६ सप्टेंबर

आम्ही शिकागोहून माऊंट रश्मोर बघून ' यलो स्टोन नॅशनल पार्क 'ला जाणार असल्याचे ऐकून डॉ. जोशी यांचेकडे आलेल्या त्यांच्या एका मित्राने सल्ला दिला, " यलोस्टोन पार्क, बर्फ पडायला सुरुवात झाल्याने बंद झाला आहे; तेव्हा इतक्या लांब कशाला जाता. उगाच निराश होऊन परतावे लागेल. " या पार्कसंबंधी इतक्याजणांकडून ऐकले होते की त्या सद्‌गृहस्थांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून तेथे जायचा निर्णय घेतला. वाटेत बिलिंग्ज या स्टेशनवर गाडी थांबली असताना चौकशी केल्यावर परत " Yellowstone is closed " हे ऐकून मात्र पुरे हादरलो; तरीही जिद्दीने प्रवासमार्ग न बदलता निदान पार्कच्या दारापर्यंत तरी धडकून यायचे ठरविले.

लिविंगस्टन ( Livingston-Montana ) येथे सकाळी ७॥ च्या सुमारास पोहोचलो. येथून यलोस्टोनला जाण्यासाठी वेगळ्या बसेस आहेत. स्टेशनवर चौकशी करता हा पार्क बंद झाला नसून टुरिस्ट बसेस बंद झाल्या असल्याचे समजले. प्रवासी आपल्या वाहनाने तेथे जाऊ शकतात हे बघून स्टेशनवरील रेस्टॉरंटमध्ये येथे गाडी भाड्याने मिळेल की काय याची चौकशी करावी असा विचार करत असतानाच पब्लिक टेलिफोनच्या वरतीच ' कार रेन्टल 'चा फोन नंबर लिहिलेला दिसला. डायल फिरविल्याबरोबर लगेच पलिकडील माणसाने " कोणती गाडी पाहिजे, किती मोठी पाहिजे " वगैरे मामुली चौकशी करून लगेच गाडी घेऊन जाण्यास सांगितले. डॉ. पटवर्धनांची अमेरिकेत गाडी चालवायची इच्छा नाहीतरी अजून पुरी झाली नव्हतीच म्हणून ही संधी न सोडण्याचे ठरविले. अमेरिकेत परदेशीयांना गाडी भाड्याने देताना पासपोर्ट बरोबर इंटरनॅशनल ड्रायव्हिंग लायसन्स आहे की नाही येवढेच फक्त बघतात. थोडे डिपॉझिट घेतात. पेट्रोल टँक पूर्ण भरून देतात. बहुसंख्य

गाड्या ऑटोमॅटिक ट्रान्समिशन असल्याने गिअर्स बदला बदलीची भानगड नाही. आम्हाला नवी कोरी ब्युक गाडी मिळाली. त्यासाठी दिवसाला १५ डॉलर्स भाडे आणि अधिक दर मैलाला १५ सेंटस् आकार द्यावा लागणार होता.

लिविंगस्टन पासून यलोस्टोन नॅशनल पार्कचे उत्तरेकडील प्रवेशद्वार ५२ मैलावर आहे. जायचा रस्ता प्रशस्त असून रस्त्यावर रहदारीही फारशी नव्हती. डॉ. पटवर्धन अमेरिकेत पहिल्यादाच गाडी चालवत असल्याने आम्हालाच टेन्शन आले होते. लख्ख सूर्यप्रकाश पडला होता त्यामुळे डोंगरमाथ्यावर पडलेले बर्फ चकाकत होते. आकाश निरभ्र, निळेशार आणि हवा गार पण फारच उत्साहवर्धक होती. मधूनमधून थाबत आरामात दीड तासात पार्कपाशी पोहोचलो.

सुरुवातीलाच मॅमॉथ हॉट स्प्रिंग्ज ( Mammoth hot springs ) लागले. छोट्या डोंगरामधून वाफा निघत होत्या. गरम पाणी खळखळून खाली वहात येत होते. या पाण्यामध्ये असलेल्या क्षाराचे ( Limestone ) थर एकमेकांवर बसून त्याच्या थप्प्या झालेल्या होत्या. जुने थर पाढरे शुभ्र; तर नवीन तयार होत असलेले थर त्यात वाढणाऱ्या शेवाळ्यामुळे ( algae ) गुलाबी, तपकिरी, करड्या रंगांचे दिसत होते. सगळीकडे गरम पाणी, गरम चिखल असल्याने हे उष्ण पाण्याचे झरे वर जाऊन बघण्यासाठी लाकडी रस्ते ( Trails ) बांधलेले आहेत.

यलोस्टोन पार्क ही २४ लाख एकराची अतिशय अद्भुत, नैसर्गिक चमत्कारांनी भरलेली जागा असून येथे अग्नी ( fire ) आणि पाणी या दोन विषम गुणधर्मांच्या वस्तूंचे ( elements ) मिलन झालेले दिसते. यलोस्टोनच्या जन्माला हजारो वर्षे झाली असली तरी पृथ्वीच्या पोटात अजून चाललेल्या उलाढालींच्या, अशांततेच्या असंख्य खुणा जागोजाग दिसतात. एकाच ठिकाणी गरम पाण्याचे झरे, फायर होल्स, तळी, धबधबा, खोल दऱ्या, बर्फ, फॉसिल्स, वाईल्ड लाईफ आणि सुंदर निसर्ग या गोष्टी बघायला मिळतात.

पार्कमधील स्वच्छ, सरळ, रुंद आणि डांबरी. रस्त्यांच्या दोन्ही बाजूला हिरव्यागार पाईन्सच्या जंगलाची दाटी होती. मधूनच फॉलने रंगलेली रंगीबेरंगी झाडे डोकावत होती. रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी बर्फ पडलेला

होता. खऱ्या नैसर्गिक बर्फाला हात लावण्याचा हा आयुष्यातील पहिलाच प्रसंग. बर्फात खेळायची, बर्फाच्या बॉल्सनी मारामारी करायची हौस भागवून घेतली. शेजार शेजारी बर्फ व गरम पाणी या निसर्गाच्या किमयेने मात्र थक्क करून सोडले. भयंकर थंडीमुळे नाग, साप, तसेच वाघ, सिंहासारखी हिंस्र श्वापदे येथे जगूच शकत नाहीत, त्यामुळे या जंगलातून हिंडताना भीति वाटत नाही. येथील वर्दळ वाढल्याने पूर्वी सर्रास दिसणारी अस्वलेही आता विशेष दिसत नाहीत. आम्हाला हरिणांसारखे प्राणी तेवढे दिसले. तसेच तळ्यांतून रानबदकेही होती. रस्त्यामध्ये काही ठिकाणी डोंगराचे कडे इतके सुटलेले होते की कोणत्याही क्षणी खाली कोसळण्याची भीति वाटावी. गोल्डन गेटमध्ये धबधबा पिवळ्या रंगाच्या खडकातून येत होता. आसपासचे सर्व डोंगरही पिवळेच दिसत होते. ते बघून ' मेकॅनाज् गोल्ड ' या प्रसिद्ध सिनेमाची प्रकर्षाने आठवण झाली.

नंतर आम्ही ग्रँड कॅनियन ऑफ यलोस्टोन ' ही यलोस्टोन नदीने खण-लेली २०९ फूट खोल आणि काही ठिकाणी ४००० फूट रुंद अशी प्रचंड दरी बघितली. दरीच्या भिंती लोहाच्या (Iron) डिपॉझिट्स्मुळे रंगीबेरंगी दिसतात.

पुढे आम्ही ' ओल्ड फेथफुल ' हा या पार्कमधील नित्य नियमाने भू गर्भातून पृष्ठभागावर उफाळून ( eruption ) येणारा गरम पाण्याचा झरा ( गिझर ) बघण्यासाठी मार्गक्रमण करण्यास सुरुवात केली. वाटेत एके ठिकाणी आमच्या समोरच एक गिझर इरप्ट झाला, त्या शेजारीच फायर होल होते. गिझरमधील पाणी अक्षरशः उकळत होते; तर फायरहोल मधील वाफ ऊंच उडत होती. या सबंध पार्कभर अनेक ठिकाणी गिझर्स असून ठराविक मध्यंतरा नंतर ( interval )त्याचे इरप्शन होते.त्यापैकी भरवशाचे(Most predictable) गिझर्स उफाळून येण्याच्या वेळा लिहून ठेवलेल्या असतात. बरोबर त्यावेळी तुम्ही तेथे गेल्यास ही चकित करणारी किमया बघायला मिळते. तसेच येथे वनस्पतींचे अनेक जुने अवशेषही ( fossils ) बघायला मिळतात.

या पार्कमध्ये कमीत कमी एक दिवस तरी मुक्काम केलाच पाहिजे, तरच ही निसर्गाची उधळण जास्त अनुभवता येईल. त्यासाठी येथे 'ओल्ड फेथफुल इन ' सारखी अनेक हॉटेल्स असून कँपिंगचीही छान सोय आहे. पार्कचे उत्तरेकडील प्रवेशद्वार सबंध वर्षभर उघडे असते तर इतर प्रवेशद्वारे मे ते ऑक्टोबरपर्यंतच

खुली असतात. हॉटेल रिझर्वेशनसाठी Reservation Deptt, Yellowstone Park Co, Yellowstone National Park, Wyoming 82190 या पत्त्यावर संपर्क साधता येतो. आम्ही मात्र गाडीला भयंकर पैसे द्यावे लागतील म्हणून मुक्काम न करताच परतलो. सानफ्रान्सिस्कोच्या बससाठी रात्री ११-३० पर्यंतचा वेळ अक्षरशः कसातरी ढकलून प्रवासाच्या पुढील टप्प्यास आरंभ केला.

* * *

# सानफ्रान्सिस्को

## गुरुवार २८ सप्टेंबर

[illegible] प्रवास अतिशय कंटाळवाणा झाला. वाटेत स्टेशन्स कमी, लोकवस्ती विरळ, मोठी गांवे तर जवळजवळ नाहीतच. सर्व प्रदेश उंचवट्याचा, लांबच लांब, वाळवंटी. गवत वाळल्याने तर फारच वैराण भासत होता. एक पाईन वृक्षांचे जंगल तेवढे लागले. अधून मधून झुडपेही दिसत होती. अमेरिकनांनी मात्र सगळीकडे पाणी खेळवून वाळवंटाचे नंदनवन केलेले आहे. वाटेत एक प्रचंड धरणही लागले.

पॅसिफिक महासागरावरील भलामोठा प्रसिद्ध ओकलँड बे ब्रिज कॉस करून सकाळी ८।। चे सुमारास आमची बस सानफ्रान्सिस्कोत शिरली. ग्रेहाऊंड स्टेशन समोर असलेल्या काही हॉटेलसमध्ये चौकशी करून Hotel Grand Southern, 1095 Mission Street, San Fransisco येथे मुक्काम केला. एका गोड दिसणाऱ्या व बोलणाऱ्या वयस्कर बाईचे हे हॉटेल होते; त्यामुळे डाऊन-टाऊनमध्ये राहूनही भीति वाटली नाही. खोलीमध्ये गालीचे, टी. व्ही., फोन, अटॅचड बाथ होते. तरीही फक्त दिवसाला १८ डॉलर्स दर होता. एकाच दिवसात सर्व उरकायचे होते म्हणून हॉटेलच्या मालकिणबाईने ठरवून दिलेल्या दुपारी २ च्या मिनी बसने ( Super Maxi Tours ) पुरे शहर पालथे घातले. त्यासाठी प्रत्येकी १६।। डॉलर्स आकार पडला.

त्याआधी आघोळी वगैरे करून ताजेतवाने झाला व मॅकडोनाल्डमध्ये जेऊन भटकायला गेलो. जपान, तैवान, हॉगकॉंग जवळ असल्याने सनफ्रान्सिस्कोला कपडे स्वस्त मिळतात असे ऐकले होते, पण आम्हाला मात्र कोठेही आढळले नाहीत. सर्व दुकानातून ढण ! ढण ! म्युझिक होते. केसांच्या टोपाची, पर्सेसचीही खूप दुकाने होती. अर्थात् आम्हाला वेळ थोडा असल्याने जवळपासच हिंडून मत बनवावे लागले.

सुरुवातीलाच जॅपानिज् टी गार्डनमध्ये नेले. अमेरिकन लोकांना चायना टाऊन, जॅपानिज् गार्डन यासारख्या गोष्टी प्रेक्षणिय स्थळे म्हणून दाखवायची का हौस आहे कोण जाणे ? या बागेत पॅगोडा, धबधबे, जपानी पद्धतीप्रमाणे छोट्या कपातून चहा वगैरे गोष्टी होत्या. आम्ही अर्थातच चहात पैसे घालविले नाहीत. चांगलेच गरम होत असल्याने प्यायला पाणी शोधू लागलो. सनफ्रान्सिस्कोत पिण्याच्या पाण्याची फार कमतरता असल्याने पाण्याऐवजी कोक, ऑरेंज यासारखी पेये पिऊन समाधान मानावे लागले. येथे पाऊस वर्षाला फक्त चार इंचापर्यंत पडतो. पण पाण्याचे एवढे दुर्भिक्ष असूनही सगळीकडे हिरवेगार असल्याने भगभगाट जाणवत नाही.

सानफ्रान्सिस्को हा बेटांचा समूह असून ' गोल्डन गेट ब्रिज ' हा १९३० साली बांधलेला आणि ' मॅरिन कौंटीस ' जोडणारा जगातील मोठा, जुना, झुलता पूल ( Suspension bridge ). या पुलाची एकूण लांबी ९ हजार फूट असून त्यातील समुद्रावरील पुलाचा बिन आधाराचा भाग चार हजार दोनशे फूट लांबीचा आहे. समुद्रापासून पुलाची ऊंची दोनशे वीस फूट; तर पुलाचे मनोरे सातशे पन्नास फूट उंच आहेत. एका वेळी उलट-सुलट दिशेने आठ मोटारी जाऊ शकतील एवढा हा पूल रुंद आहे. पुलाच्या एका बाजूला छोटी बाग असून त्यात हा पूल बांधलेल्या कल्पक इंजिनिअरचा पुतळा उभारलेला आहे. जाता जाता गंमत म्हणून गाईडने पुलावरून उडी टाकली असता खात्रीशीर मरण्याचा एक सुइसाइड पॉईंटही दाखविला. असा जगप्रसिद्ध गोल्डन गेट ब्रिज ओलांडून त्याच्या जवळ सृष्टीशोभा पहाण्यासाठी केलेल्या टेकडीवर गेलो. येथून हा पूल आणि सानफ्रान्सिस्को शहर यांचे दृष्य अप्रतिम दिसते.

नंतर दाखविला म्युर वुडस् (Muir wood) हा रेडवुड या आभाळाला भिडणाऱ्या वृक्षांचा ५५० एकर्समध्ये पसरलेला पार्क. हा पार्क फक्त चालतच बघता येतो. त्यासाठी आत कच्चे रस्ते ( Trails ) केले असून त्याची लांबी सुमारे १० किलोमिटर भरेल. हे रेडवुडस् त्यांचे प्रचंड आकारमान आणि प्रदीर्घ आयुर्मान याबद्दल विख्यात आहेत. या वृक्षांचे आयुष्य ४०० ते ८०० वर्षे असून एक महिन्यांच्या रोपापासून ते १००० वर्षांपर्यंतचे जुने कॅलिफोर्निया रेडवुडस् या पार्कमध्ये बघायला मिळतात. हे वृक्ष २०० फूट किंवा त्याहूनही

जास्तच ऊंच वाढतात. वरचा सूर्यप्रकाशही खालपर्यंत पोचू शकत नाही. सबंध झाडाची ऊंची टिपू शकेल असा एकही फोटो आम्हाला काढता आला नाही. या वृक्षांच्या छायेखाली अनेक फर्नची झाडे वाढतात. या झाडांच्या खोडामध्ये पाण्याचे प्रमाण भरपूर असून त्यांची सालही ॲसबेसटॉस सारखी जाड असते; त्यामुळे या वृक्षाच्या जंगलांना आग लवकर लागत नाही. तसेच या झाडांमध्ये असलेल्या काही नैसर्गिक रासायनिक द्रव्यामुळे त्याच्या लाकडाला किटक ( insects ) आणि बुरशी ( fungi ) यापासून संरक्षण मिळते. या सर्वांमुळेच घर बांधणीसाठी हे लाकूड फारच उपयुक्त असते; पण तेवढेच महागही. या कॅलिफोर्निया रेडवुडस्‌ना ' म्युर वुडस् ' हे नाव या झाडांच्या संरक्षणासाठी व वाढीसाठी बरेच वर्षे झगडणारा निसर्गप्रेमी 'जॉन म्युर' याच्या स्मरणार्थ दिलेले आहे. सबंध पार्क हिंडायला ३—४ तास तरी सहज लागतील. आम्हाला दिलेल्या अर्धा-पाऊण तासात जेवढे हिंडता येईल तेवढे पाहूनच परतावे लागले.

तेथून 'सॉसलिटो' या बेटावर आलो. येथे समुद्रातील घरांमध्ये अनेक आर्टिस्ट लोक आर्टिस्टिक घरे बांधून राहतात. अशा प्रकारच्या बोटीतून राहणे फार महाग असते म्हणे. येथून अनेक लोक सॉसलिटोपासून दुसऱ्या बेटावरील घरी बोटींनी जाताना दिसले. या भागातील दुकानेही आत डोकवायचीही भीति वाटावी येवढी महागडी होती. येथे आमच्या बसचा अर्धा तास हॉल्ट होता शेवटी रस्त्यावर हिंडून तसेच समुद्राकडील कठड्यावर बसून वेळ काढावा लागला. एका बिअरच्या दुकानात शिरलो. पण कॅलिफोर्निया राज्याच्या कायद्याप्रमाणे रस्त्यावर उभे राहून दारू पिता येत नसल्याने विकत घेतलेली बिअर परत करावी लागली. अमेरिकेत प्रत्येक राज्याचे कायदे वेगळे आहेत. सिगरेटवर तर अमेरिकनांनी विजय मिळविलाच आहे; आता त्यांची अल्कोहोलला ताब्यात ठेवायची धडपड चालू आहे.

नंतर आम्हाला शहरातून फेरफटका मारायला नेले. आमच्या बसचा ड्रायव्हर कम गाईड चार्ली हा छोटासा, बारीक नि चुणचुणीत मुलगा होता. बसमध्ये बसविलेल्या मायक्रोफोनमधून त्याची सतत कॉमेंट्री ऐकू येत होती. सानफ्रान्सिस्को खरोखरची सिनिक सिटी आहे. भूकंपाचे धक्के कायम बसत असल्याने गगनचुंबी इमारती नाहीत. सर्व घरे छोटी. लाकडाची १,२

मजली, सुंदर रंगविलेली; दोन घरांमध्ये कंपाऊंड नसलेली, नि भिंतींना भिंती लागून असलेली. सर्व घरांचे जिने पुढील बाजूला, रस्त्यावर. लिविंग रूमच्या खाली गॅरेज. रस्ते सरळ पण इतके चढ उताराचे की ऊंचावरून गाडी एकदम उतारावर गेली की हमखास डोके टपाला भिडणार. क्रुकेड स्ट्रीट म्हणून एक इतका वळणावळणांचा रस्ता होता की प्रत्येक वळणावर गाडी शेजारील घरात घुसणार तर नाही ना अशी भीति वाटत होती. एका उतारावर गाडी इतकी पटकन खाली गेली की मी पुढच्या बाजूला आदळून गुडघा फुटला. तेथील लोक गाड्या कशा चालवत असतील याचं कोडं पडतं. तसेच उतारावर चाके तिरकी करून गाडी पार्क करावी लागते; नाहीतर खाली सुटायची भीती. येथील रस्त्यांवरून खालीवर करताना रोलर कोस्टरची अनेकदा आठवण आली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला हिरवीगार झाडी आहे. रहायच्या जागाही खूपच महाग आहेत म्हणे.

हे शहर जरा जास्त छपरीच वाटले. आतापर्यंत अमेरिकेत कोठेही न दिसलेले हिप्पी येथे बघायला मिळाले. मला तरी येथे एकटे हिंडायला नक्की भीति वाटली असती. हे शहर मोठे नाविक केंद्रही आहे. पॅसिफिक महासागर दिसायला फारच छान वाटतो पण शार्क मासे, पाण्यातील प्रवाह ( water currents ) नि बर्फासारखे गार पाणी यामुळे पोहायला पूर्ण निकामी. पॅसिफिकच्या या वैशिष्ट्यांमुळे तेथील तुरुंग एका बेटावर ( island of Alcatraz ) असूनही कैद्यांनी तुरुंगातून समुद्रात उड्या टाकून पळून जायची अजिबात भीति नाही. परत जाताना अमेरिकेत दुसऱ्यांदा ' चायना टाऊन ' हा चिनी लोकांच्या वस्तीचा भाग प्रेक्षणिय स्थळ म्हणून पहावा लागला. आठ वाजता परत आलो.

शहराचे सौंदर्य सोडल्यास दुसरे काही बघण्यासारखे नसल्याने एक दिवस हे शहर बघायला पुरेसा होतो. आता जेवायला रेस्टॉरंट शोधणे आले. डाऊन टाऊनमध्येच असल्याने जवळच एक उडुपी टाईप छोटे हॉटेल सापडले. रेड चिलीज्‌ची डिश म्हणजे आपली तांबड्या चवळीची उसळ. ती फारच चविष्ट होती.

हॉटेलमध्ये परतताना रस्त्यावर अनेक दारुडे हिंडत होते. मी व रेखा अक्षरशः जीव मुठीत घेऊन आलो. नंतर ज्यांच्याकडे आम्ही लॉस एंजल्सला उतरायचा बेत केला होता त्या डॉ. पाठक यांना कलेक्ट कॉल केला.

एन्. सी. एल्. मधील डॉ. पानसऱ्यांचे आमच्या येण्यासंबंधीचे पत्र त्यांना पोहोचले होते. ते म्हणाले " नुसते डॉ. पानसऱ्यांचे नाव सांगून आला असतात तरीही चालले असते. " मैत्री कशी असावी याचा प्रत्यय आला. फोनवरील त्याचे आगत्य पाहून त्यांचेकडे उतरायचे नक्की केले. झोपायच्या आधी टी. व्ही. बघताना पोप जॉन पॉलचे निधनाची वार्ता समजली. अवघे ३५ दिवस त्या पदावर रहायचे त्याचे दुर्भाग्य बघून वाईट वाटले.

* * *

# लॉस अँजेलिस

## शुक्रवार २९ सप्टेंबर

सकाळी १० च्या बसने सानफ्रान्सिस्को सोडले. वाटेत अनेक फळबागा दिसत होत्या. एक मोठा कत्तलखानाही लागला. ड्रायव्हर फारच चांगला होता. वाटेत लागणाऱ्या प्रेक्षणीय स्थळाची माहिती देत होता. जेवणासाठी गाडी थांबली तेव्हा हॉटेलमध्ये पिण्यासाठी पाणी विकत घ्यावे लागले. पाणी विकत घेण्याचा हा आयुष्यातील पहिलाच प्रसंग असावा. राशींची ( जन्मरास) चित्रे असलेले कानातील, गळ्यातील आकर्षक दागिने विकण्यासाठी ठेवले होते. संध्याकाळी ७ ला लॉस अँजेलिसला पोहोचू असे वाटले पण ६ लाच पोचलो. प्रवास फारच छान झाला पण फार गरम होत होते. या बाजूस फार कडाक्याची थंडी पडते पण बर्फ पडत नाही. एक रस्ता जो सानफ्रान्सिस्को ते लॉस अँजेलिसच्या समुद्रकिनाऱ्याने जातो तो फारच रम्य आहे. लॉस-अँजेलिसला जाताना शिकागोच्या 'ग्रेट अमेरिका' सारखा ॲम्युझमेंट पार्क दिसला आणि हॉलीवुडही लागले. हॉलीवुडला ग्रेहाऊंडचे सब स्टेशन आहे. या भागात माणसे एकदम सुंदर दिसू लागली. बायकांच्या बाबतीत हा फरक नक्कीच जाणवला. छान फॉर्म ठेवलेल्या गोऱ्या युवती रस्त्याने चटपट चालत होत्या. न्यूयॉर्कसारखा बायकांच्यातील पुरुषीपणाही कमी वाटला. सिनेसृष्टीचा हा परिणाम असावा. लॉस अँजेलिसचा ग्रेहाऊंड बस स्टँड, मला वाटतं, न्यूयॉर्कच्या खालोखाल मोठा असावा. येथील व्हेंडिंग मशीन्सवर झोपायच्या हवेच्या उशा प्रत्येकी एक डॉलर प्रमाणे, तसेच अनेक प्रकारची आइस्क्रीमस्‌ही उपलब्ध होती.

ग्रेहाऊंड स्टेशनवरून डॉ. पाठकांना फोन केला. अर्ध्या-पाऊण तासात डॉ. पाठक व त्यांचा मुलगा संजू गाडी घेऊन आले. काही क्षणातच परकेपणा दूर झाला. डॉ. के. डी. पाठक हे केमिस्ट्रीचे डॉक्टर. त्यांचे घर मलबार-हिल टाईप एका छोट्या टेकडीवर होते. अतिशय पॉश, ३–४ बेडरूम्स्, मोठे

हॉल्स ! दोन भिंतीना भिंतभर सलग आरसे बसविले होते. त्यात दुसरी खोली म्हणून धडकायचा अनेक वेळा आलेला योग चुकवावा लागला. आम्ही रात्री ७–८ पर्यंत येऊ असे समजल्याने सौ. पाठक बाहेर गेल्या होत्या; तरी त्यांची मुलगी मैथिली हिने आई नसली तरी गडबडून न जाता चुणचुणीतपणे लगेच सरबत देऊन आपल्या स्वावलंबत्वाचे प्रात्यक्षिक दाखविले. जेवणासाठी सुंदर पुणेरी बेत होता. वरण, भात, पोळ्या, आमटी, रस्सा, कोशिंबीर, वगैरे. मिसेस पाठकांनी तिकडे जाऊनही भारतातील वातावरण छान जतन करून ठेवले आहे. त्यामुळे अगदी आपल्या घरी आल्यासारखे वाटले. खूप गप्पा मारल्या; संजूशी तर रात्री १२ पर्यंत.

पाठकांकडे सर्वजण कामाला जात. मिसेस पाठक ' सिअर्स ' डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये, संजू ' लॉक्हीड ' ह्या विमाने बनविण्याच्या कंपनीत, तर विनय बी. एस. सी. करून नोकरी करत होता. त्यांच्याकडे एकूण ५ गाड्या होत्या. यात मैथिली सोडून प्रत्येकासाठी एकेक व कुटुंबाकरिता एक. लॉस अँजेलिसला पब्लिक व्हेईकल्चे ऑरगनायझेशन चांगले नसल्याने त्या ठिकाणी गाडी पडेल त्या किंमतीला ठेवावीच लागते, नाहीतर नोकरी अशक्यच. डॉ. पटवर्धनांना ड्रायव्हिंग चागले येत असल्याने व अमेरिकेत ड्रायव्हिंग करू शकण्याचा त्यांचा आत्मविश्वास बघून, लगेच एका गाडीची किल्ली डॉ. पाठकानी आमच्या स्वाधीन केली. त्यांनी इतक्या अल्प परिचयात एवढा विश्वास आमच्यावर टाकल्याने फार कौतुक वाटले. झोपावयाचे अगोदर आम्ही दुसऱ्या दिवशी डिस्ने लॅंड बघायची ठरविली.

## शनिवार ३० सप्टेंबर · डिस्ने लॅंड

सकाळी डिस्ने लॅंडला कसे जायचे त्याचा नकाशा घेऊन निघालो. अपेक्षेप्रमाणे डिस्ने लॅंड येईना तेव्हा फ्री वे वरून एक्झिट घेऊन विचारले असता आपण चुकून पुढे आल्याचे समजले. फ्री वे वर गाडी थांबवून कोणालाही विचारता येत नाही. ४-४ ट्रॅकचा रस्ता होता. प्रत्येक ट्रॅकचा स्पीड ठरलेला. डाव्या बाजूने डिस्ने लॅंडची पाटी दिसते का ते पाहात होतो. आम्हाला वाटलं इतकी जगप्रसिद्ध जागा ही ! भला मोठा मिकीमाऊस असेल स्वागत करायला. परंतु केवळ एक छोटी पाटी होती, आणि तीही उजवीकडे.

फसगत होणार नाही तर काय ? भल्या मोठ्या पार्किंग लॉटमध्ये गाडी पार्क करून गेटशी जाऊन धडकलो.

प्रत्येकी आठ डॉलर्सचे तिकीट काढल्यावर राईडस् घेण्यासाठी तिकिटांचे एक पुस्तक मिळाले. डिस्ने लॅंडमध्ये फॅंटसी लॅंड, फेअरी लॅंड, टुमारो लॅंड असे वेगवेगळे विभाग आहेत. आत शिरल्या बरोबरच एखाद्या परिकथेतील राजकुमाराच्या राज्यात आल्यासारखे वाटले. शनिवार असल्याने खूप गर्दी होती. जत्रा म्हणजे काय व त्यात कशी मजा करावी हे याच लोकांपासून खरं तर शिकावं.

पहिली राईड ' स्नो मौंटन'ची घेतली. त्यामध्ये एका डोंगरामधून एकावेळी दोन छोट्या रेल्वे गाड्या विरुद्ध दिशेने सोडतात. त्या दोन्हीमध्ये इतकं कमी अंतर असतं की या दोन्हींची टक्कर होईल या भितीने डोळे आपोआप मिटले जातात. तसेच त्या गाड्या डोंगराच्या इतक्या भिंतीजवळून नेतात, की कड्यावर डोकं आपटून कपाळमोक्ष होतो की काय असे वाटावे. वाटेत रोलर कोस्टर टाईप वाकडे-तिकडे करतातच. याच्याच साथीला भयप्रद म्युझिक, जबडा वासून डरकाळी फोडून झेप घेत आहेत असे वाटणारी अस्वले, विविध प्राण्याचे ओरडण्याचे आवाज, डोंगरातील धबधब्याचे अंगावर उडणारे पाणी ! खरंच कधी एकदा परत येतोय असं वाटतं. लहान मुले किंचाळ्या फोडून ढसढसा रडत होती. पुन्हा एकदा ' ग्रेट अमेरिका 'ची आठवण झाली. बाकीच्या बराचश्या राईडस् तशाच आहेत; पण खूपशा सोप्या. मुले मजा करू शकतील अशा. परंतु त्यांचा अनुभव शिकागोत घेतला असल्याने त्या सोडून उरलेल्या राईडस् घ्यायचे ठरवले. सर्व राईडस् घ्यायच्या झाल्या तर दोन दिवसही पुरणार नाहीत, कारण प्रत्येक ठिकाणी मोठ्या रांगा. रांगा जरी झरकन् पुढे सरकत असल्या तरी १०-१५ मि रांगेत थांबावेच लागते. 'इटस् ए स्मॉल वर्ल्ड'मध्ये बोटीतून नेतात. देशोदेशींचे ड्रेस घातलेल्या बाहुल्या येथे पाहायला मिळतात.

तेथून आम्ही टुमॉरो लॅंडमध्ये गेलो. तेथे ' मून राईड ' हा अवकाशातील अनुभव घ्यायचा रोलर कोस्टर सारखा आकर्षक प्रकार बघावयास मिळाला. ' व्हिजिट टू मार्स ' मात्र एकदमच बंडल वाटले. ' अमेरिका सिंग्ज ' म्हणून प्रकार म्हणे फार चांगला आहे; पण तो आम्ही बघू शकलो नाही.

'अमेरिका दि ब्यूटिफुल' हा अमेरिकेविषयीचा थ्री डायमेन्शनल माहितीपट मात्र आम्ही बघितला. सानफ्रान्सिस्कोचा क्रुकेड स्ट्रीट प्रत्यक्ष उतरताना जेवढे थ्रिल त्याची वळणे व उतार पाहून वाटत नाही, त्यापेक्षा जास्त हा सिनेमा बघताना वाटते. या चित्रपटाच्या प्रकाराला "पॅनोरमा" म्हणतात.

नंतर आम्ही फँटसी लँडमध्ये गेलो. येथील एका राईडमध्ये बोटीतून आफ्रिकन जंगलात नेतात. मधूनच रबरी मगरी डोके वर काढत होत्या. रबरी हत्ती आंघोळ करीत होते. वाटेतील जंगलात आफ्रिकेतील क्रूर श्वापदे काळजाचा ठोका चुकवतात. आफ्रिकन लोकांच्या मारामाऱ्या चालू असतात. खरोखर आपण आफ्रिकेतील एखाद्या नदीतून प्रवास करत आहोत असे वाटते. 'पायरेटस् ऑफ कॅरेबियन्स्' हा चाच्यांच्या जीवनावरील दृश्यपट न विसरण्या-जोगा. बोटीतून वेगळ्याच जगात गेलो. बाहेर भरपूर सूर्यप्रकाश पण आत चक्क चांदण्या चमकत होत्या. तोफगोळे जहाजावर वर्षाव करत होते. बायका पळवणारे, गाणी म्हणणारे, दारू पिणारे चालते-बोलते पुतळे इतके हुबेहुब केले होते की आपण जागे आहोत का स्वप्नात हे चिमटा घेऊन पहावे लागत होते. गुहेतील खजिना डोळे दिपवीत होता. मधूनच रोलर कोस्टर-चाही झटका होताच! हाॅन्टेड् हाऊस हा एक भूतबंगला. येथे झुलत्या खुर्चीत बसवून नेतात. कवट्या, सापळ्याचे नाच व भीषण आवाज ऐकवून भीतिने जागच्या जागी असं खिळवून टाकतात की किंचाळीच फोडावीशी वाटते. तसबिरी उलट्या होणं, त्यातील चित्र बदलणं, वगैरे अनेक प्रकारचे जादू-टोणे चालू होते.

वॉल्ट डिस्नेची ओरिजिनल डिस्ने लँड बघायला शेवटी गेलो. बाकीच्या टूमारो लँड वगैरे मला वाटतं नंतर वाढवल्या असाव्यात. येथील अॅट्रॅक्शनस् सारखी बदलत असतात. एका रेल्वेच्या रोलर कोस्टरचे बांधकाम चालू होतेच. वॉल्ट डिस्नेच्या गाजलेल्या स्लीपिंग ब्यूटी कॅसल, स्नो व्हाईट व सेव्हन डॉर्फस्, पीटर पॅन वगैरे सारख्या गोष्टी हालत्या बोलत्या दृष्यांनी व संगीताच्या साथीने मूर्तिमंत उभ्या केल्या आहेत. कोठे झुलत्या खुर्च्यांतून; तर कोठे छोट्या गाड्यात बसवून आत नेतात.

एका मोठ्या बोटीतून, तसेच मोनोरेलमधून सबंध लँडभोवती चक्कर मारता येते. मधून मधून चित्रविचित्र प्राण्यांचे पोषाख घातलेले विदुषक मुलांचे

मनोरंजन करत असतात त्यांच्याबरोबर फोटो काढण्यात खरोखरच गंमत वाटते. बग्गी, जुन्या मोटारी यातून मेन स्ट्रीटवर फिरता येते. खूपसे इन्डोअर करमणुकीचे प्रकारही आहेत. सुवेनिअर शॉप्स आहेत. आपल्याकडे लहान मुलांसाठी असतात तशा मोटारीतून भटकायचाही एक खेळ आहे. ट्रॅफिक जाम होतो. या खेळामध्ये मोटार चालवताच यायला पाहिजे असं नाही. मला वाटतं तो मॅग्नेटीक ट्रॅक असल्याने मोटारी ट्रॅकवरच चालतात.

जेवढं वर्णन करावं तेवढं थोडच ! किती बघावे किती नाही असे होऊन जाते ! शेवटी वेळ फारच अपुरा पडल्याची रुखरुख तर रहातेच ! खरच धन्य त्या ' डिस्नेची. ' ज्याने मुलांच्या स्वप्नसृष्टीतील मनोरंजनाच्या कथा कल्पना प्रत्यक्षात उतरवल्या. एकदा का त्या गुहेत शिरलो की बाहेरील जग, स्वत चे वय सर्व काही विसरायला होते. आम्ही मोठी माणसं इतकी गुंगून गेलो तर मग लहान मुले किती भाराऊन जात असतील याची कल्पनाच करवत नाही. मनालीची येथे खूप आठवण झाली. शक्य झालं तर तिचं बालपण संपायच्या आत तिला डिस्ने लॅंडची सफर घडवायचीच असं ठरवलं ! अमेरिकन मुलाचा परत हेवा वाटला. येथील प्रत्येक गोष्टीची मजा मुले व प्रौढ एकत्र चाखू शकतात. " फक्त १२ वर्षाखालील मुलांसाठी " यासारख्या पाट्या कोठेही दिसत नाहीत. यामुळे मुलांबरोबर पुन्हा एकदा तरुण व्हायचं सुख अनुभवता येते. या जादूनगरीतून काही केल्या पाय बाहेर निघत नव्हता. सात वाजता सर्व बंद व्हायला लागले तेव्हा बाहेर पडण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. आठ डॉलर्समध्ये मिळविलेली सर्व कूपन्स मात्र वेळेअभावी संपवू शकलो नाही. डिस्ने लॅंड आठवड्यातून १–२ दिवस बंद असते. तसेच त्याच्या वेळाही सीझनप्रमाणे बदलत असतात. म्हणून तेथे जाण्यापूर्वी चौकशी करूनच जाणे योग्य.

प्रो. एगर्सची मुलगी नॅन्सी डिस्ने लॅंडजवळ राहात असल्याने तिच्याकडे जाण्यासाठी रस्त्याची शोधाशोध सुरू केली. अनेक ठिकाणी थाबून, काही ठिकाणी घरात घुसून पत्ते विचारले; तरी सापडेना. तेव्हा एका पेट्रोल पंपा-वरून तिला फोन केला. आम्ही अगदी जवळच आलो होतो. मि. पॉल, नॅन्सीचे यजमान, आम्हाला न्यायला आले. त्याचे घर छोटेच, दोन बेडरूम्स्चे,

उतरत्या छपराचे, सुंदर लॉन असलेले. नॅन्सी बारीक, हसतमुख आईसारखीच बडबडी ! तर पॉल उंच, धिप्पाड, यंग चॅप ! तोही खूप बोलका होता. केटरिंग मॅनेजर म्हणून काम करत होता. समवयस्क असल्याने सर्व विषया-वरील गप्पा खूप रंगल्या. आईप्रमाणेच नॅन्सीनेही आमच्यासाठी खास इंडियन पाककृतीचे पुस्तक वाचून चिकन केले होते. या लोकांच्या आगत्याची खरंच कमाल वाटते. आपल्या भारतीय कुटुंबात नसेल इतके अनौपचारिक वाता-वरण होते. जेवणानंतर केक, कॉफी, वगैरे होतेच. नंतर पॉलने सर्वांचे फोटो काढले. जेवण आटोपून कसेबसे रात्री १० वाजता परत निघालो.

आता एका तासात पोचू वाटलं, पण रस्ता चुकलो. जातानाच्या खुणा लक्षात ठेवून काहीच फायदा नव्हता. घर काही येईना. शेवटी वैतागून रात्री ११॥ वाजता पाठकांना फोन केला. ते म्हणाले " रस्ता बरोबर आहे. तसेच पुढे या. " तरीही सर्व अपरिचित वाटू लागले. नुसत्या गाड्यांच्या सेल्सची दुकाने. अनेक ठिकाणी विचारता विचारता एकदा तर गुत्यात जाऊनही विचारलं व आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेथील लोकानीही आपुलकीने माहिती दिली. एकजण सायकलवरून रस्ता दाखवायला आला. तरी चक्रव्युह सुटेना. साडेबारा झाले, एक तास नुसते भटकत होतो. आता फारच रात्र झाल्याने सर्व काही बंद झाले होते म्हणून फोन करण्याचे ठिकाणही शोधा-यला लागले. शनिवार असल्याने रस्ता मात्र थोडा वाहता होता. शेवटी पुन्हा एकदा पेट्रोलपपावरून पाठकाना फोन केला. " तुम्हीच येऊन घेऊन जा " म्हणून. डॉ. पटवर्धनाचा मूड एकदम गेला होता. ते खूप गडबडून गेले होते. सर्वजण गोंधळलो होतो. ते म्हणाले, " आता बहुधा माझ्या हातून ॲक्सिडेंट होतोय. " एकदा वळसा घेताना दगडावर छोटीशी धडकही देऊन झाली. नैराश्य आले होते. त्यात पुण्याच्या एका डॉक्टरना लॉस ॲंजेलि-सच्या गुंडांनी मारल्याची आठवण झाल्याने तर सर्वजण पुरतेच घाबरलो. शेवटी बिचारे श्री. व सौ. पाठक येऊन आम्हाला घेऊन गेले, खूप शरमल्यासारखे झाले. पाहूणे म्हणून जायच शिवाय वर हा त्रास. इतक्या रात्रीही म्हणजे जवळ जवळ रात्री एक वाजता मिसेस पाठकानी चहा करू का असे विचारल्यावर त्याच्या अगत्याला काय म्हणावे तेच कळेना. पाठक तर स्वतः झोपले नव्हतेच पण आम्ही न आल्याने अस्वस्थ होऊन सारखे इकडे-तिकडे

फेऱ्या घालत होते. श्री. पाठकांच्या वडिलांचे न्यूयॉर्कला त्यांच्याकडे येताना निधन झाले त्यामुळे त्यांना कोणी पाहुणे आले की जबाबदारीची जास्त काळजी लागते, मुले लवकर घरी आली नाही तरी ते घाबरतात; हे दुसऱ्या दिवशी मिसेस पाटकाकडून ऐकून जास्तच ओशाळल्यासारखे झाले.

## रविवार १ ऑक्टोबर ' हॉलिवुड

फिल्मी दुनियेचे आकर्षण नसलेली माणसं विरळाच ! या मोहमयी वातावरणात कमीत कमी डोकावण्याची तरी अनेकांची सुप्त इच्छा असते. म्हणूनच फिल्मी चमच्यांचा भाव नेहमी भडकलेला असतो. आपल्याकडे अनेक खटाटोप करून मिळवावा लागणारा हा चान्स अमेरिकेत अगदी सहजासहजी मिळतो हे कळल्यावर ' हॉलीवुड ' या अमेरिकेतील प्रसिद्ध चित्रनगरीतील ' युनिव्हर्सल स्टुडिओ ' बघायचे ठरविले कारण फक्त याच स्टुडिओत आम जनतेला पडद्यामागे डोकावता येते. एकदा ७·२५ डॉलर्सचे तिकिट काढले की आपल्याला काहीही करावे लागत नाही. त्याचाच गाईडसहित आयोजित ट्रिप्स् असतात. एका छोट्या टेकडीवरून आत जायला रस्ता होता. आतील जागा एवढी प्रचंड की छोटं गावच ! तिकिट काढून आत गेल्यावर परत एक मोठी रांग होती. दारातच जेम्स कॅग्ने या एका प्रसिद्ध नटाचा पुतळा होता. त्याच्या खाली जन्म-मृत्यू याची नोंद केली होती. दारातून कोण आत जाते येते हे दिसावे म्हणून टी. व्ही. चालू होताच. त्या पुतळ्याने एकदम एका बाईला टप्पू मारला. ती बाई साहजिकच घाबरून किंचाळली; तेव्हा कळले की त्या नटाचा मुखवटा घालून खरा माणूसच निस्तब्ध उभा होता.

ट्रॅम्स टाईप बसेस मधून स्टुडिओ दर्शन सुरू झाले. गाईडची कॉमेंट्री चालू होतीच. ही कामे बहुधा मुलीच करतात. वाटेत भूकंप होऊन टेकडीच्या उतारावरून दगड घरंगळू लागले. ते बसेसवर कोसळणार असे वाटेपर्यंत इनडोअर स्टुडिओपाशी येऊन थांबलो. येथे नटनट्यांच्या मेकअप् रूम्स आहेत. त्या आतून बघण्यास मिळाल्या. रविवार असल्याने सामसूम होती, नाहीतर अनेक झगमगते तारे इकडून-तिकडे जाताना दिसतात म्हणे.


टी. व्ही. साठी वेगळे स्टुडिओ असून त्याच्या काम करण्याच्या तंत्राचे दर्शन सामान्य प्रेक्षकांना घडविण्यास स्वतंत्र भाग राखून ठेवला आहे.




गोल्डन गेट ब्रिज, सानफ्रान्सिस्को (पृ ७०)



डिस्ने लॅंड (पृ ७५)



मरीन लँडमधील किलर व्हेलच्या करामती ( पृ. ८६ )



कोलोराडो ग्रँड कॅनियन ( ॲरिझोना ) ( पृ. ९३ )

येथे प्रेक्षकांना बसण्यासाठी खास व्यवस्था केली आहे. प्रत्येकी वेळी प्रेक्षकातील काही जणांना मॉडेल म्हणून काम करायला बोलावत. यासाठी 'मी' 'मी' करणाऱ्यांची तेथेही स्पर्धा बघून आश्चर्य वाटलं. माझा आपला समज (गैर) होता की त्या लोकाना २४ तास टी. व्ही. बघायला मिळत असल्याने त्यात काम वगैरे करण्याचे त्यांना एवढे आकर्षण नसेल. एका छोट्या मुलाला (की ज्याला मोटारसायकल पेलणारही नाही) मोटारसायकलवर बसवून भर वेगाने पळवून दाखविले. तेही रोम, लंडन न्यूयॉर्कमधील आपल्याला माहिते असलल्या रस्त्यातून! तोंडावरील भाव तेवढे बदलत आरामशीर बसायचे. पाठीमागचा पडदा पाहिजे त्या ठिकाणचे दृश्य लावून हालवला की टी. व्ही.च्या पडद्यावर जगातल्या कुठल्याही ठिकाणची सफर प्रेक्षकांना घडविता येते. दुसऱ्या एका ठिकाणी घरामधील शूटिंग कसे घेतात याचे प्रात्यक्षिक दाखविले. खिडकीतून पाऊस पडताना कसा दिसतो वगैरे. खोल्यांना वरती छप्पर नसते. सर्व भिंती तीन चतुर्थांश उंचीच्या असतात. हे सीन्स मात्र मालिका पूर्ण होईपर्यंत बदलता येत नाही. नंतर बायोनिक टेस्टींग सेंटर दाखविले. रस्सीखेचमधे प्रेक्षकांपैकी एकजण ५-६ ताकदवान माणसांना ओढणार, ४० फूट उंच उडी मारणार, ३००० पौंडाचा ट्रक एका हाताने उचलणार, एका लाथेत जीपचे एक चाक पंक्चर करणार वगैरे चमत्कार टी. व्ही. वर दाखविण्याचे शूटिंग कसे घेतात ते बघण्यास मिळाले.

हा एक छपराखालील बंदिस्त टी. व्ही. स्टुडिओ बघून परत विस्तीर्ण स्टुडिओ बघायला सुरवात झाली. व्हिएटनाममधील एक खेडेगाव प्रत्यक्ष वसविले होते. त्यामधून बस जाताना एकदम मुसळधार पाऊस सुरू होऊन पुरामुळे बस वाहून जाते की काय असे वाटू लागले. नदीच्या एका जुनाट पुलावरून जाताना चक्क पूल कोसळला व आता मात्र आपण नक्की खाली पडणार म्हणून डोळे मिटून घेतले तर तोही एक चित्रीकरणाचाच भाग निघाला. एक घर प्रत्यक्ष जळताना दिसत होते. धुरामुळे ठसका लागेल की काय असं वाटण्या इतपत! एका तळ्यावर पूलच नव्हता. आता पैलतिरी कसं जायचं या विचारात प्रत्येकजण असताना चक्क ते तळे दुभंगून रस्ता तयार झाला. तसेच एक तलाव ओलांडून जात असताना एकाएकी एक २४ फुटी

शार्क सबंध बसला गिळण्यासाठी प्रचंड जबडा वासून धावून आलेला बघून अर्धा सेकंद तरी काळजाचा ठोका चुकला. त्याने उसळी मारलेल्या पाण्याने भिजवून टाकले. हाच तो प्रसिद्ध ' Jaws " या चित्रपटामधला शार्क हे नंतर कळले.

या व अशा अनेक प्रकारच्या दृश्यांचे शूटिंग कसे घेतात हे बघून मजा वाटली. आपल्याकडेही असे चमत्कृतीपूर्ण चित्रपट अगदी पूर्वीपासून आहेत. पण हे ट्रिक सीन्स घेतात तरी कसे हे सामान्य माणसाला समजावे असे मात्र कोणालाच वाटत नाही. चित्रपटाच्या चित्रीकरणाचे स्टुडिओ म्हणजे अलीबाबाची गुहाच असते आपल्याकडे ! धर्मेंद्र – हेमामालिनीच्या विश्वात डोकावण्यासाठी भैयाच्या दंडुक्याचा प्रसाद वेळप्रसंगी खायची तयारी ठेवावी लागते. अमेरिकेत मात्र तिकीट काढून " तिळा उघड " म्हणायचं ! थोडे पैसे खर्च केले की हरतऱ्हेने मनोरंजन करायचे काम संयोजकाचं. सामान्य लोकाना सर्व गोष्टींचा आस्वाद घेता येतो हेच अमेरिकेचे वैशिष्ट्य ! युनिव्हर्सल स्टुडिओत काही भाग केवळ प्रेक्षकांसाठी राखून ठेवला आहे. आपल्याकडेही असा उपक्रम छोट्या प्रमाणात का होईना सुरू करता येईल व तो तोट्यात तर नक्कीच जाणार नाही.

अमेरिकेत बरेचसे चित्रिकरण स्टुडिओत होते. क्वचितच बाह्य चित्रिकरण करतात, पण त्यात वास्तवता आणण्यासाठी मात्र अत्यंत जागरुकता दाखविलेली आढळते; कारण इंग्रजी चित्रपट बघताना त्या त्रुटी कधी जाणवत नाहीत. स्टुडिओत शूटिंगला नेहमी लागणारे रस्ते, घरे, दुकाने यासारखे सेटस् कायम स्वरूपात उभे केलेले होते. इमारतींचे केवळ दर्शनी भागच होते; तर रस्ते काटकोनात वळणारे होते. तसेच जुन्या वा नव्या ज्या काळातील चित्रपट असेल त्या धर्तीची घरेही होती. घोड्याना बांधायच्या जागा, हॉटेल्स, दुकानावरील पाट्या स्थलकालाप्रमाणे होत्या. या रस्त्यावरून हिंडताना आपण स्टुडिओत आहोत हे विसरायला होते. न्यूयॉर्कमधील रस्ते, मेक्सिकन गाव, युरोपमधील रस्ते हुबेहूब वसविले होते. येवढेच काय पण वास्तवता यावी म्हणून जगातील ७०० प्रकारच्या झाडांचीही लागवड केलेली आहे. तसेच नैसर्गिकपणा वाटावा म्हणून कालमानाप्रमाणे बदलणाऱ्या अनेक प्रकारच्या वेषांचे ( costumes ) पण जतन केलेले आहे. ' सायको ' या गाजलेल्या

चित्रपटातील टेकडीवरील भूतबंगलाही बघायला मिळाला. प्रत्यक्ष चित्रपट बघताना आउट् डोअर वाटणारी शूटिंग्ज्, इनडोअर स्टुडिओत सेटस् उभारून कशी करतात हे पाहिल्यावर खरंच आश्चर्य वाटले.

अशा वेगळ्याच जगांत नेऊन आणणाऱ्या बसने, खाण्या-पिण्याच्या स्टॉपवर आणून सोडले. येथेही एका हाताने उचलता येणारी जीप, सहज वाकवता येणारे गज, प्रचंड मोठा टेलीफोन वगैरे गोष्टी, खास फोटो काढण्यासाठी ठेवल्या होत्या. सुवेनिअर शॉप्स नेहमीप्रमाणे होती, पण हॉलीवूड म्हणून जास्त महागच. पुढे म्युझिक सेक्शन व फोटो स्पॉट. येथेही अति उंच चित्रविचित्र चेहरे असलेली (आपल्याकडच्या शिमग्यातील वाघ-सिंहाच्या चेहऱ्याप्रमाणे नसून, कातडीला फिट्ट बसेल असे मास्कस् असल्याने अगदी खरे चेहरे वाटणारी) माणसे मनोरंजन करायला होती. माकडेही खूप होती. हे मास्कस् विकतही मिळतात. चित्रकारांची जागेवरच तुमचे साधे चित्र वा व्यंगचित्र काढून द्यायची दुकाने होती. तसेच जुन्या फॅशन्सचे कपडे घालून फोटो काढण्याचीही खास दुकाने होती. सर्वांचे दर स्वस्तच पण केवळ हौशी प्रवाशांच्या खिशाला न परवडणारे (कमीत कमी ३-४ डॉ.) असल्याने आम्ही फक्त दुसऱ्याची चित्रे बघण्यावर समाधान मानले.

नंतर चार न विसरता येण्याजोगे शोज् बघायला मिळाले. यासाठी ओपन एअर स्टेडियमस् बांधलेली असून हे शोज् एका पाठोपाठ सारखे चालूच असतात. दिवसातून प्रत्येकी ३-४ शोज् असतात. आपण ज्यावेळी तेथे पोहोचू तो शो बघून सुरवात करता येते.

पहिला शो बघितला ' मास्क्स् ऑफ थाऊंजड फेसेस्.' यात वेगवेगळ्या प्रकारचे मेकअपस् ( भाजलेला, जखमी, भेसूरता दाखविणारा, वगैरे ) चेहरे कसे बदलून टाकतात हे नटनट्यांचे खरे चेहरे व मेकअप केलेले चेहरे एकाच वेळी स्लाईडस्च्या सहाय्याने दाखवून पटवून देतात. नंतर त्यांनी प्रेक्षकातील दोघेजण निवडून त्यांना ' फ्रॅन्केन्स्टाइनस् मॉन्स्टर ॲन्ड हिज ब्राईड ' दाखवणारा मेकअप १०-१५ मिनिटांत केला. त्यांना इतके भयानक व कुरूप करून टाकले होते की त्यांनी आरशात बघितल्यावर त्यांची बोबडीच वळाली. प्रेक्षकातही चित्रविचित्र, भीतिदायक मुखवटे घातलेली माणसे मधूनच येऊन बसत; ज्यांना बघताच आसपासच्या लोकांची तिरपीटच उडत असे.

नंतरचा शो होता 'ॲनिमल ॲक्टरस् स्टेज' युनिव्हर्सल स्टुडिओने तयार केलेल्या अनेक चित्रपटातून कामे करण्यासाठी येथे प्राण्यांना शिक्षण दिले जाते. पांढरा काकाकुवा, कुत्रे यांना तर ट्रेन केलेले होतेच पण त्यात एका छोट्या पांढऱ्या उंदराचाही समावेश होता. शिट्टीच्या तालावर तो ताणून बसवलेल्या दोरीवर मोठ्या दिमाखाने येरझारा घालीत होता. उंदराचा जीव न जाता उंदीर मांजराना एके ठिकाणी रहाण्याचे शिक्षणही दिले होते. तेथील एका ट्रेन्ड कुत्र्याने ५० वस्तूंमधील कानात सांगितलेली नेमकी वस्तू क्षणार्धात हजर केली. या प्राण्यांना ट्रेन करणाऱ्या ट्रेनरस्च्या कष्टाळू व संयमी वृत्तीची फारच कमाल वाटली.

नंतर बघितला 'स्टंट मेन शो.' इंग्रजी चित्रपटातील हाणामाऱ्यांचे चित्रिकरण कसे करतात याचे प्रात्यक्षिक येथे चालू होते. खूप उंचीवरून पडणे, एकमेकांवर गोळ्या चालवणे, गोळी लागल्यावर रक्ताच्या चिळकांड्या उडणे, यासारख्या अवघड गोष्टी अत्यंत लिलया ते करून दाखवत होते. यातील एक इसम तर उंचावरून पडल्यानंतर चक्क समर सॉल्ट मारून दोन पायावर उभा राहिला.

शेवटी एअर पोर्ट ७७ स्क्रीन टेस्ट थिएटर मध्ये गेलो. तेथे प्रथम 'एअर पोर्ट ७७' हा सिनेमा टी. व्ही. वर दाखवण्यात आला. नंतर त्यांनी प्रेक्षकातील १०–१२ जणांची ॲक्टरस् म्हणून निवड केली. त्यांनाच वैमानिक, एअर होस्टेस, प्रवासी वगैरे भूमिका वाटून देऊन आमच्या समोरच त्या सिनेमाचे प्रत्यक्ष चित्रिकरण केले. त्यात त्यानी विमान पडल्यावर गोंधळ कसा माजतो, लोक समुद्रात कशा उड्या मारतात, समुद्रातून लोकांना कसे वर काढतात, बलूनस्च्या सहाय्याने विमान वर कसे ओढतात या सारख्या दृष्यांचे प्रेक्षकातील निवडलेल्या नटांना समजावून देऊन चित्रिकरण करून दाखविले. त्यानंतर अर्ध्या तासातच तो सिनेमा पुनश्च टी व्ही. वर दाखवण्याचा चमत्कारही त्यांनी करून दाखवला. या स्क्रीन टेस्ट मध्ये चागले उत्तीर्ण होणाऱ्यांना म्हणे टी. व्ही. वर काम करण्याची संधी मिळते. नवीन चेहऱ्यांचा शोध लागतो. येथेही स्वप्नाळू इच्छूकांची खच्चून गर्दी होती, परंतु अनेकांना हिरमुसले होऊन माघार घ्यावी लागली.

एका वेगळ्याच विश्वात डोकावून सबंध कुटुंबाला एकत्रपणे लुटता येणाऱ्या आनंदाची ही पर्वणी अमेरिकेस भेट देणाऱ्यांनी कधीही दवडू नये. सर्व खेळ

संपताना संध्याकाळ कधी झाली ते कळले देखील नाही. काल उशिरा घरी पोहोचलो होतो म्हणून आज ताबडतोब घरी परतायचे ठरविले. जवळ जवळ न चुकता पण निघताना काढून घेतलेल्या रस्त्याच्या विरुद्ध दिशेने का होईना ६ वाजता घरी परतलो. 'ॲटलांटिक बुलेवार्ड' कधीही विसरणार नाही. तो एकदा सापडला की घरी पोहोचायची तरी शाश्वती असायची.

आज रविवार असल्याने सर्व पाठक मंडळी घरीच होती; म्हणून एक प्रसिद्ध गार्डन बघायचे ठरविले. अमेरिकेतील प्लॅनिटोरियम बघण्याची संधी शिकागो येथे हुकली होती ती येथे साधायची असा विचार करून दोन गाड्यातून निघालो रविवार असूनही सबर्बकडे जाण्याच्या रस्त्यावर खूपच गर्दी होती. गाड्या जरा बेतानेच चालवाव्या लागत होत्या. गार्डन ज्या टेकडीवर होते ती चढायला लागल्यानंतर तर मुंग्यांच्या रांगेप्रमाणे गाड्यांची रांग सुरू झाली. रविवार असून येवढी गर्दी का हेही कळेना आणि वनवे असल्यामुळे परतही फिरता येईना. कासवाच्या गतीने पुढे सरकताना असे लक्षात आले की गार्डनच्या जवळच असलेल्या एका थिएटरमध्ये कोणातरी प्रख्यात गायकाचा गाण्याचा कार्यक्रम होता आणि त्याकरिता आलेल्या गाड्यांच्या पार्किंगमुळे अर्धा मैल रस्ता व्याप्त झाला होता. जो रस्ता आम्ही १० मिनिटांमध्ये काटला असता तो काटण्यांत गर्दीमुळे जवळ जवळ एक तास लागला आणि त्यामुळे उशीर होऊन प्लॅनिटोरियम बंद झाले. परत एकदा अमेरिकेतील प्लॅनिटोरियमने हुलकावणी दिली. गार्डनमधील वेधशाळेचे म्युझियम अगदी अप्रतीम आहे. गच्चीवर एक अत्यंत पॉवरफुल दुर्बिण आकाशातील ताऱ्यांचा वेध घ्यायला बसविलेली आहे. त्यावर दोन अतिशय दुर्मिळ असे जुळे तारे माऊंट केले होते. नुसत्या डोळ्यांनी बघितले असता एकच तारा दिसत होता पण दुर्बिणीखाली त्याचे वेगळे अस्तित्व दिसू शकत होते. ते दोन तारे पृथ्वीपासून इतके दूर अंतरावर होते की आम्ही जे त्यांना बघत होतो ते त्यांनी सुमारे ३०० वर्षांपूर्वी सोडलेल्या प्रकाशामुळे होते. या गच्चीवरून लॉस अँजिल्स शहराचे झगमगते विलोभनीय दृश्य दिसत होते.

---

* Universal Studios,
Universal City, California–91608
Tour Reservations Tel No (213) 877-2121

परत येताना गाण्याचा कार्यक्रम सुरू झाल्याने ट्रॅफिक जाममध्ये फसावे लागले नाही. फक्त पार्क केलेल्या गाड्यांचा अथांग सागर बघण्यास मिळाला. घरी परतल्यानंतर सानफ्रॅन्सिस्कोमधील हॉटेल ग्रँड सदर्नच्या रूमची किल्ली चुकून विजयच्या खिशात राहिल्याचे लक्षात आले, तेव्हा ती पोस्टाने पाठवावी (स्वखर्चाने) असे डॉ. पटवर्धनाचे मत पडले. पण ती सूचना मात्र विजयने "मी ती किल्ली काही मुद्दाम आणली नाही, चुकून ती माझ्या खिशात राहिली" असे म्हणून धुडकावून लावली. खूप वादविवाद झाला. नंतर असे लक्षात आले की, त्या किल्लीच्या कीचेनवर लिहिले होते की, चुकून किल्ली परत करायची राहिल्यास नुसती पोस्टाच्या पेटीत टाकून द्या. त्यानुसार आम्ही ती किल्ली बिनखर्चाने पोस्ट करून टाकली, आणि वादावर पडदा टाकला.

### सोमवार २ ऑक्टोबर · मरीन लँड्स्

सॅन डिॲगो का मरीन लँड्स् करता करता शेवटी मरीन लँड्स्लाच ('Hanna Barbaras' Marine land) जायचे सर्वानुमते ठरले. डॉ. पाठकांच्या घरापासून जवळ जवळ ४० मैल जायचे असल्याने आम्ही सकाळी लवकरच निघालो. हे ठिकाण मेन रोडपासून खूप आत असल्याने वाटेत एकदा उतरून रस्ता बरोबर असल्याची खात्री करून घेतली. तेथे पोचण्यास जवळ जवळ एक तास लागला. येथे मोठे ॲक्वेरिअम आहे. माशासाठी मोठाले तलाव बांधलेले आहेत. त्यात प्रचंड वजनाचे व्हेल्स् तसेच वॉलरस (सी लायनस्), डॉलफिन्स इ. प्रकारचे मासे सोडलेले आहेत. येथील पॅसिफीक तर सी लायन्सचे माहेरघरच आहे. समुद्रातील खडकावर वॉलरस थव्या-थव्याने बसलेले आढळतात. येथेही एन्ट्रन्स तिकिट होतेच.

पहिला शो व्हेलसचा बघितला. ऑर्की व पॉर्की नावाच्या प्रत्येकी १४०० टनाच्या व्हेलसूनी अप्रतिम करामती करून दाखवल्या. ऑर्की अशी हाक मारल्यावर ऑर्कीच येतो. माशाना हे कसे शिकवत असावेत याचे कोडे मात्र सुटत नाही. ऑर्की-पॉर्कीने उड्या मारल्यावर उसळलेले पाणी पहिल्या चार पाच रांगातील माणसांना भिजवून काढी. दोन ट्रेनरस् दोन डब्यात ठेवलेले छोटे मासे या दोघांच्या तोंडात सारखे ओतत होते. उलट्या सुलट्या उड्या मारून होताच ऑर्की व पॉर्की जबडा वासून क्षणार्धात मासे खायला हजर

होत. बहुधा या लाटेवरच त्यांचे खेळ होत असावेत २५ फूट उंचीवर टांगलेल्या बॉलला तोंड लावून हे पठ्ठे टाळ्या मिळवित होते. ऑर्कीने तर चक्क एका तरुणीचे चुंबनही घेतले. हे सर्व बघताना या व्हेल्सना शिकविण्यात त्यांच्या ट्रेनरसनी किती विलक्षण मेहनत घेतली असेल हे पदोपदी जाणवत होते. एरवी जवळपास कोणालाही फिरकू न देणारे हे व्हेलस् ट्रेनरस्ना मात्र जबड्यात हात घालू देत होते.

दुसरा शो बघितला 'डॉलफिन्स्चा.' चार डॉलफिन्स उंच उड्या, दोरीवरून उड्या वगैरे करामती तर करून दाखवतातच; पण त्यांच्यावरून त्यांचे ट्रेनर्स स्किईंग सुद्धा करतात.

तिसरा शो होता 'सीलायन्सचा' हे मासे दोन पायावर चालत येतात. नाकावर रिंग्ज, बॉल्स वगैरे ठेवून पाण्यातून चक्कर मारतात. शेकहँड करतात. एकमेकांशी व्हॉलीबॉल ( नाकावर झेलून ) खेळतात. दिसायला मात्र हे प्राणी अगदीच गिळगिळीत व ओंगळ वाटले.

चौथा शो होता परत 'व्हेलसचा.' पहिल्यांदा बघितलेल्या व्हेलसच्या खालच्या बाजूचा रंग पांढरा होता, त्यामुळे ते आकर्षक दिसत होते. परंतु हे व्हेलस् संपूर्णपणे काळे होते. खेळ सुरू झाला. ट्रेनर्सनी खूप प्रयत्न करूनही ते त्यांच्या आज्ञा पाळेनात. शेवटी खेळ रद्द करावा लागल्याची घोषणा ट्रेनर्सना करावी लागली. मारून मुटकून माशाकडून काम करवून घेता येत नाही. त्यामुळे प्रत्येक शो होतोच असे नाही तर वेळप्रसंगी एखादा शो कॅन्सलही करावा लागतो हे आमच्या लक्षात आले. तेथून आम्ही चार वाजता बाहेर पडलो.

येथून जवळच वॅक्स म्युझियम आहे असे समजल्याने आम्ही त्याचा शोध घेऊ लागलो. पण नेहमीप्रमाणे ते जवळ म्हणजे चांगलेच लांब होते. अनेक जणांना विचारल्यावर शेवटी ते सापडले, पण प्रत्येकी ५ डॉलर्स प्रवेश फी बघून परत माघारी फिरलो. एक तर ५ डॉलर्सचे जस्टीफिकेशन करण्याइतपत वेळही उरला नव्हता व लंडनला आम्हाला मादाम टूसाचे वॅक्स म्युझियम बघायचे होते.

परत येताना वाटेत पिक-अँड-सेव्ह स्टोअर्समध्ये खरेदीला गेलो. सकाळी 'अॅक्रॉन'मध्ये गेलो असता टेक्सास इन्स्ट्रुमेंटस्ची डिजिटल रिस्टवॉचेस् बघितली

होती. संध्याकाळी येताना घेऊ म्हणून घेतली मात्र नव्हती. रात्री पिक-अँड-सेव्ह स्टोअर्समध्येच ९ वाजल्याने अ‍ॅक्रॉन बंद झाले. त्यामुळे डिजिटल रिस्ट वॉचेस् घ्यायचे तसेच राहून गेले. पुढे अनेक ठिकाणी, खुद्द टेक्सास स्टेटमध्ये चौकशी करूनही ही घड्याळे मिळाली नाहीत. अमेरिकेत असेच असते. एका दुकानातील वस्तू दुसऱ्या दुकानात तशीच्या तशी मिळत नाही. त्यामुळे एकदा हुकले की हुकले.

* * *

# लास वेगास

## शुक्रवार ३ ऑक्टोबर

डॉ. पाठक ऑफिसला जाताना आम्हाला स्टेशनवर सोडणार होते. सकाळी सात वाजता त्यांचे बरोबर बाहेर पडलो. पाठक परिवाराचा निरोप घेताना गहिवरून आले. त्याचे बरोबरचे तीन दिवस कसे गेले ते समजले देखील नाही. त्यांनी दाखविलेले आगत्य तर कधीही न विसरता येण्याजोगे. विशेषत. गाडी देऊन तर फारच मदत केली. लॉस अँजेलीस अमेरिकेतील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर असूनही बस, रेल्वे यासारख्या सार्वजनिक वाहनांची व्यवस्थित सोय नसल्याने स्वतःचे व्हेईकल नसते तर आम्हाला इतक्या गोष्टी एवढ्या थोड्या वेळात पहाणे केवळ अशक्यच झाले असते.

सकाळी ९-३० वाजता लॉस अँजेलीसला राम राम करून दुपारी अडीच वाजता लास वेगासला पोहोचलो. झगमगत्या, अतिशय पॉश हॉटेल्सनी स्वागत केले. बस थांबल्या थांबल्या सामान घेऊन खालती उतरलो; पण हा टर्मिनस स्टॉप नसून परतताना बस येथे थांबत नाही असे कळले. आम्हाला तर रात्री परतायचेच होते म्हणून ड्रायव्हरची मिनतवारी करून कसे बसे परत वर चढलो आणि डाऊन टाऊन लास वेगास या मुख्य स्टॉपवर उतरलो. ग्रेहाऊंडच्या बसेसमध्ये एकदा उतरून सामान ताब्यात घेतले की पुन्हा बसमध्ये चढता येत नाही हे तेव्हा समजले.

५ सेंटस्नी जुगार खेळता येणारी स्लॉट मशिन्स ग्रेहाऊंड स्टेशनवर होती. तसेच स्टेशनच्या जवळपास अनेक कॅसिनोज्च्या पाट्या झळकताना दिसत होत्या. प्रत्येकी २०-२५ डॉलर्सपर्यंत तिकीट पडेल असे वाटत होते. त्यामुळे इतके पैसे खर्च करावेत का नाही या संभ्रमात आम्ही पडलो होतो. स्टेशन-वरील सर्व लॉकर्स भरलेली असल्याने प्रदीप-विजयला सर्व्हे करायला पाठवून मी व रेखा सामान राखत बसलो. थोडया प्रतीक्षेनंतर काही लॉकर्स रिकामी झाली. लगेच सामानाचे लोदणे त्यांत ढकलून आम्हीही हिंडायला मोकळ्या

झालो. येवढ्यात ग्रेहाऊंड स्टेशनला लागूनच असलेल्या ‘ युनियन प्लाझा ’ हॉटेलमधील ‘ शो ’ची तिकिटे रिझर्व करून ते दोघे परत आले. हे ‘ शोज् ’ दुपारपासून मध्यरात्रीपर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे असतात. काही डिनरसकट तर काही कॉकटेलच्या साथीने. आमच्या शोचे तिकीट डिनरसकट ८.९५ डॉलर्स होते. ड्रिंक्सचे पैसे अलहिदा. त्यांचे ठराविक जेवण सोडून अन्य काही हवे असल्यास जादा पैसे. हा शो संध्याकाळी सात वाजता होता. मधल्या वेळात मेन रोडवरील बरेचसे कॅसिनोज् पालथे घातले.

अगदी चक्रावून जायला होत होते. झगमगते, चकमकते, भडक डेकोरेशन केलेले मोठमोठे हॉल्स. त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे ग्लॅम्बलींग गेम्स. काही पत्ते खेळण्यात दंग; तर काही भलेमोठे लकी चक्र फिरवून स्वतःचे भाग्य शोधण्यात मश्गुल. तर आणखी कोणी पत्त्याच्या ३ पानी ( हा प्रकार फारच पॉप्युलर दिसला ) खेळात रंगून गेलेले. सुंदर, खास शिक्षण दिलेल्या वेट्रेसेस् त्यांची सरबराई करण्यात व्यग्र होत्या.

स्लॉट मशिन्सबद्दल तर विचारूच नका. एकेका हॉलमध्ये ठासून भरलेली ही मशिन्स काही नशिबवान लोकांना पैशाचा धो धो पाऊस पाडत होती पण बहुसंख्य लोकांचे पैसे गट्टम करूनच. बरेच ठिकाणी गिऱ्हाईकाना आकर्षून घेण्यासाठी ‘ दोनदा पैसे देऊन खेळा, तिसऱ्यांदा फुकट ’, ‘ स्लॉट मशिनचा दांडू एक डॉलरमध्ये दोनदा ओढा ’, यासारख्या खास सवलतींच्या पाट्या झळकत होत्या. लाखात पैसे मिळायचे हे आमिष पाहून त्या स्लॉट मशिन्सच्या तोंडात पैसे टाकायला न कळत चुंबकासारखे पाय वळतातच. आम्हाला पाच सेंटसूच्या वर खेळायला परवडणार नव्हतं. तरीही १–२ वेळा का होईना पण एक डॉलरने खेळून लाखात डॉलर्स मिळवायचा मोह आवरता आला नाही. पाच सेंटसूचा वर्षाव अनुभवून व नंतर मिळालेले सर्व पैसे घालवून प्रत्येकी दहा डॉलर्स खर्च केल्यावर मात्र आम्ही मनाला संयम घातला. अनेक लोक ( विशेषतः वयस्कर बायका ) स्वतःचे नशीब अजमावण्यात गुंग झालेले होते. त्यांचे बाकीच्या बघ्यांकडे लक्षही नव्हते. नेहमी खेळणारे मोठमोठ्या भांड्यातून नाणी घेऊन आलेले दिसले. मोड मिळण्याची सोयही तेथे होती. हे सर्व बघताना इतके भान हरपून गेले की सात कधी वाजले ते कळलेही नाही.

प्लाझाच्या अति भव्य गॅम्बलींग सेंटरमधेच हे छान सजविलेले डुमदार थिएटर होते. आतमध्ये जेवणासाठी टेबल खुर्च्या मांडलेल्या होत्या. स्टेज मात्र थिएटरच्या मानाने लहान वाटत होते. आमच्या शेजारीच ' गोल्डन नगेट ' या लास वेगासमधील प्रसिद्ध कॅसिनोचा मालक, मालकीण व तिची मैत्रिण बसलेले होते. त्याच्याशी खूप गप्पा मारल्या. एक्स्ट्रा काहीही न घेऊन पैसे न घालविता तिकिटाबरोबर मिळाले तेवढेच जेवण घेतले. अपेक्षा होती की तोकडे कपडे घातलेल्या बायकांचा नाच पहायला मिळेल. पण स्टेजवर होता फार्सिकल ड्रामा आणि तोही एकाच सेटवर. हे पाहून सुरुवातीला थोडी निराशा झाली; पण नंतर सहज समजणारे सुंदर इंग्रजी नाटक बघायला मिळाल्याने समाधान वाटले. फार्सचा विषय होता भरदार छातीची, सौंदर्याचा ॲटमबॉम्ब असलेली बाई आणि तिची लफडी.

नाटक संपवून बाहेर पडलो तो सगळीकडे लखलखाट झाला होता. रस्तेच्या रस्ते हजारो रंगीबेरंगी दिव्यांनी झळाळत होते. शहरात आता जास्त जीवंतपणा जाणवत होता. परत एकदा मेन रोडवरून चक्कर मारली. रात्री रस्त्यावरून हिंडायला काहीही भीति वाटत नव्हती. आम्ही दमलो होतो पण स्लॉट मशिन्स मात्र तेवढ्याच जोमाने पैसे गिळत होती व क्वचित बाहेर फेकत होती. थोडे खेळलेले पण चक्क नव्यासारखे दिसणारे पत्त्याचे जोड अत्यंत स्वस्तात मिळाले. आता त्या गॅम्बलिंगच्या विश्वात पुरते गुरफटून जायला झाले होते. जुगारी अड्ड्यासंबंधीची आपल्याकडे असलेली वाईट कल्पना येथे क्षणार्धात बदलून जाते चांगले लोक विशेषतः एकएकट्या बायका बिनधास्तपणे मजा लुटताना दिसतात. आपल्या बायकांना जरा कोपऱ्यावर जायचे म्हटले तरी सोबत लागते. आमच्याकडील सर्वसामान्य बाई कंपनी नसेल तर उपाशी राहील पण एकटी हॉटेलमध्ये जाऊन काही खाणार नाही. सिनेमा-नाटकाला एकटे जाणाऱ्या बायका तर अगदी विरळाच ! जीवनाचा आनंद एकट्यांने उपभोगू शकल्याबद्दल मला अमेरिकन बायकांचा फार हेवा वाटला.

लास वेगास बाय नाईट कधीही विसरू शकणार नाही. काळवेळ, काळज्या विसरायला लावणारे हे जग सोडायचे हा विचार अस्वस्थ करत होता. तेथून पाय निघत नव्हता; पण फार रेंगाळायच्या आतच आम्ही काढता पाय घेतला.

स्टेशनवर जाताना, घरी जायला पैसे नाहीत म्हणून एक डॉलर मागणारा चांगल्या कपड्यातील एक भिकारी तेवढा भेटला.

शेवटच्या वटकेपर्यंत स्वतःच्या व दुसऱ्याच्या नशिबाची परीक्षा पहात तृप्त मनाने पण हुरहुरत लास वेगासचा ग्रँड कॅनियनला जाण्यासाठी रात्री बारा वाजता निरोप घेतला. लास वेगासचे ग्लॅमर काही निराळेच आहे. ते अनुभवल्याशिवाय कळायचे नाही.

* * *

# ग्रँड कॅनियन

## बुधवार ४ ऑक्टोबर

काल मानवनिर्मित ऐश्वर्याचे दर्शन झाले तर आज निसर्गनिर्मित संपत्ती बघायला जायचे होते. ग्रँड कॅनियनला जाण्यासाठी 'फ्लॅगस्टाफ' ( Flagstaff-Arizona ) स्टेशनवर उतरावे लागले, कारण फक्त येथपर्यंतच ग्रेहाऊंडची बस जात होती. तेथे आम्ही सकाळी सहा वाजता पोचलो.

फ्लॅगस्टाफपासून ग्रँड कॅनियनला स्थानिक प्रेक्षणिय स्थळे दाखविणाऱ्या बसेसनी जावे लागते व त्यासाठी वेगळे तिकीट काढावे लागते. ग्रेहाऊंडचा पास असणाऱ्यांना 'ग्रेलाईन'चे तिकीट सवलतीच्या दरात ( प्रत्येकी ७ डॉलर्स ) उपलब्ध होते म्हणून आम्ही त्याचा फायदा घेतला. फ्लॅगस्टाफला मोटारी भाड्याने मिळण्याचीही सोय आहे.

ग्रँड कॅनियन व्हिलेजमध्ये ग्रेलाइनच्या बसेसचे जे टर्मिनस आहे तेथेच व्हिजीटर्स सेंटर असून येथून कॅनियनच्या नॉर्थ व साऊथ रिम्सवर जाण्यासाठी ट्रिप्स निघतात. त्याचे अर्थातच निराळे चार्जेस् द्यावे लागतात. या ट्रिप्समध्ये पैसा व वेळ घालविण्यात काहीच हशील नाही कारण तेच तेच दृष्य वेगवेगळ्या अँगल्समधून दाखवितात. सबंध कॅनियन व्हिलेजभर ट्रॅमसारख्या बसेस सतत फिरत असतात. यातून फुकटात हिंडता येते. शिवाय त्यात माहिती द्यायला ड्रायव्हर कम गाईड असतोच. या बसेसमधून बघता येणार जवळचे पॉईंटस् ग्रँड कॅनियनची कल्पना यायला पुरेसे आहेत. बसेस दर दहा-पंधरा मिनिटांनी येतच असल्याने पाहिजे तितका वेळ हव्या त्या ठिकाणी थांबता येते. या गावात कॅम्पिंगचीही सोय आहे. तसेच हॉटेल्सही आहेत; पण बरीचशी मुद्दाम जुन्या पद्धतीने ठेवलेली.

ग्रँड कॅनियन म्हणजे कोलोराडो नदीने खणलेल्या दऱ्या. या दऱ्या १·५ किलो मिटर्स खोल व २०० मिटर्स ते ३० किलो मिटर्स रुंद असून नदीच्या कडेनी त्याची लांबी मोजल्यास ती ४४३ किलोमिटर्स भरते. जर रिम्सवरून खाली दरीत असणाऱ्या डोंगराच्या टोकांची तळापासून मोजणी केली तर ती ६००

मिटर्स; किंबहुना थोडी जास्तच आहे. ग्रँड कॅनियनमध्ये झाले असेल इतके ' जिऑलॉजिकल रेकॉर्ड ' जगात कोठेही इतक्या स्पष्टपणे न्यतित झाले नसेल. ग्रँड कॅनियनच्या भिंतिमधून जिऑलॉजिक टाईमचा जो व्हयू दिसतो तो २० कोटी वर्षांपूर्वीचा इतिहास सागतो.

कॅनियनच्या रिमवरून खालती डोकावताना अक्षरशः गरगरायला होते; इतकी खोली आहे. डोंगराच्या भिंती वेगवेगळ्या डिपॉझिटस्मुळे रंगीबेरंगी दिसतात. वरून कोलोराडो नदी इतकी गोगलगाईसारखी गरीब, शांत व छोटीशी दिसते की याच नदीने एवढ्या प्रचंड दऱ्या खणल्या असाव्यात यावर विश्वासच बसत नाही. नदीच्या प्रवाहापर्यंत पायी उतरता येते वा ' म्युल ' राइडस्ही आहेत खाली उरण्यासाठी अगोदर परवानगी काढावी लागते. म्हणजे रेडिओ सेटस्च्या सहाय्याने ते लोक आपल्याशी सतत संपर्क ठेवतात; नाहीतर चुकायची शक्यता फारच दाट असते. खाली पोचायला बारा तास तर त्याच्या तिप्पट वेळ परत वर यायला लागतो खाली नदीवर झुलता पूल असून एक रेड इंडियन्सचे खेडेही आहे. कोलोराडो नदी बोटीतून पार करण्यासाठी ३ ते १८ दिवसांच्या ट्रिप्स असल्या तरीही कायमचे अत्यंत कमी तपमान ( सुमारे १० सें. ) व वेगवान अंतःगैत प्रवाह यामुळे या नदीत पोहणे केवळ अशक्यच ! जिऑलॉजिकल व जिऑग्राफीकल उत्खननासाठीही सहली असतात. येथील यावापी (Yawapai) म्युझियम मधूनही कॅनियनचा विस्तृत व्हयू दिसतो. तो बघण्यासाठी दुर्बिणीही बसविलेल्या आहेत. तसेच ग्रँडकॅनियनचा इतिहास, टूरस् वगैरे संबंधीची माहिती तेथे मिळते.

खालती उतरायला नक्कीच आवडले असते पण पुढचा सर्व कार्यक्रम बदलावा लागला असता म्हणून खूप वादविवाद करून शेवटी फ्लॅगस्टाफला परतायचा निर्णय घेतला.

फ्लॅगस्टाफ हे निसर्गाच्या कुशीत वसलेले छोटेसे, टुमदार गाव. तेथील हॉटेल्सवरील पाट्या राहणे महाग नसल्याचे दर्शवित होत्या. पण अलबुकर्की-जवळ असलेला ' स्टॅलेक्टाईट, स्टॅलेग्माईट ' हा अमेरिकेतील अजून एक नैसर्गिक चमत्कार पहावयाचा असल्याने तेथे मुक्काम न करता पुढे जायचे ठरविले. रात्री बाराला गाडी होती. तोपर्यंतचा कंटाळवाणा वेळ कसातरी ढकलून अलबुर्कीकडे कूच केले.

* * *

# अलबुर्की

### गुरुवार ५ ऑक्टोबर

पहाटेच अलबुर्कीला (न्यू मेक्सिको) पोहोचलो. स्टँडवर स्टॅलेक्टाइट, स्टॅलेग्माइट बद्दल कोणाला माहिती तर नव्हतीच पण हे शब्द देखील कधीही ऐकलेले नसावेत असे भाव मात्र त्याच्या चेहऱ्यावर दिसून आले. आश्चर्य म्हणजे तेथील प्रेक्षणीय स्थळांची माहिती देणारी पॅम्फ्लेटसही नव्हती. आता परक्या ठिकाणी वेळ कसा काढायचा असा प्रश्न निर्माण झाला म्हणून शेवटी जवळच असलेल्या हॉटेल प्लाझाचे दर (डबल रूमला १८ डॉलर्स) परवडणारे वाटल्याने तेथे मुक्काम करायचे ठरविले. हॉटेलचा मनुष्य लगेच गाडी घेऊन न्यायला आला. आणायला-पोचवायला फ्री सर्व्हिस हे त्या हॉटेलचे वैशिष्ट्य दिसले. हॉटेलमध्येही स्टॅलेक्टाइटसंबंधी चौकशी केली असता त्यांनी दुसरे दिवशी सकाळी ९ वा. रिसेप्शनिस्ट येईल त्याला विचारा असे सांगितले. दमल्यामुळे डॉ. पटवर्धनांना हे बघण्यात स्वारस्य नव्हते. पण डॉ. इंगळे यानी सांगितले असल्याने माझ्या मनातून काही केल्या ते जात नव्हते. सकाळी या स्टॅलेक्टाइटच्या केव्हज् ३०० मैल दूर असल्याचे समजले. वेळेअभावी जाऊन परत येणे अशक्यच असल्याने प्लॅनिटोरियमप्रमाणे हेही आपल्या नशिबात नाही म्हणून समजूत करून घेतली.

उशीरा उठून गावात फेरफटका मारायला गेलो. मेनरोड ग्रेहाऊंड स्टेशनसमोरूनच जात होता. तेथील दुकानात माल स्वस्त वाटल्याने खूप किरकोळ खरेदी केली. अलबुर्की गाव खूप मोठं असलं तरी खास बघण्यासारखं मात्र काही नाही. दुपारी मेक्सिकन रेस्टॉरंटमध्ये जेवलो. त्यांच्या व आपल्या चवीत खूपच साम्य आहे. मुख्य म्हणजे तिखट जेवण देतात. सर्व पदार्थ विशेषत: बारिटो–परिटो इतके आवडले की पुढे प्रत्येक ठिकाणी आम्ही मेक्सिकन रेस्टॉरंटस् शोधू लागलो. रात्री आम्ही पोचायच्या आतच हे हॉटेल बंद झाल्याने ग्रेहाऊंड स्टेशनवरील रेस्टारंटमध्ये खावे लागले.

डॉ. मेघा प्रधान (गुते) ही माझी कॉलेजपासूनची मैत्रिण. तिनेच आम्हाला स्पॉन्सर केले होते. तिला भेटण्याची जबरदस्त इच्छा असल्याने तिचे 'लास ॲनिमस' हे गाव जरी आडमार्गी असले तरी कसेही करून तिच्याकडे जावयाचे ठरविले. त्याबद्दलची माहिती विचारण्यासाठी तिला दोन फोन केले. तिच्याकडे आमच्या घरचे पत्र आल्याचे कळले म्हणून ते वाचून घेण्यासाठी ऑकवर्ड वाटत असूनही चैन पडणार नाही म्हणून विजयनी आणखी एकदा फोन केला.

एकंदर खरेदी व विश्रांती यात दिवस मजेत घालवला. हॉटेलमध्ये उगाचच मुक्काम केल्याची टोचणी मात्र लागून राहिली होती.

* * *

# कोलोराडो स्प्रिंग्ज्

## शुक्रवार ६ ऑक्टोबर

सकाळी दहा वाजता अल्बुकर्की सोडली. वाटेत एक मेक्सिकन टाईप गाव लागले. तेथील रस्ते, घरे, नवीन बांधकामे सुद्धा मातीचीच होती. अमेरिकनांच्या ऐतिहासिक आवडीची गंमत वाटली. मेक्सिकन हॉटेल्सही जुन्या पद्धतीने सजविलेली. मिरच्यांचा मोठा घड प्रत्येक हॉटेलच्या दारात टांगलेला.

संध्याकाळी पाच वाजता प्युबलोला आलो. येथून लास ॲनिमसला कॉंटीनेंटल ट्रेलवेज्‌च्या बसने जावे लागणार होते; व तो स्टँड ग्रेहाऊंडस्टेशनपासून थोड्या अंतरावर होता. प्युबलोला आमची बस फक्त पंधरा मिनिटे थांबणार होती. लगेच सामान उतरवून कॉंटीनेंटल ट्रेलवेज्‌ला माहिती विचारण्यासाठी फोन केला असता कळले की एक तासाने लास ॲनिमसला जायला बस असून तेथे पोचायला तिला दीड-दोन तास लागतील. शनिवारी डेनव्हरला ब्रुसकडे जायचेच होते त्याआधी ' कोलोराडो स्प्रिंग्ज ' बघायचे असेल तर सकाळी सहाच्या बसने आम्हाला लास ॲनिमस सोडणे भाग होते. त्यामुळे मेधाकडे जेमतेम रात्रभरच राहता आले असते. डॉ. अविनाश प्रधान इमर्जन्सी ड्यूटीवर असल्याने व मेधाचे दिवस अगदी भरत आले असल्याने ते दोघेही आम्हाला स्टेशनवर न्यायला वा पोचवायला येऊ शकणार नव्हते. शेवटी खूप सारासार विचार करून व पुढची ट्रिप नजरेसमोर ठेऊन सामान परत ग्रेहाऊंडच्या बसमध्ये ठेवले आणि कोलोराडो स्प्रिंग्ज्‌कडे प्रयाण केले.

कोलोराडो स्प्रिंग्ज्‌ला संध्याकाळी सात वाजता पोचलो. ग्रेहाऊंड स्टेशनवर चौकशी करता त्यांनी जवळपास चांगले हॉटेल नसल्याचे सांगितले. पण आता आम्हीही हुशार झालो होतो म्हणून त्याच्या सांगण्यावर विश्वास न ठेवता प्रदीप-विजय हॉटेल शोधार्थ बाहेर पडले. जवळच असलेल्या एम्बर्स मोटेलमध्ये रोजी १३·७५ डॉलर्स दरात सगळ्या सुखसोयींनी युक्त खोली मिळाली. शिवाय ब्रेक फास्ट ( २ कप कॉफी व १ डोनट ) फुकट. तेथपर्यंत अवजड सामान वाहून नेताना हाताला घट्टे पडले.

एम्बर्स मोटेलमधून शेजारीच असलेल्या 'थ्रिफ्टी रेन्ट अ-कार'ची पाटी दिसली म्हणून त्यासंबंधी हॉटेलच्या रिसेप्शनिस्टला विचारताच त्याने त्यांचा धंदा चालत नाही म्हणून बंद केल्याचे सांगितले. तरीही वरील अनुभवामुळे आम्ही तेथे प्रत्यक्ष जाऊन विचारले असता त्या रिसेप्शनिस्टने थापा मारल्याचे लक्षात आले. एम्बर्स मोटेल व थ्रिफ्टी मोटर्स यांचे संबंध चांगले नसल्याने बहुदा त्याने मुद्दाम खोटी माहिती दिली असावी.

हॉटेलमधून लगेच, न येता आल्याबद्दलची दिलगीरी व्यक्त करण्यासाठी मेघाला फोन केला तेव्हा डॉ. प्रधान वेळ काढून स्टेशनवर येऊन गेल्याचे कळले. दुसऱ्या दिवसाच्या ब्रेकफास्टला इडली-सांबाराची तयारी केल्याचे तिने सांगितले तेव्हा तर तोंडाला पाण्याची नुसती धार लागली अटोकाट प्रयत्न करूनही मेघाकडे जाता आले नाही. त्यांना उगाचच नुसती तसदी मात्र दिली म्हणून खूप वाईट वाटले.

प्रदीपचा धाकटा भाऊ राजेंद्र याचा ब्रुस हा अमेरिकन मित्र भारतात पटवर्धन कुटुंबात काही दिवस राहिला होता. "माझ्यासाठी एक शनिवार-रविवार राखून ठेवा" म्हणून त्याने प्रदीपला भारतात तारही पाठविली होती. त्याप्रमाणे उद्या येतो म्हणून प्रदीपनी त्याला आज फोन केला. तेव्हा त्याचे " शनिवारी डेनव्हरला हॉटेलात रहा व रविवारी सकाळी मला भेटा " असे उत्तर ऐकून प्रदीपचा मुड पार ऑफ झाला. आत्तापर्यंत डॉ. पटवर्धनांनी त्याला अनेकदा फोन केला होता पण दरवेळी काही तरी कारण सांगून तो भेट पुढे ढकलत होता. त्याच्याकडे जायचे म्हणून आम्ही मेघाकडेही गेलो नाही. आणि आता हा असा विक्षिप्तप्रमाणे का वागतो याचे कोडे मात्र उलगडेना. राजूचे ब्रुसशी असलेले संबंध बिघडू नयेत म्हणून डॉ. पटवर्धन काही बोलले नाहीत. डेनव्हरला मुक्काम न करताच पुढे सटकायचे ठरवून मन व पोट शांत करण्या-साठी शेजारीच असलेल्या हॉटेलमधे जेवायला गेलो. तेथे युरोपला जायचे का भारतात परतायचे यावरून मुलींच्या आठवणीने रेखाच्याही मनाचा बांध फुटला.

सानफ्रान्सिस्कोच्या हॉटेल ग्रँड सदर्नची चुकून बरोबर आलेली किल्ली विजयने स्वत:चे पैसे खर्च करून पाठवायला नकार दिला म्हणून प्रदीपने त्याला उपदेशाचे डोस पाजले होते; आणि आज चक्क पटवर्धनांच्या ओव्हरकोटच्या

खिशात त्याच्याही खोलीची किल्ली लपून बसलेली आढळली. गालातल्या गालात हसत ताबडतोब तिला पोस्ट केली. लागोपाठ आलेल्या दोन किल्ल्या बघून हॉटेल ग्रँड सदर्नची मालकीण नक्कीच चकावली असेल.

**शनिवार ७ ऑक्टोबर**

कोलोराडो स्प्रिंग्ज्‌ला अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. जे आतापर्यंत बघितले होते, त्यात वेळ न घालविता इतर न बघितलेल्या गोष्टी बघायचे ठरवले. वेळ थोडा असल्याने मोटार भाड्याने ( सबकॉम्पॅक्ट फोर्ड पिंटो, दर दिवसाचे १० डॉ. + प्रत्येक मैलास १२ सेंटस् ) घेतली.

पहिल्यांदा 'केव्ह ऑफ दि विंडस्' म्हणजे, स्टॅलेक्टाइट, स्टॅलेग्माइटच्या गुहा, ज्या बघायची इच्छा अजून पूर्ण झाली नव्हती तिकडे गेलो येथे असे कळले की, नुसते स्टॅलेक्टाइट कोठे आहेत हे विचारून त्या लोकांना कळत नाही, तर प्रत्येक ठिकाणी या गुहाना वेगवेगळी नावे असतात. अमेरिकेत अशा प्रकारच्या गुहा अनेक ठिकाणी आहेत. त्या बघायच्या असल्यास मात्र त्यांची नावे माहिती पाहिजेत. केव्ह ऑफ दि विंडसकडे जाण्याचा रस्ताही एका दरीतून (कॅनियन)जातो. त्या दरीस विलियम्स कॅनियन–दि बेबी ग्रँड ऑफ कोलोराडो असे म्हणतात. या गुहा बघण्यासाठी दर १५ मिनिटानी गाईडेड टूरस् आहेत, आणि त्यांच्याबरोबरच जावे लागते. आत गेल्यावर वाट चुकली तर काय होईल या भीतिने काटा उभा राहतो. भौगोलिक आश्चर्यांनी ही गुहा भरलेली आहे. शिवाय त्यावर प्रकाशाचे झोत टाकून ब्राइडल् चेंबरस्, व्हॅली ऑफ ड्रीम्स, मिस्टिरियस टेंपल ऑफ सायलन्स अशा प्रकारच्या विविध गोष्टी तयार करून नैसर्गिकतेला नाट्याची झलक सामान्य लोकांसाठी दिलेली आहे. त्यामुळे निसर्गाचे चमत्कार आकर्षक वाटतात. माणसाचे मनोरंजन कसे करावे हे अमेरिकन लोकांकडूनच शिकावे. आत जाताना सुरवातीसच आमच्या ग्रुपचा फोटो काढण्यात आला व टूर संपवून परत जाताना त्याच्या तयार प्रती हातात ठेवल्यासुद्धा. जवळजवळ एक मैलाचा हा गुहेतील प्रवास आहे. या गुहांचा शोध १८८० मध्ये लागला. अनेक छोटे मोठे वरून खाली लोंबकाळणारे वा खालून वर झेपावणारे कॅल्शिअमच्या डिपॉझिटस्‌चे सुळके आहेत. यातील बहुतेक सर्वांची वाढ खुंटलेली असून फक्त एकाच जागी अजूनही वाढणारे ( लाईव्ह ग्रोथ )सुळके बघण्यास मिळतात. मृत सुळके टणक व गुळगुळीत होते तर वाढणारे सुळके ठिसूळ !

एके ठिकाणी स्टॅलेक्टाइट व स्टॅलेग्माइट जोडले जाऊन मोठा खांबच तयार झाला होता. गुहेतील वस्तुसंग्रहालयात वेगवेगळ्या प्रकारचे दगड विक्रीस उपलब्ध होते. गुळगुळीत दगडावरील घड्याळे हा प्रकारही नवीनच होता.

तेथून आम्ही गार्डन ऑफ दि गॉडस् हा अजून एक नैसर्गिक चमत्कार बघण्यास गेलो. येथे सॅण्डस्टोनचे आकाशाकडे झेपवणारे, उंचच्या ऊंच, सरळसोट तांबड्या रंगाचे सुळके आहेत. या प्रदेशात पुरातन काली युटे इंडियन्स लोकांचे प्रार्थनास्थान होते. या सॅंडस्टोनच्या सुळक्यावर अनेक हौशी गिर्यारोहक कडे चढण्याचा सराव करीत होते. त्यांच्याकडे बघून आमच्या डोक्यातही धाडसाची सणक आल्याने एक कडा धडपडत का होईना पण तो चढून आलो. जवळच एक बलन्सिंग रॉक म्हणून प्रचंड ' दगड गोल ' आहे. तो इतक्या छोट्या आधारावर उभा होता की, कोणत्याही क्षणी कोसळून कपाळ मोक्ष होईल की काय असे वाटावे. तेथेच एक बोटीच्या आकाराचा ( दि शिप ) चित्तवेधक खडक आहे. एके ठिकाणी तर जिऑलॉजित शिकलेले ' शिफ्टिंग ऑफ दि रॉक'चे प्रत्यंतरही उत्तम प्रकारे आढळून आले.

वाटेत एक वॅक्स म्युझियम होते. पण कृत्रिमतेपेक्षा निसर्गाची जास्त आढ असल्याने आम्ही सेव्हन फॉल्सला जायचे ठरवले. तेथील प्रवेश फी चा जबर-दस्त आकडा, वेळेचा तुटवडा व त्यातूनही नायगारासारखा प्रचंड धबधबा अगोदर बघितल्याने काय करावे, बघावे की न बघावे असा संघर्ष मनात सुरू झाला. अखेर येथेही निसर्गाने व्यवहारावर मात केली. वनश्रीने नटलेल्या उत्तुंग डोंगराच्या रांगांमधून धबधब्याकडे जाणारा सुंदर रस्ता बघून आम्ही सेव्हन फॉल्सकडे खिशाला चाट मारून प्रयाण केले. सेव्हन फॉल्सची ब्यूटी तर काही औरच आहे. आसपासचा मोहक निसर्ग पाहून तेथेच तळ ठोकून राहावे की काय असा विचार मनात डोकावतो. पाईन वृक्षाच्या झाडीने भरलेल्या लाल डोंगराच्या रांगातून एकाखाली एक अशा सात टप्प्यात हा धबधबा कोसळतो. येथील विहंगम दृश्य बघण्यास वर जाण्यासाठी सुमारे २०० पायऱ्या आहेत. ट्रॉली बंद असल्याने आम्ही सर्व पायऱ्या चढून गेलो. येथून धबधब्याचे दुरून दर्शन होते. प्रत्यक्ष सेव्हन् फॉल्सच्या माथ्यावर जाण्यासाठी जवळजवळ २५०–३०० पायऱ्या आहेत. येथे तर ट्रॉली नाहीच. हृदयाचे ठोके मोजत आम्ही जिद्दीने वर चढून गेलो. दोन वेळा इतके उंच चढणे

म्हणजे चेष्टा नव्हती. अनायसेच 'मास्टर्स टेस्ट' झाली. वरती धबधब्याचा उगम असून तेथे हेलन हंट जॅक्सन या कवियत्रीचे थडगे आहे. ती म्हणे येथे बसून कविता करत असे. धन्य त्या कवियत्रिची; जिला वरती चढून दमल्यावरही कविता लिहिण्याची स्फूर्ति येत असे. या धबधब्याचे पाणी मात्र बर्फासारखे थंडगार होते. नायगारासारखी तुषारांची गंमत नव्हती. धबधब्याच्या पायथ्याशी असंख्य खारी असून त्यांना खायला घातले की त्या अंगाखांद्यावर खेळतात. त्यांना अन्नदान करून खेळवणे हा तेथील लोकांचा छंदच आहे. येथेसुद्धा रात्री लाईटींग असते; तसेच उन्हाळ्यात दर तासानी 'इंडियन डान्सेस' असतात.

वेळेशी झटापट करून दुपारी ३ ची गाडी पकडायची होती. येथेच एक वाजून गेला होता म्हणून घाईघाईने परत फिरलो. हॉटेलवर येऊन कार परत केली, सुस्कारा सोडला आणि स्टेशनवर जाऊन ब्रेड—सॉस खाल्ला. कोलोराडो स्प्रिंग्ज्ला एअर फोर्स ॲकॅडमी, पाईक्स् पीक, रॉयल गॉर्ज हा जगातील सर्वात उंचावरील झुलता पूल जो दरीच्या तळापासून सुमारे १०५५ फुटांवर आहे, इत्यादी गोष्टी बघण्यासारख्या आहेत. हे सर्व बघण्यासाठी कमीत कमी दोन दिवस मुक्काम करावाच लागतो. निसर्गाच्या कुशीत लपलेले हे ठिकाण आराम करण्यास फारच सुंदर वाटले. वेळ कमी पडला म्हणून हुरहुरत दुपारी ३–२० च्या बसने आम्ही डेनव्हरकडे प्रयाण केले.

* * *

# डेनव्हर ते अटलांटा

दीड-दोन तासात डेनव्हरला पोचलो. केवळ ब्रूसकडे जायचे होते म्हणून आम्ही डेनव्हरला मुक्काम करणार होतो. तेथे खास बघण्यासारखे काही नसल्याने हॉटेलमध्ये राहून पैसे वाया न घालवता आणखी एखादे गाव बघायचे ठरवले. सामान लॉकरमध्ये टाकून बाहेर पडलो. शनिवार असल्याने सर्व बंद होते. स्टेशनच्या जवळपासच फिरायचे ठरवले. डेनव्हरच्या ग्रेहाऊंडच्या स्टेशनजवळ काहीही बाजारपेठ नव्हती. नुसती ऑफिसेस. तेथेही सुट्टी असल्याने शुकशुकाटच होता. एका हॉटेलमध्ये जाऊन चहा घेतला. बसवर पैसे खर्च करायचे जीवावर आल्याने चालतच वेळ काढत होतो; पण वेळ जाता जात नव्हता. रस्त्याने दारुडे, गाजेकस बरेच दिसत होते. सर्वत्र निर्मनुष्य असल्याने गल्लीबोळातही जाण्याची भीति वाटू लागली. अंधार पडू लागला तसे खाण्यासाठी हॉटेल शक्यतो मेक्सिकन रेस्टॉरंट शोधू लागलो, पण सर्व काही बंद होते. एकीकडे ब्रूसही आला नाही व त्यातही भर म्हणून की काय सुट्टीनेही आमचा गळा कापला. जी काही एक-दोन हॉटेल्स उघडी होती त्यात फक्त बारस् होते; पिणारे लोक बघून आत पाऊल टाकायची भीति वाटावी अशी ! शेवटी एक मेक्सिकन हॉटेल हुडकण्यात यश मिळाले. त्यात एक बार होताच पण जेवणाची वेगळी रूम होती. ते हॉटेल एक बाई चालवत असल्याने आत जाण्याचे धाडस केले. सात वाजताच उदरभरण करून घ्यावे लागले कारण हे जर का बंद झाले असते तर उपवासाचे पुण्य लाभले असते. बारिटो-परिटो खाऊन झाले तरी आठच वाजले होते. अजून २-३ तास काढायचे म्हणजे दिव्यच होते. बोल्डरला ग्रेहाऊंडच्या सारख्या बसेस सुटत होत्या. तेव्हा डोक्यात आले की आपण ब्रूसकडे बोल्डरला जाऊन आलो असतो तर त्या शहराचे दर्शन झाले असते. पण आता वेळ गेली होती.

अखेर शोभाला फोन केला. त्यावेळेस तिचा आवाज ऐकून अवेळी फोन केल्याची जाणीव झाली. अमेरिकेत तीन वेळा असून त्यात २-३ तासाचा फरक आहे जेथे फोन करायचा तेथे किती वाजले असतील याचा विचार करूनच डायल फिरवावी लागते. न्यूयॉर्कहून मेघाला सकाळी

८ वा. फोन केला तेव्हा मेधा झोपली आहे असे डॉ. प्रधानांचे उत्तर ऐकण्यास मिळाल्यावर आश्चर्य वाटले होते. आताही आम्ही ॲटलांटाला येतो आहोत हे सांगण्यास शोभास रात्री १२॥ वाजता उठवले होते. आमच्या पहिल्या प्लॅनप्रमाणे आम्ही डेनव्हरहून थेट वॉशिंग्टनला जाणार होतो, पण ब्रूसने गुंगारा दिल्याने आमचे एक-दोन दिवस वाचले होते, तसेच भारतात अमेरिकेस जाऊन आलेल्या बऱ्याच जणांनी दक्षिणेकडील एक तरी गाव पहाच असे आग्रहाने सांगितले होते म्हणून आम्ही दोघांनी अटलांटा पदरात पाडून घ्यावयाचे ठरविले, तर पटवर्धन द्वयांनी डॉ. अर्चना कुलकर्णी या विजय-प्रदीपच्या वर्गमैत्रिणीकडे अलाबामात मॅाँटगोमेरीला जायचा बेत केला.

७ ऑक्टोबरला रात्री बारा वाजता डेनव्हर सोडले. आम्हाला आपापल्या स्थळी पोचायला सुमारे ४२ तास लागतील असा अंदाज आम्ही ग्रेहाऊंडचे नकाशे बघून केला होता. पण हे गणित करताना पुढची बस मिळेपर्यंतच्या वेळेचा ( waiting period ) हिशोब लक्षात घ्यायला आम्ही पूर्ण विसरलो. बस उशिरा आली म्हणून पुढची बस मिळाली नाही असे कधीही झाले नाही. सर्व प्रवासात सेंट लुईस, मेंफीस, बर्मिंगहॅम या तीन ठिकाणी गाड्या बदलताना पुढच्या बससाठी वाट पहावी लागली. तरी दरवेळी बरोबर सामान वाहून नेण्याची कटकट नसल्याने नुसतीच पेशन्सच्या कसोटीची परीक्षा झाली.

सेंट लुईसला दुसरे दिवशी रात्री ८ वा. पोचून १०-३० वाजता पुढे निघालो. रात्र असल्याने गावात भटकायला बाहेर पडलो नाही. प्रसिद्ध 'स्टेनलेस स्टील आर्क' ग्रेहाऊंड स्टेशनजवळच आहे. जाता जाता बसमधूनच ती चमकणारी प्रचंड कमान बघितली. कमानीखाली मोठी बागही होती. या कमानीवर जाऊन शहराचे दृश्य बघायची नि खाली डोकवायची सोयही बहुदा असावीच.

मेंफिस हे खूप मोठे बिझिनेस सेंटर असून तेथे आम्ही ९ तारखेला सकाळी ९ वाजता पोहोचलो. 'एल्व्हिस प्रेस्ले' या गायक नटाचे हे जन्मगाव. त्याचे राहते घर स्मारक म्हणून जतन केलेले आहे. तेथे जाण्यासाठी एका टॅक्सीवाल्याला विचारले असता त्याने दहा डॉलर्स मागितले म्हणून तिकडे जायची कल्पना सोडून देऊन स्टेशनच्या आसपास भटकत वेळ काढू लागलो.

जवळपास काहीही मिळत नव्हते. एक मोठे होलसेल मार्केट दिसल्यावर आत घुसलो तर किरकोळ खरेदी करणारे म्हणून तेथूनही आम्हाला हुसकावून दिले. पुढे जायला दुपारी ३ ला गाडी होती. आता एवढा वेळ काढायचा कसा. अतिशय वैताग आला होता. साऊथच्या दिशेने पुढे प्रवासाला जावे का थेट बॉशिंग्टन गाठावे यावर खूप विचार, वाद-विवाद केला. शोभाला व अर्चना कुलकर्णीला आम्ही येत असल्याबद्दल अनेक फोन, ते सुद्धा कलेक्ट कॉल्स केले होते म्हणून काहीही झाले तरी त्यांच्याकडे जाण्याचा निश्चय केला.

संध्याकाळी साडेसहा वाजता बर्मिंगहॅमला पोहोचलो. येथून प्रथमच आमचा व डॉ. पटवर्धनांचा प्रवास मार्ग वेगळा होणार होता. आम्हाला लगेच ७ वा. पुढची बस होती पण डॉ. पटवर्धनांना २||–३ तास पुढील बससाठी रखडावे लागणार होते. वाटेत एकदा एक तास घड्याळ मागे करावे लागले. आम्ही अटलांटाला स्थानिक वेळेप्रमाणे रात्री १२ वा. तर पटवर्धन मॅाँटगोमेरीला रात्री २|| वा. पोहोचले. म्हणजे आम्ही ५०–५२ तास बस प्रवास करण्याची जिद्द दाखविली होती.

अटलांटाला उतरल्यावर अगदी हायस वाटल. विजय देशपांडे व त्याचे शिकागोहून आलेले मित्र नारायण अथणीकर व सुभाष नाडकर्णी स्टेशनवर आम्हाला न्यायला आले होते. श्री. अथणीकर म्हणे डॉ. वैसासच्या वर्गात मराठी चौथीत होते. इतक्या वर्षांनंतरही त्यानी ओळखले. श्री. अथणीकर इंजिनिअर तर श्री. नाडकर्णी आर्किटेक्ट. नाडकर्णींना एका इंटरव्ह्यूसाठी अटलांटाला यायचे होते. त्यानिमित्ताने गाडी घेऊन दोघेही सहकुटुंब ट्रिप करायला आले होते. सर्व समवयस्क, बडबडे असल्याने गप्पा अशा काही रंगल्या की विजयने चुकून लांबच्या रस्त्याने गाडी घेऊनही शोभाचे घर कधी आले ते कळलेही नाही.

इतक्या रात्री भरपूर गप्पा मारत ड्रिंक्स सकट साग्रसंगीत जेवण केले. शँपेन मी आयुष्यात पहिल्यादा टेस्ट केली. खरोखरीच हे बायकाचे पेय. अजिबात कडू नसते. बरेच दिवसानंतर घरचे जेवण मिळाल्याने सर्व पदार्थांचा फडशा पाडला. दोन रात्री बसूनच झोपावे लागल्याने रात्री दोन वाजता मुलायम दुलईत, गुबगुबीत फोमच्या गादीवर जेव्हा अंग टाकले तेव्हा स्वर्गसुख गवसल्यासारखे वाटले.

* * *

# अटलांटा

## मंगळवार १० ऑक्टोबर

मस्तपैकी उशीरा उठून मनोसक्त आंघोळी केल्या. शिकागोची दोस्त कंपनी आली असल्याने शोभा-विजय दोघानीही रजा घेतली होती. थोडे खाऊन सर्वच जण दोन गाड्यातून दुपारी बारा वाजता बाहेर पडलो.

पहिल्यांदा सायक्लाराभा या प्रकारामध्ये 'वॉर ऑफ अटलांटा' बघितले. एका सिलेंड्रिकल, गोल हॉलमधील भिंतींवर अटलांटाच्या लढ्याची दृष्ये रंगविलेली आहेत तर तळातील जमिनीवर लढाईच्या दृष्याची मॉडेल्स केलेली आहेत. जमीन कोठे संपते नि भिंत कोठे सुरू होते याचा आजिबात पत्ता लागत नाही इतका छान थ्री डायमेन्शनल इफेक्ट या सबंध सीनला आलेला आहे. या दृष्यातील एक रेल्वे लाईन अर्धी भिंतींवर पेंट केलेली तर अर्धी जमिनीवर बनविलेली पण दोन्हीतील सांधा कोणता ते शोधायला लागत होते. तसेच तेथील एका सैनिकाचे धड भिंतींवर रंगविलेले तर पाय जमिनीवर मॉडेलच्या सहाय्याने केलेले होते हे सांगितल्यावरच कळले. धन्य त्या कारागिरांची ज्यांनी अटलांटाचे हे युद्ध मूर्तरूप केले.

त्यानंतर अटलांटामधील एक खूप ऊंच इमारत पाहिली. वास्तुशास्त्राच्या दृष्टीने तर फारच अप्रतिम होती. येथेही एक फिरते उपहारगृह होतेच. वरून शहराचे अतिशय सुंदर दर्शन झाले. मुख्य म्हणजे या इमारतीत चक्क मुफ्त प्रवेश होता.

एकूण अटलांटा फारच छान वाटले. तसे खास काही वेगळेपण जाणविले नाही. पण उत्तरेकडील शहरापेक्षा थोडी स्वस्ताई मात्र आहे. अटलांटाला फोर्ड मोटार कंपनीचे असेंब्ली युनिट आहे पण ते डेट्रॉइटला बघितले असल्याने परत वेळ घालविला नाही. तसेच येथे 'कोका कोला' कंपनीचे मुख्य ऑफिसही आहे, त्यामुळे अटलांटात कोक कधी कधी गॅलनला २० सेंटस् इतका स्वस्त मिळतो.

तेथून ' अंडरग्राऊंड अटलांटा ' बघायला गेलो. अटलांटात जेव्हा यादवी युद्ध झाले तेव्हा सर्व शहर जळून गेले. हाच भाग तेवढा बचावला असल्याने त्याला आता ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. आतमध्ये जुन्या पद्धतीची दुकाने, हॉटेल्स आहेत. प्रत्येक वस्तूची किंमत मात्र दाम दुपटीने वसूल करतात म्हणून विशेष गर्दीही दिसली नाही. आम्हीही तेथे फक्त कोक पिऊन बाहेर पडलो.

खूप हिंडून संध्याकाळी घरी परतलो. शोभाचे घर डाऊन-टाऊन पासून १०-१२ मैल दूर, एक मजली, खाली तळघर, पुढे पाठीमागे लॉन. अमेरिकेत स्वतःचे घर म्हणजे फार उठाठेवी कराव्या लागतात. आपल्या घरासमोरच्या रस्त्यावरील गवतही आपल्यालाच कापावे लागते. तसेच थंडीत बर्फ काढून रस्ता मोकळा करावा लागतो. नवरा बायको दोघेही नोकरी करत असताना या गोष्टी जमतात तरी कशा असा प्रश्न मला पडत असे. शोभा फिजिओ थेरेपिस्ट तर विजय रेस्पिरेटरी युनिट स्पेशॉलिस्ट. मुले लहान असल्याने शोभा पार्ट टाईम नोकरी करत होती. अमेरिकेत अनेक पार्टटाईम; म्हणजे रोज अर्धावेळ किंवा आठवड्यातून २ वा ३ दिवस नोकऱ्या उपलब्ध आहेत. सुट्टीच्या दिवशी काम करण्यासाठी स्पेशल इनसेंटिव्हज् असतात. प्रिया अथणीकरही लॅबोरेटरी टेक्निशियन म्हणून नोकरी करत होती. नोकरी लगेच मिळते म्हणून आपल्याकडील बी. एस्. सी. झालेल्या बऱ्याच बायका हा कोर्स करत असलेल्या दिसल्या.

रात्री डॉ. अर्चना कुलकर्णीने मॉटगोमेरीला येण्याचा फोनवर खूप आग्रह केला. पण इतके सामानाचे ओझे घेऊन परत उलट सुलट प्रवास करण्याचा कंटाळा आल्याने पुढल्यावेळी येऊ तेव्हा नक्की येण्याचे आश्वासन देऊन अटलांटालाच एक दिवस आराम करायचे ठरविले. तिने बुधवारी डॉ. पटवर्धनांसाठी रजा घेतल्यामुळे वॉशिंग्टनचे प्रयाण आम्हाला एक दिवस लांबवावे लागले.

शोभाचे घर पाहुण्यांनी भरलेले असल्याने फार मजा आली. गप्पा-टप्पांत दिवस कधी संपला ते कळलेही नाही.

## बुधवार दि. ११ ऑक्टोबर

पहाटे अथणीकर– नाडकर्णी मंडळी शिकागोला कधी निघून गेली याचा पत्ता देखील लागला नाही. एक महिन्यात पहिल्यांदाच मोकळा दिवस मिळाला. अनेक विषयावर गप्पा मारत सावकाश आवरले. शोभाने अनुपाला जिम्नॅस्टीकच्या क्लासला सोडायला जाताना आम्हाला एका शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये सोडले. ती आम्हाला परत न्यायला आली तेव्हा एक वाजून गेल्याची जाणीव झाली. अमेरिकेतील या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये एकदा शिरले की घड्याळाचे काटे इतके जोरात फिरू लागतात की बाहेर पडताना वेळ कमी पडल्याची चुटपुट निदान परदेशीयाना तरी नेहमी लागून राहते. मोठमोठी डिपार्टमेंटल स्टोअर्स नुसती नजरेखालून घालायला मला वाटते एक दिवसही पुरणार नाही. विजयनी बहुसंख्य नवरोजींप्रमाणे हिन्दुस्थानात खरेदी करायचे नाव कधी आपणहून काढलेले मला तरी आठवत नाही. पण अमेरिकेत शॉपिंगला जायचे म्हटले की स्वतःला काही खरेदी करायची नसली तरी स्वारी तय्यार. इतकी ही दुकाने मोहवून टाकतात. त्यांतून हिंडायची नशाच जडते.

दुपारी बरेच दिवसांचे साठलेले कपडे धुवून घेतले. युरोपच्या खर्चासाठी म्हणून शोभाकडून ८०० डॉलर्स घ्यायचे ठरविले. त्यासाठी बँकेत गेलो तर बँक बंद. शेवटी विजयने दुसऱ्या दिवशी आम्हाला ग्रेहाऊंड स्टेशनवर सोडायला जाताना बँकेतून पैसे काढून द्यावयाचे असे ठरले. शोभाची मुले– अनुपा, अलोक–जवळजवळ पाठोपाठचीच असल्याने सारखी भांडणे चालू होती. आई घरात असल्यामुळे तर त्यांना जास्तच चेव चढला होता. पण एरवी हीच मुले बेबी सिटिंगचे वेळी कोणाजवळही राहतात. बेबी सिटींगचे पैसेही महिन्यानी न देता रोजच्या रोज द्यावे लागतात. शोभा व तिच्या शेजारची एक अमेरिकन बाई सुट्टीच्या दिवशी मार्केटमध्ये वगैरे जावयाचे असल्यास एकमेकींच्या मुलाचे बेबी सिटिंग करतात हे ऐकून तेथेही अजून शेजारधर्म जीवंत असल्याचे जाणवले.

परत संध्याकाळी सहा वाजता विजयनी आम्हा दोघांना मनसोक्त खरेदी करायला एका दुकानात नेऊन सोडले. टेक्सास इंन्स्ट्रुमेंटस्चे डिजिटल मनगटी घड्याळ शेवटी येथे मिळाले, आणि तेही ९.९५ डॉलर्सला म्हणजे लॉस

एंजल्सपेक्षा एक डॉलरने स्वस्तच. अमेरिकेत एका ठिकाणी बघितलेली वस्तू दुसरीकडे मिळेलच असे नाही. इतकेच काय एकाच गावात दुसऱ्या दुकानातही त्याच प्रकारची वस्तू मिळत नाही. किंमतीतही फरक असतो. बारीकसारीक जेवढी आठवेल तेवढी खरेदी केली. मनालीचा फ्रॉक फक्त एक डॉलरमध्ये मिळाला. तीस डॉलर्स किरकोळीत उडाले. रात्री ९ वा. विजय देशपांडे न्यायला आले तेव्हा आम्हाला खरेदीची ही मोहिम संपवावी लागली.

न्यूयॉर्क सोडताना दोन बॅगज् घेऊन आम्ही निघालो होतो. प्रत्येक ठिकाणी थोडी थोडी म्हणता इतकी खरेदी झाली की अल्बुकर्कीला एक हॅंड बॅग विकत घेऊनही आत्ता घेतलेले नवीन सामान कोठे ठेवायचे हा प्रश्न उभा राहिला. शेवटी काही जुने कपडे शोभाकडे टाकून देऊन कसेतरी सामान बॅगात कोंबण्यात यश मिळविले. आवराआवर करत झोपायला मात्र चांगलाच उशीर झाला.

## गुरुवार १२ ऑक्टोबर

नीट प्लॅन आखला तर एका महिन्यात फ्लॉरिडाही करता येईल. फ्लॉरिडाच्या इतक्या जवळ येऊनही आम्ही तेथे गेलो नाही. कारण जवळजवळ प्रत्येक गोष्टीची पुनरावृत्ती होऊ लागली होती. तसेच आमचा पुढे युरोपलाही जायचा बेत असल्याने एकदा बघितलेल्या त्याच त्या गोष्टींवर परत पैसे खर्च करण्याचे जीवावर आले. पण आधी ठरविले असते तर मात्र तीन दिवसात फ्लॉरिडाही नक्की बघता आला असता.

दुपारी ११॥ च्या बसने वॉशिंग्टनला जायचे होते. शोभाचा निरोप घेऊन विजयबरोबर ८॥ वाजता निघालो. वाटेत बँकेतून पैसे घेतले. विजयला कॉलेजमध्ये जायचे असल्याने त्याने आम्हाला दहा वाजता ग्रेहाऊंड स्टेशनवर सोडले. गाडी वेळेवर आली. ठरल्याप्रमाणे डॉ पटवर्धनही आले. त्यांची मॉंटगोमेरीची ट्रीपही छान झाली होती. अटलांटाला आलो ते बरं झालं म्हणत वॉशिंग्टनच्या दिशेने आमचा परत सहप्रवास सुरू झाला.

* * *

# वॉशिंग्टन डी. सी.

**शुक्रवार १३ ऑक्टोबर**

आम्ही वॉशिंग्टनला शुक्रवारी पहाटे पांचच्या सुमारास पोहचू अशी अपेक्षा होती. मस्त डुलकी लागलेली असताना ३॥ वाजताच वॉशिंग्टन आल्याची जाणीव करून देण्यात आल्यावर धडफडत का होईना उतरणे भाग पडले. आमची चांगलीच दांडी उडाली. इतक्या अवेळी श्री. अशोक अभ्यंकर या डॉ. पटवर्धनांच्या ज्या नातेवाईकांकडे आम्ही उतरणार होतो त्यांना आम्हाला स्टेशनवर न्यायला येण्यासाठी कसे उठवायचे असा संभ्रम पडला म्हणून कसा तरी वेळ काढत राहिलो. वॉशिंग्टनचे ग्रेहाऊंड स्टेशन अगदीच छोटे आणि अमेरिकेच्या राजधानीला न शोभणारे आहे. रेस्ट रूम्सही तशा गचाळच होत्या. पिस्तुलधारी पोलीस अनेक व्हेगॅबॉंड लोकांना गच्चांड्या धरून स्टेशन बाहेर हुसकावत होते. ते बघून थोडीशी भीति वाटली. अनेक विषयांवर गप्पा मारून झाल्या तरीही वेळ जाता जाईना नि झोप पण येईना. शेवटी सकाळी ६ चे आधीच अभ्यंकरांना फोन केला. त्यांची वाट बघत स्टेशनबाहेर उभे असताना एक चांगल्या कपड्यातील माणूस “बसने घरी जाण्यासाठी ५० सेंट्स्” मागू लागला. भीक मागण्याचा हा अमेरिकन पॉलिश्ड् तरीका बघून चाट पडायला झाले.

अर्ध्या तासात अभ्यंकरांकडे पोहोचलो. त्यांचेही घर इतरांसारखे टुमदार होते. अमेरिकेत घरासाठी वर्षानुवर्षे थांबावे लागत नाही. थंडीमुळे बहुसंख्य घरे लाकडाचीच असतात. त्यामुळे घराचे डिझाईन निवडल्यानंतर काही महिन्यातच नवीन घर मिळू शकते. तसेच भाड्याने अथवा विकतही अनेक घरे तातडतोब उपलब्ध असतात. यामुळेच ते लोक सारखी घरे बदलताना दिसतात. स्वतंत्र बंगल्यांना तळघर असतेच. तेथे फायर प्लेस, कपडे धुण्याचे मशिन यासारख्या गोष्टी असतात. तसेच ‘L’च्या आकाराचा हॉल, त्यामध्ये एका बाजूला सिटींग व दुसऱ्या बाजूला डायनिंग आणि अर्ध्या मजल्यावरील बेडरूम्स ही बऱ्याचश्या अमेरिकन घरांची जाणवलेली आणखी दोन वैशिष्ट्ये. सबंध घरे सेंट्रली हीटेड् असतात.

श्री अशोक अभ्यंकर हे 'वंडर ब्रेड' या अमेरिकेतील प्रसिद्ध पाव तयार करण्याच्या कंपनीत मेंटेनन्स इंजिनिअर म्हणून काम करत होते. त्याचा आज साप्ताहिक सुट्टीचा दिवस असल्याने त्यांनी आम्हाला त्यांचे गाडीतून शहरातून फिरवून आणायचे ठरविले. ब्रेक फास्टला केलेल्या साबुदाणा खिचडीचा समाचार घेऊन बाहेर पडलो.

पहिल्यांदा 'व्हाईट हाऊस' हे अमेरिकेच्या प्रेसिडेंटचे निवासस्थान बघण्यासाठी लागलेल्या रांगेत उभे राहिलो तर आमच्या पुढेच साध्या कपड्यांतील पोलीस होते. हे लोक सकाळी १२ वाजता एकदा रांगेत उभे राहिले की त्यानंतर कोणालाही रांगेत उभे राहता येत नाही. बारा वाजेपर्यंत क्यूमध्ये असलेल्याना मात्र व्हाईट हाऊसमध्ये जाता येते. प्रथमग्रासे मक्षिकापातः झाल्याने थोडे निराश झालो.

व्हाईट हाऊसच्या समोरच एफ. बी. आय्. या अमेरिकेच्या अंतर्गत इंटेलिजन्सची ( Domestic intelligence ) बिल्डिंग होती. तेथे मटका लागतो का ते बघायचे ठरविले. एफ. बी. आय. चे कामकाज कसे चालते ते कोणाही सर्वसामान्य माणसाला कळावे म्हणून येथेही कण्डक्टेड टूरस् आहेत. एफ. बी. आय. चा जन्म कसा झाला, एफ. बी. आयचा आत्तापर्यंतचा इतिहास याची माहिती, अमेरिकेतील कुप्रसिद्ध गुंड, त्यांनी वापरलेली असंख्य प्रकारची पिस्तुले, हत्यारे यासारख्या वस्तूंचे प्रदर्शन, त्यांना एफ्. बी. आय. ने कसे पकडले यासंबंधीचे माहितीपट या टूरमध्ये बघायला मिळतात. तसेच फॉरेन्सिक लॅब, डाटा स्टोअरींग इत्यादींचे काम कसे चालते ते प्रत्यक्ष काचेतून दाखवितात. जॉन केनेडी, मार्टिन ल्युथर किंग याना मारलेल्या बंदुका येथे बघायला मिळाल्या. शेवटी एका ऑडिटोरियममध्ये पिस्तुल शूटिंगची प्रात्यक्षिके दाखवून या टूरची सांगता झाली. या इमारतीत व्हिजिटर्ससाठी सेपरेट सेक्शन राखून ठेवलेला होता. अमेरिकन लोक व्हिजिटर्सना सर्व खुल्लम खुल्ला बघून देण्याचे मानसिक समाधान देण्यात मात्र तरबेज. शिवाय कोठलीही गोष्ट उघडपणे नुसतीच न दाखवता मनोरंजनात्मक पद्धतीने दाखवितात. 'पेंटॅगॉन' ही लष्करी गुपितांची बिल्डिंग बघण्यासाठीही कंडक्टेड टूरस् आहेत. आम्ही मात्र ही इमारत फक्त बाहेरून बघितली.

जाता जाता अमेरिकन पार्लमेंटरी बोर्डाची इमारत व 'वॉशिंग्टन मॉन्यु-

मेंट 'चा स्तंभ बघितले. याही स्तंभाच्या वरपर्यंत लीफ्टने जाऊन शहराचे दर्शन घेता येते. अमेरिकेत अनेक वेळा वरून खाली डोकावल्याने परत एकदा तोच व्यायाम करण्याचे जीवावर आले, म्हणून तसेच पुढे सटकून 'जेफरसन मेमोरियल ' व ' लिंकन मेमोरियल ' ही दोन स्मारके बघितली. अब्राहम लिंकनचा प्रचंड मोठा पुतळा, पुढे सुंदर बाग, तळे, कारंजी आणि सभोवतालची विस्तृत हिरवळ यामुळे हे ठिकाण फारच रमणीय झाले आहे.

यानंतर प्रेसिडेंट केनेडींच्या समाधीचे दर्शन घ्यायला गेलो. ही समाधी अर्लिंग्टन नॅशनल सेमेटरी ' मध्ये असून या ठिकाणी कॅव्हलरी मेन ऑफ येस्टर इअर पासून ते अंतराळवीरापर्यंत अमेरिकेच्या इतिहासात अजरामर झालेल्या हुतात्म्यांना पुरण्यात आलेले आहे. व्हिएतनामच्या लढाईत कामी आलेल्या कोवळ्या अमेरिकन सैनिकांच्या समाध्या पाहून मन भारावून जाते. प्रे. जॉन केनेडींच्या समाधीवर सतत तेवणारी ज्योत ( eternal flame ) असून सबंध जागा सुंदर, शांत व हिरवीगार आहे. जवळच रॉबर्ट केनेडींचीही समाधी आहे. येथून अगदी अंतर्मुख होऊन बाहेर पडलो.

वॉशिंग्टनच्या देशांतर्गत एअरपोर्ट शेजारील एका रिकाम्या मैदानात थोडा वेळ जाऊन बसलो. शेजारून पोटोमॅक नदी वाहत होती. घड्याळ लावून मिनिटाला एक विमान येत वा जात होते. डोक्यावरून शंभर फूट ऊंचीवरून जाणारी ती प्रचंड विमाने बघून मानेला रग लागली; तरी खाली बघवत नव्हते. विमानात बसून इतक्या दूर आलो तरी विमानाचे आकर्षण कमी झाले नव्हते. विमान आले की आपोआप लक्ष वरती जात होतेच. विमानतळावरील विमानांची ही वर्दळ पाहताना वेळ कसा गेला ते कळले देखील नाही.

घरी परतताना वाण नाही पण गुण लागला म्हणतात तसे चक्क अभ्यंकरही रस्ता चुकले. पण त्यामुळे लांबच्या गर्द झाडीने भरलेल्या नि फॉलच्या विविध रंगांनी रंगलेल्या सुंदर रस्त्याने जायला मिळाले. वॉशिंग्टन राजधानीचे शहर असूनही भव्य नाही. रस्ते छोटे, बरेचसे दुहेरी वाहतूक असलेले. न्यूयॉर्कशी तुलना करावयाचा विचारही करवत नाही. लॉस अँजेलिसप्रमाणे येथेही गाडी-शिवाय हिंडायचे वांधे आहेत. जमिनीखालील रेल्वेचे काम चालू असलेले

काही ठिकाणी दिसले. बस सर्व्हिसही तितकीशी चांगली नसावी. एकूण या शहरामध्ये भव्यतेपेक्षा रमणीयताच जास्त जाणवले.

रात्री जवळच राहणाऱ्या डॉ. हेमंत जोगळेकर या विजयच्या आणि अभ्यंकरांच्या कौटुंबिक मित्राने आम्हा सर्वांना जेवायला बोलावले होते. त्याचे घर एक मजली, अतिशय प्रशस्त होते. मिसेस् जोगळेकरांनी स्वयंपाकाचा खासा व्हेजिटेरियन महाराष्ट्रीयन बेत केला होता. जोडीला अर्थात ड्रिंक्स होतीच. आम्ही आत्तापर्यंत ज्या भारतीयाकडे गेलो त्यापैकी बहुतेकांकडे दारुचे वेगवेगळे प्रकार ठेवलेले आढळले. म्हणजे दारुडे कोणी नाही हं ! पण हौशी जरूर ! मात्र अमेरिकेत सिगारेट न ओढण्याबद्दल इतकी भयानक जाहिरातबाजी केलेली आहे की एकेकाळी चेन स्मोकर असलेल्या आपल्या अनेक मंडळींनी सिगारेट सोडून दिलेली आढळली. गप्पा-गोष्टींच्या जल्लोशात जेवण पार पडले. अमेरिकेत वकिलाखालोखाल डॉक्टर पैसे कमावतो. १०-१५ वर्षे नोकरी केलेल्या डॉक्टरला वर्षाला साधारणतः एक लाख डॉलर्स मिळतात. मानही मिळतो तो वेगळाच. हे ऐकून विजयला इ.सी. एफ्. एम्. जी.ला न बसल्याचा पश्चात्ताप झाला. मेडिकलला ॲडमिशन मिळणे त्याचमुळे अमेरिकेतही कठीण आहे म्हणे.

अभ्यंकरांनी त्यांच्या दोन गाड्यांपैकी एक गाडी आम्हाला हिंडण्यासाठी देऊ केली; पण दुहेरी वाहतुकीचे रस्ते, अनेक ठिकाणी वेगवेगळ्या वेळांना 'नो' एण्ट्रीचे बोर्ड, आणि त्यातूनही अभ्यंकर आज रस्ता चुकलेले बघून अमेरिकेत अनेक ठिकाणी सराईतपणे ड्रायव्हिंग करूनही वॉशिंग्टनला गाडी चालवायला डॉ. पटवर्धनांनी नकार दिला. अमेरिकेत बहुतेक सर्वांकडे दोन गाड्या असतात. एक छोटी, नि दुसरी मोठी फॅमिली कार. शेवटी श्री. अरुण पाटणकर या अशोक अभ्यंकरांच्या वॉशिंग्टनमध्ये टॅक्सी चालविणाऱ्या आते भावाने आम्हाला काही स्थळे दाखवून ठराविक ठिकाणी सोडायचे आणि संध्याकाळी ऑफिसमधून परतताना अभ्यंकरांनी घेऊन यायचे असे ठरविले.

## शनिवार १४ ऑक्टोबर

आम्ही उठायच्या आतच आज अभ्यंकर कामावर गेलेले सुद्धा होते. ठरल्याप्रमाणे श्री. पाटणकर आम्हाला सकाळी १० वाजता न्यायला आले आणि त्यांनी आम्हाला व्हाईट हाऊस पाशी सोडले.

'व्हाइट हाऊस' वॉशिंग्टन शहराच्या अगदी मध्यवस्तीत असून इतक्या गर्दीच्या ठिकाणी अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष राहतो याचे मला तरी थोडे आश्चर्यच वाटले. अमेरिकेत आत्तापर्यंत आम्हाला कोठेही पासपोर्ट सुद्धा विचारला नाही. सगळीकडे मुक्त संचाराला परवानगी आहे असे निदान वाटते तरी. व्हाइट हाऊसमध्येच तेवढी संरक्षण व्यवस्थेची थोडी फार झलक बघायला मिळाली. आत जाताना पर्सेस वगैरे तपासल्या. तसेच गुप्त पोलीसही रांगातून उभे असतात म्हणे. व्हाईट हाऊस बघण्यासाठी कायमच लांबच्या लांब रांग असते. आजही त्याला अपवाद नव्हता. रांग भराभर पुढे सरकल्याने फार वेळ ताटकळावे लागले नाही. पूर्वीचे प्रेसिडेंट आणि त्यांच्या बायकांचे फोटो, तसेच प्रेसिडेंट कार्टर आणि त्यांच्या कुटुंबाच्या चालू महिन्यातील कार्यक्रमांचे फोटो कॉरिडार्समध्ये लावलेले होते. ग्रीन रूम, रेड रूम, ब्लू रूम, इस्टरुम, डिनर रूम ही सर्व एका बाजूची दालने दाखवितात. सर्वच हॉल्स भव्य आहेत. फर्निचर, गालीचे, सोफा, इ. अनेक वस्तू जुन्या राष्ट्राध्यक्षाच्या वेळेपासून जपून ठेवलेल्या आहेत. प्रेसिडेंट प्रत्यक्षात रहात असलेला व्हाईट हाऊसचा भाग मात्र व्हिजिटर्सना बंद असतो. आज दुपारी व्हाईट हाऊसचे गार्डन 'फॉल सीझन' निमित्त प्रेक्षकांसाठी खुले होते. "प्रे. कार्टर दुपारचा चहा पाहुण्याबरोबर बागेतच घेणार. तुम्ही नशिबवान असाल तर प्रेसिडेंटबरोबर बोलायला, हस्तांदोलन करायला मिळेल" यासारखी ॲडव्हरटाइझमेंट चालली होती. ही गार्डन फारच प्रेक्षणीय आहे. तेथे खूप लोकांनी झुंबड उडविली असणार; पण आम्हाला मात्र इच्छा असूनही घरी परतण्याचा प्रश्न असल्याने त्याचा विचारही करता आला नाही.

व्हाईट हाऊसमधून अर्ध्या तासातच बाहेर पडलो. नंतर पाटणकरांनी केनेडी सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस्, ट्रेझरी व कॉमर्स डिपार्टमेंटस्, प्रे. निक्सनचे सत्तांतर घडविणारी वॉटर गेट बिल्डिंग यासारखी ठिकाणे 'टॅक्सी ड्रायव्हर'च्या कॉमेंट्रीसकट दाखवून आम्हाला स्मिथसोनियन म्युझियमपाशी आणून सोडले.

'स्मिथ्सोनियन इंन्स्टिट्यूशन' हा जगातील सर्वांत मोठा म्युझियमचा समूह ( complex ) असून त्याची स्थापना १८४६ साली जेम्स स्मिथ्सन या ब्रिटिश शास्त्रज्ञाने दिलेल्या देणगीमुळे झाली. गंमत म्हणजे या शास्त्रज्ञाने

अमेरिकेला कधीही भेट दिली नाही. या समुहात १२ म्युझियम्स आणि ‘ नॅशनल झू ’ धरून ७० लाख वस्तू ( objects & specimens ) आहेत. यापैकी फक्त १ % वस्तू लोकांना बघण्यासाठी ठेवलेल्या असून उरलेल्या संशोधनासाठी वापरल्या जातात. बारापैकी अकरा म्युझियम्स वॉशिंग्टनमधे ( त्यापैकी सात वॉशिंग्टन् मॉन्यूमेंट आणि व्हाईट हाऊस यामध्ये असलेल्या ‘ The Mall ’ या रस्त्यावर आहेत. ) असून फक्त एकच म्युझिअम वॉशिंग्टन बाहेर न्यूयॉर्क शहरात आहे. या म्युझियम्समध्ये इतिहास, पुराणवस्तूशास्त्र, कला ( आर्ट ) या सारख्या विषयांवरील संग्रहालयाच्या वेगवेगळ्या इमारती असून आपल्या आवडीप्रमाणे त्यांची निवड करावी लागते. नाहीतर ही सगळी संग्रहालये बघायला मला वाटत कमीत कमी एक आठवडा तरी लागेल. आम्ही आत्तापर्यंत कोठेही न बघितलेले व पुन्हा कधी बघायचा योग न येण्याजोगे असे ‘ एअर अँड स्पेस म्युझियम ’ बघायचे ठरविले.

या म्युझियमच्या प्रवेशद्वारातच ‘ Touch the moon rock अशी पाटी लावून प्रत्यक्ष चंद्रावरून आणलेला खडक ठेवलेला होता. चंद्रावर पाय ठेवायचे नाही तरी चांद्रखडकाला हात लावायचे भाग्य लाभले. या संग्रहालयात विनामूल्य प्रवेश बघून मात्र चांगलेच आश्चर्य वाटले. वॉशिंग्टन राजधानीचे शहर असल्यामुळे की काय पण अमेरिकेत इतरत्र असणारी प्रवेश फी येथे कोठेही आढळली नाही. हे म्युझियम बघताना विमानोड्डाण व अंतराळ शास्त्रांतील तांत्रिक ( Aviation & Space Technology ) उत्क्रांतीचे समग्र दर्शन घडते. येथे १९०३ साली राईट बंधूंनी उडविलेल्या विमानापासून ते आपोलो ११ च्या कमांड मोड्युल पर्यंतच्या सर्व वस्तू मूळ स्वरूपांत बघायला मिळतात. त्याशिवाय आपोलो–सोयुझ स्पेस क्राफ्ट, स्कायलॅब, ऑरबिटल वर्कशॉप, एक्सप्लोरर–१ आणि जेमिनी–४ ची मॉडेल्स, मानवाला चंद्रावर उतरविणाऱ्या सॅटर्न–५ चे एफ–१ इंजिन यासारख्या प्रदर्शनीय वस्तूंची २४ मुख्य दालने येथे आहेत. तसेच नील आर्मस्ट्रॉंग व अल्ड्रिन ऑल्डरिच या अंतराळ वीरांनी चंद्रावर जाताना घातलेले स्पेस सूटस् आणि इतर अंतराळवीरांनी प्रत्यक्षात वापरलेल्या बूट, टूथपेस्ट, साबण या सारख्या अनेक वस्तूही येथे आढळतात. कमांड मोड्यूलची आतील गुंतागुंतीची रचना, अगणित लहान–मोठी बटणे, जेमतेम बसायला पुरेल येवढी जागा

बघून या अंतराळाच्या दिव्यातून पार पडून आलेल्याबद्दल नतमस्तक व्हायला होते. एके ठिकाणी दिवंगत प्रे. केनेडीनी स्पेस प्लॅन बद्दल १९६२ मध्ये सिनेटमध्ये केलेले ऐतिहासिक भाषण टी. व्ही. वर चालू होते तर दुसरीकडे अपोलो-११ च्या चंद्रावर उतरण्याविषयीची छोटी फिल्म दाखविली जात होती. विमानाची व बलून्सची अनेक मॉडेल्स होती. वैमानिक कलेसंबंधीची पहिल्या महायुद्धाची स्टोरी विमाने आणि इतर साधनसामुग्रीच्या सहाय्याने, तर पाच देशातील फायटर विमाने दुसऱ्या महायुद्धावरील गॅलरीमध्ये ठेवलेली होती. काय पहावे, किती पहावे असे होऊन गेले. सगळे विभाग पाहताना तंगड्या तुटायची पाळी आली. उड्डाणावरची 'Flying' म्हणून पाच मजली उंच पडद्यावरची फिल्म म्युझियममधीलच एका छोट्या थिएटरमध्ये चालू होती. फारच अप्रतिम. पन्नास फूटी पडदा बघून खरच डोळे फिरतात. थ्री डायमेन्शनल इफेक्टही इतका छान येतो की पडद्यावरील बलूनमध्ये बसून उतरलेला माणूस बघताना आपणही त्यात बसलो आहोत असा भास होतो. या फिल्मला थोडे तिकीट असले तरीही ती न चुकविता येण्याजोगी आहे.

श्री. अशोक अभ्यंकर फॅक्टरीतून घरी परतताना आम्हाला घेऊन जाणार होते. तोपर्यंत कसेबसे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत म्युझियमचे नुसते ओझरते दर्शन घेता आले. त्यामुळे स्मिथसोनियनची बाकीची म्युझियमस् बघण्याचा विचारही डोक्यात आला नाही. दुसऱ्या दिवशी उरलेल्या म्युझियम्सना भेट देण्याचे ठरवून तृप्त मनाने पण बऱ्याचशा अपूर्णतेच्या भावनेने घरी परतलो.

डिनरला मिसेस शोभा अभ्यंकरांनी कांदा, मिरची सारखे भारतीय चवींशी जुळणारे पदार्थ वापरून फारच टेस्टी पिझा बनविले होते. १९ ला निघून २० ला लंडनला येत असल्याचे श्री. धनंजय गाडगीळ यांना पत्र टाकूनच निद्रादेवीच्या आधीन झालो.

## रविवार १५ ऑक्टोबर

श्री. पाटणकर टी. व्ही. वरील फुटबॉलची मॅच पाहण्यात मग्न, श्री. अभ्यंकर कामावर, डॉ. पटवर्धनांचा वॉशिंग्टनमध्ये गाडी चालवायला नकार आणि गैरसोईच्या बसेस यामुळे स्मिथ्सोनियन इंन्स्टिटयूशनची उरलेली

म्युझियम्स बघण्याचा कार्यक्रम रहित केला. कपडे धुऊन, इस्त्री करून घेतले. दुपारी सौ. अभ्यंकर खरेदी करायला घेऊन गेल्या. रात्रीचे जेवण भारतीय बैठकीवर मांड्या ठोकून पार पाडले. सबंध दिवस जवळजवळ आरामातच घालविला. खरं म्हणजे बोस्टन ( अमेरिकेतील मोठे मेडिकल सेंटर ) आणि बाल्टीमोरला ( मिनिएचर ट्री गार्डन ) जायच्या तीव्र इच्छेला ग्रेहाऊंडचा पास उद्या संपत असल्याने आवर घालावा लागला. ग्रेहाऊंडचा प्रवास प्रत्येक-वेळी वेगळे तिकीट काढून करणे ही फारच खर्चाची बाब असल्याने बारीक सारीक बघायच्या राहिलेल्या गोष्टी परत अमेरिकेस येऊ तेव्हा बघू असे म्हणून स्वतःचीच समजूत काढून घेतली.

ज्यांना अमेरिकेत न्यूयॉर्क-वॉशिंग्टनच्या आसपासचा प्रदेशच फक्त बघणे शक्य आहे त्यांनाही यलोस्टोन पार्क, ग्रँड कॅनियन या सारख्या निसर्गनिर्मित आणि या शहरापासून खूप दूर असलेल्या गोष्टी सोडल्यास इतरांची प्रतिकृति तरी बघायला मिळते. येथून जवळच ' दि हॅपी लँड ऑफ हॅना बार्बेरा ' ही डिस्नेलँडसारखी जागा असून तेथे डॉलफीन्सचे शोज़ होतात. कोनी आयलंड येथे ' किंग्ज़ डोमिनियन ' ॲम्युझमेंट पार्कही आहे. स्टलेक्टाईट-स्टलेग्माईटच्या केव्हज़ ( क्रिस्टल केव्हज़ ) वॉशिंग्टनचे जवळ आहेत.

उद्या सकाळी विजय-प्रदीपना डॉ. हेमंत जोगळेकर याचे हॉस्पिटल बघा-यला जावयाचे होते. त्यानंतर दुपारची बस पकडण्यासाठी येवढे अवाढव्य सामान घेऊन कसे जायचे यावर बराच वेळ वादविवाद करून शेवटी मी व रेखाने टॅक्सीने सामान घेऊन स्टेशनवर जायचे धाडस करण्याचे ठरविले.

## सोमवार १६ ऑक्टोबर

विजय व प्रदीप सकाळी उठून डॉ जोगळेकराच्या बरोबर त्यांच्या हॉस्पिटलमध्ये गेले. ते दोघेही तेथून स्टेशनवर निघाले की घरी फोन करणार होते, मगच आम्ही दोघीजणी टॅक्सीने ग्रेहाऊंड स्टेशनवर सामान घेऊन जाणार होतो. पुरुषांच्या सोबती शिवाय टॅक्सीने जायचं म्हणून चांगलच टेन्शन आलं होतं. भारतामध्ये ऐकलेल्या अमेरिकेतील टॅक्सी-वाल्यानी बनविल्याच्या अनेक अतिरंजित बातम्या परतपरत आठवू लागल्याने फारच अस्वस्थ वाटत होते. टॅक्सीवाला दुसरीकडे तरी पळवून नेऊन

जाणार नाही ना ? पिस्तूल, चाकू दाखवून लुबाडणार तर नाही ना ? वगैरे कुशंका सारख्या मनात येत होत्या. वेळ जाता जात नव्हता. फोन वाजला की तो आपलाच आहे असे वाटायचे. शेवटी बऱ्याच काळाच्या प्रतीक्षेनंतर आता जेवून घ्यावे असे म्हणून जेवायला बसल्याबरोबर फोन आला. लगेच टॅक्सीला फोन केला. अर्ध्या तासात टॅक्सी येईल असे वाटले पण दहा मिनिटांतच टॅक्सी दारात येऊन उभी राहिली. गोरा ड्रायव्हर बघून अर्धा जीव भांड्यात पडला. आम्ही भराभर काहीतरी खाऊन घेतले तोपर्यंत ड्रायव्हरने सामान ठेवले पण ! श्री. पाटणकरांच्या टॅक्सी चालविण्याच्या लायसन्सचे आजच नूतनीकरण करायचे असल्याने त्याची टॅक्सी उपलब्ध नव्हती; नाहीतर काहीच प्रश्न नव्हता. थोड्याशा धुगधुगत्या अंतः-करणाने अभ्यंकर कुटुंबाचा निरोप घेतला. रस्ता तर ओळखीचा वाटत नव्हता, पण रस्त्यावर असलेली पुष्कळशी रहदारी बघून भीतिही लगेच नष्ट झाली. ग्रेहाउंड स्टेशनवर पोचल्यावर डॉ. पटवर्धन रेखाच्या हाता-तील सामान उचलायला लागले तर ड्रायव्हर त्यांना कोणीतरी परका इसम समजून सामानास हात लावू देईना. जेव्हा डॉ. जोगळेकरांनी हे त्याचे यजमान असल्याचे सांगितलं तेव्हा त्याचे समाधान झाले. इतकी पॅसेंजरची काळजी हे ड्रायव्हर लोक घेतात. सामान ठेवणे, काढणे हेही काम तेच करतात. त्यामुळे एकट्या बाईला सामान घेऊन जायची अजिबात काळजी करावी लागत नाही. या सर्व गोष्टींमुळे टॅक्सीबद्दल मनात असलेली भीति नाहीशी झाली. तेथून २॥ वाजता न्यूयॉर्ककडे प्रयाण केले.

प्रवासाचा हा आमचा अखेरचा टप्पा होता. ग्रेहाऊंडचा पास संपण्याचाही आजचा शेवटचाच दिवस होता. त्यामुळे रात्री १२ च्या आत पोहचायला पाहिजे होते न्यूयॉर्कला जाताना वाटेत फारच सुंदर ' फॉल ' बघायला मिळाला. एक महिन्यापूर्वी न्यूयॉर्क सोडले तेव्हा ते हिरवेगार दिसत होते; तर आज प्रवेश करताना रंगीबेरंगी ! निसर्गाची किमया बघून मन थक्क झाले. न्यूजर्सी ते न्यूयॉर्क समुद्राखालील बोगद्यातून बस आली. या प्रकारचा न्यूयॉर्कजवळील बोगदा ' चिझपेक बे ' बघायला जायचे असा आम्ही भारतात बेत केला होता पण वेळेअभावी तो राहिला होता. ती अपूर्णता हा बोगदा बघून पूर्ण झाली. एकदा आत शिरलं की लांबच लांब रस्ता. वरती

पाणी आहे ही नुसती कल्पनाच करावी लागते. काहीच दिसत नाही, ऐकू येत नाही. एवढा मोठा बोगदा खणणाऱ्या मानवी मेंदूचे मात्र कौतुकमिश्रित आश्चर्य वाटले.

संध्याकाळी ७ च्या सुमारास न्यूयॉर्क मधील ग्रेहाऊंड टर्मिनस ' पोर्ट ॲथोरिटीवर ' येऊन पोचलो. येथे बारीक बारीक पाऊस पडत होता. याच बिल्डिंगमध्ये असलेल्या अंडरग्राऊंड रेल्वेने हरीषच्या घराच्या जवळात जवळचे स्टेशन ' हॅमस्टेड ' येथे कसे जायचे हे त्याने आम्हाला निघतानाच सांगितले होते. सामान वाहून नेण्याचा हा शेवटचा टप्पा होता. इतकं प्रचंड, अवजड सामान मोडलेल्या बॅगांतून प्लॅटफॉर्मपर्यंत घेऊन जाणे म्हणजे एक कसरतच होती. अंतरही बरेच होते. वाटेत फिरते जिने, चढ, उतार, सर्वकाही होते मुख्य म्हणजे फक्त एक मिनिट लोकल थांबणार होती. इतक्या थोड्या वेळात ॲटोमॅटीक दरवाजात न सापडता सर्व सामानासहित आत घुसण्यात खरी कसोटी होती. सामान नेता नेता अक्षरशः नाकी दम आला. सर्व सामान भिरकावून देऊन पळत जाऊन लोकल पकडावीशी वाटली; पण अखेरचे कष्ट म्हणून समजूत करून घेत, अनेक ठिकाणी हात दुखल्याने टप्पे घेत घेत; २-३ फेऱ्या करून प्लॅटफॉर्मवर पोचलो. एका माणसाच्या मदतीने लवाजम्यासकट आत येऊन बसलो. हॅमस्टेड (क्वीन्स) हा लोकलचा शेवटचा स्टॉप असल्याने उतरताना फारशी धावपळ करावी लागली नाही. हरीषला फोन करून त्याची रस्त्यावर येऊन वाट पहात थांबलो. हरीषला बघितल्यावर ब्रेव्हो म्हणून विजयी प्रवासाची सांगता केली. जाताना हरीष म्हणत होता हे तुमचं सामान जरा जास्त आहे. दोन ऐवजी तुम्ही एकच बॅग घ्या. पण आताची सामानातील वृद्धी पाहून हे एवढे मोठे सामान गाडीतून घरापर्यंत कसे न्यायचे हा प्रश्न त्याला पडला.

घरी पोचल्यावर ट्रिपमधील अनुभवाच्या गप्पा मारत, घरून आलेली पत्रे वाचत, पुढचे युरोपचे प्लॅन करत, कधी झोप लागली ते समजले देखील नाही.

* * *

# ग्रेहाउंड

ग्रेहाउंड म्हणजे ग्रेहाउंडच ! आपल्या एस्. टी. विषयीची कल्पना मनात ठेऊन जेव्हा आम्ही प्रथम ग्रेहाउंडच्या बसमध्ये पाउल ठेवलं तेव्हा " युवर ड्रायव्हर मि. .. इज सेफ, रिलायेबल, कॉर्टिअस " अशी ड्रायव्हरच्या नावाची पाटी बघून येथे सौजन्य सप्ताह तर चालू नाही ना अशी शंका आली. दारात तिकिट फाडायला, त्याआधी सामान ताब्यात घेऊन बसच्या तळात असलेल्या कप्प्यात ठेवण्यास ड्रायव्हरच होता. येथे कंडक्टर नावाची चीजच आढळत नाही. सर्व कामे ड्रायव्हरच करतो प्रवासास सुरवात करण्यापूर्वी दारु प्यायला परवानगी नाही; सिगारेटस् फक्त शेवटच्या दोन रांगातच ओढता येतील; बस कोठे कोठे थांबणार वगैरे निवेदने ड्रायव्हर करतो. दरवेळी बस सुरू करण्यापूर्वी हे निवेदन करण्याचे काम ड्रायव्हर लोक कटाक्षाने पाळतात. प्रत्येक वेळी बसमधून उतरताना ड्रायव्हर बाईला ( तिचे वय कितीही असो ) हात देणारच. बायकांना ते लोक देत असलेला मान पाहून फारच बरे वाटले.

बसमधील खुर्च्या रिकलाईनिंग असतात. पण पाठ फार उंच असल्याने ( ॲव्हरेज अमेरिकनाच्या मोजमापाने केलेली असावी ) मान ठेवायच्या जागेपर्यंत मान पोहचू शकत नसल्याने कधी कधी मानेला रग लागे. बसमध्ये संडास बघून ( याला अमेरिकेत डब्ल्यु. सी., कम्फर्ट, रेस्ट रूम, इ. म्हणतात ) तर दोन फूट उडायला झालं. स्वच्छ बाथरुम्स नसणं ही आपल्याकडील एस. टी. प्रवासाची मुख्य गैरसोय. बसमध्ये रेस्ट-रूम आहे या कल्पनेनेच तेथे विशेष कधी जायला लागत नसे. ग्रेहाउंडची बस वातानुकुलीत असून १०० मैलाच्या वेगाने जाते, पण आतमध्ये वेग अजिबात जाणवत नाही. वेळेवर सुटणार, ठरल्यावेळी पोचणार हे तर आम्ही अपेक्षिलेले होतेच. पण हे लोक रिझर्वेशन शिवाय जात नसतील, मग आपल्याला दरवेळी रिझर्वेशन करण्यास जमेल का नाही वगैरे शंका होत्या. परंतु रिझर्वेशनची कटकट येथे करावीच लागत नाही. समजा, १० वाजता

बस असेल तर त्याआधी थोडा वेळ रांगेत उभं राहायचं. जागा मिळाली तर ठीक नाहीतर कोणालाही उभे राहून दाटीवाटीने जायची वा पुढच्या बससाठी तिष्ठत बसायची गरज नाही. त्याचवेळी उरलेल्या माणसांसाठी सुद्धा दुसरी बस सोडतात. आम्हाला हा अनुभव नायगऱ्याला आला. त्यावेळेस त्यांनी ५-६ लोकांसाठी दुसरी बस सोडली.

प्रत्येक बसला प्रचंड जाडीचे ६-६ टायर्स असतात. आमच्या ६-७ हजार मैलाच्या प्रवासात टायर्स पंक्चर होणे, बस बंद पडणे, वगैरे आपल्याकडे नेहमी अनुभवाव्या लागणाऱ्या गोष्टींचा एकदाही अनुभव आला नाही. याचं कारण म्हणजे ठराविक अंतरानंतर बस संपूर्ण स्वच्छ करतात त्याचवेळी इतरही गोष्टी तपासत असतील. तसेच ठराविक अंतरानंतर संपूर्ण बसच बदलतात. ड्रायव्हर तर ६-८ तासांच्या ड्यूटीनंतर बदलत असतो. इतकं करूनही वाईट घटना घडलीच तर प्रत्येक बसमध्ये रेडिओ सेट असतोच. त्या द्वारे पेट्रोलिंग युनिटशी संपर्क साधत येतो.

सामान एकदा कंपनीच्या ताब्यात दिले की मध्ये कितीही वेळा बस बदलावी लागली तरी तेच लोक सामान हालवतात. शेवटच्या स्टेशनवरच आपलं सामान आपल्या ताब्यात मिळतं. प्रथम आम्हाला आमच्या सामानाची फार काळजी वाटायची. पण जसजसा प्रवास करत गेलो तसतसे निष्काळजी होत गेलो. पुढे पुढे तर सामान लॉकर्समध्ये ठेवा वगैरे लफडे नको म्हणून आधीच सामान चेक आउट करून निर्धास्तपणे भटकू लागलो ( प्रथम बस बदलताना आमच्या बॅगा क्लोकरूममध्ये नेताना बघून आम्ही घाबरलो व बॅग्ज् ताब्यात मागू लागलो पण ते लोक तो डेस्टिनेशन पॉईंट नसल्याने देईनात. खूप चिडले. आम्हाला ते का चिडतात, डोन्ट आस्क फॉर युवर लगेज असे का म्हणतात ते कळेना. शेवटचे स्टेशन येऊन सामान ताब्यात मिळेपर्यंत ते मिळते की नाही याची खात्री नव्हती. दुसऱ्या बसमध्ये ठेवले गेले आहे वा नाही याबद्दल काळजी होती. नंतर ही आठवण येऊन व्यर्थ काळजीचं हसू येत असे ). बायकाही सामान हलवाहलवीची कुलींची कामे करताना दिसल्या. ग्रेहाउंडची स्त्री बस ड्रायव्हर मात्र दिसली नाही.

ड्रायव्हर लोक एकदम स्मार्ट, पोलाईट असतात. बहुधा हायली पेड असावेत. ग्रेहाउंडने टूरीस्ट वा म्हातारे लोकच ( विशेषतः बायका ) प्रवास करताना

दिसतात. स्थानिक लोक जवळचे अंतर मोटारीने आणि लांबचे विमानाने काटत असावेत. त्यामुळेच की काय वाटेतील प्रेक्षणीय स्थळेही काही ड्रायव्हर्स दाखवताना आढळले. सान-फ्रान्सिस्को ते लॉस एंजिलस या प्रवासात आम्हाला हा अनुभव आला.

ग्रेहाउंडचे स्टँडही बस सारखेच स्वच्छ, एअर कंडिशन्ड. भरपूर रेस्ट रूम्स. हात पुसायच्या टॉवेल्सनीही प्रदुषण होते म्हणून नॉन पोल्युटिंग हॉट एक्झॉस्ट. बटण दाबले की गरम हवेचा झोत यायचा की एका मिनिटात हात वाळून कोरडे. गरम गार पाण्याचे नळ तर चोवीस तास. रेस्ट रूम्समध्ये १० सेंटस् ( डाईम ) टाकल्यावर कुलूप उघडत असे, पण प्रत्येक ठिकाणी १-२ तरी टॉयलेटस् कुलूपाशिवाय होतीच. अमेरिकेतही लबाडीची थोडीशी झलक बघायला मिळाली. काही काही ठिकाणी पाच सेंटस् टाकून इसेन्सचा फवारा उडवून मिळण्याची सोय होती.

ग्रेहाउंड स्टेशन्सवर 'पोस्ट हाउस' सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटस् तर असतातच पण ती ठराविक वेळीच उघडी आणि ठराविक वेळी ठराविक पदार्थच मिळणारी. फक्त ब्रेकफास्टलाच उकडलेली अंडी, ऑम्लेट मिळे. तसेच आश्चर्याची गोष्ट म्हणजे कॉफीच्या पहिल्या कपाला पैसे द्या नि नंतरचे कितीही कप कॉफी फुकट प्या. जेवणात भाज्यांमध्येही पुष्कळ वेळा बीफचे तुकडे घातलेले असत. नुसता ब्रेडही मिळत नसे. केक्स, पेस्ट्री मात्र भरपूर. वेळ सहज निभावता येत असे. शाकाहारी जेवण, मांसाहारापेक्षा थोडे जास्त महाग पडत असे.

या ग्रेहाऊंड स्टेशन्सवरील व्हेंडिंग मशिन्स मात्र निष्ठावान व दिवस-रात्र सर्व्हिस देणारी. त्यांची उघडझाप सतत चालू असे. गरम व गार पदार्थांसाठी वेगळी मशिन्स. बटण दाबलं की खाडकन बाहेर येणारा पदार्थ. विशेषतः कॉफी घेताना प्रथम दार उघडून येणारा ग्लास व नंतर आपण जे बटण दाबू त्या प्रमाणात पडणारी कॉफी, साखर, दूध, इ. बघून जादू तर बघत नाही ना असा संभ्रम होई. गरममध्ये असंख्य परम्युटेशन्स-कॉम्बिनेशन्सची कॉफी व क्वचित चहा मिळे. गार पदार्थांत मात्र विविधता होती. कोका कोला, पेप्सी-कोला, रूट-बिअर, डॉ. पेपर, ऑरेंज, ग्रेप्स, वगैरेचे टिनस्, आइस्क्रिम कॅंडीज, इत्यादी. त्याचप्रमाणे ए ते झेड् वा एक ते तीस वगैरे नंबर असलेल्या

मशिन्सवर वेगवेगळ्या प्रकारचे वेफर्स, चीझ कर्लस्, बिस्किटस, चॉकोलेटस्, पीनटस्, वगैरे पदार्थ पंचवीस सेंटस्मध्ये मिळायचे. इच्छा होईल ते बटण दाबा क्षणार्धात पदार्थ हजर.

मोठ्या स्टेशन्सवर दुकाने, पैसे टाकून खेळायच्या करमणुकीच्या खेळांची यंत्रे, टी. व्ही. असत. गिफ्ट शॉप्स तर प्रत्येक स्टेशनवर. तसेच काही ठिकाणी रक्तदाब मोजायची वजन करण्याच्या यंत्रासारखी मशिन्स, ५० सेंटस्मध्ये दोन मिनिटात रंगीत फोटो हातात ठेवणारी यंत्रे, वगैरे अनेक वेळ घालविण्याची साधने होती.

तीन-तीन तास सलगपणे ड्रायव्हर्स बस चालवत. सर्व सुखसोईंमुळे ग्रेहाउंडच्या कितीही लांबचा प्रवास करून आलो तरी शिणवटा विशेष जाणवत नसे. उडलेले केस, धुळीने भरलेले कपडे नसल्याने प्रवासाहून आलेला मनुष्य अमेरिकेत ओळखताच येत नाही. जेथे ग्रेहाउंड जात नाही तेथे कॉन्टिनेन्टल ट्रेलवेज् म्हणून दुसऱ्या कंपनीच्या बसलाही ग्रेहाउंडचा पास चालतो. इतक्या सर्व सुखसोई ही एक खासगी कंपनी उपलब्ध करून देते; एवढा अवाढव्य व्याप सुरळीतपणे चालवते. छोट्या अंतराच्या प्रवासास भाडे खूप आहे. पण पास एकदम स्वस्त. सीझनप्रमाणे पासचे दर बदलतात. ऑफ सीझनला खूप सवलती असतात. तसेच राऊंड ट्रिपचा पास फार स्वस्त मिळतो. अमेरिकेत ग्रेहाउंडने प्रवास करून पेट्रोल वाचवा, एकट्याने जाऊन पेट्रोल नासू नका म्हणून जाहिरात करतात.

अशी ही आहे ग्रेहाउंड बस. हिच्यात जर का दोषच काढायचे म्हटले तर रात्री–अपरात्री केव्हाही, त्यांचे ठराविक अंतर काटून झाले की बस साफ करताना वा बदलताना खाली उतरवतात. कधी-कधी इतकी छान डुलकी लागलेली असते की अगदी चडफडत, शिव्या देत, मध्यरात्री उठावं लागतं. रेल्वेप्रमाणे बर्थस् नसल्याने आडवे पडून झोपता येत नाही. स्टेशनवर शॉवर्स नसल्याने आंघोळीस सुट्टीच घ्यावी लागते. तसेच अमेरिकनांच्या खाण्याच्या वेळाही वेगवेगळ्या असल्याने थोडी पंचाईत होते. सकाळी ६ पासून ७-७।। पर्यंत केव्हाही ब्रेकफास्टचा स्टॉप घेतात. ४५ मि. हॉल्ट असतो. इतक्या लवकर ते लोक फ्रुट ज्यूसपासून सर्व व्यवस्थित चोपतात. आपल्याला मात्र सवय नसल्याने कॉफी शिवाय काहीही नको वाटते. ९-९।। वाजता भूक

लागते तेव्हा बस थाबत नाही. १२||-१ वाजता जेमतेम अर्धा तास जेवणासाठी देतात त्यावेळेस आपल्याला भूक लागलेली असते पण लाईनीतून नंबर यायला १५ मि. लागतात. उरलेल्या वेळात त्या एकाच हॉटेलात जे असेल, ते खाऊन घाईघाईने हात धुवायला लागतात. संध्याकाळी ७ च्या सुमारास डिनर हॉल्ट घेतात. येथे मात्र भूक नसली तरी जेऊन घ्यावेच लागते. कारण नंतर मग हॉल्ट नसतो व असला तरी तेव्हा स्टेशनवरील सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटस् बंद झालेली असतात. मग व्हेंडिंग मशिनवरील पदार्थांवर भूक भागवावी लागते. कधी कधी रात्री अपरात्री कडकडून भूक लागायची त्यावेळेस चॉकलेटस् वगैरेचा आधार घ्यावा लागायचा.

ग्रेहाउंडच्या कोणत्याही स्टेशनवरती तेथून न सुटणाऱ्या बसेसचीही माहिती मिळू शकते. ग्रेहाउंडने ' अमेरी लॉजिंग ' म्हणून रहाण्याची सोयही मोठमोठ्या स्टेशन्सवर केली आहे. पण ही लॅाजेस रमदा इन, हॉवर्ड जॉन्सन, शेरेटोन सारखी असल्याने टूरिस्टच्या दृष्टीने महागच ! एकूण काय तर अशी ही बस सर्व्हिस आपल्याकडे औषधालाही सापडणार नाही. केवळ आपल्या-कडेच नाही तर मला वाटते जगात इतरत्र कोठेही. ग्रेहाउंड स्टेशनवर कायम हत्यारी पोलीस गस्त घालत असल्याने फार सुरक्षित वाटते. त्यामुळे कोणाही गुंडाची तेथे सहसा डाळ शिजत नाही. तसेच आत अतिशय उबदार वातावरण असल्याने बाहेरील थंडीचाही जाच होत नाही.

ग्रेहाउंड स्टेशन्स अत्यंत अवाढव्य असतात, विशेषतः मोठ्या शहरात. लॉस ॲंजेलिसचे स्टेशन तीन मजली आहे तर काही ठिकाणी तर अंडरग्राऊंड स्टेशन्स आहेत. एकंदरीत सर्व काही जबरदस्तच.

* * *

# आणि परत न्यूयॉर्क

## मंगळवार १७ ऑक्टोबर

सामानाचा ढिगारा पडला होता. चार बॅग्जमध्ये ४० किलोच्या आत सामान बसविण्याचे दिव्यकर्म करायचे म्हणजे एक कठीण परीक्षाच होती. हरीषच्या दोन खोल्या बाळंतीणीच्या खोलीलाही लाजवतील अशा पसरल्या होत्या. उठल्याबरोबर प्रथम आवरा-आवरीस प्रारंभ केला. बाहेरचं सर्व सामान बॅगेत बसल्याने जरी हायसं वाटलं तरी या वजनाचा खरा प्रश्न लंडन सोडतानाच भेडसावणार होता हरीषने आज सुट्टी घेतल्याने ते तिघेजण बाहेरची कामे उरकण्यासाठी गेले. त्यांनी गाडगीळांना पत्र वेळेवर पोचेल की नाही म्हणून तार केली. तसेच युरेलच्या पासेसचीही चौकशी केली. हरीषच्या घराजवळच असलेल्या व त्याच्या ऑफिसची कामे करणाऱ्या एजंटला युरेलची तिकिटे काढायला सांगितले होते. बरेच दिवस घराबाहेर काढल्याने युरोपला जावे की नाही याचा निश्चय होत नसल्याने तिकिटे कलेक्ट न करताच, बदामाची पुडकी मेवढी घेऊन ते परतले. बदाम फारच स्वस्त होते ( १ ५० डॉ. ला ३०० ग्रॅम ).

घरी आल्यावर मनसोक्त गप्पा मारत भरपेट जेवण केले. संध्याकाळी हरीषने जवळपासची पण अजून भेट न दिलेली डिपार्टमेंटल स्टोअर्स बघण्यासाठी नेले. सामान कोंबता यावे म्हणून एक हँडबॅग घ्यायची ठरविली. एका दुकानातील सेल्समनने उद्यापासून ॲडव्हरटाईज्मेंट सेल सुरू होत आहे, उद्या आलात तर आजची १५ डॉ. ची हँडबॅग उद्या १० डॉ. मिळेल, असे सांगितले. बहुदा ते लोक असे कधीही सागत नाहीत. आमचा मात्र त्याने फायदा करून दिला. विशेष खरेदी न करता दोन-तीन शॉपिंग कॉम्प्लेक्सेस् बघून घरी परतलो.

## बुधवार ११ ऑक्टोबर

सकाळी बाहेर पडल्यावर पहिल्यादा युरेलचे पास खरेदी केले आणि युरोपला जायचे का नाही या वादावर पडदा टाकला. हा १५ दिवसांचा

रेल्वेचा फर्स्टक्लासचा पास १८० डॉलर्सला ( ९० पौंडस् ) होता. नंतर तेथून बसने काल बघितलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये जाऊन चक्क १० डॉलर्सला 'ती' हँडबॅग खरेदी केली येथे सेलची ही फार गंमत असते. सेलमध्ये कोणत्याही प्रकारच्या वस्तू स्वस्त मिळतात. जाहिरातीत दाखविलेल्या किमतीलाच ती वस्तू मिळते. आपण फक्त जाहिरातीवर लक्ष ठेवावे लागते. या ठिकाणी फसवाफसवी मात्र अजिबात नसते. मुलायम दुलया पाहून विकत घ्यायची वारंवार होणारी इच्छा त्या न्यायच्या कशा हा अडचण असल्याने दाबून ठेवावी लागली. सिंथेटिक बेल बॉटम्स २-३ डॉ. ला होत्या. ली-व्हाइसच्या नेव्ही ब्ल्यू कलरच्या, रंग मुद्दाम विटविलेल्या पँटी मात्र १५-२० डॉलर्स खाली मिळत नव्हत्या. माणसाला अतिसुख मिळाले की त्याच्या आवडीनिवडी कशा बदलतात याचे हे उत्तम उदाहरण ! बारीक सारीक राहिलेली सर्व खरेदी उरकून घेतली. साड्या मात्र न मिळाल्याने वाईट वाटले. नंतर बसनेच घरी परतलो.

वाटेत हरीषच्या घराजवळील दुकानातून ब्रेड, भाजी, इ. सामान घेतले. येथे एक टोमॅटो, एक वांगे असेही मिळते. घरी आल्यावर डॉ. सुनिता येरवडेकर ( सोमण ) या माझ्या बालमैत्रिणीस फोन केला. फोनवर तिचे यजमान डॉ. सोमण भेटले, पण ती बोस्टनला कोणत्यातरी कॉनफरन्सला गेल्याने भेटू शकली नाही. मेघाप्रमाणेच सुनितालाही भेटण्याची संधी हुकली. नंतर विजयनी त्यांचा मित्र श्री. चंदू गद्रे याला फोन केला. त्यानेही त्याच्याकडे न आल्याबद्दल नाराजी दाखविली. पुन्हा अमेरिकेस आल्यावर नक्की येण्याचे आश्वासन न गेलेल्यांना दिले. अमेरिकेत येणे हे स्वप्न एकदा सत्यात उतरल्यावर परत येण्याचे स्वप्नरंजन करण्यास कोणतीच आडकाठी नव्हती. डॉ. चोभेंच्या मिसेस गुर्जना पोस्टाने पाठविलेले मंगळसूत्र मिळाल्याची खात्री करून घेण्यासाठी फोन केला. सर्वांचा निरोप घेऊन अमेरिकेतील शेवटची रात्र घालविण्यासाठी पाठ टेकली.

## गुरुवार ११ ऑक्टोबर

आज न्यूयॉर्क सोडायचे या विचाराने सकाळपासूनच हुरहूर वाटत होती. रात्री आठचे विमान होते. बैचेनीत नित्याची कामे उरकली. काही राहिले नाही याची पुनः पुनः खात्री करून घेण्यात वेळ जात होता. हरीषला रात्री

कॉलेज असल्याने तो आम्हाला विमानतळावर सोडून लवकरच परतणार होता. माणसाचे मन तरी कसे विचित्र असते. येथे आलो तेव्हा घरची आठवण होत होती; आणि आज परतण मुष्कील झाल होत. मनाली बरोबर असती तर नक्कीच अजून थोडे दिवस राहिलो असतो. स्वप्ननगरी सोडून जायचे हा विचार उदासीनतेत भर घालत होता. पाच वाजता गाडीत कसेबसे सामान बसवून हरीषच्या घराला बायबाय करून निघालो. गाडीला सामानाचे वजन चांगलेच जाणवत होते. हवा व ट्रॅफिकने कोणत्याही प्रकारचा त्रास न दिल्याने एका तासात एअरपोर्टवर पोचलो.

पॅन ॲमचा स्वतःचा वेगळा एअरपोर्ट केनेडी एअरपोर्टवर असल्याने, जे. एफ्. के. ची येताना न जाणवलेली भव्यता नजरेस पडली. एअर-इंडियाचे विमानही फुल असावे. सामानाचे चेक इन करून मग एअरपोर्टवर चक्कर मारली. प्रत्येक विमान कंपनीचा भाग म्हणजे छोटासा एअरपोर्टच ! मोठाली टॅक्स फ्री, कॉस्टली शॉप्सही होतीच. एका जागी एवढे इंडियन लोक बघून आपण भारतातच आहोत की काय असा भास होत होता. सात वाजता गहिवरलेल्या अंतःकरणाने हरीषचा निरोप घेतला. खरच हरीषने इतक्या आत्मीयतेने जर आम्हाला मदत केली नसती तर आमची ट्रिप इतकी यशस्वी नक्कीच झाली नसती. हरीष न्यूयॉर्कलाच असल्याने त्याच्याकडून बऱ्याच गोष्टी घ्याव्या लागल्या. त्यानेही सहकार्याचा इतका हात पुढे केला की आम्ही भारावून गेलो. असा स्नेही लाभायलाही भाग्य लागते म्हणतात ना !

विमानात बसायची अनाउन्समेंट झाली. सर्व फॉर्मॅलिटीज् पूर्ण करून आत जाऊन बसलो. सव्वा नऊला विमानाने उड्डाण केले. एअर इंडियाचे ३०० च्या वर सीटस असलेले हे जंबोजेट म्हणजे एक छोटेसे गावच वाटत होते. सीटस् नुसत्या कोंबल्या होत्या. दोन सीटमध्ये माणूस जेमतेम शिरू शकेल एवढीच जागा होती. माणसांचा नुसता गलबलाट चालू होता.

अखेर विमानाने जे. एफ. के. विमानतळ सोडला. पट्टे आवळून वरती जाताना खालील न्यूयॉर्क शहर फारच सुंदर दिसत होते. ॲव्हेन्यू व स्ट्रीटच्या बरोबर काटकोनात जाणाऱ्या दिव्यांच्या रांगा आगळीच शोभा आणत होत्या. सरळसोट रस्त्यावरून धावणाऱ्या मोटारींचे दिवे यात भर घालत होते. वरून दिसणारे न्यूयॉर्कचे विहंगम दृश्य डोळे भरभरून बघत असतानाच


डिनर समोर आले. छोट्या छोट्या ग्लासमधून फ्रुट ज्यूस दिला गेला. पण त्याबरोबर असलेले दही, पापड, भात, इ. पदार्थांनी युक्त असे व्हेजेटेरियन जेवण मात्र फारच चांगले होते.

न्यूयॉर्क ते लंडन हा ६ तासांचा प्रवास सतत समुद्रावरून होता. बसल्या बसल्या डिनर झाले. डिनर संपवून असलेल्या तुटपुंज्या जागेत झोपण्याचा जरा कोठे प्रयत्न करतो तोच चार तासात ब्रेक फास्ट समोर आला. जांभया देत समोर आलेला ब्रेकफास्ट संपवला व हुश्श् करतो नाही तोच लंडन आले सुद्धा. सबंध रात्रभर झोपेचा अशा रीतिने बट्ट्याबोळ झाल्याने डोळे अक्षरशः तारवटले होते.

* * *

# यूरोप

# युरोप प्रवासमार्ग



नॉर्वे
स्विडन
कोपनहेगन
हॅम्बर्ग
ॲमस्टरडॅम
ग्रेट ब्रिटन
लंडन
डव्हर
कॅले
बुलोन
बेल्जियम
प. जर्मनी
पॅरिस
म्युनिक
ऑस्ट्रिया
स्वित्झर्लंड
लेक जिनिव्हा
जिनिव्हा
मॉन्ट ब्लॉक
फ्रान्स
व्हेनिस
इटली
रोम
स्पेन

# युरोपिअन देशांचा प्रवास करण्यापूर्वी

ज्या देशांत जावयाचे नक्की ठरले आहे त्या देशाचे व्हिसा भारतातच काढून घ्यावेत. ते एजन्टतर्फे मिळतात. स्वतःला जायला लागत नाही. हे व्हिसा बहुदा तीन महिन्यासाठीच दिलेले असल्याने आपल्या प्रवासाच्या संभाव्य तारखेपर्यंत त्यांची मुदत संपत तर नाही ना हे निघायच्या आधी तपासून घ्यावे. तसेच आपल्याला जायच्या असलेल्या देशात कितीही वेळा प्रवेश करता येण्यासाठी मल्टिपल एण्ट्री व्हिसा काढावेत. युरोपिअन देशांच्या व्हिसासाठी पैसे पडत असल्याने भारतातच व्हिसा काढल्यास वेळ व अमूल्य परदेशी चलन यांची बचत होते. या व्हिसासाठीचे प्रत्येक देशाचे दर वेगवेगळे असतात.

अमेरिकेस जाताना वा येताना युरोप बघावयाचा असल्यास ( फक्त युरोपची ट्रिप करावयाची नसल्यास ) लंडनलाच ब्रेक घ्यावा म्हणजे भाषेची अडचण येत नाही. तसेच युरोपचा प्रवास सुरू करण्यापूर्वी ज्या देशांना जावयाचे नक्की ठरले आहे त्या देशाचे प्रत्येकी कमीत कमी ५ पौंडाचे चलन घेऊन ठेवावे, म्हणजे सकाळी उठल्यावर बाथरूम, चहा यासारख्या गोष्टी लगेच मिळतात नाहीतर ' ब्युरो दि चेंज ' शोधण्यातच वेळ घालवावा लागतो. चालत्या गाडीत विशेषतः याचा फारच उपयोग होतो. हे चलन मिळणारे ' ब्युरो दि चेंज ' लंडनमध्ये ठिकठिकाणी आहेत.

रोजच्या खर्चाला लागेल तेवढेच प्रत्येक देशाचे एक्स्चेंज घेणे. तसेच त्या-त्या देशाचे चलन शक्यतो त्याच देशात संपवावे, त्यातून जर चलन उरलेच तर ते नोटाच्या स्वरूपात ठेवावे. एकदा तो देश ( विशेषतः ज्यांच्या चलनाला जागतिक बाजारपेठेत किंमत नाही ) सोडला की नाण्यांमधील चलन कोठेही स्वीकारले जात नाही किंवा डॉलर्स वा पौंडात बदलून मिळत नाही.

युरोपमधील हॉटेल्स खूप महाग असल्याने रात्र गाडीत काटली जाईल असा प्रवासाचा मार्ग आखावा. युरोपिअन देश अगदी छोटे असल्याने

जवळचे ठिकाण सोडून दुसऱ्या देशातील लांबचे ठिकाण शोधावे लागते. यासाठी ' मल्टिपल एन्ट्री व्हिसा ' अगोदरच काढून ठेवावेत.

युरेलचा पास पश्चिम बर्लिनला चालत नाही. तेथे जाण्यासाठी वेगळे तिकीट काढावे लागते. तसेच बऱ्याच ठिकाणी फेरी बोटीतुन समुद्र क्रॉस करताना वेगळा आकार द्यावा लागतो.

आपल्याला उतरावयाचे ठिकाण कधी कधी सकाळी १०–११ वाजताही येते. युरेलच्या रात्रीच्या गाड्यांना ' डायनिंग कार ' नसते ( आणि असली तरी तेथील खाणे अर्थातच महाग असणार ). प्लॅटफॉर्मवरही काहीही मिळत नाही. स्टेशनवरील कॅफेटेरियापर्यंत जाऊन यायला वेळ नसतो. म्हणून किमान रात्रीचा प्रवास करताना तरी खायचे पदार्थ तसेच पिण्याचे पाणी बरोबर ठेवावे. जर्मनीसारख्या देशात पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते.

युरोपिअन देशांतील आपल्या परिचयाच्या स्टेशन्सची इंग्लिशमधील स्पेलिंग्ज्, उच्चार इ. खूप वेगळे असल्याने उदा. व्हेनिस (Venezia), जिनिवा (Geneve) नेपल्स ( Napoli ), कोपनहेगन (Kobenhavn ), फ्लोरेन्स ( Firenze ) जेथे जावयाचे आहे ते नक्की ठिकाण तेच आहे याची खात्री करून घ्यावी.

युरेलचा पास फर्स्ट क्लासचा पण फक्त बसण्याकरिता असतो. स्लिपिंग कोचसाठी वेगळे पैसे देऊन रिझर्वेशन करावे लागते. फर्स्टक्लासमध्ये रिक-लाइनिंग चेअर्स असतात. गर्दीही विशेष नसते. समोरासमोरील खुर्च्या जोडल्या की झोपण्यासाठी बेड तयार करता येतो.

कंडक्टेड टुर बरोबर युरोपचा प्रवास करावयाचा [illegible] दिवसाच्या सहली थॉमस कुक, कॉसमॉस यासारख्या कंपन्याच्या ७ ते २१ दिवसाच्या सहली निघतात. या कंपन्याची ऑफीसेस लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर आहेत.

* * *

# लंडन

## शुक्रवार २० ऑक्टोबर

लंडनचा हिथ्रो एअरपोर्ट, वाईट हवामानामुळे विमानांच्या उडण्या-उतरण्याला नेहमीच उशीर होण्याबद्दल प्रसिद्ध. पण चक्क छान सूर्यप्रकाश असल्याने आम्ही वेळेत (सकाळी ८॥ वा.) उतरलो. कस्टम्सचे सर्व सोपस्कार आटोपून गाडगीळ आले असतील की नाही या शंकेत बाहेर पडलो. तोच न्यायला आलेल्या लोकांचे गर्दीत ते एकदाचे दिसल्यावर जीव भांड्यात पडला. लंडन एअरपोर्टवर वेट्रेस, स्वीप्रेस्, यासारखी कामे इंडियन बायका करताना (एखादे वेळी त्या ब्रिटिश पासपोर्ट धारकसुद्धा असतील) बघून आपण कोठल्या विमानतळावर उतरलोत याचा संभ्रम पडतो. प्रवासाचा शीण घालवण्यासाठी विमानतळावरील एका हॉटेलमध्ये कॉफी घेतली.

श्री. धनंजय गाडगीळ इंग्लंडला जाण्यापूर्वी भारतात मेडिकल रिप्रेझेंन्टेटिव्ह म्हणून काम करत होते. विजयची व त्यांची त्यामुळेच जास्त जानपेहचान. त्यांची जागा लहान असल्याने आमच्या दोघांची त्यांनी स्वतःच्या घरी सोय केली होती तर डॉ. पटवर्धनांना त्याच्या घरी रहायला सेपरेट रूम नसल्याने आवडेल की नाही या शंकेने त्यांच्यासाठी हॉटेलमधील एक खोली रिझर्व करून ठेवली होती आम्ही जेव्हा त्यांना सांगितले की "सेपरेट बेड-रूमची भानगड ट्रिपवर नाही. जिथे कोठे राहू तेथे एकत्रच राहणार" तेव्हा आमचे हे विचार ऐकून गाडगीळ फारच खूष झाले व त्याच्या पाहुणचाराला सुरुवात झाली.

हिथ्रो एअरपोर्टच्या खालपर्यंत ट्यूब (अंडरग्राऊंड रेल्वे) आली आहे. ट्यूबपर्यंत पार करायचे अंतर खूप असले तरी सरळ धावणारे एस्केलेटर्स (जे फक्त लंडनलाच बघायला मिळाले) असल्याने चालायचे श्रम करावे लागत नाहीत. श्री. गाडगीळ 'कॅंटिश टाऊन' या लंडनच्या भागात राहात होते.

तेथे जाण्यासाठी दोनदा गाड्या बदलाव्या लागल्या. प्रत्येक वेळी भली मोठी अंतरे, एवढे अवाढव्य सामान घेऊन पार करणे केवळ गाडगीळ होते म्हणूनच शक्य झाले. दरवेळी चौकशी करण्याचा त्रासही वाचला. केंटिश टाऊन स्टेशनपासून गाडगीळांचे घर दोन मिनिटांच्या अंतरावर होते. तेथपर्यंत हाताला घट्टे पडेस्तोवर सामानाचे लेंढार वाहून त्यांच्या तिसऱ्या मजल्यावरील ब्लॉकमध्ये येऊन पोहोचलो.

मिसेस् अंजली गाडगीळ ब्रेकफास्टची तयारी करून आमचीच वाट पहात होत्या. त्याही एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये काम करतात; पण वार्षिक पंधरा दिवसांच्या रजेवर असल्याने घरी होत्या. विमानातील ब्रेक फास्टनंतर विमानतळावरील कॉफी पचतीय न पचतीय तोपर्यंत गाडगीळांच्या आग्रहास्तव पुन्हा फराळ करावा लागला. घरी येताना ' हिथ्रो ' अंडरग्राऊंड स्टेशनवरच ' Go as you please ' हा प्रत्येकी ८·३० पौंडाचा लंडनमधील ट्यूब व बसेसना चार दिवस कितीही वेळा वापरता येणारा पास काढला होता, त्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी तावडतोब भटकायला बाहेर पडायचे ठरविले. सर्वांच्या या पासेसचे पैसे गाडगीळांनीच दिले. घरी आल्यावर त्यांना देऊ लागले असताना ते घेईनात; शिवाय जेऊनच मग बाहेर पडा असेही म्हणू लागले. एवढे खाल्ल्यावर आता काय जेवणार ? त्यांचा आग्रह बघून आपण या घराला भार होणार नाही याची पुरेपूर खात्री मात्र झाली.

दोन मोठ्या रूम्स व एक छोटे किचन असा हा ब्लॉक मिसेस् गाडगीळांच्या ऑफिसतर्फे भाड्याने मिळालेला होता. अमेरिकेतील व येथील ब्लॉकमध्ये लगेच फरक जाणवला. रानड्यांचा बफेलोचा एक बेडरूमचा फ्लॅटही सेंट्रल हीटिंग, ओव्हन, फ्रीझ, डिश वॉशर इत्यादींनी भाड्याने मिळतानाच परिपूर्ण होता. मात्र गाडगीळांचे घर अगदी मध्यवर्ती ठिकाणी असल्याने ट्यूब, बस, मार्केट वगैरे सोयीस्कर गोष्टी जिना उतरल्याबरोबरच होत्या. त्यामुळे आम्हाला हिंडायचा पंचायत पडली नाही.

प्रथम बसने मादाम टुसाचे वॅक्स म्युझियम ( Madame Tussaud's, Marylebone Rd , London, NW15LR) बघायला गेलो. दारातच मादाम टुसाचा पुतळा होता. या म्युझियमची स्थापना १७७० साली पॅरिसमध्ये झाली.

१८०२ मध्ये ते इंग्लंडला आले व १८३५ मध्ये लंडनला स्थायिक झाले. इतिहासात गाजलेल्या लोकांपासून सध्या प्रकाशात असलेल्या अनेकांचे मेणाचे पुतळे येथे पाहायला मिळतात. केस व डोळे इतके खरे, तोंडावरील हावभाव, सुरकुत्या इतक्या हुबेहुब की हात लावल्यावरच हा पुतळा आहे हे कळत असे. या पुतळ्यांमध्ये ब्रिटिश राजघराण्यातील पूर्वीचे लोक, आताच्या राणी एलिझाबेथ, प्रिन्स फिलीप, प्रिन्सेस मार्गारेट इ. व्यक्ति, तसेच विन्स्टन चर्चिल, बेंजामिन फ्रँकलीन, फ्रान्समधील रॉयल फॅमिलीतील लोक, त्याचप्रमाणे जगातील केनेडी, एनक्रुमा यासारखे नावाजलेले पंतप्रधान, साहित्य-क्रीडा क्षेत्रातील पर्ल बक, व्हर्जिनिया वेड यासारख्या प्रसिद्ध व्यक्ति होत्या. आपल्याकडील फक्त म. गांधीच तेथे दिसले; आणि त्यांची उंचीही फार कमी असल्यासारखी वाटली. या म्युझियममधून हिंडताना पुढे पुढे तर खरा माणूस कोणता आणि पुतळा कोठला हे ओळखताना अक्षरशः पेचात पडायला होत होते. येथे नवीन पुतळ्यांची कायम भर पडत असते. त्यासाठीचा स्टुडिओ आणि वर्कशॉपही याच बिल्डिंगमध्ये आहेत. लंडनला आलेल्या कोणीही या म्युझियमला भेट देण्याचे विसरू नये. ख्रिसमस डे सोडून हे दररोज ( रविवारी सुद्धा ) उघडे असते. म्युझियमच्या तळघरामध्ये ‘ दि बॅटल ऑफ ट्राफल्गार ’ लाईट आणि आवाजाच्या सहाय्याने दाखविली होती; तर ‘ दि चेंबर ऑफ हॉरर ’ मध्ये ज्यांनी क्रूरपणे अनेक निष्पाप लोकांचे विष पाजून, उकळत्या तेलाचे कढयात टाकून, आंघोळीच्या टबमध्ये बुडवून, यासारख्या अघोरी पद्धतीने बळी घेतले त्या गुन्हेगारांचे प्रदर्शन केलेले होते. नेपोलियनच्या काळातील एक गिलोटीनही या ठिकाणी ठेवलेला होता. भीषण संगीताच्या साथीने हे बघताना अंगावर शहारे येतात.

याच इमारतीत प्लॅनिटोरियमही आहे. म्युझियम-प्लॅनिटोरियमचे एकत्र तिकीट थोडे स्वस्त मिळते ( प्रत्येकी १·७० पौंड ). अमेरिकेत हुलकावणी दिलेले प्लॅनिटोरियम शेवटी येथे बघायला मिळणार म्हणून उत्सुकतेने आत शिरलो, पण रात्रभर जागरण झालेले असल्याने अंधार पडताच डोळा कधी लागला ते कळलेही नाही. इच्छेपुढे निसर्गाने हात टेकून आम्हाला सुस्त झोपविले. मध्येच एकदा थोडासा उजेड झाला तेव्हा कॉमेंटेटर म्हणाला “ काळजी करू नका, शो संपला की मी तुम्हाला उठवीन ”. तेव्हा मी

आजूबाजूला बघितले तो आमच्यासारखे इतर अनेकजण डुलक्या मारताना दिसले. थोडक्यात म्हणजे प्लॅनिटोरियममध्ये नुसते बसून ( झोपून ) काहीही न बघता बाहेर पडलो.

आता झिमझिम पाऊस पडायला सुरुवात झाली होती म्हणून लंडनचे नुसते दर्शन घेत आरामात बसमधून हिंडायचे ठरविले. लंडनच्या या भर वस्तीतील रस्ते वेडेवाकडे, अरुंद, दोन्ही बाजूंनी वाहतूक असलेले आहेत. अमेरिकेत ६-८ ट्रॅक्सचे सरळच्या सरळ रस्ते बघायची सवय झाल्याने इतके छोटे रस्ते पाहून कसेसेच झाले. एवढ्याश्या रस्त्यावरून डबलडेकर बसेस हाकणारांचे मात्र कौतुक वाटत होते. बरेचसे ड्रायव्हर्स इंडियन होते. अरुंद रस्ते व खूप ट्रॅफिक असल्याने बसेस मात्र अगदी मंदगतीत जात होत्या. याउलट लंडनची ट्यूब अतिशय फास्ट. प्रत्येक स्टेशनवर आणि डब्यामध्ये मोक्याच्या ठिकाणी समजेल असा मोठाच मोठा मॅप लावलेला. शिवाय स्टेशन्सवर अनेक ठिकाणी अंडरग्राऊंडच्या सर्व लाईन्सचे मॅपस् लावलेले. न्यूयॉर्कमध्ये स्टेशनचे नावही सापडवताना मुष्कील व्हायचे. लंडनच्या ट्यूबमध्ये चुकायचे म्हटले तर चुकता यायचे नाही. सकाळी पहिल्यादा ट्यूबमध्ये बसल्याबरोबरच लंडनमध्ये कोठेही एकटीने प्रवास करू शकण्याचा मला आत्मविश्वास आला. मात्र या विश्वासाला थोडा तडा गेलाच. कॅंटिंग टाऊन स्टेशनवर तिथे पुरुष सामान वाहून नेत होते. मी व रेखा उतरावयाच्या व चढायच्या ठिकाणी सामानाचे रक्षण करत एक-एकट्या थांबलो होतो. इतक्यात एक गोरा मनुष्य रेखाजवळ असलेल्या सामानातील एक बॅग उचलून आपलीच आहे असे सहजतेने दाखवून चालायला लागला. तिने ओरडाओरड करताच बॅग टाकून पसार झाला. ब्रिटिशांच्या प्रामाणिकपणाचे धडे शाळेत वाचलेल्या आम्हाला हा चांगलाच शॉक होता. गाडगीळांच्या म्हणण्याप्रमाणे यात काहीच नवीन नव्हते. ट्यूब-मध्येही दारात ठेवलेल्या सामानापैकी एखादा डाग कोणी लंपास करू नये म्हणून सबंध प्रवासभर ते दारात सामानाजवळ का उभे होते याचे उत्तर तेव्हा मिळाले. निदान खुद्द लंडनमध्ये तरी चोऱ्या खूप वाढल्या आहेत म्हणे. रस्त्यात पर्सेसही सहजतेने हिसकावून घेतात, हे ऐकून आम्ही पर्स न घेताच घराबाहेर पडलो होतो.

ट्राफल्गार स्क्वेअरला उतरलो. येथे काळाशार दगडाचा खूप उंच विजय-स्तंभ असून त्यावर नेल्सनचा पुतळा उभा आहे. तसेच सुंदर कारंजीही आहेत. या ठिकाणी कायमच असंख्य कबुतरे असतात. अनेक लोक त्याना खायलाही घालताना दिसले. कबुतरांच्या विष्टेवर सतत पडणाऱ्या पावसाने तेथील जमीन कायम निसरडी झालेली असते. एक एक पाऊल अगदी जपून उचलावे लागत होते.

येथून टेम्स नदीच्या काठाकाठाने चालत जाऊन बी. बी. सी. रेडिओवर ज्याचे ठोके ऐकतो ते प्रसिद्ध ' बिग् बेन ' घडयाळ बघितले. खालून एवढे भव्य वाटले नाही. तेथून जवळच असलेली 'वेस्ट मिनिस्टर ॲबे' रात्र झाल्याने फक्त बाहेरूनच बघता आली. जवळच ब्रिटिश पार्लमेंटची इमारत असून पार्लमेंटचे सेशन चालू असताना कोणालाही हजर राहता येते. आता घरी कसे परतायचे हा प्रश्न आ वासून उभा राहिला. पार्लमेंटच्या दारातच बॉबी ( ब्रिटनमधील पोलीस ) उभे होते. त्यांना कँटिश टाऊनला कसे, कोणत्या बसने जायचे विचारले असता त्यांच्यातील एक गोरा पोलीस ( सर्वच पोलीस गोरे दिसले. पोलीसमध्ये बहुदा इंडियन लोक घेत नसावेत ) " मला काहीही माहित नाही " ( Simply I don't know anything ) असे म्हणाला. त्याचे हे उत्तर ऐकून आम्ही चाट झालो. बॉबी ' विषयीची मते पु. लं. ची अपूर्वाई वाचून बनविलेल्या मला हा चांगलाच शॉक होता. इंग्लंडविषयीच्या वाचिव माहितीपेक्षा अगदी उलटे अनुभव आम्हाला निदान लंडन शहरात तरी आले. उपनगराविषयी काही कल्पना नाही. व्हेंडिंग मशिन्सही येथे विशेष दिसत नाहीत, का तर म्हणे त्याची कुलपे उघडून लोक पैसे पळवितात म्हणून. घराच्या कुलपाच्या किल्ल्या हरविल्या तरी म्हणे कुलप बदलावे लागते; नाहीतर चोरीची भीति. शेवटी आमचे आम्हीच मार्गक्रमण करू लागलो. चालता चालता एकदाचे एक अंडरग्राऊंडचे स्टेशन दिसले त्यामुळे झटक्यात घरी पोहोचलो. या स्टेशन्सवरील उंचच्या उंच एस्केलेटर्स मात्र डोळे फिरवितात. जमिनीपासून इतकी खाली, अनेक वर्षांपूर्वी बांधलेली ही स्टेशन्स बघून मात्र ब्रिटिशांचे कौतुक वाटते. अमेरिकेतील अंडरग्राऊंड स्टेशन्सही इतकी खोल नाहीत.

घरी पोळ्यांसकट सर्व स्वयंपाक तयार होता. गप्पांबरोबर त्यावर तुटून पडून दिवसाची सांगता केली.

## शनिवार २१ ऑक्टोबर

आज स्वच्छ सूर्यप्रकाश पडला असल्याने ' क्यू ' गार्डनला जायचे ठरविले. बसमधून शहराचे दर्शन घेत हिंडता येते म्हणून डबलडेकरच्या वरच्या मजल्यावर जाऊन बसलो. एकदा बस बदलून डकाव डकाव करत तेथे पोचायला जेव्हा बारा वाजले तेव्हा उगाचच वेळ वाया घालविल्याबद्दल पश्चात्ताप झाला. या गार्डनमध्ये फक्त ' एक पेनी ' प्रवेश-फी बघून मजा वाटली.

क्यू गार्डन ही प्रचंड मोठी बोटॅनिकल गार्डन असून तेथे ५-६ ग्लास हाऊसेस, नर्सरीज्, हरबेरियम्स वगैरे गोष्टी आहेत. ग्लास हाऊसेसचे आत दमट वातावरण निर्माण केलेले असून, ट्रॉपिकल देशांतील वनस्पती लावलेल्या होत्या. आपल्याला मात्र त्यात विशेष नाविन्य वाटत नाही. गुलाबांचे मोठाले बगीचे आणि विस्तीर्ण हिरवळी मात्र आकर्षक होत्या. तेथील तळ्यांत बदके, राजहंस पोहत होते, तर सुंदर, रंगीबेरंगी पक्षी हिरवळीवर बागडत होते. खरोखरीच बोटॅनिकल गार्डन वाटते. पिकनिकला तर फारच सुंदर ठिकाण. याचे आवार एवढे मोठे आहे की चालून चालून पायाचे तुकडे पडायची वेळ आली. दोन तीन तासात कसेबसे बाहेर पडलो. येथून ट्यूब स्टेशनपर्यंतच्या रस्त्यावरील घरे फारच लॅव्हिश् दिसत होती.

लोकलने फटकन व्हिक्टोरियाला येऊन तेथून जवळच 'बकिंगहॅम पॅलेस' हे राणीचे निवासस्थान बघायला ( अर्थात फक्त बाहेरूनच ) चालत गेलो. राणी त्यावेळी लंडनबाहेर होती; तरीही या राजवाड्यासमोरील फुटपाथवर जरा जास्त वेळ उभे राहिल्यास लगेच पोलीस जवळ येऊन तेथे थांबण्याचे कारण विचारत होते. द्वारपाल पोलीस डोळ्याची पापणीही न हालविता पुतळ्या-सारखे राणी नसलेल्या राजवाड्याचे रक्षण करत होते. अमेरिकेत व्हाईट हाऊसही बघता येते पण येथे राजवाड्याचा काही भाग दाखविणे तर सोडाच पण बाहेर उभे राहूनही राजवाडा नीट न्याहाळता येत नाही. तसेच टी. व्ही.

वर राजघराण्यातील लोकासंबंधी कोणी डायव्हर्स घेतला, कोण प्रेगनंट आहे, कोणाला बेबी झाली यासारख्या बातम्यांना दिलेले अवास्तव महत्वही पटत नाही. येथील ' चेंज ऑफ गार्डस् ' हा सेरेमनी मात्र बघण्यासारखा असतो.

व्हिक्टोरिया स्टेशनवर परतताना बदाम, पिस्ता, चॉकोलेट, इ. प्रकारांची भल्या मोठ्या डब्यांतून ठेवलेली आईस्क्रिम्स नुसती बघून थंडी असूनही तोंडाला पाणी सुटले. खायचा मोह आवरता आला नाही. लंडनमधील आइस्क्रिम्स फारच टेस्टी !

नंतर ' टॉवर ब्रीज ' हा टेम्स नदीवरील उघड-मिट करणारा प्रसिद्ध पूल बघायला गेलो. १९०० सालच्या आधी बांधलेला हा पूल स्थापत्यशास्त्रज्ञांच्या करामतीचे कौतुक करायला लावतो. याच्या उंचीपेक्षा मोठी जहाजे आली असताना हा चक्क मध्ये उघडून जहाजांना वाट करून देतो. हे बघायचे भाग्य आम्हाला लाभले नाही. पुलावरून वाहने जाताना मात्र चांगलेच हादरे बसत होते. रात्र असल्यामुळेच की काय पण टेम्स नदी इंग्रजी साहित्यातून वर्णन केल्याइतकी आकर्षक वाटली नाही. जहाजे-होडयांच्या सतत वाहतुकीमुळे पाणीही अगदी खराब झाल्यासारखे दिसले. टेम्स नदीतून बोटीतून लंडन भोवती फेरी मारण्याची ट्रिपही असते.

घरी पोचायला चांगलाच उशीर झाला. जेवताना थोडा वेळ टी. व्ही. बघून, मस्तपैकी ताणून दिली. लंडनचा टी. व्ही. संध्याकाळीच सुरू होत असून त्याला चॅनेल्सही हाताच्या बोटावर मोजण्याएवढीच होती. अमेरिकेतील अनेक कार्यक्रम येथे पुर्नःप्रक्षेपित करतात म्हणे. बी. बी. सी. च्या जागतिक बातम्या ( वर्ल्ड न्यूज ) मात्र बघण्यालायक वाटल्या. प्रत्येक गोष्टीची अमेरिकेशी तुलना करण्याचा मोह आवरता येत नव्हता.

## रविवार २२ ऑक्टोबर

लंडनला एअर इंडियात अकाउंटन्ट असलेले गाडगीळांच्या ओळखीचे गृहस्थ ( श्री. सोवनी ) आजारी असल्याने विजय प्रदीप गाडगीळबरोबर त्यांना पहावयास गेले. त्यांना परतायला बारा वाजून गेले त्यामुळे घरा-तून बाहेर पडायला चांगलाच उशीर झाला.

पहिल्यांदा ब्रिटिश म्युझियमला भेट देण्याचे ठरवून ट्यूबने तेथे गेलो. म्युझियममध्ये आज मुफ्त प्रवेश असल्याने आमचा फायदा झाला. आत जाताना पर्सेसही तपासताना पाहून थोडी चीड आली. ममीज् बघायचे आकर्षण असल्याने प्रथम त्या विभागाकडे धाव घेतली. चार हजार वर्षांपूर्वींचे हे मृतदेह होते. सबंध शरीर कापडात गुंडाळले असल्याने बाहेर तसे काहीच दिसत नव्हते. प्रत्येक पेटीवरील माहिती वाचताना अंगावर काटा येत होता. याव्यतिरिक्त अनेक वर्षांपूर्वी हंड्यांत पुरून ठेवलेल्या एका स्त्रीच्या हाडांचा सांगाडा हातातील बांगड्यांसकट बघावयास मिळाला. रोमन, ग्रीक संस्कृतीचे अनेक अवशेष या म्युझियममध्ये पहायला मिळतात. भारतीय संस्कृतीसंबंधीचे मात्र एकही दालन आढळले नाही. ब्रिटीश म्युझियम खूप मोठे आहे; तरीही ओझरते बघून का होईना पण संपविता येते.

'लॉर्डस्' हे क्रिकेटप्रेमींना स्वर्गाप्रमाणे वाटणारे मैदान बघायची अतिशय इच्छा होती म्हणून पाऊस पडत असतानाही धावत-पळत अंधार पडायच्या आत तेथे कसेबसे जाऊन पोहोचलो. द्वाररक्षकाने आत जाता येणार नाही म्हणून अडविले. त्याला "आम्ही इतक्या लांबून केवळ हे ग्राऊंड पाहण्यासाठी आलो आहोत, आता तू नाही म्हणतोस तर आमची फार निराशा होईल." असे काकुळतीला येऊन विनविले; तेव्हा शेवटी त्याने फक्त दोन मिनिटे स्टेडियमवर जावयाची परवानगी दिली. संपूर्ण हिरवळीने भरलेले ते हिरवेगार लॉर्डस् पाहून त्याला क्रिकेटसमन्स पॅराडाईज का म्हणतात याची प्रचीति आली. आकाराने हे थोडे लहान वाटले. खरच लहान आहे का दृष्टिभ्रम होता कोण जाणे? येथून 'वेंबले' या फुटबॉलची मक्का असलेल्या ग्राऊंडवर जायची कल्पना तेथे मॅच चाललेली असल्याने सोडून द्यावी लागली.

नंतर पिकॅडली सर्कसला जायचे ठरविले. पण बस मिळून तेथे जाइपर्यंत चांगलाच अंधार पडला. त्यामुळे काहीच बघता आले नाही. पिकॅडली सर्कस येथे 'हाईड पार्क' हे मोठे मैदान असून तेथे प्रचारसभा वगैरे होतात. आतापर्यंत कोठे हॉटेल न दिसल्याने कॉफी सुद्धा पिता आली नव्हती. ऑक्सफर्ड स्ट्रीटवर अनेक हॉटेल्स होती म्हणून तेथे जाऊन एकेका हॉटेलात कॉफी पिण्यासाठी शिरू लागलो. पण आम्हाला 'फक्त' कॉफी

कोणीही देईना. काही ठिकाणी डिनर तर काही ठिकाणी प्रत्येकी कमीत कमी ५० पेन्सचे तरी बिल केले पाहिजे अशी विचित्र अट. अकरा पेन्सच्या कॉफीच्या कपासाठी एवढे पैसे खर्च करायचे जीवावर आले. व्हेंडिंग मशिन्सही कोठे नव्हती. अगदी रडायची पाळी आली. अमेरिकेत कॉफीच्या पहिल्या कपाला पैसे, नंतरचे फुकट हे आठवून परत परत अमेरिकेशी तुलना होत होती. तसेच येथे सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटस्ही विशेष नसल्याने वेटर्सना टिप द्यावी लागते ती वेगळीच. पैसे उकळण्याचा हा प्रकार पाहून मला फार चीड आली. हौशी प्रवाशाना तरी निदान या जाचक नियमातून सुटका असावी असे तीव्रतेने वाटले. एवढ्यात व्हिक्टोरिया स्टेशनपाशी 'मॅकडोनाल्डस्' हा आंतरराष्ट्रीय कुक बसलेला आहे हे आठविले. त्या दिशेने तडक बस पकडून मॅकडोनाल्डस् गाठले. त्यांनी केवळ अकरा पेन्समध्ये कॉफीची तल्लफ भागविली. सबंध युरोपभर 'मॅकडोनाल्डस्' या अमेरिकेतील प्रसिद्ध सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटच्या शाखा असून कमीत कमी पैशात या ठिकाणी स्वस्त नि मस्त खायला-प्यायला मिळते.

गाडगीळांच्या लग्नाचा आज पहिला वाढदिवस असल्याने केक शोधू लागलो. पण रविवार व त्यातून उशीर झालेला असल्याने जवळ जवळ सर्व दुकाने बंद होती. शेवटी एका दुकानात मिळालेला काहीतरी एक गोड पदार्थ घेऊन घरी परतावे लागले.

## सोमवार २३ ऑक्टोबर

युरेलचा पास इंग्लंडमध्ये चालत नसल्याने व्हिक्टोरिया स्टेशनवर जाऊन लंडन ते कॅले ( फ्रान्स ) या प्रवासाचे रेल्वे ( लंडन ते डोव्हर ) आणि बोट ( डोव्हर ते कॅले ) या दोन्हीसाठी एकत्र असे सीलिंक कंपनीचे रिटर्न तिकीट काढून ( प्रत्येकी २५ पौंड ) युरोपला जायची निश्चिती केली. तसेच फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड या देशात नक्की जावयाचे ठरले असल्याने त्या देशांचे प्रत्येकी पाच पौंडाचे चलन घेऊन ठेवले. हे चलन मिळण्यासाठी असलेले 'ब्युरो दि चेंज' लंडनमध्ये ठिकठिकाणी आहेत. तेथे डॉलर, पौंड, फ्रॅंक यासारखे आंतरराष्ट्रीय पत असलेले चलन दिले असता पाहिजे त्या देशाची करन्सी मिळू शकते.

व्हिक्टोरियाहून ऑक्सफर्ड, केंब्रिज, विंडसर पॅलेस यांपैकी एखाद्या तरी ठिकाणी जायची इच्छा होती. पण ही ठिकाणे लंडनबाहेर असल्याने तेथे लंडन ट्रान्सपोर्टचा गो ॲज यू प्लीज हा पास चालत नव्हता. तसेच युरोप बघण्यासाठी किती खर्च येईल याचाही अंदाज नव्हता म्हणून तेथे जाण्यासाठी जादा पौंडस् खर्च न करावयाचे ठरवून मनाला आवर घालणे भाग पडले.

आज पासचा शेवटचा दिवस असल्याने निदान विम्बल्डन येथील टेनिसची ग्राऊंडस् पहिल्यांदा पदरात पाडून घ्यावयाची ठरविली. विंबल्डन स्टेशनपासून बसने स्टेडियमपर्यंत जावे लागते. 'लॉर्डस्' सारखे येथेही हातापाया पडावे लागणार असे वाटत होते. तरी तसेच आत शिरलो. वॉचमनला आमची इच्छा सांगताच ताबडतोब त्याने स्वतः बरोबर येऊन मोठ्या आत्मीयतेने सेंट्रल कोर्ट दाखविले; आमच्या शंकांचे निरसन केले. सेंट्रल कोर्टच्या स्टेडियमवरील बसण्याच्या जागा वाढविण्याचे काम चालू होते. सेंट्रल कोर्ट वरती प्रत्यक्ष मॅच जरी नाही तरी रिकामे कोर्ट का होईना बघायला मिळाले म्हणून अतिशय आनंद झाला. सेंट्रल कोर्टवरील हिरवळीच्या जाडीइतकी जाड 'केक' अजूनपर्यंत कोठेही बघितला नव्हता. येथे अनेक लहान मोठी कोर्टस् असून तेथे प्राथमिक फेरीचे सामने होतात. शिवाय वर्षभर लहान मोठे सामने चालू असतात ते वेगळेच. विम्बल्डनच्या जागतिक सामन्यांची रिझर्वेशन्स ५-५ वर्षे आधी करावी लागतात. टेनिस विषयीचे येथे असलेले म्युझियम मात्र दर सोमवारी बंद असल्याने थोडी निराशा झाली.

विम्बल्डनच्या या टेनिस कोर्टसूसमोर एक भले मोठे गोल्फचे ग्राऊंड होते. हा रस्ता गर्द झाडीने भरलेला व घरेही श्रीमंती थाटाची होती. आम्ही लंडनच्या भर वस्तीत राहिल्याने की काय पण उपनगराचा हा भाग जास्त संपन्न वाटला. विम्बल्डनमध्ये टेनिस, बॅडमिंटनच्या रॅकेटस्ची बरीच दुकानेही आहेत. त्यांच्या किमतीही किंचित स्वस्त होत्या. आम्ही मात्र चॉकोलेटस्, सेंटस् या सारखी किरकोळ खरेदी करून 'ऑक्सफर्ड स्ट्रीट' या लंडनच्या सगळ्यात मोठ्या दुकानांनी गजबजलेल्या रस्त्यावर जाण्याचे ठरविले.

ऑक्सफर्ड स्ट्रीटवरून हिंडताना मुंबईच्या फोर्टची आठवण येते. रस्ता अत्यंत वाहता होता. फुटपाथवर फेरीवाले बसलेले होतेच. त्यांपैकी अनेक

"१ पौंडमध्ये ३-४ मोठ्या सेंटसच्या बाटल्या. शिवाय नेकलेस, बांगड्या यासारख्या वस्तू" असे पुकारून गर्दी जमवत होते. आम्ही अर्थात हा एक पौंड घालवायचा धोका पत्करला नाही. ऑक्सफर्ड स्ट्रीटवर अमेरिकेशी तुलना करू शकतील अशी काही डिपार्टमेंटल स्टोअर्स होती. त्यांपैकीच एक ' Marks & Spencer '. सर्वांच्याच किमती अमेरिकेच्या दुप्पट होत्या. मालाची प्रत मात्र अमेरिकेपेक्षा नक्कीच जास्त चांगली होती. आमच्या-सारख्या टूरिस्टना पैशाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा असतो. त्यामुळे आम्ही अनेक दुकानांतून नुसतेच डोकावून बाहेर पडलो. येथील सेंटस् मात्र जास्त चांगली, सुवासिक वाटली. दुकानातून प्रवेश करताना हा खुशबू मोहवून आत ओढून घेत असे. पण आतमध्ये अमेरिकेसारखा मोकळेपणा मिळत नाही. विक्रेत्या मुली आपण काही उचलत नाही ना हे बघण्यासाठी सारख मार्ग मागे करत असतात. कशालाही हात लावा, काहीही उचला हा प्रकार येथे नाही. बहुसंख्य दुकानांतून भारतासारखेच विक्रेते आढळले. मनालीला आश्वासन दिलेली ' वॉकी टॉकी ' एका अवाढव्य डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये होती पण १० पौंडस् किंमत ऐकून तेथल्या तेथे माघारी फिरलो. गाडगीळांच्या घरासमोरही अनेक दुकाने होती. तेथील किमती ऑक्सफर्ड स्ट्रीटपेक्षा जरा कमी वाटल्याने सं. ५ वा. ती बंद व्हायच्या आत पोचायचे ठरवून ऑक्सफर्ड स्ट्रीटला रामराम करून निघालो; परंतु ऑफिसेस सुटल्याने ट्रॅफिक जाममध्ये सापडलो. गाड्या ठासून भरून वाहात होत्या. रेटारेटी करून कसे तरी आत घुसलो तरीही केंटिश टाऊनला पोचेपर्यंत तेथे सर्व मामसूम झालेली. अखेर कोक पिऊन घरी परतावे लागले.

उद्या आम्हाला युरोपच्या प्रवासाला सुरुवात करावयाची होती. पॅरिसमध्ये उतरण्यासाठी श्री. जनुभाऊ करंदीकर यांना डॉ. पटवर्धनांनी पाठविलेली पत्रे मिळाली की नाही हे कळायला मार्ग नव्हता. त्यांना कालपासून अनेक वेळा फोनवर ( लंडन ते पॅरिस डायरेक्ट कॉल करता येतो ) गाठायचा प्रयत्नही असफल झाला म्हणून पॅरिसमधील भारतीय वकिलातीत असलेले आमच्या श्री. रासकर या पेशन्टचे नातेवाईक श्री. नवले यांना फोन केला, तर आठच दिवसांपूर्वी बदली होऊन ते भारतात परत गेल्याचे कळले. त्यांचा मोठा मुलगा तेथेच होता पण त्यांचा फोन, पत्ता नसल्याने काहीही

उपयोग नव्हता. अमेरिकेत जवळजवळ प्रत्येक ठिकाणी कोणी तरी उतर-ण्यासाठी होते. युरोपच्या सुरुवातीलाच नन्नाचा पाढा सुरू झाल्याने थोडे नैराश्य आले. कितीही अडचणींना तोंड देऊन युरोपला जायचा निर्धार करूनच झोपी गेलो.

* * *




ट्राफलगार स्क्वेअर, लंडन. ( पृ १३७ )



कलोसियम, रोम. ( पृ १५७ )



' माऊट ब्लाक ', आल्पस्   ( पृ. १६२ )



आर्क द ट्रायाँफ, पॅरिस   ( पृ १७९ )

# लंडन ते व्हेनिस

## मंगळवार २४ ऑक्टोबर

सकाळी १०॥ वा. लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवरून सुटणाऱ्या रेल्वेने युरोपकडे कूच करायचे होते. त्याआधी पॅरिसमधील भारतीय वकिलातीतील श्री. नवले यांचे मुलाला निरोप देता आला का हे विचारण्यासाठी फोन करण्याचा खूप वेळ प्रयत्न केला. काल संध्याकाळी दुकाने बंद झाल्याने व युरोपहून परत आल्यावर वेळ मिळेल की नाही या शंकेने गाडगीळांच्या घरासमोरील एका खेळण्याच्या दुकानातून मनालीसाठी ३ पौंडाची एक साधी बाहुली खरीदली. हे सर्व करता करता घर सोडायला ९॥ वाजून गेले.

घाईघाईने तिकीटे काढून व्हिक्टोरियाला जाण्यासाठी ट्यूबमध्ये बसलो. दोन स्टेशन्स गेल्यावर लंडन-कॅले या प्रवासाची तिकीटे आपण घेतली नसल्याचे माझ्या लक्षात आले. मी आज पर्स बदलली होती. तिकीटे नक्की कालच्या पर्समध्ये राहिली असणार म्हणून आमचे सामान डॉ. पटवर्धनांबरोबर पाठवून देऊन मी व विजय लगबगीने लगेच खाली उतरलो व परत केंटिश टाऊनला येऊन अक्षरशः पळत गाडगीळांचे घर गाठले. त्यातून केंटिश टाऊन वरील एस्केलेटर्स बंद असल्याने उंचच्या उंच जिने चढून जाताना 'नाकी दम' आला. अंजली सुट्टीवर असल्याने निदान घर उघडे तरी होते नाहीतर मात्र आमची खरी पंचाइत झाली असती. धडपडत पर्स उघडली पण त्यातही तिकिटे नव्हती. डॉ. पटवर्धनांच्याकडेच मी तिकिटे ठेवायला दिली असतील या खात्रीने दुसरीकडे कोठेही न पाहता आम्ही तडक व्हिक्टोरिया गाठले, तो स्टेशनच्या दारातच डॉ. पटवर्धन उभे. गाडी चक्क त्याच्या डोळ्यासमोरून निघून गेली होती. आपल्यामुळे गाडी चुकली म्हणून मला चांगलेच ओशाळवाणे झाले. डॉ. पटवर्धनांच्याकडेही आमची तिकिटे नव्हती. मग ती कुठे पडली तर नसतील ? 'सीलिंक' कंपनीच्या ऑफीसमध्ये जाऊन तिकिटे गहाळ

झाली असल्याने प्रवास करू देण्याबद्दल नो ऑबजेक्शन सर्टिफिकेट द्याल का म्हणून विचारताच त्यांनी नकार दिला. उलट ही तिकिटे कॅश करन्सी सारखीच असल्याने पुन्हा काढावी लागतील असेही सुनावले. पुनः पुनः केलेल्या विनंतीचा काहीही उपयोग झाला नाही. तिकिटे पुन्हा काढायची म्हणजे ५० पौंडाचा फटका बसणार म्हणून मला अक्षरशः रडू येऊ लागले. सगळे सामान परत परत तपासूनही तिकिटाचे कोडे काही सुटेना.

शांतपणे विचार केल्यानंतर बऱ्याच वेळाने एकदम मला स्ट्राईक झाले की टूरिस्ट डिपार्टमेंटमधून आणलेली प्रेक्षणीय स्थळे बघायची पॅम्फ्लेटस् काल आपण पर्स बदलताना बॅगेत काढून ठेवलीत. तिकिटांची पॅकेटस् ही या पॅम्फ्लेटस् सारखीच असल्याने तीही त्यांच्याबरोबरच बॅगेत टाकली गेली असणार. पण हे बघण्यासाठी पुन्हा घरी जाणे भाग होते; कारण फक्त एक बॅग व एक हँडबॅग असे स्वतःला वाहून नेता येईल एवढे सामान सोडल्यास बाकी सर्व सामान आम्ही गाडगीळांच्याकडेच सोडले होते. पुढची गाडी दुपारी ३ वाजता होती. परत पैसे खर्च करण्याआधी घरी जाऊन सर्व सामान पुन्हा एकदा नीट तपासायचे ठरवून तिकडे निघालो.

मिसेस गाडगीळ परत आम्हाला पाहून चाटच झाल्या. नशीब त्यांना सुट्टी होती कारण दोघांचीही ऑफिसेस आम्हाला माहिती नव्हती. अपेक्षे-प्रमाणे इतर पॅम्फ्लेटस्च्या गठ्ठयामध्ये तिकिटे दडली होती. तोंडचे पाणी पळविणारी तिकिटे बघून गाडी चुकली तरी पैसे तर वाचले म्हणून हायसे वाटले. मिसेस गाडगीळांनी झटपट भरपूर काजू घालून खिचडी केली. पापड खिचडी खाऊन व थोडी प्रदीप-रेखासाठी घेऊन विजयी मुद्रेने परत व्हिक्टो-रियावर आलो.

आमचा युरेलचा पास फर्स्ट क्लासचा असला तरी हा पास ब्रिटनमध्ये चालत नसल्याने डोव्हरपर्यंत सेकंड क्लासनेच प्रवास करावयाचा होता. दुपारी तीन वाजता गाडीत चढलो तेव्हा हुश्श झाले. अगदी मेंदूला मुंग्या आणणारी धावपळ झाली. ब्रिटिश रेल्चा सेकंड क्लास आपल्या फर्स्ट क्लासपेक्षाही पॉश नि स्वच्छ होता. गाडीला गर्दीही विशेष नव्हती. तासाभरातच डोव्हरचे 'चॉक क्लिफस्' दिसू लागले. समुद्राच्या काठाने यांचे डोंगरच होते.

येथून इंग्लंड, फ्रान्सच्यामध्ये असलेली ब्रिटिश खाडी बोटीने क्रॉस करावयाची होती. देश बदलणार म्हणून पासपोर्ट, व्हिसासाठीच्या फॉर्मलिटीज् पूर्ण करून बोटीत चढलो मोठ्या बोटीतून प्रवास करावयाचा पहिलाच अनुभव होता. सर्व बोट पालथी घातली. बसण्यासाठी छान कोच, कँटीन, करमुक्त दुकाने यांसारख्या सुविधा तेथे होत्या. डेकवर जाऊन मनोसक्त वारा खाल्ला. वारे इतक्या वेगाने वाहत होते की उडून जायची भीति वाटावी. ते पाहून मिहीर सेन, आरती सहा, इ. ब्रिटिश खाडी पोहून पार करून गेलेल्यांबद्दल आदर वाटला.

सुमारे २-२।। तासात कॅलेला पोहोचलो तेव्हा दिवेलागण झाली होती. परत एकदा पासपोर्ट-व्हिसा तपासणीच्या चक्रातून जावे लागले. बाहेर पॅरिस-कडे जाणारी रेल्वे उभीच होती. पण डब्यावर कोठेही 'पॅरिस' असे लिहिले नव्हते. 'गॅरे दि नॉर्ड' अशा सगळ्या डब्यांवर पाट्या होत्या सर्व अनाऊन्समेंटसही फ्रेंचमध्ये असल्याने काहीही समजत नव्हते. इंग्रजी जाणणारा माणूस शोधणेही मुष्कील झाले. आतापर्यंत एवढी आजूबाजूला वावरणारी इंग्लीश बोलणारी माणसे एकाएकी कोठे गायब झाली तेच कळेना. एक खाडी केवढा मोठा फरक घडविते ! शेवटी 'गॅरे दि नॉर्ड' म्हणजे पॅरिस असल्याचा शोध लागला. तात्काळ वरती चढलो तर तो डबा 'डायनिंग कंपार्टमेंट'चा निघाला. तेथून कसेबसे दुसऱ्या डब्यात येऊन बसलो व पॅरिसच्या दिशेने आमची मार्गक्रमणा सुरू झाली. रात्र असल्याने फ्रान्सचे निसर्ग सौंदर्य बघता आले नाही. रात्री ९ चे सुमारास 'गॅरे दि नॉर्ड' ला पोहोचलो.

जास्तीत जास्त रात्री रेल्वेतच काढून पैसे वाचवायचे ठरविले होते, त्याला सकाळची गाडी चुकल्याने सुरुवातीलाच नाठ लागणार होता. जाग्रणाची पहिलीच रात्र असल्याने झोपही येत नव्हती. म्हणून हॉटेलमध्ये केवळ रात्रीसाठी राहून पैसे खर्च करण्याचे जीवावर आले. शेवटी पॅरिसला मुक्काम न करताच पहिल्यादा रोमला जावयाचे ठरविले, परंतु तेथे जाणारी गाडी 'परीलिऑं' या पॅरिसमधील दुसऱ्या स्टेशनपासून सुटत असल्याचे समजले. आता तेथे जायचे कसे ? खूप जणांना विचारले पण कोणीही इंग्रजी शब्द उच्चारायला तयार नाही. 'चौकशी' मधील बाईही नीट उत्तरे देईना. ट्यूबने जाणे नक्कीच स्वस्त पडले असते. पण कोणती गाडी घ्यायची, कोठे बदलायची

कोणीच काही धड सांगेना. युरोपमध्ये भासणारी भाषेची अडचण इतके दिवस मी नुसती विश्वास न ठेवताच ऐकत होते, पण आज प्रत्यक्ष अनुभवली. शेवटी एका पोलिसाला विचारले. त्यालाही इंग्लीश येत नव्हते. खाणा-खुणांच्या सहाय्याने त्याने आम्हाला कसेबसे सांगितले की ट्यूबने जायला वेळ लागेल तेव्हा तुम्ही टॅक्सीनेच जा. त्यानेच आम्हाला दोन टॅक्सी गाठून दिल्या. रात्री ११॥ ची गाडी होती. तासाभराचाच अवधी होता. गाडी चुकली तर हॉटेल मध्ये झक्कत रहावे लागेल म्हणून जास्त काहीही विचार न करता टॅक्सीत बसलो. पंधरा मिनिटांत 'पॅरी लिऑं'ला पोचलो १७॥ फ्रॅंक्स बील झाले. जे अंतर २-४ फ्रॅंक्समध्ये ट्यूबने काटता आले असते त्याला केवळ भाषेअभावी एवढे पैसे खर्च करावे लागले. वाईट गोष्ट म्हणजे पॅरिसमध्ये एवढ्या मोठ्या मर्सिडीज टॅक्सीत फक्त दोनच उतारू घ्यायला परवानगी असल्याचे सांगितल्याने दोन टॅक्सी करणे भाग पडले. लंडनला ५ पौंडाचे ४० फ्रॅंकस मिळाले होते त्यापैकी २० तर असेच उडाले. शिवाय स्टेशनवर भलतेच लवकर येऊन पोचलो. रोमला जाणारी गाडीही अजून लागली नव्हती. पॅरिसला अशी सहा स्टेशन्स असून वेगवेगळ्या ठिकाणी जाणाऱ्या गाड्या निरनिराळ्या स्टेशन्सवरून सुटतात व फ्रेंच न येणाऱ्या प्रवाश्यांना बुचकळ्यात पाडून त्यांचा चांगलाच गोंधळ उडवून देतात.

थोड्या वेळाने 'रोमा टर्मिनी' असे लिहिलेली फक्त २-४ डब्याची गाडी प्लॅटफॉर्मला येऊन लागली. आमची गाडी हीच का ते कोणीच सांगेना. शेवटी एका सहप्रवाशाच्या सांगण्यावरून त्या गाडीत चढलो. डब्यामध्ये अंधार, कुडकुडायला लावणारी थंडी, त्यामुळे गार पडलेल्या रेक्झीन कुशन्स इ. बघून रात्रीचा प्रवास आपण कसा करणार याचा संभ्रम पडला. बऱ्याच वेळानंतर अजून डबे येऊन लागले. दिवे लागताच लक्षात आले की आपण सेकंड क्लासमध्ये बसलो आहोत. घाईघाईने फर्स्ट क्लासमध्ये सामान हलविले. सबंध कंपार्टमेंटच रिकामे होते. लगेच डॉ. पटवर्धन ह्यांनी एक व आम्ही दोघांनी एक असे दोन वेगवेगळे कुपे अडवून एकेका बाकावर पथाऱ्या पसरल्या. आत अतिशय उबदार वातावरण होते. कापडाचे कव्हर असलेल्या फोम कुशन्स होत्या. एवढ्या सर्व सुखसोयींमुळे व सकाळपासून फार जीवघेणी धावपळ झाल्याने डोळा कधी लागला ते कळलेही नाही.

गाडी बरोबर वेळेला सुटून शंभर मैल वेगाने धावत होती. काहीतरी खुडबुडल्याने मला अचानक जाग आली. पाहते तो एक चांगला गोरापान, धिप्पाड, सहा फूट उंचीचा इसम डोक्याशी ठेवलेल्या माझ्या पर्सची चेन उघडून आत चाचपणी करत होता. कुपेमधील हा घुसखोर पाहून मी जोरात ओरडताच तो ताबडतोब पळाला. विजयला पहिल्यांदा मी का ओरडतीय ते कळलेच नाही. पण जेव्हा तो चोर असल्याचे त्याच्या लक्षात आले तेव्हा तोही तडक पायातही काही न घालता त्या माणसाच्या मागे गेला. पायाचा आवाज येत नसल्याने आणि गाडीच्या आवाजात आपला पाठलाग होत असल्याचे बहुधा त्याला कळले नसावे. त्याच्यापासून अगदी चार पावलांवर येऊन पोहचल्यावर विजयला वाटले हा एवढा आडदांड मनुष्य, आपण एकटे, निःशस्त्र. एवढ्या फास्ट गाडीतून याने आपल्याला बाहेर भिरकावून दिले तरी कोणाला पत्ता लागणार नाही म्हणून डॉ. पटवर्धनांना उठविण्यासाठी विजय परत फिरला कुपेच्या काचेच्या बंद दारातून हा आपल्याला खाणाखुणा करून का उठवितो आहे हे पटवर्धनांना अजिबात समजेना. त्याना वाटले डब्याला आगच लागलीय. त्यांनी आतूनच खुणेने चेन ओढू का असे विचारले. शेवटी दोघांनी मिळून त्याचा पाठलाग करेपर्यंत तो भामटा कोठे गायब झाला ते काही कळले नाही. छाती चांगलीच धडधडत होती. चोरीला मात्र काहीही गेलं नाही. दुसऱ्यांदा पैसे वाचले. सकाळी तिकिटे शोधण्यासाठी गाडगीळांकडे परत गेलो तेव्हा अनेक देशाच्या करन्सीची एकत्र गल्लत झाल्याचे माझ्या लक्षात आले. म्हणून मी प्रत्येक देशाची करन्सी सुलभतेने सापडण्यासाठी वेगवेगळ्या कागदाच्या पाकिटात घालून ठेवली. यामुळेच पर्स उघडल्यावर त्या चोराला कुठेच कॅश करन्सी न दिसता नुसती पाकिटेच दिसली असावीत. पाकिटात काय आहे हे पाहण्यासाठी त्याला खुडबुड करावी लागली व त्यामुळे मला जाग आली. सकाळच्या तिकिटांचा गोंधळ असा फायद्यात पडला. नाहीतर सर्व युरोपचा प्रवास रद्द करून परतावे लागले असते. युरेलच्या कुपेंचा एक दोष म्हणजे त्याना आतून लॉक करण्याची सोय नाही. युरोपमध्ये पासपोर्टस्च्याही खूप चोऱ्या होतात म्हणे.

पुढच्या स्टेशनवर गाडी थांबल्यावर भामट्याच्या वर्णनासहित तक्रार केली. पण गाडीच्या गार्डला ‘ रॉबर ’ या शब्दापलिकडे बहुदा काही कळले नसावे.

खूप शोधूनही तो माणूस गाडीतही सापडला नाही अथवा स्टेशनवर उतरतानाही दिसला नाही. काही चोरीला गेलेले नसल्याने त्याला शोधायचे विशेष प्रयत्नही केले नाहीत. तो खरच भुरटा असला पाहिजे. सराईत असता तर पिस्तुल, चाकूच्या नुसता धाक दाखवून चोरी करून पसार झाला असता तरीही आम्ही काहीही करू शकलो नसतो. जीवावरचं निभावलं म्हणून दैवाचे आभार मानले.

यापुढे आडवे होऊन झोपायला नाही मिळाले तरी चालेल पण चौघांनी एकाच कुपेत बसायचे ठरविले म्हणजे निदान चौघांना बघून तरी आत यायचे धाडस कोणी करणार नाही या उद्देशाने. थोड्याच वेळात आमच्या असे लक्षात आले की बसण्याच्या खुर्च्या ओढून तिरक्या केल्या की त्या एकमेकाना जोडल्या जाऊन मस्तपैकी बेड तयार होतो. लगेच तातडीने आम्ही बिछाने सजवून ताणून दिली.

रोमला जायच्या आधी 'व्हेनिस' हे पाण्यात वसलेले शहर बघायचे ठरविले. एवढ्या मोठ्या प्रवासात अनेक चिमुकले युरोपियन देश येत-जात होते. दरवेळी देश बदलून सरहद्द क्रॉस करण्याचे आधी एकदा पासपोर्ट, व्हिसासाठी व एकदा तिकिटासाठी असे दोनदा चेकिंग होत असे. स्मार्ट, रुबाबदार गणवेषातील अधिकारी रात्री-अपरात्री उठवून दर्शन देत. याने झोपमोडीचा त्रास सारखा होतो. त्यामुळे अर्थात जाग राहते, पण प्रत्येक वेळी उठून सर्व कागदपत्र दाखविण्याचा व्यायाम करावा लागतो.

* * *

६२०
23320
प्रवास
७५९१२

# व्हेनिस

## बुधवार २५ ऑक्टोबर

सकाळी ८ वाजता मिलान आले व चक्क एक कॉफी विकणारा दिसला. अगदी छोट्या ग्लासमधून अर्धा ग्लास, कोरी, काळी कॉफी कपाला ६०० लिरा या दराने मिळाली. ती इतकी कडू होती की औषधच प्यायल्यासारखे वाटले. पैसे गेल्याचे दुःख होऊन तोंडाची चवही गेली. नंतर असे कळले की सर्व युरोपभर काफे-ऑ-ले ( Cafe-au-lait ) म्हणून कॉफी मागितली की दूध घातलेली काफी मिळते.

दुपारी चारच्या सुमारास व्हेनिसला जाऊन पोचलो. सामानाचे ओझे घेऊन स्टेशनबाहेर पडलो तो पाण्याचा मोठा कॅनॉल होता. व्हेनिसमधील प्रेक्षणीय स्थळे दाखविण्यासाठी हाताने होड्या वल्हविणारे भयानक पैसे मागू लागले. संध्याकाळही होत आली होती म्हणून स्पेशल बोट न करता बससारख्या सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या मोटार-बोटीतून थोडे भटकून आलो. हे सबंध शहर कालव्यावर वसले असून एका लेन मधून दुसरीत जाताना बोटीतूनच जावे लागते. सगळीकडे पाणीच पाणी. घरेही सदैव पाण्यात असल्याने शेवाळे, बुरशी यानी काळवंडल्यामुळे अवकळा आलेली. नवीन इमारतीही दिसल्या नाहीत. एका मार्केटच्या स्टॉपवर उतरलो. येथील लोकांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन टूरिस्टच असल्याने सर्व गोष्टी अतिशय महाग होत्या. बाजारपेठ हिरव्यागार भाज्या, ताजी टवटवीत फळे-फुले, अनेक शोभिवंत वस्तू यानी भरलेली होती. टूरिस्टचीही अमाप भीड होती. फळे मात्र स्वस्त होती. बाकी सर्व नुसते बघूनच समाधान मानावे लागले.

स्टेशनवर परतायच्या आधी खाऊन घ्यावे म्हणून एका हॉटेलपाशी गेलो. बाहेर गार वारा सुटला होता म्हणून आत बसून खाल्ले तो त्या मालकाने आत बसण्याबद्दलचा वेगळा आकार लावला. अन्न बांधून नेले तर जास्त स्वस्त होते. इटालियन जगप्रसिद्ध पिझ्झा इटलीत खाताना आगळीच मजा

आली. परत येऊन रात्री रोमला निघणाऱ्या गाडीची प्रतीक्षा करत वेटिंग रूममध्ये बसलो.

व्हेनिस बद्दल खूप ऐकलं होतं. सारखे पाण्यात रहाण्याची कल्पना आम्हा दोघांनाही इतकी आकर्षक न वाटल्याने की काय हे शहर एवढे आवडले नाही. ते फारच उदास, दमट आणि महाग वाटले.

* * *

# रोम

## गुरूवार २६ ऑक्टोबर

सकाळी सातचे सुमारास ' रोमा टर्मिनीला ' पोहोचलो. रोमचे रेल्वे स्टेशन अति भव्य असून जगाच्या कानाकोपऱ्यातून येथे लोक येत असल्यामुळे गर्दीही खूप होती उतरल्या उतरल्याच एका माणसाने गाठले व स्वतः जवळील पॅम्फ्लेटमधील त्याच्या हॉटेलच्या रूमचे आकर्षक रंगीत फोटोग्राफ दाखवून आम्हाला गटविले. आम्हीही आणखी कोठे चौकशी न करता त्याच्या पाठीमागून चालू लागलो. लगेच त्याने आम्हाला टॅक्सीत घालून एका हॉटेलपाशी आणून सोडले. हे होते हॉटेल 'प्रिसिला' आणि खोलीचे भाडे होते एका रात्रीला १८,००० लिरा. येथे येऊन बघतो तो त्या माणसाने दाखविलेल्यापैकी एकही रूम दुपारी १२ वाजेपर्यंत रिकामी व्हायची शक्यता नव्हती. आम्ही पुरते गंडविले गेल्याचे लक्षात आले. असे अनेक हॉटेल्सचे एजण्ट रोम स्टेशनवर कायम फिरत असणार व नवख्यांना आपल्या जाळ्यात ओढत असणार. पण आता इलाज नव्हता. सामान तेथेच ठेऊन तेथूनच सकाळी ८-३० ची साईट सिईंग टूर बुक केली. त्यांनी आम्हाला एक व्हरांड्यात असलेली समाईक बाथरूम मात्र वापरायला दिली. शॉवरला गरम पाणीही नव्हते. विजय-प्रदीपनी गार पाण्यानेच आंघोळी केल्या. तोपर्यंत बस आल्याची वर्दी आल्याने आम्हा दोघींना ड्रायक्लिनिंगवरच बाहेर पडावे लागले.

युरोपियन देश बघताना कण्डक्टेड टूरस् घेणे महाग पडले तरी केव्हाही इष्ट, कारण त्यांच्याबरोबर इंग्लीश बोलणारे गाईडस् असतात. तसेच फ्रेंच, स्पॅनिश यासारख्या इतर युरोपियन भाषांतील गाईडस्चीही सोय असते. रोमचे आढळलेले विशेष म्हणजे ऐतिहासिक महत्व असलेली ठिकाणे शहराच्या मध्यवर्ती जागीच आहेत. त्यासाठी आऊट ऑफ दि वे जावे लागत नाही. रस्ते तेवढे डांबरी व शेजारी जुने अवशेष.

जाता जाता गाईडने अनेक कारंजी, स्तंभ, रोमन वॉल, इटालियन प्रेसिडेंटचे निवासस्थान यासारखी बरीच प्रेक्षणीय स्थळे दाखवून श्री कॉईन फाऊंटन-पाशी आणून सोडले. हे फारच सुंदर फाऊंटन असून याची अशी आख्यायिका आहे की येथे एक नाणे टाकले की रोमला परत यायला मिळते, दुसरे टाकले की लग्न होते व तिसरे टाकल्यावर घटस्फोट मिळतो. स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्यात अनेक नाणी पडलेली दिसत होती. ती टाकणाऱ्यांच्या आकांक्षांचे काय झाले हे कळायला मात्र मार्ग नव्हता. आम्ही रोमला परत यायची तीव्र इच्छा असूनही एकही नाणे वाया न घालविण्याचा निर्धार अमलात आणला.

नंतरचा हॉल्ट होता पँथिऑन पाशी. 'पॅथिऑन' ही इ. स. पू. २००० मध्ये पहिल्यांदा टेंपल म्हणून बांधलेली व ख्रिश्चानिटीनंतर चर्चमध्ये कन्व्हर्ट झालेली वास्तू. या ठिकाणी बहुदा ख्रिश्चनांना प्रतिकार न करता चर्चमध्ये बदल करण्याचा स्वीकार करण्यात आला असावा. त्यामुळेच इतर देवळासारखे हे नामशेष झाले नाही. पँथिऑन बघून एवढे प्रचंड शिल्प इतक्या जुन्या काळी कसे बांधले असावे याचे कोडे पडते. याचा आकार 'डोम शेप' असून डोमचा डायमिटर व उंची १४२ फूट आहे. सबंध बांधकाम बारीक विटांचे असून आत कोठेही स्टील फ्रेम वर्क नाही. डोमच्या छतावर हवा व उजेडासाठी मोकळी जागा सोडली असून दुसरीकडे कोठेही खिडकी नाही. या मोकळ्या जागेतून येणारे पावसाचे पाणी जाण्यासाठी जमिनीवर भोके ठेवलेली असून ४००० वर्षांपूर्वीची ही ड्रेनेज सिस्टिम अजूनही कार्यान्वित आहे. ( कॉर्पोरेटर्सना इतर दौऱ्यांसारखा 'रोम दौरा' अभ्यासाची सहल या नावाखाली काढता येईल ). पँथिऑनच्या मुख्य दाराचे वजन ७५ टन असूनही एक माणूस ती सहजतेने उघडू शकतो. तसेच या दारापुढे लावलेले खांबही संगमरवरी नि सलग ( one piece ) असून ते इजिप्तहून आणलेले आहेत. यंत्रे नसताना येवढ्या अवजड वस्तु इतक्या दूर कशा आणल्या असतील कोण जाणे. कदाचित किती तरी लोकांना यात आपले प्राण देखील गमवावे लागले असतील. आतमध्ये जगप्रसिद्ध चित्रकार राफेल याची समाधी आहे. पँथिऑन बघताना नि त्याचे वर्णन ऐकताना भारावून जायला होते.

येथून नंतर 'व्हॅटिकन सिटी' या जगातील सर्वात छोट्या राष्ट्रात प्रवेश केला. याचे रेडिओ टी. व्ही. स्टेशन, स्टँपस्, नाणी सर्व काही स्वतंत्र. इतकेच

काय पण त्याचा वकीलही ( अॅंबेसेडॉर ) रोम ( इटली ) मध्ये आहे. जाताना एका सुवेनिअर शॉपपाशी गाईडने बस थांबविली व तेथील वस्तू खऱ्या असतात म्हणून फक्त तेथूनच खरेदी करण्याचा सल्ला दिला. नाणी, होली वॉटर, पोपने हात लावून आशीर्वाद दिलेल्या वस्तू, इ. गोष्टी या दुकानात विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. तसेच कोणत्याही वस्तूला पोपचा आशीर्वाद पाहिजे असेल तर सकाळी ती वस्तू निवडून ठेवून संध्याकाळी पोपच्या ब्लेसिंगसकट मिळण्याचीही सोय होती. याला अर्थातच जास्त पैसे मोजावे लागतात. त्या लोकांतही इतकी अंधःश्रद्धा पाहून मन विषण्ण झाले. दुकानाबाहेरील फुटपाथवर अगदी आतील वस्तूंसारख्याच काहीही फरक न ओळखता येणाऱ्या वस्तू कमी किंमतीत मिळत होत्या.

सेंट पीटर्स कॅथेड्रलच्या बाहेरील चौक इतका प्रचंड आहे की लाख-दीड लाख लोक त्यात सहज माऊ शकतील. सेंट पीटर हा पहिला रोमन कॅथॉलिक धर्मगुरू. त्याच्याच नावाने बांधलेले 'सेंट पीटर्स बॅसिलीका' हे जगातील सर्वात मोठे चर्च. हे नुसतेच भव्य नाही तर त्याच्या संपन्न सौंदर्यकलेने मोहवून टाकणारे ! काय बघावे, काय नाही असे होऊन जाते. संपूर्ण भिंतींभर मोझिॲक वर्कनी चित्रे काढलेली आहेत. या मोझिॲक टाईल्समध्ये नैसर्गिक रंग वापरले असल्याने ते अजिबात विटलेले नाहीत. त्यामुळेच इतक्या वर्षांनंतरही ही चित्रे अगदी अलिकडेच रंगविल्यासारखी दिसतात. दोन टाइल्समध्ये अजिबात अंतर नसल्याने लांबून ही चित्रे पेंटिंग्जच वाटतात. वेगवेगळ्या रंगांच्या शेडस्‌मधील इतक्या बारीक बारीक टाइल्स बसविण्यास किती लोकांचे हात कारणीभूत झाले असतील कोण जाणे ? एक-एक चित्र पुरे करायला चित्रकारांना आपले पुरे आयुष्य देखील खर्च करावे लागले असेल. या चर्चमधील डोमचे डिझाइन मायकेल अँजेलोने वयाच्या ७४ व्या वर्षी केलेले आहे. डोम बघताना तर डोळ्याचे पारणे फिटते. मध्यभागी सोने व ब्रॉंझपासून बनविलेली वेदी ( pulpit ) असून तेथे फक्त पोपलाच बसता येते. तसेच ज्या पोपना या बॅसिलिकात पुरले आहे त्यांच्या समाध्याही तळघरात आहेत. चर्चच्या हॉलमध्ये प्रवेश केल्या केल्या उजव्या बाजूला 'पिएटा' हे मायकेल अँजेलोचे शिल्प असून या पुतळ्याचा नुसता मार्बल सिलेक्ट करायला मायकेल अँजेलोला म्हणे सहा महिने लागले.

८–१० वर्षांपूर्वी हा पुतळा तोडायचा प्रयत्न एका माथेफिरूने केल्याने त्याला आता बुलेट-प्रुफ काचपेटीत ठेवलेले आहे.

या चर्चं शेजारीच ' व्हॅटिकन म्युझियम ' असून तेथे मायकेल अंजेलो, राफेल यासारख्या जगविख्यात कलाकारांचे मास्टर पीसेस बघायला मिळतात. ' सिस्टीन चॅपेल ' हे सेंट पीटर्स बॅसिलिकाच्या उजव्या बाजूला असून येथेच जगातील कार्डिनल्स नवीन पोपची निवड करतात. या चॅपेलवरती असलेल्या चिमणीतून काळ्याचा पांढरा धूर येऊ लागला की नवीन पोपची निवड झाल्याचे समजते. त्या शेजारीच पोपचे निवासस्थान असून त्याच्या खिडकीतून पोप ठराविक वेळी भाविकांना दर्शन देतो.

व्हॅटिकन सिटी ही ख्रिश्चनांची मायभूमी असल्याने प्रत्येक ख्रिश्चनाची तेथे एकदा तरी जाण्याची इच्छा असावीच. यामुळे की काय तेथे जत्रा असल्यासारखी प्रचंड गर्दी होती. अनेक भाषांतील कण्डक्टेड टूरस् आल्या होत्या; त्यातून आपली हुडकून काढणे म्हणजे कसरतच होती.

दुपारी हॉटेलमध्ये परत आलो तो आमचे सामान एका अतिशय गचाळ-रूममध्ये ठेवलेले आढळले. त्या रूमला सेंट्रल हीटींग, ॲटॅचड् बाथ तर नव्हतेच पण बेडला लागूनच सवय नसल्याने घृणा वाटणारे युरिनल होते. भाडेही दिवसाला १८००० लिरा. एवढ्या सगळ्या गैरसोई, शिवाय सेंट्रल हीटिंग नसल्याने कुडकुडत मरण्यापेक्षा रेल्वेचा उबदार फर्स्टक्लास काय वाईट म्हणून खोली सोडायची ठरविली. मालकानेही विशेष काही न बोलता ३००० लिरा इन्सिडेन्टल चार्जेस् घेऊन आमची सुटका केली.

तडक स्टेशनवर जाऊन सामान लॉकरमध्ये टाकले व उरलेले रोम बघायला सिद्ध झालो. प्रथम मेट्रोनी ( भुयारी रेल्वे ) फक्त १०० लिरा तिकीटात कलोसियमच्या दारात पोचलो. 'कलोसियम' ही सुद्धा ४००० वर्षांपूर्वी बांधलेली वास्तु भल्या मोठ्या डांबरी मेन रोडवर आहे. येथे गुलाम वा ख्रिश्चन झालेल्या लोकांना हिंस्र श्वापदांबरोबर झुंज खेळण्यासाठी सोडत. गुलाम जिंकले तरच सुटका नाहीतर मृत्यू ठरलेलाच. जनावरांसाठी जमिनीखाली बांधलेले पिंजरे, झुंजीसाठीचा मधला हौद, झुंजी पहाण्यासाठी लोकांना बसण्यासाठी बांधलेले प्रचंड स्टेडियम वगैरे गोष्टी आता बऱ्याचशा पडल्या असल्या तरीही पूर्वीच्या रोमन सम्राटांच्या क्रूर करमणुकीची आणि प्रगत

वास्तूशास्त्राची साक्ष द्यायला पुरेशा आहेत. कलोसियम बघताना ' को-वाडीस सिनेमात बघितलेली मनुष्य-प्राण्यांच्या जीवन-मरणाच्या निर्घृण लढ्याची दृश्ये पुन्हा पुन्हा आठवून शहारायला होत होते.

कलोसियम समोरच अति प्रचंड, भव्य कमानीचे ' रोमन गेट ' असून अशी ६ गेटस् रोममध्ये आहेत. तसेच रस्ता क्रॉस केला की लगेच रोमन फोरम ही लागते. ' रोमन फोरम ' हे जवळ जवळ दोन चौरस मैल एरिया असलेले राजे लोकांचे राहायचे ठिकाण. सध्या जवळ जवळ सगळ्याचे अवशेषच दिसतात. तरीही भव्य संगमरवरी कमानी, अनेक देवळांचे सागाडे, राजवाड्याचा काही भाग, सैन्यासाठी बांधलेले भुयारी रस्ते, वगैरे गोष्टी रोमन राज्याच्या ऐश्वर्याची प्रचीति आणून देतात. अनेक लोक बसू शकतील असे सिनेटही असून त्याचे व्यासपीठ राजवाड्याच्या दारातून बरोबर दिसावे असे बांधलेले आहे. रोमन फोरम नुसते बघून पूर्वीचे वैभव जाणविण्याशिवाय काहीही कळत नाही. तेवढ्यासाठी तेथे इंग्लिश बोलणारे गाईडस् आहेत किंवा इंग्लीश कॉमेंट्री असलेले टेपरेकॉर्डरसेही भाड्याने मिळतात. फोरम हिंडताना अक्षरश. दमछाक होते.

रोमन फोरम ओलांडून, मधला रस्ता पार करून वर चढून गेलो तो रोमन म्युझियम लागले. हे म्युझियम इतर म्युझियम्ससारखेच. शिवाय सर्व माहिती रोमन लिपीत लिहिलेली म्हणून खास आवड नसल्यास बघितले नाही तरी चालण्यासारखे. निदान एन्ट्रन्स फी तरी वाचेल. आम्ही मात्र हेही बघण्याचा व्यायाम केला. तेथून बाहेर पडलो तेव्हा दिवेलागण झाली होती. चालून चालून पायात पेटके आले होते. म्युझियमच्या पायऱ्या कशाबशा उतरलो तो त्याशेजारीच असलेले Attar of the Nation हे संगमरवर दगड मुक्त हस्ताने वापरलेले अतिसुंदर स्मारक दिसले. पण परत त्याच्या पायऱ्या चढून वर जायची ताकद नसल्याने खालूनच बघण्यावर समाधान मानले.

पोटातही कावळे कोकलायला लागले होते म्हणून जेवणासाठी हॉटेलचा शोध घेत व जेथे कायम आर्टिस्ट लोकांचे गाणे-बजावणे, खाणे-पिणे, पेंटिंग्ज काढणे चालू असते शिवाय जेथे रोडसाईड कॅफेही खूप आहेत असे ' Piazza Navona ' हे भटकण्याचे प्रसिद्ध ठिकाण धुंडाळत चाललो. पण

ही रोमँटीक जागा काही केल्या येईना. वाटेत 'मुसोलिनीचे' अवाढव्य घर तेवढे लागले. शेवटी थकून एका रेस्टॉरंटमध्ये घुसलो. इटालीयन फूडला मात्र तोड नाही. फारच चवदार, जिभल्या चाटायला लावणारे. अनेक प्रकारचे चविष्ट व्हेजिटेरियन पदार्थही चाखायला मिळतात.

भरपेट खाऊन बसने स्टेशनवर जावे म्हणून स्टॉपवर उभे राहिलो. प्रत्येक बस माणसाच्या गर्दीने ओसंडत होती. दोन-तीन बसेस तशाच सोडल्या. शेवटी एका बसमध्ये रेटारेटी करून कसे बसे आत शिरलो. कंडक्टर हा प्रकार नसल्याने लोक आत घुसण्यावर काहीच निर्बंध नव्हता. बळी तो कान पिळी या न्यायाने सर्व कारभार चालला होता. बसमध्ये धरून उभं रहायची पण गरज नव्हती बसच्या दारातच तिकीटे काढायचे यंत्र होते. अर्थात तिकीट काढणं न काढणं तुमच्या सत्सद्‌विवेक बुद्धीवरच सोपविलेलं. अधून मधून सरप्राइझ चेकींग होतं म्हणे. त्यावेळी सापडलात तर मात्र धडगत नाई. आत घुसण्यापेक्षाही बाहेर पडण्याचे चक्रव्युह भेदण्यातच खरी कसोटी होती. ती पार करण्याच्या टेन्शनने थंडीतही घाम फुटला आणि आधिच्याच स्टॉपवर उतरलो. त्यामुळे परत तंगडतोड करत स्टेशनवर जाणे भाग पडले. गर्दीच्या लाटा प्रत्येक बसमध्ये वर-खाली करतच होत्या. क्यूची पद्धत कोठेही दिसली नाही. येवढ्या सगळ्या गडबडीत विजयचा महत्प्रयासाने जपलेला अमेरिकन पोलरॉईड गॉगल मात्र खिशातून नाहीसा झाला. पडला का कोणी मारला कोण जाणे. कालपासून दोनदा फटका बसण्याचे मोठे प्रसंग टळले होते. आज छोट्याशा चपराकीवर सुटका झाली.

एकूण रोम फारच प्रेक्षणीय आहे. रोमचे रोड अति भव्य नसले तरी अगदी छोटेही नाहीत. ट्रॅफिक मात्र सतत वहात असल्याने रस्ता क्रॉस करणेही मुष्कील होते. 'रोमन हॉलीडे' प्रमाणे रोम स्कुटरवरून बघायचे म्हणून 'टु व्हिलरचे' इंटरनॅशनल ड्रायव्हिंग लायसन्सही काढून ठेवले होते, पण 'स्कुटर रेंटल'ची दुकानेच काय पण विशेष स्कुटर्सही दिसल्या नाहीत. इटालियन स्त्रिया मात्र अमेरिकन बायकांपेक्षा जास्त सुरेख वाटल्या. सडपातळ, ऊंच, चटपटीत, चेहऱ्यावर गोडवा असलेल्या अनेक युवती आकर्षून घेत होत्या. रोममधील बहुतेक सर्व गोष्टी बघून झाल्याने पुढे सटकायचा निर्णय

घेतला. थोड्या लिरा उरल्या होत्या त्या कोणीही परत घेऊन त्याचे डॉलर्स वा पौंड देईनात. शेवटी २५०० लिरांची एक शो-बाहुली खरेदी केली. अॅश- ट्रे, फ्लॉवर पॉट, यासारख्या काचेच्या वस्तू येथे फार सुंदर मिळतात पण जड म्हणून त्यांचा मोह टाळावा लागला. हॉटेलने धोका दिला नसता तर अजून एक दिवस रोममध्ये राहिलो असतो; म्हणजे काउंटलेस फाउंटन, तसेच फ्लोरेन्स, नेपोली या सारखी ठिकाणे बघता आली असती अशी रुख-रुख घेऊन रात्री ९–३० वाजता जिनिवाला जाणाऱ्या गाडीत बसलो.

* * *

# जिनिवा

## शुक्रवार २७ ऑक्टोबर

सकाळी खूप उशीरा म्हणजे ११ चे सुमारास मुख्य स्टेशन जिनिवाला पोहोचलो. त्याआधीचा वेळ न खाता-पिता केवळ निसर्गाच्या सानिध्यात अन्र्वर्न, लाऊसर्न, झुरिक यापैकी कोठे उतरावे याची चर्चा करत कसा गेला ते कळलेही नाही समुद्रासारख्या विस्तिर्ण लेक जिनिवाचे दर्शन मधून मधून होत होतेच. सकाळी प्रवासाचा योग आल्याने स्विझलँडचे सौंदर्य मनमुराद नि फुकटात लुटता आले. स्वर्ग म्हणजे आणखी काय असणार असे वाटायला लावणारा चित्रातल्यापेक्षाही सुंदर निसर्ग. वृक्षांनी भरलेले, फॉलच्या विविध रंगानी रंगलेले डोंगर, डोंगर उतारावर सलग उभ्या असलेल्या फळझाडांच्या रांगा, वळणावळणाचे रस्ते, जमिनीवर हंतरलेले हिरवळीचे हिरवेगार गालीचे, अधून मधून दिसणारी छोटीशी टुमदार घरे, सर्वच इतके अप्रतिम होते की वाटेत लागणाऱ्या स्टेशन्सवर पटकन उडी मारून या शेतातून पायी हिंडण्याचा अनेक वेळा मोह झाला नि तेथे जन्मलेल्यांचा खरोखर हेवा वाटला. स्विझलँडचे जर खरे निसर्गसौंदर्य उपभोगायचे असेल तर तेथील खेड्यातील 'सो कॉलड्' झोपडीतच राहिले पाहिजे. जिनिवा स्टेशनसमोरील मोठा रस्ता, उत्तुंग इमारती या सारख्या रुक्ष गोष्टी पाहून अगदी नकोसे झाले. भाषेच्या माध्यमातून काय काय बघायचे आहे हे ठरवायलाच एक-दीड तास गेला.

सामान लॉकरमध्ये टाकून स्टेशनसमोरच्या बोळात असलेल्या मॅकडोनाल्डस्मध्ये उदरभरण केले. तेथून चालत पाच मिनिटांच्या अंतरावर लेक जिनिवा होते. या जगप्रसिद्ध सरोवरातून तीन तासांची ( तिकीट प्रत्येकी १३ स्विस फ्रँकस् ) बोटीची राईड घेतली. लेकच्या किनाऱ्यावरील वास्तूंची माहिती देण्यासाठी सतत कॉमेंट्री चालूच होती. लेनिन, आसेनहॉवर, आगाखान, बायरन यासारख्या नावाजलेल्या लोकांचे बंगले तेथे आहेत. फॉलचे रंग

लेकऱ्या शोभेत भर घालत होते. कुडकुडविणाऱ्या तुफान वहाणाऱ्या वाऱ्यात या राईडची मजा लुटून संध्याकाळी पाच वाजता परत आलो.

जिनिवाहून माऊंट ब्लांक या आल्पस्‌मधील सर्वात उंच शिखरावर जाता येते असे कळले. तेथे जाणाऱ्या गाड्या Geneve–Eaux–Vives या जिनिवातील दुसऱ्या स्टेशनपासून सुटत असल्याने व त्याच दिवशी जिनिवाला परतायचे असल्याने पहिली गाडी पकडणे भाग होते म्हणून ते स्टेशन बघून यायचे ठरवून त्यासंबंधी लगोलग विचारणा सुरू केली. स्टेशनच्या नावाचा उच्चार बरोबर न झाल्याने की काय पण कोणालाही धड काहीच सांगता येईना. अनेकांना विचारावे तेव्हा एखादा थोडेफार इंग्लिश जाणणारा भेटायचा. त्याने दिलेल्या तुटपुंज्या माहितीवर थोडेसे जावे तो पुन्हा विचारायची पाळी यायची. असे करता करता पायाचे तुकडे पडायची वेळ आली पण स्टेशन काही येईना.माघारी फिरण्याआधी आता शेवटचा चान्स म्हणून एका माणसा-जवळ चौकशी केली असता आपण स्टेशनच्या अगदी जवळ आलो असल्याचे समजले. सकाळी ६।। वा. माऊंट ब्लांकला जायला पहिली गाडी होती. कडाक्याच्या थंडीत इतक्या लवकर जिनिवाच्या मुख्य स्टेशनपासून एवढे दूर येणे फारच कठीण असल्याने तेथे असणाऱ्या एका हॉटेलमध्ये ( Hotel Pax ) जागा आहे का ते बघावे म्हणून आत शिरलो आणि चक्क दोन मस्त रूम्स मिळाल्या देखील. दर होता ६० स्विस फ्रॅंकस्‌ विथ बाथ आणि ४५ स्विस फ्रॅंकस्‌ विदाऊट बाथ. ( आम्ही दरवेळी पैसे वाचविण्यासाठी एक रूम विथ बाथ व एक विदाऊट बाथ घेत असू व बाथ असलेल्या खोलीत चौघेजण आंघोळी करत असू ). रूममध्ये गेल्या गेल्या मी व रेखाने हंथरुणावर अंग टाकले पण आमचे सर्व सामान लॉकरमध्ये असल्याने विजय-प्रदीपला मात्र ताबडतोब निघावे लागले. एवढे अवजड सामान व आमच्यासाठी खायचे पदार्थ घेऊन ते दोघे जेव्हा चालत परत आले तेव्हा खरोखरच त्यांना साष्टांग नमस्कार घालावासा वाटला. महागाईमुळे युरोपचा प्रवास म्हणजे कष्ट, पेशन्स, टॉलरन्स याची सत्व परीक्षा होती. ती पुरुषांनी तरी पास करून दाखविली.

भल्या पहाटे उठून, झटपट आवरून सहा वाजताच स्टेशनवर जाऊन धडकलो तो स्टेशनला कुलूप. इकडून तिकडून आत जायला कोठेही मार्ग

दिसेना. थंडीत कुडकुडत काय करावे ते न सुचून तेथेच उभे राहिलो तो साडेसहाला पाच-सात मिनिटे कमी असताना स्टेशनमास्तर कारमधून आले. त्यांनी दार उघडून दिवे लावताच आम्ही आत शिरलो. लगेच दोन डब्यांची पेशवे पार्कमधील फुलराणीसारखी छोटीशी गाडी आली. पाच मिनिटातच पुढच्याच स्टेशनवर खालती उतरावे लागले. येथे फ्रान्सची हद्द सुरू होत असल्याने पासपोर्ट–व्हिसाची तपासणी झाली. अशा तीन ठिकाणी गाड्या बदलाव्या लागल्या. पण पुढची रेल्वे उभी असल्याने चार गाड्या करूनही आम्ही दीड-दोन तासात शॅमोनीला पोचलो.

शॅमोनी ( Chamonix) हे मॉंट ब्लांकच्या पायथ्याशी निसर्गाच्या कुशीत वसलेले गाव. हे ठिकाण फ्रान्समध्ये असले तरीही सगळीकडे स्विस फ्रॅंक्स किंवा फ्रेंच फ्रॅंक्स दोन्हीही चालतात सगळे चलन वलन गोठवून टाकणारी थंडी होती. धुकं तर इतकं दाट की चार पावलावरचेही दिसत नव्हते. एका रेस्टॉ-रंटच्या उबेत शिरून कॉफी घेतली. अनेक हॉटेल्स व दुकानांतून चिकन भाजण्यासाठी रस्त्यावरच ठेवलेले होते. इतक्या सकाळी कुठून खाणार म्हणून शिखरावर जाऊन आल्यावर खायचे ठरवून केबल कारच्या स्टेशनपाशी आलो.

शिखरावर जाण्यासाठी प्रत्येकी ४४ स्विस फ्रॅंक्स तिकीट होते. धुके इतके प्रचंड होते की क्षणार्धात केबल कार धुक्यात दिसेनाशी होत होती. वरती जाऊन नुसते धुकेच बघायचे तर एवढे पैसे कशाला खर्च करा म्हणून आम्ही थंडीत दात वाजत असतानाही तसेच कुडकुडत खालती थांबलो होतो. उभे राहण्यासाठी शेड वगैरेही नव्हती. जावे की नाही याचा निश्चय होत नव्हता. तिकीट देणारा मोडक्या तोडक्या इंग्लीशमध्ये वरती ऊन असल्याची ग्वाही देत होता. वर जाऊन खाली आलेल्यांनाही विचारले असता खाणा-खुणांनी त्यांनी वर लखलखीत सूर्यप्रकाश असल्याचे सांगितले. पण धुक्याचा तो घनदाट थर बघून तिकीट काढण्याचा धीर होत नव्हता. बऱ्याच वाद-विवादानंतर डॉ. पटवर्धनांनी कोणीही नाही आले तरी एकट्याने जाण्याचा निर्णय जाहीर करताच आम्हीही त्याना साथ द्यायची ठरविली.

काचेची दारे असलेल्या केबल कारमध्ये बसून वरती जायला लागलो नि काही क्षणातच धुके खालती राहून चकचकीत सूर्यप्रकाश दिसू लागला. परत-ण्याचा मूर्खपणा न केल्याबद्दल बरं वाटलं. वर-वर, ऊंच-ऊंच जाताना दिसणारे

दृष्य अवर्णनीय होते. संपूर्ण पांढरा शुभ्र बर्फ पसरलेला आणि त्याखाली धुक्याच्या दुलईत लपेटलेले शॅमोनी. समजा केबल तुटली तर काय होईल हा विचार फक्त मधूनच अस्वस्थ करत होता. मधे एके ठिकाणी केबल कार बदलून Aiguille du Midi या ३८४२ मिटर्सवर असलेल्या ठिकाणी जाऊन पोचलो. शॅमोनी १०३० मिटर्स ऊंचीवर आहे. म्हणजे २८०० मिटर्स ऊंच या केबल कारने नेतात. इतक्या ऊंचीवर ही कशी उभारली असावी असा प्रश्न पडतो. मॉंट ब्लांक हे ४८०७ मिटर्स ऊंचीचे शिखर बघण्यासाठी येथे लाकडी प्लॅटफॉर्म बाधला असून येथून पुढे प्रत्यक्ष शिखरावर मात्र पायीच जावे लागते. मॉंट ब्लांक, पुढची चढण अगदी सोपी वाटावी इतके जवळ दिसत होते. पण येथेही ऑक्सिजन कमी पडणे म्हणजे काय ते जाणवत होते; मग वरती जाण्याची बात तर सोडाच. मला थोडी चक्कर यायला लागली. जेव्हा नशिबाने खिशात असलेल्या साखरेच्या पुडया पटापट खाल्ल्या तेव्हा बरे वाटले. वाटेत बर्फाचा बोगदा लागला. तोल सावरत दुसऱ्या टोकाला गेलो तो पलीकडे बर्फाचा नुसता महासागर पसरलेला. हे स्किइंग टनेल होते म्हणे. एकजण स्किइंगचे सामान घेऊन उभा होताच. या बोगद्यातून परतताना मात्र केवळ कॅन्व्हस शूज्वर बर्फावरून चालल्यामुळे पायातुन चांगल्याच मुंग्या यायला लागल्या. पाय बधीर झाले. शेवटी बूट काढून पाय चोळले व कॉफी घेतली तेव्हा बरे वाटले. ऊंचीचे परिणाम इतके दिवस नुसते वाचले होते आज प्रत्यक्ष अनुभवले. खाली परतताना धुक्याने पोबारा केला होता. त्यामुळे 'फॉल' नी नटलेले शॅमोनी फारच सुंदर दिसत होते. थंडीही थोडी कमी झाली होती. बारा वाजता वरती गेलो, खाली यायला दोन वाजून गेले.

आता कडाडून भूक लागली होती, पण सकाळी मांस भाजत असलेली सर्व दुकाने लंच टाईम संपल्याने बंद झालेली. कोठेही खायला मिळाले नाही. शेवटी नुसते निसर्ग सौंदर्य पिऊन पोट भरावे लागल्याने लगोलग असलेल्या दुपारी २॥ च्या रेल्वेने परतायचे ठरविले. सर्व युरोपभरच हिवाळा एक महिना पुढे गेल्याने शॅमोनीत निदान स्वच्छ सूर्यप्रकाश तरी मिळाला नाहीतर बर्फाशिवाय काहीही दिसले नसते. प्रत्येक ठिकाणी त्यांच्या जेवणाच्या वेळा संभाळाव्या लागतात. एकदा का ती वेळ चुकली की भुके मरा पण काही मिळणार नाही.

एवढ्या गाड्या बदलून जिनिवाला वेळेत पोचतो की नाही ही काळजी सकाळच्या चांगला अनुभव असतानाही पडली होती, पण दरवेळी पुढची गाडी तयार असल्याने वेळेत पोचायला काहीच अडचण आली नाही. शॅमोनीला गाडी सुरू होण्याआधी एका ७०–७५ वर्षांच्या गोऱ्या वृद्धेने डब्यात शिरल्या शिरल्या ' नमस्कार ' म्हणून शेजारी बसून हिंदीतून बोलायला सुरुवात करताच आश्चर्यच वाटले. ही होती A Maryla Falk नावाची D Lett Ph. D , D. Sc पदव्या विभुषीत फ्रेंच विदुषी. अतिशय बडबडी. आम्ही इंडियन बघून मुद्दाम येऊन गप्पा मारू लागली. ती कलकत्याला बरेच वर्षे प्राध्यापक म्हणून काम करत होती. तसेच पुण्याच्या भांडारकर इंन्स्टिट्यूटमधेही काही काळ होती. भारतीय संस्कृतीचा तिला इतका अभिमान की शॅमोनीतील आपल्या बंगल्याचे नाव तिने ' सावित्री ' ठेवले होते. भारतातील संस्कृत विद्वानात ती गार्गी—मैत्रेयी या नावाने ओळखली जाते म्हणे. भारतीयाबद्दलही तिला खूप प्रेम दिसले. इटलीतून माऊंट ब्लांकवर जायला असलेली ग्लेशिअर्सची राईड आम्ही परत इटलीत जाऊन काहीही करून घ्यावीच असा आग्रह तर तिने केला पण जर पैसे कमी पडत असतील तर स्विस फ्रँक्सही देऊ केले. भारताच्या राजकारणातही तिला फार रस. आणिबाणी तिला आवडली नाही म्हणून त्या काळात ती भारतात आली नाही म्हणे. श्री मोरारजी देसाई तिचे मित्र. म. गांधींना तिने युरोप दाखविलेले. गाडी सुरू होताच ही आमच्या डब्याबाहेर जाऊन पॅसेजमध्ये उभी राहून बोलू लागली, का तर तिचे जवळ सेकंड क्लासचे तिकीट असताना फर्स्ट क्लासमधे प्रवास करणे हा गुन्हा होता म्हणून. आम्ही सेकंड क्लासमध्ये बसून तिला आमच्या जागी बसण्याची विनंती केली. पण ती महा जिद्दी. सामान आमचेजवळ ठेऊन स्वतः सेकंडमध्ये जाऊन बसली. ही बाई चालली होती कोठे तर स्वतःच्या इमर्जन्सी ऑपरेशनसाठी हॉस्पिटलमधे ॲडमिट व्हायला. तातडीच्या शस्त्रक्रियेची इतकी गरज होती की सोमवारपर्यंत थांबण्यातही धोका होता असा तिच्या डॉक्टरने इशारा दिल्याचे जेव्हा तिने सहजतेने सांगितले तेव्हा दोन फूट उडायला झाले. माझ्या डोळ्यापुढे आपल्याकडे कितीही छोट्या ऑपरेशनसाठी जमलेला नातेवाईक, आप्ताचा सचिंत मुद्रांचा गोतावळा उभा राहिला. ही येवढी विद्वान वृद्धा, एकटी, ती सुद्धा रेल्वेने चालली होती. ऑपरेशननंतर खाण्यासाठी एका पिशवीत

थोडी द्राक्षे तेवढी घेतली होती. तिची ऑपरेशनबद्दलची तुच्छता मला इतकी धक्कादायक वाटली की न राहून मी तिला तुम्ही बरोबर कोणी सोबतीला का घेतले नाही असे विचारले. त्यावर ताडकन तिने दिलेल्या " I am old enough to take my own care " या उत्तराने मला अवाक् केले. हे अविस्मरणीय, अलौकिक व्यक्तिमत्व एकट्याने कसे जगावे याची शिकवण देऊन स्टेशन येताच आमच्याकडून सामान घेऊन निघून गेले; पण माझ्या मनात खळबळ माजवूनच !

संध्याकाळी हॉटेल पॅक्स ते जिनिवा स्टेशनपर्यंतचा रस्ता थोडा ट्रॅमने व उरलेला अवजड सामान तोलत पार केला. जिनिवा लेकमधील इतक्या थंडगार पाण्यातही अनेक काळी पांढरी बदके (swans) मुक्तपणाने संचार करत होती गार थार, अथांग सरोवर, त्यावर तरंगणारे असंख्य स्वानस्. नजर खिळवून ठेवणारे दृष्य होते.

अशीच अजून एक वेड लावणारी गोष्ट म्हणजे घड्याळांची दुकाने इतक्या अगणित प्रकारांची घड्याळे होतीं की नुसते बघतानाच थकायला होत होते. सिलेक्ट करताना काय अवस्था होत असेल याची कल्पनाही करवत नाही. घड्याळांचे इतके वेगवेगळे आकार, प्रकार अमेरिकेतही बघायला मिळाले नाहीत. इलेक्ट्रॉनिक वॉचेस् मात्र कुठे दिसली नाहीत. बांगडी, नेकलेस, अंगठीतील हिऱ्यामधे मढविलेली घड्याळे बघून पैसे घेऊन येथे फक्त घड्याळ खरेदीसाठीच यावे असे वाटले. किमतीही तशा विशेष नव्हत्या. आम्ही बिघडले, वाया गेले तरी वाईट वाटायला नको म्हणून स्वस्तात स्वस्त ( १० स्विस फ्रॅंक्स ) असे एक कु-कू वॉल वॉच घेतले. जिनिवात १० फ्रॅंक्समध्ये एकवेळ पोटभर जेवता देखील येत नाही पण घड्याळ मात्र मिळते. रात्री पुन्हा एकदा अन्नदात्या मॅकडोनाल्डस्ला भेट देऊन ॲमस्टरडॅमला जाणाऱ्या गाडीत पथाऱ्या पसरल्या.

* * *

# ॲमस्टरडॅम

## रविवार २९ ऑक्टोबर

सकाळी साडेनऊचे सुमारास आम्ही ॲमस्टरडॅम या हॉलंडच्या राजधानीला पोचणार होतो. रविवार असल्याने प्रेक्षणीय स्थळे कितपत बघता येतील याबद्दल जरा शंकाच होती. अजून एका गोष्टीची बेचैनी होती; ती म्हणजे या देशाचा व्हिसा. आम्हाला इतर युरोपियन देशांचे तीन महिन्याचे व्हिसा दिले होते पण बेनेलक्सचा फक्त एक महिन्याचाच ( २१ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर ) व्हिसा होता. ही गोष्ट मी ज्या प्रवासी कंपनीकडून व्हिसा काढून घेतले त्यांच्या पुण्याच्या एजंटच्या निदर्शनास आणून दिली होती. पण त्यांनी त्या वेळी बेनेलक्सचा ( बेल्जियम, नेदरलँडस्, लक्झेनबर्ग या तीन देशांचा एकत्र व्हिसा देतात ) नेहमी फक्त एकच महिन्याचा व्हिसा देतात म्हणून वेळ निभावून नेली होती. आम्हीही त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवला; आज डॉ पटवर्धनांचे बेनेलक्सचे व्हिसा बघितले तर ते तीन महिने मुदतीचे. आता त्या एजंटची थाप लक्षात येऊनही काही उपयोग नव्हता. नेदरलँडस् सुरू झाल्यावर व्हिसा चेकरला काय जबाब द्यावा यावर आमचा वादविवाद सुरू झाला. शेवटी ही चूक आपल्याला माहितच नाही असा अज्ञानी भाव आणायचे ठरविले. बॉर्डर क्रॉस केल्या केल्या गोरापान, उंचापुरा, धिप्पाड, स्मार्ट, कडक युनिफॉर्म मधील चेकर आला. आम्हाला वाटले एखादे वेळेस याच्या काही लक्षातही येणार नाही व आपण तसेच सुटून जाऊ. पण कसचे काय ! व्हिसा बघताक्षणीच त्याने सुनावले, "तुमच्या व्हिसाची मुदत संपलेली आहे. तुम्हाला पुढच्या स्टेशनवर उतरून नवीन व्हिसा काढल्यावरच पुढे जाता येईल." आम्ही " दोन्ही व्हिसा एकदम काढले असल्याने असे कसे झाले कोण जाणे. हे आम्हाला आत्ताच कळतंय. आम्ही ॲमस्टरडॅमला मुक्कामही करणार नाही " यासारखी खूप सारवासारव करून पाहिली पण व्हिसाची मुदत वाढवून देणे त्याच्या हातात नव्हते. हॉलंड बघायचा असेल

तर तुम्हाला पुढच्या स्टेशनवर उतरावेच लागेल, असे त्याने सांगितल्यावर गाशा गुंडाळण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. आम्हाला वाटलं, झालं आता दिवस-भर आपल्याला हे लोक रखडवणार नि पुरा दिवस वाया जाणार. आम्ही आणि नाईलाजास्तव आमच्याबरोबर प्रदीप-रेखा अर्नहेम स्टेशनवर उतरलो. तेथील ऑफिसमधील एका माणसानेच हॉरीबल इंग्लिशमध्ये व्हिसासाठीचा फॉर्म भरला. रविवार असल्याने तेथे कोणीच ऑफिसर नव्हता म्हणून त्याला हेगला फोन करून परवानगी काढावी लागली. हे सर्व त्याने फक्त अर्ध्या तासात करून ॲमस्टरडॅमला जाणाऱ्या एका फास्ट गाडीचा मार्ग दाखविला. इतक्या तत्परतेने केलेल्या झटपट हालचाली पाहून उतरण्याची झालेली कटकट विसरून साडेदहाचे सुमारास आम्ही ॲमस्टरडॅमला पोचलो देखील.

वाटेत हॉलंडचा अतिशय सुंदर निसर्ग; चहूकडे हिरवीगार कुरणे, त्यात चरणाऱ्या गाई, इ. बघायला मिळाले. भूगोलात वाचलेली हॉलंडभोवती असलेली भिंत आठवली. मला असे वाटत होते की या सबंध देशाभोवती भिंत असून तिच्या कडेवर मधून मधून पाणी काढण्यासाठी विंड मिल्स आहेत. पण ही कल्पनाच ठरली. सबंध नेदरलॅंडस् समुद्रसपाटीपासून खाली आहे की नाही ते नुसत्या डोळ्यांनी तरी दिसत नाही. पण या प्रकारच्या भिंति ( Dykes ) असलेली थोडीच ठिकाणे शिल्लक राहिल्याने त्यांना आता ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. ॲमस्टरडॅम पासून अशी जवळात जवळ डाईक १०० मैलावर होती; परंतु जवळ जवळ सगळ्या साइट सिईंग टूरस् सकाळी १० व दुपारी १।।–२ ला निघत असल्याने तिचा नाद सोडावा लागला. जी गोष्ट डाईक्सची तिच गोष्ट विंड-मिल्सची. ॲमस्टरडॅमच्या जवळच असलेल्या खेड्यात पूर्वी ७०० विंड मिल्स होत्या. त्यापैकी आता फक्त पाचच शिल्लक आहेत. खुद्द ॲमस्टरडॅमध्येही एक विंड मिल आहे.

ॲमस्टॅरडॅम स्टेशन बाहेरच खूप मोठे टूरिस्ट इन्फॉर्मेशन सेंटर आहे. साईट सिईंग टूरस्ची सकाळची वेळ टळल्याने व अपेक्षेप्रमाणे रविवार म्हणून सर्व बंद असल्याने कंडक्टेड टूर न घेता Go-as-you-like हे ट्रॅम व बसला चालणारे तिकीट काढून शहरातून आपले आपण भटकायचे ठरविले.

ॲमस्टरडॅम अतिशय सुंदर शहर आहे आणि तितकेच महागही. खाण्या-साठीही खिसा खूप रिकामा करावा लागतो. या शहराला सुमारे साठ काल्व्यांनी

वेढलेले असल्याने याला उत्तरेकडील व्हेनिस म्हणतात. इमारतीही अगदी नेटक्या. रेसिडेन्शियल फ्लॅटस्च्या ३–४ मजली, लाबंचे लांब बिल्डिंगज्ही रस्तोरस्ती दिसतात. तरीही जमिनीची किंमत खूप असल्याने व फ्लॅटमध्ये रहाणे महाग पडते म्हणून अनेक लोक कालव्यांतील हाऊस बोटींतून पाण्यात राहतात. सबंध शहरभर अनेक बागा, क्रीडांगणे पसरलेली आहेत. सगळ्या गार्डन्स विविधरंगी फुलांनी बहरलेल्या. सगळं हॉलंडच तसे हिरव्या गालीच्या वर बसल्या सारखे आहे. येथील चीझ तर जगप्रसिद्ध आहेच. चीझ फॅक्टरी, डायमंड कटिंग फॅक्टरी ही बघण्यासारखी ठिकाणे रविवार असल्याने हुकली व फार निराशा झाली. वाटेत लागलेले मादाम टुसाचे वॅक्स म्युझियम उघडे असूनही लंडनला बघितल्याने तसेच सोडले. सबंध शहर बस, ट्रॅम, नि चालत पालथे घालून दिवस घालवला. सर्वच गोष्टी इतक्या महाग की येथील लोकं तरी कसे जगत असावीत असा प्रश्न पडला. अनेक हॉटेल्स बाहेर लावलेल्या पदार्थांच्या किंमतीचे बोर्ड बघून, दहा हॉटेल्स हिंडून त्यातल्या त्यात स्वस्तातील एखाद्यात आत शिरावे लागत होते. समुद्रापलीकडे विमानातून अर्ध्या तासावर असलेल्या इंग्लंडमध्ये बरेचजण खरेदीला जातात म्हणे. अनेक सुंदर डॉल्स बंद दुकानांच्या विस्तीर्ण शो-केसमध्ये दिसत होत्या. रविवार असल्याने ॲमस्टरडॅममधून 'सुवेनिअर' म्हणून सुद्धा काहीही खरेदी न करता निमूटपणे म्युनिककडे जाणाऱ्या रात्री १० च्या गाडीत बसावे लागले.

* * *

# म्युनिक

**सोमवार ३० ऑक्टोबर**

जर्मनीबद्दल मला का कोण जाणे पण पहिल्यापासून फार आकर्षण होतं. सकाळी ९ चे सुमारास म्युनिकला उतरल्यावर त्या डॉएशलँडला पाय लागल्या-बद्दल धन्य वाटले. स्टेशनवरील टूरिस्ट इन्फॉर्मेशन काऊंटरवर जाऊन म्युनिकमधे काय काय बघण्यासारखे आहे याची माहिती व शहराचा नकाशा घेतला. युरोपमधे प्रत्येक मोठ्या स्टेशन्सवर ही इन्फॉर्मेशन सर्व्हिस असते. मुख्य म्हणजे तेथील माणसांना इंग्रजी येत असते. सामान लॉकरमध्ये टाकून भ्रमंतीला सुरुवात केली.

प्रथम स्टेशनपासून चालत १०–१५ मिनिटावर असलेल्या ' मेरियन प्लाट्झ् ' या अगडबंड मार्केटिंग एरियात गेलो. या ठिकाणी एक चर्च असून त्याच्या टॉवरवर रोज सकाळी ११ वाजता म्युझिकल ठोके पडून नंतर मनुष्य-प्राण्याचे बाहुल्यासारखे छोटे पुतळे गोड संगीताच्या तालावर गोल फिरत नाच करतात. हे बघण्यासाठी मेरियन प्लाट्झ्च्या चौकात तुंबळ गर्दी उसळली होती. मेरियन प्लाट्झ् इतका प्रचंड मोठा शॉपिंग कॉम्प्लेक्स अजून तरी आमच्या पहाण्यात आला नव्हता. अनेक तऱ्हेची, विविध प्रकारची (काही अंडरग्राऊंडही) मोठ मोठी दुकाने येथे आहेत यात मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्स-पासून ते फूटपाथवर एक मार्केमधे अनेक वस्तू विकत देण्याचा सौदा पट-विणाऱ्यापर्यंत सर्वांचा समावेश होता. ' काऊफहॉफ् ' या अशाच एका प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये घुसलो. आतील वस्तूंची क्वॉलिटी व किंमत अमेरि-केत मिळणाऱ्या वस्तूंपेक्षा नक्कीच सरस. इंजिनिअरिंगची उपकरणे, पेन्सिली, चाकू जास्त स्वस्त; तर कापड, कपडे फार महाग वाटले. या दुकानात एक रेस्टॉरंटही होते. बाहेरही खाण्यापिण्याची अनेक हॉटेल्स, दुकाने, छोटे स्टॉल्स होते. तेथील लोक नॉनव्हेज जास्त खाताना दिसले. जर्मन बिअर तर जगप्रसिद्धच. बऱ्याचशा दुकानांतून फेसाळलेल्या बिअर ग्लासची मोठ-मोठाली मॉडेल्स गिऱ्हाईकाना खेचून घेण्यासाठी करून ठेवलेली होती.

पिण्याचे पाणी मात्र कोठेही नव्हते. सर्व जर्मनीतच प्यायचे पाणी कोठेही मिळत नाही. म्युनिकला येताना रेल्वेतही प्यायला पाणी विचारताच पाण्याची छोटी बाटली ५ मार्कसला विकत घ्यावी लागेल हे ऐकून आम्ही चाट पडलो. पिण्याच्या पाण्याला पैसे आणि ते सुद्धा मौल्यवान मार्कस् खर्च करण्याची कल्पनाही सहन झाली नाही. शेवटी आम्ही रेल्वेतील टाकीचे पाणी—जे दिसायला तरी अतिशय स्वच्छ होते—प्यायचे ठरविले. सर्व प्रवासभर टाकीचे पाणी पिऊनही आम्हाला काहीही झाले नाही. सगळीकडे थंडी असली तरी जन्मापासूनच्या सवयीने व सारखे भटकल्यामुळे प्यायला थोडे जास्तच पाणी लागत होते. पाण्याची सर बिअरला थोडीच येणार ? शिवाय बिअर तरी कुठे स्वस्त. टूरिस्टच्या दृष्टीने महागच.

आम्ही प्रत्येकी ५ डॉईश् मार्क दराचे बस, ट्रॅम, अंडरग्राऊंडला चोवीस तास चालणारे तिकीट काढले. हे तिकीट मिळणारी स्वयंचलीत यंत्रे फुटपाथ-वर आहेत. आम्हाला हवे असलेले हेच ते तिकीट याची पैसे टाकण्यापूर्वी खात्री करून घेण्यासाठी अनेकांना इंग्लीश येते का विचारण्याचा व्यायाम करावा लागला. बरोबर म्युनिकचा नकाशा होताच. त्यात अनेक ड्रामा थिएटर्स आढळली. आम्ही प्रथम बसने ' झू 'ला भेट द्यायला गेलो. ' झू ' खूप मोठे होते, पण तेवढाच मोठा प्रवेश फीचा आकडा वाचून आत न जाता बाहेरूनच बघायचे ठरविले. जिराफ, हत्ती वगैरे प्राण्यांना पिंजरे नव्हते. सर्व प्राणी माणसामधून रस्त्यांवरून हिंडताना दिसले. वेळ असल्यास आतून हिंडायला नक्कीच मजा येईल. बसने परत मेरियन प्लाटझला येऊन तेथे अस-लेल्या भल्या मोठ्या भाजी मार्केटमध्ये फ्लॉवर, मिरच्या, फळे खायला घेऊन शहराच्या दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन आलो. त्या दिवशी म्युनिकला इतकी बोचरी थंडी होती की कुडकुडत बागातून, रस्त्यांवरून हिंडण्यापेक्षा ट्रॅम्सच्या उबदार वातावरणात बसून शहर पालथे घालायचे ठरविले.

१९७२ सालचे ऑलिंपिक्स झालेले स्टेडियम बघण्याचे जरा उशीराच लक्षात आले. लगेच ट्रामने ' Olympiazentrum ' पर्यंत जाऊन तेथून मेट्रोने ( subway ) स्टेडियमपर्यंत गेलो. या ऑलींपिक्स गेम्ससाठी भुयारी रेल्वेच्या स्टेशनपासून सर्व गावच्या गाव मुद्दाम वसविलेले दिसत होते. म्युनिकची मेट्रो सुद्धा स्वच्छ, सुंदर नि फास्ट आहे. स्टेशनमधून बाहेर पडल्या पडल्या

लाल दिवा दाखविणारा ऊंच स्तंभ दिसतो. हाच ऑलिंपिक टॉवर. लांबून साध्या तंबूसारखी वाटणारी ही स्टेडियम्स प्रत्यक्षात अतिशय जाड पारदर्शक प्लास्टिक शिटस् मेटलच्या खांबांना ठोकून तंबूचा आकार दिलेली निघाली. इतके जाड व अवाढव्य फ्लास्टिक रूफ मी प्रथमच बघत होते. गरम पाण्याचा पोहण्याचा तलाव असलेले स्टेडियम बघितले. अनेक बाल, तरुण, वृद्ध स्त्री-पुरुष बाहेर जीवघेणी थंडी असूनही पाणी गरम असल्याने पोहण्याचा आनंद लुटत होते. सेंट्रल स्टेडियम तर अतिभव्य असून त्या बाहेर म्युनिक ऑलिंपिक विजेत्यांची नोंद चकचकीत प्लेटस्वर केलेली आहे. या ऑलिंपिक कॉम्प्लेक्सचा सबंध परिसरच हिरवागार, जवळ टेकडी, पाठीमागे नदी असा रमणीय आहे. आम्ही तेथे पोचेपर्यंत अंधार व्हायला आल्याने लवकर न आल्याबद्दल चुटपुट लागली. महायुद्धात बेचिराख झालेल्या जर्मनीने इतक्या मॉडर्न डिझाइनने बनविलेल्या स्टेडियममध्ये ऑलिंपिक्स घेऊन दाखविल्याबद्दल त्यांचे कौतुक वाटले. त्याचवेळी अरब माथेफिरूनी चार इस्त्रायली खेळाडू मारल्याबद्दल चीडही आली.

सबंध म्युनिकमध्ये महायुद्धाचे भग्न अवशेष, खुणा कोठेही बघायला मिळाल्या नाहीत. एवढी प्रगती, तीसुद्धा एक सबंध तरुण पिढी युद्धात कामी आली असताना हे जर्मन कसे करू शकले याचे खरोखरच कोडे पडते. हिटलरच्या काळातील ' गॅस चेंबर्स ' सारख्या गोष्टी म्युझियमच्या रूपानेही ठेवलेल्या दिसल्या नाहीत ( निदान टूरिस्टना तरी दाखवत नाहीत ). नवीन शहर अतिशय पॉश वसविले आहे.

स्टेडियमवरून मेरियन प्लाटझला परत आलो तो सर्व खाण्या-पिण्याचे स्टॉल्स, दुकाने बंद झालेली. जवळ जवळ सर्वच दुकानाना असलेल्या काचेच्या शोकेसेस मात्र अहोरात्र उघड्या असल्याने वेळ घालवायचे साधन शोधायला लागत नाही. सिल्हर-वेअर, चायना ग्लासेसचे अत्यंत महाग टीसेटस्, डिनर सेटस् यासारखी आर्टिकल्स अनेक दुकानांतून मांडलेली होती. दुकानांचा लक्षात राहणारा आणखी एक प्रकार म्हणजे ' सेक्स शॉप्स. ' म्युनिक व ॲमस्टरडॅम या दोन्ही ठिकाणी कृत्रिम सेक्स ऑरगन्स शोकेसेसमध्ये डिसप्लेसाठी मांडलेली अशा प्रकारची दुकाने मेन रोडवर, भर मार्केटमध्ये आढळली. आपल्याकडे अशी दुकाने जरी निघाली तरी त्यांच्याकडे मान खाली करून

तिरक्या नजरेने बघायची चांगल्या पुरुषांचीही छाती होणार नाही मग बायकाची तर गोष्ट सोडाच. त्या रस्त्यावर फिरायचीही चोरी. या दुकानांचे आत जायची गरज नसली तरी उत्सुकता म्हणूनही धैर्य झाले नाही. कदाचित सल्ल्याला फी पडत असेल. पण अशी दुकाने आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने बनविलेली सेक्सची साधने असतात हे मला तरी आजच कळले.

खायची सर्व लहान दुकाने, बेकऱ्या बंद झाल्याने आता मोठ्या रेस्टॉरंट-मध्ये कंटाळा आलेले तेच ते नॉनव्हेज पदार्थ खायला लागणार असे वाटत असतानाच भुयारी रस्त्यातील एका दुकानात पिझ्झाचा एक शेवटचा राहिलेला छोटासा तुकडा मिळाला. त्या दुकानातील वेटर्स आपापसात हिंदीत बोलत असलेले पाहून प्यायला पाणी मागितले तेव्हा कळले की म्युनिकमध्ये साधे पाणीच नाही. कोठेही पाणी मागितले असता मिळते मिनरल वॉटर ( सोडा ). म्हणजे पैसे देऊन विकत घेणे आले तोही म्हणाला " जर्मनीत पाण्याला पैसे पडतात. " इंडियन लोक पाण्याला नाही म्हणत नाहीत म्हणून की काय कोण जाणे पण त्याने ते मिनरल वॉटर फुकट दिले. मेरियन प्लाट्झच्या सबंध एरियात वहाने आणायला परवानगी नसल्याने चालतच भटकावे लागते. सकाळी जत्रेसारखा माणसांच्या गर्दीने फुलून गेलेला हा परिसर आता अगदी शांत झाला होता. मधून मधून स्ट्रिट सिंगर्स मात्र गर्दी जमवून गाताना, वाद्ये वाजवताना दिसत होते. बाहेर थंडीत हिंडण्यापेक्षा वेटिंग रूमच्या गरम वाता-वरणात पुढच्या गाडीपर्यंतचा वेळ काढावा म्हणून स्टेशनवर परत फिरलो. अंधार पडल्यानंतरचा हा वेळ काढणे मात्र आम्हाला महामुष्कील होऊन जात असे. सकाळी सामानाबरोबर चुकून कॅमेराही लॉकरमध्ये टाकला गेला हे बऱ्याच वेळाने लक्षात आल्याने पुन्हा स्टेशनवर जाऊन लॉकर उघडून म्हणजे पर्यायाने लॉकर उघडण्यासाठी परत पैसे खर्च करायचे जीवावर आले. त्यातून हवाही अति ढगाळ होती. त्यामुळे इतक्या सुंदर शहराचा एकही फोटो काढता आला नाही.

बर्लिनला जायची मला अति तीव्र इच्छा होती. दुसऱ्या महायुद्धानंतर बांधलेली ती ऐतिहासिक ' बर्लिन वॉल ', पूर्व-पश्चिम बर्लिनमधील दिसणारे वेगळे जीवन यासारख्या वाचलेल्या गोष्टी आपण काहीही करून प्रत्यक्ष बघितल्याच पाहिजेत असे मला नेहमी वाटत असे. इतक्या दिवसांची उद्या

इच्छापूर्ती होणार या खुषीत रात्री दहाला बर्लिनला जाणाऱ्या गाडीत चढून झोपायच्या तयारीला सुरुवात केली. गाडी सुरू झाल्यावर नेहमीप्रमाणे व्हिसा, पासपोर्ट, तिकीट चेकर्स आले त्या तिकीट चेकरने आमचे युरेल्चे पास व बर्लिनचा डबा पाहून सहज कोठे जाणार विचारले. 'बर्लिनला' कळल्यावर जर्मन भाषेत त्याने आम्हाला काहीतरी आवर्जून सांगितले. बाकी सर्वांनी त्याच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले पण डॉ. पटवर्धन मात्र अस्वस्थ झाले. त्यांनी त्या चेकरला परत शोधून आणले. तो काय म्हणतोय हे समजून घेण्याचा प्रयत्न केला असता कळले की युरेल्चा पास बर्लिनला चालत नाही. न्यूरेन-बर्ग या पश्चिम जर्मनीतील गावापर्यंतच या पासवर प्रवास करता येईल. तेथून बर्लिनपर्यंत वेगळे तिकीट काढावे लागेल. फर्स्ट क्लासची भाडी तेथेही सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर असल्याने बर्लिनपर्यंत फर्स्ट क्लासचे तिकीट काढायचे म्हणजे आमचे सर्व पैसे संपून गेले असते. आमच्यापुढे आता दोन पर्याय होते. एक सेपरेट तिकीट काढणे वा बर्लिनला विसरून न्यूरेनबर्गला उतरून दुसऱ्या ठिकाणी जाणे. न्यूरेनबर्गही रात्री दोन वाजता येणार होते. तेथून दुसरीकडे कोठे कनेक्टिंग गाडी आहे की नाही याची कल्पना नव्हती. समजा पुढे कोठे जायला गाडी मिळाली नाही तर इतक्या अपरात्री ते सुद्धा इंग्लिश न जाणणाऱ्या देशात हॉटेल शोधणे मुष्कील होते. बर्लिनपर्यंतचे तिकीट परवडणारे नसल्याने सारासार विचार करून तेथे जाणे रद्द केले.

सर्वच प्लॅन बिघडल्याने आता पुढे काय करावे या विवंचनेत बर्लिन न बघायला मिळाल्याचे दुःख विसरून गेलो. अगदी हवालदील झालो होतो. इतक्यात आऊग्सबर्ग स्टेशनवर गाडी थांबली आणि आमचा डबा यूरेल्च्या टाईमटेबल समोरच उभा राहिला डॉ. पटवर्धन पटकन उडी मारून उतरले व झरकन टाईमटेबलवरून नजर फिरविली असता त्यांच्या लक्षात आले की म्युनिक-कोपनहेगन ही Alpen express आऊग्सबर्गला ११ –१५ ला येऊन ११–२० ला सुटते. क्षणार्धात आम्ही निर्णय घेतला की आपण आता कोपनहेगनला जायचे आणि होत्या त्या अवस्थेत सुटे सामान बॅगात कोंबायच्याही भरीस न पडता पटापट प्लॅटफॉर्मवर उड्या टाकल्या. आम्हाला सावध केलेल्या चेकरला आम्ही न्यूरेनबर्ग ऐवजी चुकून आऊग्सबर्गला उतरलो वाटल्याने त्याने मुद्दाम येऊन 'हे' 'ते' स्टेशन नसल्याचे सांगितले. पण आम्ही आमचे

डेस्टिनेशन चेंज केल्याचे ऐकून तोही चकीत झाला. जर्मनीतील फ्रँकफूर्टला जायचा बेत ते जवळ असल्याने करता आला नाही, कारण हॉटेलमध्ये रहाण्याचे पैसे वाचविण्यासाठी रेल्वेत रात्र काढणे जरूरीचे होते कोपनहेगनला जावे की नाही असा विचार आम्ही आधीपासून करत होतोच आणि तेच आमच्या नशिबातही होते.

* * *

# कोपनहेगन

## मंगळवार ३१ ऑक्टोबर

सकाळी आठ वाजता हॅम्बुर्ग हे जर्मनीतील बंदर आले. त्यानंतर आमची रेल्वे जणू समुद्रावरूनच जात आहे इतक्या छोट्या पट्ट्यावरून धाऊ लागली पुटगार्टन स्टेशनवर सकाळी अकराच्या सुमारास पोचलो, आणि येथे चक्क संपूर्ण रेल्वेच्या रेल्वे समुद्र ओलांडण्यासाठी बोटीवर जाऊन उभी राहिली. आमच्या शेजारी अजून २ ३ रेल्वे उभ्या होत्या. शिवाय अनेक ट्रक्स, मोटारी वगैरे होत्या त्या वेगळ्याच. गोव्यामध्ये बस तराफ्यावर चढवून नदी क्रॉस केलेली पाहिली होती; पण येथे रेल्वे घुसविलेली बघून आश्चर्य चकित व्हायला झाले. बोटीला अनेक मजले होते. डेकवर खूप मोठे रेस्टारंट, नेहमी-प्रमाणे जास्तच महाग वस्तु मिळणारे ड्युटी-फ्री शॉप होतेच. त्यामधे चीझ व चॉकोलेटस्चे मात्र असंख्य प्रकार बघायला मिळाले. रात्रभर खायला न मिळाल्याने पोटात चांगलेच कावळे कोकलत होते पण बोटीवर खायचे पदार्थ खूप महाग असल्याने केवळ कॉफी-बिस्किटांवर भागवून कोपनहेगन येण्याची वाट बघत बसलो.

दुपारी दोनच्या सुमारास कोपनहेगनला पोचलो. झाडाचे खराटे झाले होते. सबंध युरोपभर हिवाळा पुढे गेल्याने बर्फ पडण्यासही सुरूवात झाली नव्हती त्यामुळे डेन्मार्क येवढे आकर्षक वाटले नाही. स्टेशनवर इनफॉर्मेशन काऊंटर कोठेही दिसला नाही त्यामुळे शहरामधे काय बघण्यासारखे आहे याची भाषेच्या अडचणीमुळे नीट चौकशीही करता आली नाही. टॅक्सीने शहरात फेरफटका मारण्यासाठी सांगितला गेलेला आकडाही अवाक्याबाहेरचा वाटल्याने निदान पोटभर खाऊन तरी घ्यावे म्हणून हॉटेलमधे शिरलो असता तेथील दर पाहुन माघारी फिरलो. शिवाय कोणत्या पदार्थाची ऑर्डर द्यावी हा प्रश्न होताच. शेवटी स्टेशनच्या जवळपास थोडे पायीच भटकून डिपार्टमेंटल स्टोअर तेवढे शोधून काढून खायचे पदार्थ खरीदले. हवा अति थंडगार, ढगाळ,

उदासीनता वाढविणारी होती. पुढे काय करावे याचा काहीच मार्ग न सापडल्याने मुक्काम करून खर्चात आणखी विनाकारण भर घालण्यापेक्षा पुढे सटकायचे ठरविले. स्वीडनला जायचा विचार तेथे जाण्यासाठी घ्याव्या लागणाऱ्या फेरी बोटीला युरेलच्या पास व्यतिरिक्त वेगळे पैसे द्यावे लागत असल्याने रद्द केला व दुपारी चार वाजता कोपनहेगनहुन निघुन दुसरे दिवशी सकाळी ८ वाजता पॅरिसला पोचणाऱ्या रेल्वेने परतायचा निर्णय घेतला. प्रत्येक ठिकाणी लागणारा भारंभार पैसा व इतके दिवस प्रवास केल्याने सर्वच गोष्टींची होणारी पुनरावृत्तीही या निर्णयाला कारणीभूत असेल. जेव्हा आपण खर्च केलेल्या पैशाचा हिशोब होऊ लागून त्याबद्दल आनंद न मिळता दुःख होऊ लागते त्याचवेळी मला वाटत प्रवाशाने माघारी फिरणे इष्ट. कोपनहेगनला तर नुसते भोज्याला शिवून आल्यासारखे झाले. निसर्गाचीही ट्रान्झिशन फेज असल्याने स्कॅंडिनेव्हियन देशांत निदान गाडीतून तरी बर्फ पडताना बघायला मिळेल ही सुद्धा अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. अखेर हिरमुसल्या मनाने कोपनहेगन-डेन्मार्कला रामराम केला.

* * *

# पॅरिस

## बुधवार १ नोव्हेंबर

पॅरी नॉर्डला सकाळी पोहोचलो. याच स्टेशनवरून लंडन म्हणजे पर्यायाने कॅलेला जाणारी गाडी सुटत असल्याने स्टेशनजवळील हॉटेलमध्ये रहाण्याचे ठरविले. जवळपासची बरीचशी हॉटेल्स धुंडाळून हॉटेल रिचमण्डला निवडले. एक बाई हे हॉटेल चालवत होती. डबल रूमचे भाडे होते दिवसाला ४५ फ्रेंच फ्रँकस्. आंघोळीसाठी मात्र वेगळे पैसे. हवे तितके वेळा आंघोळ करता यावी म्हणून एक रूम विथ बाथ व एक विदाऊट बाथ घेतली. आंघोळीला पैसे मोजावे लागत असल्यामुळे तेथील लोक आठवड्यातून एक-दोन वेळाच आंघोळ करत असावेत. आपण भारतीय ' आदतसे मजबूर ' असल्याने की काय पण कितीही गारठा असला तरी रोज आंघोळ केल्याशिवाय फ्रेश न वाटल्याने चैन पडत नाही.

गेल्या गेल्या लगेच त्या हॉटेलमार्फत ' Paris Vision ' या टूरिस्ट कंपनी बरोबर संपूर्ण पॅरिस दर्शनाच्या ट्रिपची तिकीटे रिझर्व केली. हॉटेलच्या मालकीणीला नाईट क्लबच्या तिकीट दराविषयी विचारले असता तिने स्वस्तात स्वस्त तिकीट प्रत्येकी १२५ फ्रँकस् असल्याचे सांगितले व वर " तुम्ही इतक्या लांबून आलात तर अगदी चीपेस्ट शो बघू नका " अशी मखलाशीही केली. पॅरिसचे जगप्रसिद्ध शो न चुकवायचा सल्ला अनेकांनी दिला होताच शिवाय पॅरिसच्या या नाईट क्लबज् बद्दल इतके वाचलेले, ऐकलेले होते की ते न बघता गेलो असतो तर सर्वांनी वेड्यात काढले असते. तिकीटाच्या रकमेचा एवढा मोठा आकडा ऐकून खिसा चाचपला असता शो बघायचे मोडे मनातच ठेवावे लागणार असे वाटू लागले. दुसऱ्या कोठल्या खर्चात काटछाट करता येईल का याचा हिशोब केला पण मार्ग दिसेना. ती बाई तर सारखी तुमचे शोसाठी बुकींग करू का विचारू लागली. का कोण

जाणे पण तिच्या धूर्त नजरेकडे पाहूनच ही काहीतरी थापा लगावतीय असा संशय आल्याने तिला " टूर संपवून आल्यावर सांगतो " असे सांगितले. ज्या ऑपेरा हाऊस या ठिकाणी आमची बस येणार होती व जेथे खायलाही स्वस्त मिळेल असे त्या बाईने सांगितले होते तेथे जाण्यासाठी चालायला सुरुवात केली.

हॉटेलपासून चालत फक्त दहा मिनिटावर आहे असे तिने सांगितलेले हे ठिकाण खूप वेळ तंगडतोड केली तरी येईना. रस्त्यावरील सर्व दुकाने All saints day असल्याने बंद होती. त्यामुळेही हे अंतर जास्तच भासत होते. वाटेत लागणाऱ्या काही उघड्या असलेल्या हॉटेल्समधून घुसत खायचे पदार्थ बघत होतो पण प्रत्येक ठिकाणी त्यांच्या आवाच्या सव्वा किमती बघून बाहेर पडावे लागत होते. शिवाय सगळीकडे सकाळी कधीतरी केलेले गारढोण पदार्थ मांडून ठेवलेले. ते थंडीत खायची कल्पनाही करवत नव्हती. इतक्यात बहुदा आमचे आपापसातील बोलणे ऐकून एक भारतीय तरुण आपणहून आमच्या बरोबर गप्पा मारत चालू लागला. ' अमर मखिजा ' त्याचे नाव. त्याचा म्हणे गारमेंटस् एक्सपोर्टचा बिझिनेस असल्याने वर्षातून कमीत कमी एक वेळा त्याला युरोपची ट्रीप करावीच लागत असे. दुकाने बंद असल्याने त्याला आज इकडून-तिकडे भटकत वेळ काढावा लागत होता. पॅरिसला तो अनेक वेळा आला असल्याने त्याने आम्हाला पॅरिसबद्दल खूपच उपयुक्त माहिती दिली. त्याच्याकडून असे कळले की ' फॉलीस बर्जर ' शो चें थिएटर आमच्या हॉटेलपासून अगदी जवळ आहे व त्याचे तिकीटही ५० फ्रँकस्च्या आसपास असेल. हा दर आमच्या खिशाला परवडणारा असल्याने मखिजा म्हणजे देवदूतच भेटल्यासारखे वाटले व हॉटेलवालीची लबाडी उघडी पडली. मला वाटत हॉटेलवाल्यांचे असे शो रन करणाऱ्यांशी लागेबंधे असावेत. एक दोन दिवस येणारे नवखे त्यांच्या जाळ्यात नक्कीच फसत असणार.

अर्धा तास चालल्यावर एकदाचे ऑपेरा हाऊस आले. तेथे असलेल्या हॉटेलमधील बाईने रेकमेंड केलेल्या हॉटेलात गेलो. तेथील पदार्थ स्वस्त तर नव्हतेच, पण भाषेअभावी एखादा पदार्थ गोड, तिखट का आंबट हेही कळायला मार्ग नव्हता. काचेच्या कपाटात मांडलेल्या पदार्थांचे केवळ बाह्यरंगरूप पाहून अंदाजाने ' ते द्या सांगितले. व्हिएटनामी ऑम्लेट व दुसरा भज्यासारखा दिसणारा पदार्थ घेतला. हे ऑम्लेट म्हणजे भाकरीत मोडाची मटकी

भरलेली. त्याला ना तिखट, मीठ, मसाला ! पोटात कडकडून भूक असूनही काहीही खावसं वाटलं नाही. त्या हॉटेलमध्ये मीठ मागितले असता वजनावर विकत घ्या म्हणून सांगितले. इतक्या थंडीत गारढोण, बेचव ( आपल्या दृष्टीने ) पदार्थ हे लोक तरी कसे खात असावेत याचे मला नवल वाटले.

ऑपेरा हाऊसमधे नृत्य, नाट्य, संगीत ॲकॅडमी आहे. येथून एका बसने आम्हाला Rue the Revoli येथे असलेल्या ' पॅरिस व्हिजन ' च्या ऑफीस-पाशी आणून सोडले. वेगवेगळ्या भाषांतील कंडक्टेड टूरस् होत्या. चहूबाजूने काचेच्या खिडक्या असलेल्या कंपनीच्या दुमजली बसमधे स्थानापन्न होऊन सकाळी अकरा वाजता पॅरिस दर्शनाला सुरुवात केली. बसमधे बाहेरची माहिती देण्यासाठी सतत रेकॉर्डेड कॉमेंट्री सुरू होती. रू दि रिव्होली येथे प्रचंड मोठे गार्डन असून त्या शेजारीच भरपूर कारंजी व उंच विजयस्तंभ असलेला मोठा चौक आहे.

' आयफेल टॉवर'पाशी पहिला स्टॉप होता. येथेही अवाढव्य गार्डन, कारंजी आहेत. आयफेल टॉवरच्या वर लिफ्ट अगर जिन्याने जाता येते. एकूणच पॅरिसमध्ये इतक्या बागा नि कारंजी आहेत की आंघोळीच्याच पाण्याचे येथे इतके दुर्भिक्ष का असावे याचे कोडे मला पडले. या बसने आम्हाला पॅरिसच्या लहानमोठ्या रस्त्यांवरून, सीन नदीच्या काठाने खूप भटकविले. न्यूयॉर्कला असलेल्या स्टॅच्यू ऑफ लिबर्टीची छोटी प्रतिकृति सीन नदीवरील एका ब्रीजकाठी आहे. Arch of Triumph ही अति प्रचंड कमान. येथूनच नेपोलियनने व्हिक्टरी मार्च केला. पॅरिसचा हा भाग मोठमोठ्या शॉपिंग सेंटर्सनी गजबजलेला. अनेक ट्रॅकचे रस्ते, फुटपाथ गर्दीने भरलेले. न्यूयॉर्कसारखे पॅरिसही चालत हिंडण्यात नक्कीच मजा आली असती. युनेस्कोचे ऑफीस, मिलीटरी ॲकॅडमी, अनेक चर्चेस यासारख्या गोष्टी बाहेरून दाखवून अरूंद रस्त्याच्या टेकडीवरील Basilica of the Sacre-Coeur in Montmarte येथे उतरविण्यात आले. ' ऑल सेंटस् डे ' असल्याने चर्चमधे आत खूप गर्दी होती. बाहेर वेगवेगळ्या कलाकारांची आपल्या कलेचे प्रदर्शन करणाऱ्या छोट्या छोट्या दुकानांची बाजारपेठच होती. अनेक पेंटिंग्ज वगैरे विकायला होती. त्यांच्या किमती अर्थातच आम्हाला तरी न परवडण्या सारख्या होत्या. या टेकडीवरून पॅरिसचे दृष्य मात्र फारच

अप्रतिम दिसत होते. झोंबणार गार वार वहात असल्याने लवकरच बसच्या उबदार वातावरणात जाऊन बसलो. बसमध्ये अमेरिका-युरोपचा एकट्याने प्रवास करणारा एक भारतीय भेटला. जवळ जवळ सर्व पॅरिसभर फिरवून संध्याकाळी परत ऑपेरा हाऊसला आणून सोडले.

ऑपेरा हाऊस समोरील रस्त्याचे फुटपाथ फेरीवाले नि पादचारी यांच्या गर्दीने चालणेही मुष्कील व्हावे इतके ओसंडत होते. तेथून जवळच असलेले फॉलीस बर्जेर शोचे थिएटर शोधून काढले. शो रात्री ८॥ चा होता, तर तिकीट विक्री रात्री ८ ला सुरू होती म्हणून हॉटेलवर परत आलो.

दिवसभरचा शिणवटा मस्तपैकी गरमागरम पाण्याने आंघोळ करून घालवावा म्हणून विजय प्रथम बाथरूममध्ये शिरला पण गिझरला तर गार पाणी. सकाळीच तेवढे गिझरला गरम पाणी येण्याची क्लृप्ती लढविली होती. पॅरिसने आमची चांगलीच दांडी उडविली. एक रूम विथ बाथ घेऊन काहीच फायदा झाला नाही. विजयने मात्र एवढ्या थंडीतही युरोपमध्ये दुसऱ्यांदा गार पाण्याने आंघोळ केली.

नंतर पॅरी नॉर्ड स्टेशन समोर असलेल्या विम्पीमध्ये ( मॅकडोनाल्डस्सारखे इंग्लंड-युरोपमध्ये आढळणारे आणखी एक रेस्टॉरंट ) चक्क गरमागरम हंबरगर व फ्रेंच फ्राइझ मिळाले. हंबरगर भाजताना त्यावर कांदा घालत असल्याने त्याला फारच सुंदर टेस्ट आली होती.

उदरभरण करून थिएटरवर गेलो तेव्हा आढळले की तिकिटाचे दर ५० फ्रँक्सही नसून सगळ्यात कमी दर २५ फ्रँकस् होता. आमच्या हॉटेलची मालकीण किती बनेल होती याचा प्रत्यय आला. ' पॅरिस व्हिजन ' च्या रात्रीच्या कंडक्टेड टूरस् मध्ये कॅबरे, लिडो, कॅन-कॅन, स्ट्रिप-टिझ या सारख्या गोष्टींचा अंतर्भाव असला तर मात्र त्याचे दर प्रत्येकी कमीत कमी १२० फ्रँक्स् पर्यंत असतात. The Lido हे पॅरिसमधील सगळ्यात मोठे कॅबरे रेस्टॉरंट असून तेथे इंटरनॅशनल शो होतात म्हणे. कंडक्टेड टूरस् पेक्षा प्रत्यक्ष थिएटरवर जाऊन तिकीट काढले तर मला वाटतं कमी दर असावेत. ' पॅरिस व्हिजन ' च्या पॅम्प्लेटमध्ये 'फॉलीस बर्जेर'चे नावही दिसले नाही. थिएटरही बोळकांड्यात होते. कार पार्किंगलासुद्धा जागा नव्हती. तेव्हा हा ' शो ' अगदी बोगस असेल की काय, तेथे येणारे लोक लोफर असतील की काय अशा शंका आत जाई-

पर्यंत भेडसावत होत्या. प्रत्येकी ३५ फ्रँकस्चे तिकीट काढून थिएटरमध्ये पाऊल टाकताच सगळ्या शंका पळून गेल्या. बाहेरून जुनाट वाटणारे हे थिएटर आतून इतके भव्य, प्रशस्त, ग्लॅमरस होते की डोळे दिपून गेले. एका सुंदर युवतीने स्वागत करून बसायच्या सीटस् दाखविल्या आणि त्या-बद्दल प्रत्येकी २ फ्रँकस् वसूल केले. सरचार्जचा हा अजबच प्रकार बघायला मिळाला. आमच्या सीटस् पहिल्या मजल्यावर स्टेजच्या अगदी जवळ पण कडेला होत्या.

'शो' बद्दल तर बोलायचीच सोय नाही. अपेक्षेपेक्षाही फॅन्टास्टिक सुंदर निघाला. अति कमी कपड्यातील तर कधी कधी संपूर्ण नग्न अवस्थेतील (फक्त अंगावरील चकमकते दागिने सोडून) २५–३० स्त्रिया एका वेळेस स्टेजवर नृत्याचे वेगवेगळे प्रकार करत होत्या. मधून मधून गाणीही होती. त्या बायकाही कपडे न घातलेल्या. वस्त्र विरहीत ॲडाम-ईव्हचा डान्सही झाला. पण हे सर्व एवढे कलात्मकतेने दाखविले होते की सर्वांना नेकेड बघून कधीही किळस आली नाही. एका वेळी अनेक बायकांचा स्नानाचा कार्यक्रमही स्टेजवर झाला. मिमिक्री मधून मधून होते. एका माणसाने अंगावरच्या कपड्यातून शीख, अरब व त्याचा घोडा, यासारखे १०-१५ प्रकारांचे विविध वेष करून दाखविले. बायकांचे झगमगते ड्रेसेस व त्याबरोबर सर्व मॅचिंग सेटस् तर मिनिटागणिक बदलत होते. ते पाहून एवढ्याश्या थिएटरमध्ये एवढे प्रचंड सामान कुठे ठेवत असतील याचा संभ्रम पडतो. नाचणाऱ्या सर्वच बायका सुंदर, गोऱ्या होत्या (निदान लांबून तरी वाटल्या). फक्त गाणारी नि नाचणारी एक बाई तेवढी काळी होती. पुरुष मात्र बाय-कांच्या मानाने फार खुजे वाटले. तीन तास कधी गेले ते कळलेही नाही इतके छान मनोरंजन केले. अक्षरशः स्वप्नात असल्यासारखे वाटत होते. अनेक एक-एकट्या बायकाही सहजपणे आलेल्या दिसल्या. म्हणजे तसे घाबरण्यासारखे काही नसावे. लास-वेगासला चुकला तरी पॅरिसला एक अप्रतिम शो आणि तोही स्वस्तात बघायला मिळाल्याच्या आनंदात बाहेर पडलो.

हॉटेलवर परतल्यावर रिसेप्शन काऊंटरपाशी असलेल्या व्हेंडिंग मशीन-मध्ये बिअर बॉटल घेण्यासाठी डॉ. पटवर्धनांनी पैसे टाकले. पण बाटली काही बाहेर आली नाही. मशिन नीट ऑपरेट होत नसेल म्हणून त्यांनी

रिसेप्शनिस्टला त्याविषयी सांगताच त्या रिसेप्शनिस्टने विजयकडून परत पैसे मागून घेऊन बाटली काढून दिली व मशिन बिघडल्याची तक्रार फेटाळून लावली. प्रदीपने पैसे किंवा बाटली मागताच तो प्रदीपच्या सांगण्यावर विश्वास ठेवायलाच तयार होईना. तो म्हणे एकतर तुम्ही पैसे टाकलेच नसतील किंवा खोटे टाकले असतील म्हणूनच मशिन ऑपरेट झाले नाही. अमेरिकेत ग्रेहाऊंडच्या छोट्या स्टँडवरील व्हेंडिंग मशिन असेच एकदा ऑपरेट झाले नाही तेव्हा बसच्या ड्रायव्हरने स्वतःजवळच्या किल्लीने मशिन उघडून आम्हाला आतील कोकचा डबा काढून दिला. हा अनुभव असल्याने आम्ही त्या रिसेप्शनिस्टशी पैसे परत देण्याबद्दल खूप वादविवाद घातला. शेवटी त्याने माझ्याजवळ या मशिनची किल्ली नाही; उद्या सकाळी मादाम आली की तिच्याजवळून घ्या म्हणून वळे मारून नेली.

**गुरुवार २ नोव्हेंबर**

सकाळचा ब्रेकफास्ट हॉटेलच्या दरातच समाविष्ट केलेला होता. आणि छानही होता. पॅरिसपासून १०० मैलांवर असलेला Versailles Palace फारच प्रेक्षणीय आहे. तेथे जाण्यासाठी युरेलचा पासही चालतो. दुपारच्या तीनच्या गाडीने लंडनला परतायचे ठरविले होते. पॅलेस बघायला गेलो असतो तर दुपारची गाडी तरी चुकली असती किंवा अजून एक दिवस पॅरिसला मुक्काम तरी करावा लागला असता. म्हणून तेथे जाण्याचा बेत सोडून दिला. अशा रितीने दीर्घ प्रवासामुळे अजून एक चांगले ठिकाण मुकण्याचा प्रसंग ओढवला. पॅरिसला आपली कोणाकडे रहायची सोय होऊ शकली नाही म्हणून परत एकदा वाईट वाटले. परंतु खिशाकडे बघणेही भाग होते.

सिटी बसने जगप्रसिद्ध लूव्हर् म्युझियमला जायचे ठरविले. म्युझियमचा स्टॉप आल्यावर सांगण्यासाठी अनेकांना इंग्लिश येते का म्हणून विचारावे लागले. हे लोक इंग्लिश जाणून बुजून तर बोलायचे टाळत नाहीत ना असा खरोखरच संशय येतो. 'लूव्हर्' हे आर्टस् म्युझियम इतके अवाढव्य आहे की नुसते ओझरते बघायचे म्हटले तरीही सहज आठवडा लागेल. म्युझियम बाहेर पाना-फुलांनी भरलेली; हिरवळीने आच्छादलेली प्रचंड मोठी बाग आहे. आत तिकिटासाठी इतकी मोठी रांग होती की एखादा तास सहज लागेल असे वाटले पण १०–१५ मिनिटातच आम्ही आत शिरलो.

प्रथम धावलो ते विश्वविख्यात ' मोनालिसाचे ' पोर्टेट बघायला. या गॅलरीतील इतर चित्राच्या मानाने हे चित्र छोटेच आहे. आर्टिस्टिक आय नसल्याने की काय पण यात एवढे खास काय आहे हे मात्र समजले नाही. अर्थात् शेकडो वर्षांपूर्वी, सायन्स एवढे प्रगत नसताना अगदी हुबेहूब (नॅचरल) स्किन कलर, नैसर्गिक स्मित हास्य इ. गोष्टी रेखाटणे ही किती अवघड कला असावी याचा विचार केल्यानंतर लिऑनार्डो दा व्हिन्सी च्या मोनालिसाचे महत्व अवाजवी नाही हे पटते. काळाचा विचार न करता नुसतेच आजुबाजूला बघितले तर राफेल, रॅमब्रॅण्डट यासारख्या अनेक जगविख्यात कलाकारांच्या चित्रकृति नजर खेचून घेतात. नेपोलियनच्या राज्याभिषेकावेळचे संपूर्ण भिंतभर नि अनेक व्यक्ती असलेले पोर्टेट ते दृश्य प्रत्यक्ष बघत असल्याचा आभास निर्माण करत होते. या चित्रातील प्रत्येक व्यक्तीच्या तोंडावरील भाव, डोळे इतके बोलके होते की सर्वच प्रसंग जीता-जागता वाटत होता. मोना लिसाच्या पोर्टेट समोर एक सेन्सिटिव्ह स्क्वेअर असून या चित्राचा इतिहास ऐकण्यासाठी पाहिजे त्या भाषेतील कॉमेंट्रीसकट हेड फोन तेथेच भाड्याने मिळतात. सेन्सिटिव्ह जागेत पाऊल टाकून हेडफोन कानाला लावला की मोनालिसा संबंधीची कहाणी सुरू होते. ही खरी व्यक्ती का काल्पनिक, बाई का बुवा, हे चित्र कोणी काढले यासारख्या गोष्टींबद्दल इतिहाससंशोधकात दुमत आहे. हे चित्र फक्त एकदाच पॅरिसबाहेर अमेरिकेत गेले होते. तेव्हा ते पहाण्यासाठी तेथेही रसिकांच्या रांगा लागल्या होत्या. पोर्टेटच्या या दालनात लहान-मोठी, वेगवेगळ्या प्रकारची इतकी चित्रे आहेत, की काय बघावे नि काय वगळावे ते कळत नाही. जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेले अनेक विद्यार्थी चित्रांचा तन्मयतेने अभ्यास करताना दिसले. कोणी चित्रांचा इतिहास लिहिण्यात मग्न तर कोणी कॅन्व्हस लावून हुबेहुब तशीच चित्रकृती रेखाटण्यात दंग. नंतर नेपोलियनची ' क्राऊन ज्युवेल्स ' बघून स्कल्पचर मध्ये जगात नावाजलेला ' व्हिनस-डि-मेलो ' चा पुतळा बघायला गेलो. हा हात तुटलेला बघून सामान्याला त्याची काहीही महती कळत नाही. या गॅलरीतही अनेक पुरातन कालीन संगमरवरी पुतळे होते. येथेही बऱ्याच शालेय विद्यार्थ्यांच्या ट्रिप्स आलेल्या दिसल्या. लूव्हर् म्युझियममधील या फक्त तीनच मुख्य गोष्टी बघून नि त्याबरोबर वाटेत दिसणाऱ्या इतरांवरून नुसती नजर फिरवून बाहेर पडलो

तरी दोन तास लागले. दुपारी तीनच्या गाडीने पॅरिस सोडायचे असल्याने बारा वाजता म्युझियमबाहेर पाऊल काढावेच लागले

पॅरिसमध्ये बस सर्व्हिस खूप महाग वाटल्याने जवळच असलेले ट्यूब स्टेशन गाठले. पॅरिसची अंडरग्राऊंड स्टेशन्स लंडनपेक्षाही जास्त स्वच्छ. स्टेशन्सवर गाड्यांच्या रूटस्‌चे लंडनसारखेच नकाशे लावलेले, पण ते सर्व फ्रेंच-मध्ये असल्याने कसेबसे समजाऊन घेतले व एके ठिकाणी गाडी बदलून पॅरिस नॉर्डला सुखरूप येऊन पोहोचलो तेव्हा हायसं झालं. ट्यूब रेल्वेला बससारखी टायर्सची चाके होती.

स्टेशनसमोरील फुटपाथवर ओल्या नारळाचे खोबरे, खारे काजू, खारे पिस्ते यासारख्या वस्तू खारे दाणे-फुटाण्यासारख्या विकायला बसल्या होत्या. विम्पीत जेवण करून हॉटेलमध्ये ठेवलेले सामान घेतले. खोल्या तर सकाळीच सोडल्या होत्या.

'मादाम'ला डॉ. पटवर्धनांनी काल घडलेली हकीगत सांगून बिअर बॉटल साठी घालविलेले पैसे परत मागितले. तर तिही बाई महा चालू निघाली. पैसे टाकलेच नसतील नाहीतर दुसऱ्या देशाचे खोटे टाकले असतील म्हणून बॉटल बाहेर आली नाही असे आरोप करू लागली. ते ऐकून डॉ. पटवर्धन अतिशय संतापले. इकडे गाडी सुटायची वेळ झाली पण ती वया काही नमेना. शेवटी आम्हीच डॉ. पटवर्धनांचा राग कसा बसा शमवून धावत पळत गाडीत येऊन बसलो. पॅरिसला येऊन एकही परफ्युम खरेदी केला नव्हता. स्टेशनवरील दुकानात बघितले तो त्याच्या किंमती खिशाला न परवडणाऱ्या होत्या. शेवटी परफ्युम्सचा नाद सोडून द्यायला लागला. पॅरिसमध्ये रहायची सोय असती तर कमीत कमी अजून एक दिवस तरी काढता आला असता म्हणजे व्हिक्टरी आर्क जवळील शॉपिंग सेंटर्स, रिव्होली, आयफेल टॉवर येथील गार्डनस्‌ यासारख्या ठिकाणी मोकळेपणाने पायी हिंडता आले असते ही रुखरुख मनात ठेऊन कलोनच्या दिशेने प्रयाण केले. संध्याकाळी पाच वाजता कलोनला पोहोचलो.

हॉवर क्राफ्टचा प्रवास हा एक वेगळाच अनुभव मिळणार होता. हॉवर क्राफ्ट पाण्यावर तसेच जमिनीवरही चालते. त्यासाठी वेगळे पोर्टस्‌ बांधलेले आहेत. पासपोर्ट-व्हिसाच्या तपासणीतून पार पडून समुद्राकाठी वाळूवर उभ्या असलेल्या हॉवर क्राफ्टमध्ये जाऊन बसलो. आत विमानासारखेच-खुर्च्या,

ड्युटी–फ्री वस्तू, हवाई सुंदरी–वातावरण होते. समुद्रावरून हवेच्या दाबावर भयानक मोठा आवाज करत, जेमतेम तीस मिनिटात आम्ही डोव्हरला पोचलो देखील. हेच अंतर काटायला बोटीने दोन तास लागतात वेळ वाचतो पण इतका प्रचंड आवाज करत हे जाते की शेजाऱ्याशी बोलणेही अशक्य होते. त्यामुळे हा कमी वेळातील प्रवासही सुखदायक वाटत नाही. म्हणूनच की काय हॉवर क्राफ्टस् एवढी लोकप्रियता मिळवू शकली नाहीत. पोर्टस् वगैरे बांधण्याचा एवढा खर्च करूनही आता म्हणे तोट्यात चालते म्हणून हॉवर-क्राफ्टची सर्व्हिस बंद करणार.

देश बदलल्याने डोव्हरला परत पासपोर्ट-व्हिसाचे चेकिंग होऊन रेल्वेने चेरिंग क्रॉस या लंडनमधील स्टेशनवर रात्री ८ वाजता येऊन धडकलो. पंधरा दिवसांचा युरोपचा पास पुरेल की नाही वाटत होता. पण तो फक्त ११-१२ दिवसच वापरूनही भरपूर बघितले. जेव्हा प्रत्येक ठिकाणी थोडा फार फरक वगळता फारच रिपिटेशन होऊ लागले व किती पैसे खर्च केले याचा ‘ रुपयात ’ हिशेब होऊ लागला तेव्हा लंडनला परतायचा निर्णय घेतला. पंधरा दिवसात अॅथेन्सलाही (ग्रीस) सहज जाऊन येता आले असते.

आम्ही गाडगीळांना शुक्रवार-शनिवारपर्यंत येतो सांगितले होते. पण दोन दिवस आधीच आणि ते सुद्धा रात्री इतक्या उशिरा परतलो होतो. त्रास द्यायला नको म्हणून “ जेऊनच घरी येतो ” असा चेरिंग क्रॉस स्टेशनवरून त्यांना फोन करताच “ आज भाऊबीज आहे. दिवाळीचा शेवटचा दिवस. तुम्ही बाहेर जेवणार असाल तर येऊच नका ” अशी त्यांची प्रेमळ ताकीद ऐकून त्यांचा आग्रह मोडविला नाही. ताबडतोब केंटीश टाऊनची वाट धरली. घरी गेल्या-गेल्याच कळले की आम्हाला सोमवारऐवजी रविवारची रिझर्वेशन्स मिळाली आहेत. त्यामुळे एक दिवस लवकर परतल्याबद्दल बरं वाटलं. अण्णाचे पत्र मिळाले. त्यातून मनालीला गालगुंड झाल्याचे कळताच थोडी बेचैनी आली. बाकी इतक्या लांबून काहीच करता येण्यासारखं नव्हतं. ज्या अर्थी परत तातडीचा काही निरोप नाही त्या अर्थी ती आता बरी असावी असा आराखडा बांधून समाधान मानायचा प्रयत्न केला. हेच पत्र जर युरोपचा प्रवास सुरू करण्याआधी मिळाले असते तर मात्र युरोपला जावे का भारतात परतावे याबद्दल द्विधा मनःस्थिती झाली असती.

ट्रिपबद्दल सतत गप्पा मारत योगर्टपासून घरी केलेल्या चविष्ट श्रीखंडावर आडवा हात मारला. १०-१२ दिवसांच्या गारदोण बेचव अन्नानंतर हे घरचे स्वादिष्ट जेवण अमृताहूनही गोड लागले.

* * *

# पुन्हा लंडन आणि भारत

## शुक्रवार ३ नोव्हेंबर

सकाळी उठल्या उठल्या पहिल्यांदा एअर इंडियाची लंडन-मुंबई व्हाया दिल्ली ही डायरेक्ट फ्लाईट कन्फर्म केली. दिल्लीला उगाचच २-३ तास वाया जाऊन अपरात्री मुंबईस पोचणार म्हणून थोडे वाईट वाटले भाऊजींना आधी सकाळी ११ वाजता मुंबईस पोचणाऱ्या फ्लाईटने येणार असल्याचे कळविले होते. हा बदल कळविण्यासाठी त्यांना परत एकदा मुलुंडला टेलिग्राम पाठविला व डॉ. पटवर्धनांकडे पुण्याला पाठविलेल्या टेलिग्राममध्ये आमच्या घरी निरोप देण्यास सांगितले. आता मुख्य काम म्हणजे प्रत्येकी २० किलो प्रमाणे ४० किलोत दोघांचे सामान बसविणे.

युरोपचा दौरा लवकर आटोपता घेतल्याने पैशाची थोडी बचत झाली होती; त्याची उधळण लंडनमध्ये खरेदी करून करायची ठरविली. युरोपमधील प्रत्येक देशातील नाण्याच्या रूपामध्ये थोडी थोडी करन्सी उरली होती. ती पौंडात बदलून घेण्यासाठी अनेक बँकांना विचारले पण 'नाणी' कोणी घ्यायला तयार होईना. प्रत्येक बँकेत 'नोटा असल्या तर बदलून मिळतील' हे उत्तर. हा अजब अनुभव होता. भारतात यासंबंधाने कोणीही मार्गदर्शन केले नव्हते. प्रत्येक ठिकाणी काहीही घेण्यासाठी नोट दिली की नाणी मोड म्हणून परत देत. त्यावेळी काहीही जाणविले नाही किंवा हे डोक्यातही आले नाही की या देशांच्या नाण्यांना त्या देशाबाहेर काहीच किंमत नसेल. तरी बरं, अति महागाईमुळे च पैसे खर्च करण्याचा मोह होऊ नये म्हणून आम्ही दररोज जास्तीत जास्त २० डॉलर्सचेच चलन घेत होतो. त्यामुळे खर्चावर आपसुकच बंधन येत असले तरीही प्रत्येक देशाचे थोडे चलन नाण्याच्या स्वरूपात उरलेच होते आता हे सर्व पैसे अक्कलखाती जमा करावे लागणार असे वाटत असतानाच 'थॉमस-कुक' या प्रवासी कंपनीच्या ऑफिसमध्ये नाणीही बदलून मिळतात असे कळले म्हणून पहिल्यांदा त्यांची कचेरी

गाठली. स्विस फ्रँक, जर्मन मार्कला जेवढयास तेवढा नाही तरी बऱ्यापैकी भाव मिळाला. पण फ्रेंच फ्रँक्स्, लिरा, क्रोनर वगैरे अक्षरशः मोडीच्या भावाने द्यावे लागले. थॉमस कुक कंपनीची युरोपभर ऑफिसेस आहेत, त्यामुळे हे पैसे चलनात आणायला त्याना काहीच त्रास पडत नसणार. या व्यवहारात कंपनी किती टक्के नफा उकळत असेल याचा विचार सुद्धास करवत नाही.

तेथून 'भवनिता' या साड्यांच्या दुकानाकडे मोर्चा वळवला. एका भारतीयाचेच हे दुकान होते. खूप प्रकारच्या साड्या होत्या. किमती मात्र अमेरिकेपेक्षा दुप्पट. शिवाय सर्व साड्या 'मेड इन जपान'. शेवटी प्रत्येकी ५ पौंडाच्या दोन बुळी साड्या खरीदून त्या मोहजालातून स्वतःची सुटका करून घेतली. 'गो ॲज यू प्लिज' पास आता नसल्याने शक्यतो चालतच हिंडायचे ठरविले.

युरोपमध्ये काढलेले फोटो ट्रॅफल्गार स्क्वेअरजवळील एका दुकानात लगेच डेव्हलप करून मिळतील असे समजल्याने तिकडे गेलो. पण दुसरे दिवशी शनिवार रविवारची सुट्टी असल्याने दुकानदाराने काम घेण्यास नकार दिला. अमेरिकेत काढलेल्या फोटोंचे सर्व रोल्स गाडगीळांच्या घराजवळील एका दुकानात डेव्हलपिंग, प्रिंटिंगसाठी दिले होते. इतके सुंदर प्रिंटस् काढले होते की 'पिक्चर पोस्ट कार्डच' वाटावे. प्रत्येक फोटोच्या पाठीमागे पोस्ट कार्ड छापलेले. म्हणजे तसाच फोटो मजकुरासकट कोणालाही पाठवता यावा. शिवाय एक रंगीत रोल डेव्हलप करायला दिल्यास एक रंगीत रोल बक्षीस हे खास आकर्षण. फक्त २५ पौंडात चार कलरड् रोल्स डेव्हलप, प्रिंट करून घेतले. वर चार कलरड् रोल्सचा बोनसही मिळाला. फोटोंची क्वॉलिटी अमेरिकेत डेव्हलप करून घेतलेल्या फोटोंपेक्षाही सरस होती हा आणखी एक विशेष.

रात्री जेवायला रेखाने अप्रतिम चिकन केले. चिकन इतके सॉफ्ट की केवळ पंधरा मिनिटात प्रेशर कुकर शिवाय तयार. गप्पांच्या मैफलीत लंडनच्या टेस्टी बिअरच्या साथीने त्याचा लगेच फडशा पाडला हे सांगायला नकोच. सोबतीला वाईटमन कपची (डेव्हीसकप प्रमाणे बायकांची टेनिसची स्पर्धा) फायनल टी. व्ही. वर चालू होती.

## शनिवार ४ नोव्हेंबर

आज पहिले काम केले म्हणजे बॅगा भरून वजन करून आणल्या. जुने अनावश्यक सामान फेकून देऊन चाळीस किलोत भागविण्यात कसे बसे यश मिळविले. सर्व घरभर अस्ताव्यस्त पसरलेले बरेचसे सामान आत गेल्याने गाडगीळांचे घर आता स्वच्छ व मोठे वाटत होते. लंडनमधील शेवटचा दिवस अगदी आरामात रमत-गमत काढायचा ठरविले.

गाडगीळांच्या घराजवळ स्वस्त मार्केटिंग एरिया असल्याने वेळ जायचा काहीच प्रॉब्लेम नव्हता. या भागाला ऑक्सफर्ड स्ट्रीटचे ग्लॅमर नाही पण टूरिस्टना मान वर करून बघता तरी येते. काल समोरच असलेल्या मार्क्स् अँड स्पेन्सर मधून मनालीसाठी सॉक्स, पेटीकोट, इत्यादी गोष्टी खरेदल्या होत्या. आज शनिवार असला तरी लहान दुकाने उघडी होती हेअर-पिनस्, बिस्किटस्, चॉकलेटस, शूस्, स्टेनलेसचे चमचे यासारख्या स्वस्तातील अनेक बारीक सारीक वस्तू घेऊन होते नव्हते तेवढे सर्व पैसे संपवून टाकले. मँचेस्टर जवळ असूनही कापड खूप महाग होते. फ्रेंच परफ्युम्स मात्र पॅरिस पेक्षाही स्वस्त होती. तसेच मॅक्स फॅक्टरची कॉस्मेटिक्सही फारच स्वस्त वाटली. दुकाने बंद होईपर्यंत मनसोक्त भटकून घेतले.

इंडिया हाऊस, भारतीय वकीलातीत ( पुण्याचे ना. ग. गोरे असल्याने ) जायचे मनात असून, ठरवूनही राहून गेले. तसेच लंडनमध्ये एक सिनेमा बघायची इच्छा त्यासाठी २॥–३ पौंड खर्च करायचे जीवावर आल्याने प्रत्यक्षात उतरविली नाही.

## रविवार ५ नोव्हेंबर

सकाळी दहाचे विमान असल्याने आठ-साडेआठ पर्यंत तरी विमानतळावर पोचायलाच पाहिजे होते. पहाटे लवकर उठून साडेसहा वाजता गाडगीळांच्या घराबाहेर पडायला सज्ज झालो. अंजली गाडगीळने कुंकू लावून हातावर दही देऊन अश्रूपूर्ण नेत्रानी त्यांच्या घरातून आमची पाठवणी केली. त्यांच्या या प्रेमाने भारावून जाऊन आमचाही पाय उचलताना जड झाला.

एवढं भलं मोठं अवजड सामान घेऊन कॅंटीश टाऊन स्टेशनवर गेलो तो स्टेशन बंद व बाहेर ‘ स्टेशन सकाळी ७-३० वा. उघडेल ’ असा बोर्ड. त्यानंतर

रेल्वेनी हिथ्रो एअरपोर्टवर जायला सहज १||-२ तास लागणार म्हणून रेल्वेच्या भानगडीत न पडायचा गाडगीळांनी निर्णय घेऊन क्षणार्धात टॅक्सीज् थांबविल्या. लंडनच्या टॅक्सीतही बसायचा अशा रीतीने योग आला. हिथ्रोवर जाताना लंडनचा न पाहिलेला सुंदर भाग बघायला मिळाला. रस्तेही खूप मोठे होते. ४-६ ट्रॅक्सचे, बरेचसे सरळ. आत्तापर्यंत गाडगीळांनी कसलेच पैसे घेतले नव्हते. उरले आहेत आता परत कोठे करायचे म्हणून कसे बसे वीस पौंड त्याचे हातात कोंबण्यात यश मिळाले. साडे-सात वाजताच विमान-तळावर पोहोचलो.

गेल्या गेल्या सामान चेक इन केले. चौघांचे सामान एकत्र वजन केल्याने विशेष जास्त भरले नाही. लंडनला ठराविक वजनापेक्षा जास्त वजनावर पडणारा प्रचंड टॅक्स ( Per excess kg २|| पौंड ) तिथल्या तिथे लगोलग भरावा लागतो आणि तो सुद्धा पौंडात. आम्ही मात्र टॅक्स न पडल्याने खूष होतो. लवकर आल्याने खिडकीजवळील सीटस्‌ही मिळाल्या. येथे एक ब्लॅंकेट हातातून नेता येत असल्याचे समजले तेव्हा अमेरिकेतून आपण स्वस्त नि मुलायम दुलया ( कंफर्टर ) अति इच्छा असूनही वजनाच्या प्रश्नामुळे न आणल्याबद्दल वाईट वाटले.

हिथ्रो एअरपोर्ट खूपच मोठा आहे. एअर इंडियाची व्हाया दिल्ली फ्लाईट असल्याने सरदारजी, सिंधी, पंजाबी बरेच दिसत होते. आता वेळ खूप वाटत होता. विमानही थोडे लेट होत. गप्पा मारत, विमानतळावर हिंडत वेळ काढला. साडे नऊ वाजता गाडगीळांचा निरोप घेताना गदगदून आले. इतक्या अल्प परिचयात इतके अगत्य कोणीच दाखविले नव्हते. शेड्यूल टाईमपेक्षा थोडे उशिरा म्हणजे सकाळी अकराचे सुमारास ‘ एम्परर राजेंद्र चोला ’ या तीनशेचे वर कॅपॅसिटी असलेल्या आमच्या जंबोने भारताकडे झेप घेतली.

हिथ्रोवर आजही चक्क छान सूर्यप्रकाश होता. लंडनला उतरताना, उडताना दोन्ही वेळेस चांगली हवा, तीही थंडीत मिळण्याचे दुर्मिळ भाग्य आमच्या वाट्याला आले. भूक सणकावून लागली होती. शाकाहारी जेवणही फारच टेस्टी होते. त्याचा समाचार घेईपर्यंत चिमुकलं इंग्लंड पार करून युरोपमधील आल्पस्‌ची बर्फाळलेली शिखरे कधी दिसायला लागली ते

कळलं देखील नाही. दिवस होता म्हणून खालचे सगळे स्वच्छ दिसत होते. मधूनच पायलट आपण कोणत्या देशावरून उडत आहोत हे सांगत होता. रात्र सुरू होतीय न होतीय तोवर दिल्ली ( रात्री १ वा. ) आली देखील.

मी दिल्ली अजून बघितली नसली तरी विमानतळाला विमानाचे पाय लागण्याचा योग आला. अर्थात दिल्ली एअरपोर्टवर उतरता आले नाही पण विमानाच्या शिडीवर उभे राहून नुसते लांबून दर्शन घेता आले. ऑफिसची इमारत मुंबईच्या तुलनेत अगदीच छोटी वाटत होती. निम्याच्यावर विमान दिल्लीला रिकामे झाले. आमचे बरोबर प्रवास करणाऱ्या एअर इंडियाच्या एका को-पायलटकडून विमानासंबधीच्या अनेक कुतुहल मिश्रित शंकाचे निर-सन करून घेतले. त्याला विनंती करून फर्स्ट क्लास प्रवाशासाठी कॉकपिट शेजारी असलेले खास लाऊंजही बघून आलो. फर्स्ट क्लासच्या खुर्च्या जास्त स्पेशस, आरामदायक, ड्रिंक्स फुकट, इत्यादी थोड्या खास सोईसाठी इकॉ-नॉमी क्लासच्या जवळ जवळ तिप्पट आकार द्यावा लागतो. मला वाटतं स्वतःच्या खिशाला कात्री लावून विशेष कोणी त्यातून प्रवास करत नसावे. केवळ दुसऱ्याच्या पैशाने प्रकारणारेच फर्स्टने जात असावेत. एअर इंडियाच्या जंबोच्या इकॉनॉमी क्लासच्या सीटस्मध्ये मात्र जरासुद्धा इकडे तिकडे करता येत नाही. जाड माणसं तर एखादे वेळी अडकूनच बसायची. खुर्च्यांची संख्या कमी करण्याची खरच आवश्यकता वाटते. एअर इंडियाचे रुचकर व्हेजिटेबल फुड व भाषा यामुळे बऱ्याचशा भारतीयांना एअर इंडियाचा प्रवास आवडतो. पॅन-ॲम मध्ये मोठमोठी चॉकोलेटस् देतील वाटले होते पण निराशा झाली; तर एअरइंडियानी रावळगावच्या छोट्या टॉफी-गोळ्या बसल्या बसल्या पुढे केल्या. मोठमोठ्या ग्लासेसमधून पाहिजे तेवढे फ्रुट-ज्युसेस, दूध, चहा, कॉफी यांची सुबत्ता पॅन-ॲममध्येच आढळली. परदेश प्रवास करणाऱ्यांना एअर-इंडियाच्या विमानात 'शिवास रिगल'ची व्हिस्कीची अर्धी बाटली ८ डॉलर्सना, तर डनहिल, केंट, या सारख्या प्रसिद्ध सिगारेटस् ४ डॉलर्सला १०० या दराने मिळत होत्या. सेंटस्च्या किमती मात्र जास्त वाटल्या.

बरेचसे प्रवासी उतरल्याने विमानात आता दोन सीटस्मधील हात वर करून झोपायलाही जागा झाली होती. मुंबई येईपर्यंत एक-दिड तास ताणून द्यायला चांगली संधी होती. पण आपण यशस्वी ट्रीप करून परत आलो

मनी भेटणार या एक्साइटमेंटमधे झोप कुठली यायला. पहाटे पाचला उठलेलो मुंबईलाही सकाळीच पोचणार. परत एक सबंध रात्र झोपेविना होऊनही वरी जायच्या अत्यानंदात डुलकी सुद्धा लागली नाही. मध्यरात्री ३-२५ चे सुमारास सांताक्रुझला उतरलो.

विमानात अगदी कमी प्रवासी असल्याने पासपोर्ट, कस्टमच्या कंटाळवाण्या सोपस्कारातून लवकर सुटका झाली. कस्टम्समधे सुदैवाने चांगला अधिकारी होता. त्याने विचारले, " काय काय आणले ?" आम्ही म्हटले, "अमेरिका-युरोप केवळ टूरिस्ट म्हणून जाऊन आलोत तेव्हा महाग काही आणायला पैसे तरी पाहिजेत ना ! " तेव्हा तो अधिकारी म्हणाला, " बाई साड्या किती आणल्यात? बायका म्हणजे साड्या तरी नक्कीच आणल्या असल्या पाहिजेत. " त्यावर मी म्हटल, " आणल्यात ५-६ ! " त्याने आमच्या सांगण्यावर विश्वास टेऊन सामानही न उघडता सोडलं. डॉ. पटवर्धनांना मात्र त्यांच्या बॅगज् उघडाव्या लागल्या. अर्थात आक्षेपार्ह काही आणले नसल्याने ड्यूटी भरावी लागली नाही. सर्व सोपस्कार केवळ अर्ध्या तासात संपले. बाहेर पडलो तो डॉ. खळदकर व डॉ. बाळ आगाशे स्वागताला हार घेऊन हजर होते. देशोदेशीचा प्रवास करून आल्यावर आपल्या लोकांना भेटण्यात केवढा आनंद साठविलेला असतो याचा प्रत्यय आला. डॉ. खळदकर त्यांची गाडी घेऊन आम्हाला न्यायला आले होते. भाऊजींचा मात्र अजून पत्ता नव्हता. डॉ. पटवर्धनांचे आई-वडिल व मुली त्याना न्यायला आल्याने त्यांचा एअरपोर्टवरच पुण्यापर्यंत निरोप घेतला.

डॉ. खळदकर नवीनच गाडी चालवायला शिकले असल्याने त्यांनी ड्रायव्हर आणला होता. त्यांच्या छोट्याश्या स्टँडर्डमध्ये पाच माणसे व चार मोठ्या बॅगज् कशा बशा बसविण्याची कसरत करून व भाऊजींची पाच वाजेपर्यंत एअरपोर्टवर वाट बघून प्रवासाच्या अखेरच्या टप्प्याला सुरुवात केली. वाटेत भाऊजींना मुलुंडला आम्ही आल्याचा निरोप सांगून पुढे जावे म्हणून त्यांचे-कडे गेलो तो ते " तुम्ही इतक्या लवकर कसे आलात ! आम्ही दहा वाजता एअरपोर्टवर तुम्हाला न्यायला येणार होतो " म्हणताच आमचा फ्लाइट चेंज झाल्याचा टेलिग्राम मिळाला नसेल असे वाटले. टेलिग्राम तर मिळाला होता, पण त्यांचा असा समज झाला की आधीच्या टेलिग्रामच्या कन्फर्मेशन-

साठी तो पाठविला आहे. दोन्ही टेलिग्राममधील फ्लाईट नंबर्स वेगळे आहेत हे त्यांनी न बघितल्याने आम्ही सकाळी ११।। वा. येणार या कल्पनेतच ते राहिल्याने हा घोटाळा झाला.

डॉ. आगाशे / खळदकरांना आमच्या अवेळी फ्लाईटमुळे रात्रभर जागरण झाल्याने त्यांनी भाऊजींकडे एक तास झोपायचे ठरविले. आम्ही दोघे मात्र आंघोळी करून फ्रेश झालो. चहा सांज्याचा नाश्ता करून सर्वजण निघालो. वाटेत गाडीचे चाक पंक्चर झाले होते ते रिपेअर करून घेतले. ठाणे सोडायला दहा वाजले. गाडी वजनाने भरली असल्याने फार जोरात जाता येत नव्हते. खंडाळ्याला 'स्टड'मध्ये जेवण घेतले. अमेरिका पुराण ऐकवत आणि येथील बातम्या जाणून घेत ४।। वा. पुण्यात पोहोचलो. डॉ. आगाश्यांना एन्. सी. एल्. कॉलनीत सोडले. त्यांच्याकडे चहा घेऊन संध्याकाळी ५ वा. हक्काच्या घरी येऊन मनालीला जेव्हा कडेवर घेतले तेव्हा प्रवासपूर्तीचा खरा निर्मळ आनंद मिळाला.

* * *

REFBK-0023327

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३३२७
शाखा